# वीरशैव तत्त्वदर्शन

श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

मराठी अनुवाद
डॉ. शे. दे. पसारकर

शोधप्रकाशन ग्रंथमाला- ९६

# वीरशैव तत्त्वदर्शन

काव्य-सर्वदर्शनतीर्थ, वेदान्ताचार्य, विद्यावारिधी, विद्यावाचस्पती
श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू

**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**

मराठी अनुवाद

**डॉ. शे. दे. पसारकर**
एम.ए., पीएच.डी.

**शैवभारती शोधप्रतिष्ठान**
जंगमवाडी मठ, वाराणसी

वीरशैव तत्त्वदर्शन (मराठी)
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी
मराठी अनुवाद : डॉ. शे. दे. पसारकर

Veerashaiv Tatva Darshan (Marathi)
Dr. Chandrashekhar Shivacharya Mahaswamiji
Marathi Translation : Dr. S. D. Pasarkar

ISBN : 978-93-82639-36-7

प्रकाशक :
शैवभारती शोधप्रतिष्ठान,
डी. ३५/७७, जंगमवाडी मठ,
वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१००१
दूरभाष : 07084321008

अक्षरसंयोजन :
सौ. उषा पसारकर
श्रीविश्वाराध्य अक्षररचना, 'पसारकर भवन',
केकतउमरा, ता.जि. वाशीम ४४४५०५
चरभाष : 09518599152

© प्रकाशक

मुद्रक :
बाबूराव कोरे, शिवानंद प्रिंटर्स,
J-34, एम.आय.डी.सी., कुपवाड ब्लॉक, सांगली ४१६४३६
स्थिरभाष : 0233 - 2643255

प्रथमावृत्ती : ४ मार्च २०१९ (महाशिवरात्री)

प्रती : १०००

मूल्य : रु. १२५/-

श्रीमत्काशीज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू

# डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

# आशीर्वचन



'वीरशैव तत्त्वदर्शन' हा मराठी भाषेतील अपूर्व ग्रंथ जिज्ञासू वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आतापर्यंत वीरशैव तत्त्वज्ञानाविषयीची समग्र माहिती मराठीत उपलब्ध नव्हती. ही मोठी उणीव या ग्रंथाद्वारे दूर होणार आहे. मराठी वीरशैव साहित्याचे गाढे अभ्यासक शिवकवी डॉ. शे. दे. पसारकर यांच्या प्रयत्नामुळे हे साध्य झाले आहे.

भारतीय आस्तिक दर्शनांमध्ये वीरशैवदर्शन हे आपल्या विलक्षण समन्वयात्मक भूमिकेमुळे विद्वज्जनांच्या गौरवास पात्र ठरले आहे. जगातील सर्व दार्शनिकांनी प्रामुख्याने ईश्वर, जीव, जगत्, बंध व मोक्ष या पाच विषयांवरील आपले चिंतन लोकांसमोर ठेवले आहे. या पाच विषयांवर पंचाचार्यांनी सर्वप्रथम सूत्ररचना केली, त्यांना 'पंचसूत्रे' म्हणतात. जगद्गुरू रेणुकाचार्यांनी महर्षी अगस्त्यांना 'पडविडिसूत्र' उपदेशिले. पडविडी म्हणजे पदविधी. परमपद प्राप्त करण्याचा विधी. यासाठी सर्वप्रथम सद्गुरूला शरण जावे लागते, हा या सूत्राचा अर्थ होय. जगद्गुरू दारुकाचार्यांनी दधीचि महर्षींना 'वृष्टिसूत्रा'चा उपदेश केला. वृष्टी म्हणजे पाऊस. आपापल्या कर्मांनुसार विविध योनींमध्ये जन्म घेण्यासाठी जीवात्मे वृष्टीद्वारेच पृथ्वीतलावर येऊन मातेच्या गर्भात शिरतात. हाच विषय सूत्ररूपाने जगद्गुरू दारुकाचार्यांनी या सूत्रात सूचित केला आहे.

जगद्गुरू घंटाकर्णाचार्यांनी महर्षी व्यासांना 'लंबनसूत्रा'चा उपदेश केला. लंब म्हणजे उन्नत, उंच, लांब. विश्वात ईश्वरतत्त्वच सर्वोच्च आहे, असे या सूत्रात ईश्वरतत्त्वाचे सूचन केलेले आहे. जगद्गुरू धेनुकर्णाचार्यांनी सानंद ऋषींना

'मुक्तागुच्छसूत्रा'चा उपदेश केला आहे. छत्तीस तत्त्वरूपी मोत्यांचा गुच्छ म्हणजे जगत्. हे समग्र विश्व छत्तीस तत्त्वांनी बनलेले आहे. या सूत्राद्वारे जगद्गुरूंनी जगत्स्वरूप सूचित केले आहे. जगद्गुरू विश्वकर्णाचार्यांनी महर्षी दुर्वासांना 'पंचवर्णसूत्रा'चा उपदेश केला. 'शिव एवात्मा' हे पाच अक्षरांचे सूत्र होय. जीव हा शिवस्वरूपच आहे, असा या सूत्राचा अर्थ होतो. या सूत्राद्वारे जीवाला जखडून टाकणारे आणवादी मलरूपी बंध आणि त्यांच्या निवारणाचे उपाय या सूत्रामधून सूचित केलेले आहेत. अशा रीतीने जगद्गुरू पंचाचार्यांनी पंचसूत्रांद्वारे वरील पाच प्रमुख दार्शनिक विषयांची सूत्ररूपाने मांडणी केल्यामुळे ती दर्शनक्षेत्रातील आद्यसूत्रे ठरतात. नंतरच्या काळात अनेक ऋषिमहर्षींनी आपापल्या दर्शनांची सूत्ररूपाने रचना केली. उदा.- सांख्यसूत्र, योगसूत्र, ब्रह्मसूत्र, भक्तिसूत्र इत्यादी. वरील पंचसूत्रे वीरशैवदर्शनाचा मूळ आधार असून याच सूत्रांच्या आधारे श्रीशिवयोगी शिवाचार्य, श्रीपतिपंडिताराध्य, नीलकंठ शिवाचार्य आदी आचार्यांनी श्रीसिद्धान्तशिखामणी, ब्रह्मसूत्र श्रीकरभाष्य, क्रियासार या ग्रंथांमधून वीरशैवदर्शनाची विस्तृत मांडणी केली आहे. या सर्व आचार्यांनी समन्वयसिद्धान्तावर अधिक भर दिलेला आहे.

पूर्वाचार्यांचा हा समन्वयसिद्धान्त आधुनिक पद्धतीने कथन करावा या विचाराने आमचा संस्कृत भाषेतील 'श्रीसिद्धान्तशिखामणिसमीक्षा (षड्दर्शनीय तुलनात्मिका)' हा पीएच.डी.चा प्रबंध पूर्ण झाल्यानंतर डी.लिट्. पदवीसाठी 'शक्तिविशिष्टाद्वैत-तत्त्वत्रयविमर्श:' हा विषय घेऊन आम्ही संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी येथील वेदान्त विभागामध्ये नोंदणी करून शोधकार्याचा आरंभ केला. या प्रबंधामध्ये वीरशैवसंमत शक्तिविशिष्टाद्वैतसंबंधानुसार ईश्वर, जगत्, जीव, बंध व मोक्ष या प्रमुख दार्शनिक विषयांवर द्वैताद्वैत श्रुतींचा समन्वय कसा होतो, हे विस्ताराने आणि शास्त्रोक्त पद्धतीने प्रतिपादन केले आहे. याशिवाय वीरशैव साधकाला त्याच्या साधनेमध्ये अत्यंत साहाय्यक असलेल्या अष्टावरणाचे विवेचन केलेले आहे. तसेच साधकाची अंतर्बाह्य परिशुद्धी सांभाळणाऱ्या पंचाचाराचे आणि त्यातील विविध शीलांची सविस्तर माहिती 'चंद्रज्ञानागमा'च्या आधाराने विशद केली आहे. त्याबरोबरच षट्स्थल साधनापद्धतीची माहिती देऊन 'सूक्ष्मागम' व

'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथांच्या आधारे अंगस्थल व लिंगस्थलातील १०१ स्थलांचा अत्यंत सूक्ष्म क्रमिक विकास होऊन जीव शिवस्वरूप कसा होतो, हे स्पष्ट केले आहे.

संस्कृत भाषेतील या प्रबंधाचा संस्कृत भाषातज्ज्ञांना उपयोग होत आहे, ही आनंदाची बाब होय. परंतु समस्त वीरशैवांना आणि जिज्ञासूंना याचा उपयोग कसा होईल, असा विचार आमच्या मनामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून येत होता. त्यासाठी डॉ. शे. दे. पसारकर यांना काशीला बोलावून घेतले आणि त्यांच्यासमोर हा विषय ठेवला. आमच्या शास्त्रीय परिभाषेतील संस्कृत प्रबंधाचा आशय सुलभ मराठीत कसा अनुवादित करता येईल, याबद्दल त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी हे कार्य सहर्ष स्वीकारले आणि केवळ पंधरा दिवसांत हा ग्रंथ सिद्ध झाला, हे पाहून आम्हालाही अत्यंत आनंद झाला.

डॉ. शे. दे. पसारकर २०१२ पासून वेळोवेळी काशीजंगमवाडी मठात येऊन राहिले. या काळात त्यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत', 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा', 'श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय', 'रेणुकगीताई' आदी मौलिक ग्रंथांची रचना केली. या रचनांमुळे मराठी वीरशैव साहित्य अधिक समृद्ध झाले आहे. प्रस्तुत 'वीरशैव तत्त्वदर्शन' हा ग्रंथदेखील मराठी वीरशैवांना अत्यंत उपयुक्त ठरणार असून यामुळे सर्वसामान्य वाचकांना सुद्धा वीरशैवांच्या दार्शनिक तत्त्वांचे संपूर्ण ज्ञान होणार आहे. डॉ. पसारकरांच्या मनामध्ये विविध प्रकारची भरपूर साहित्यरचना करण्याचा अपार उत्साह आहे. भविष्यकाळात त्यांच्या हातून मराठी वीरशैव साहित्य समृद्ध करणाऱ्या अधिकाधिक रचना व्हाव्यात, अशी शुभेच्छा बाळगून त्यांना शुभाशीर्वाद प्रदान करीत आहोत. त्यांच्या ग्रंथनिर्माणकार्यात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषाताई यांचे मोलाचे सहकार्य लाभते. लेखन सुरू असतानाच त्या संगणकीय अक्षरलेखन करतात. त्यामुळे ग्रंथ तत्काळ मुद्रणासाठी पाठवला जातो. या दांपत्याला जगद्गुरू विश्वाराध्य, काशीविश्वनाथ व माता अन्नपूर्णा उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य प्रदान करोत. त्यांच्या परिवारातील सर्व सदस्यांना सुखसमृद्धी प्राप्त होवो, हा मंगलाशीर्वाद!

**इत्याशिष:**

# भूमिका

'वीरशैव तत्त्वदर्शन' हा ग्रंथ पूर्ण होऊन मराठी बांधवांच्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. या ग्रंथलेखनाचा संकल्प करून २७ वर्षे उलटून गेली. म्हणून या ग्रंथाच्या निर्मितीमागचा इतिहास सांगणे आवश्यक आहे.

परमपूज्य श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी हे १७ नोव्हेंबर १९८९ या मंगल दिवशी काशीपीठावर विराजमान झाले. त्यानंतर १९९० मध्ये त्यांचे पहिले श्रावणमास तपोऽनुष्ठान सोलापूर येथील श्रीसिद्धेश्वर मंदिरात पार पडले. ७ जुलै १९९० रोजी पूज्य महास्वामीजींनी संपादित केलेला आणि डॉ. चंद्रशेखर कपाळे, वे.पं. शरणय्या शास्त्री व डॉ. शे. दे. पसारकर यांनी मराठीत अनुवादित केलेला 'सिद्धान्तशिखामणी' हा ग्रंथ (प्रकाशक : वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर) सिद्धेश्वर मंदिरात श्रीरंभापुरीजगद्गुरू प्रसन्नरेणुक वीररुद्रमुनी शिवाचार्य महास्वामीजी व श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी या जगद्गुरुद्वयांच्या अमृतहस्ते प्रकाशित झाला. ही नूतन श्रीकाशीजगद्गुरूंच्या भावी कार्याची जणू नांदीच होती.

याच काळात सिद्धेश्वर मंदिरात श्रीकाशीमहास्वामीजींनी महिनाभर केलेल्या कन्नड आशीर्वचनांचे वृत्तांकन मी सोलापूरच्या 'दै. संचार'मधून दररोज केले. ते एवढे गाजले की त्याचे पुस्तक करावे, अशी आग्रही मागणी लोकांकडून करण्यात आली. त्या वृत्तांकनावरूनच 'जन्म हा अखेरचा' या ग्रंथाचा प्रारंभीचा संक्षिप्त भाग सिद्ध करून तो नागपूरच्या वीरशैव भवनात डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते १९९१ मधील श्रावणमासात प्रकाशित करण्यात आला. पुढे 'जन्म हा अखेरचा' हा बृहद् लेखनप्रकल्प आकाराला येऊन सिद्ध झाला.

श्रीकाशीमहास्वामीजी काशीपीठावर अधिष्ठित होण्याआधीच आम्ही त्यांच्या संपर्कात आलो होतो. १९८८ मध्ये 'मन्मथशिवलिंग यांच्या 'परमरहस्य' या ग्रंथाचा सर्वांगीण चिकित्सक अभ्यास' हा शोधप्रबंध मी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे पीएच.डी. पदवीसाठी सादर केला होता. त्यावेळी वीरशैव तत्त्वज्ञान हा भाग लिहिताना माझ्यासमोर अडचण आली होती. कारण वीरशैव तत्त्वज्ञान स्पष्ट करणारा एकही ग्रंथ मराठीत उपलब्ध नव्हता. केवळ पं. काशीनाथ शास्त्रीजींच्या 'वीरशैवरत्न' या ग्रंथातील 'शक्तिविशिष्टाद्वैत' हे एकमेव छोटे प्रकरणच वीरशैव तत्त्वज्ञानावर उपलब्ध होते. त्याची भाषादेखील जुनी व कठीण होती. परंतु त्या प्रकरणाच्या आधारेच मी प्रबंधात वीरशैव तत्त्वज्ञानाची मांडणी

केली. माझी ही अडचण मी त्यावेळी पूज्य महास्वामीजींजवळ व्यक्त केली आणि मराठी वाचकांसाठी सोप्या भाषेत वीरशैव तत्त्वज्ञानावर एखादा ग्रंथ सिद्ध करावा, असा आग्रह धरला. त्याला त्यांनी संमती दर्शविली.

त्यानंतर १९९१ मध्ये एप्रिल-मे महिन्यांत पूज्य महास्वामीजींचे अधिकमास-अनुष्ठान प्रयागराज (अलाहाबाद) येथील जंगमवाडी मठात झाले. त्यांनी मला तेथे बोलावून घेतले. त्यावेळी 'वीरशैव धर्मदर्शन' या नावाने वीरशैव तत्त्वज्ञान स्पष्ट करणारा एक ग्रंथ सिद्ध करावा, असे ठरले. पूज्य महास्वामीजींनी त्यांच्या डी.लिट्. प्रबंधाच्या आधारे मला हिंदीमधून सांगावे आणि मी ते मराठीत लिहून काढावे, अशाप्रकारे 'अष्टावरण' हे प्रकरण महिनाभर चर्चा करीत लिहून झाले. ते काम तेवढ्यावरच थांबले. हे प्रकरण पुढे 'विभूतिवैभव' त्रैमासिकातून मी क्रमश: प्रकाशित केले. परंतु संकल्पित ग्रंथ पूर्ण करण्याएवढा वेळ मिळाला नाही. कारण 'जन्म हा अखेरचा' हा लेखनप्रकल्प पूर्ण करण्यात पुढील दहा वर्षे निघून गेली. या काळात 'वीरशैव धर्मदर्शन' हा ग्रंथ पूर्ण विस्मरणात गेला. महाविद्यालयातील अध्यापन, 'विभूतिवैभव' त्रैमासिकाचे संपादन, प्रापंचिक जबाबदाऱ्या आणि अन्य लेखन यांतच पुढील अनेक वर्षे खर्ची पडली.

सेवानिवृत्त झाल्यानंतर पूज्य महास्वामीजींच्या आज्ञेवरून २०१२ मध्ये मी काशीला गेलो, तेव्हा 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ रचण्याची आज्ञा झाली. तो ग्रंथ पूर्ण झाल्यावर पुढे क्रमश: 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा' (अभंगबद्ध), 'श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय' (ओवीबद्ध) आणि 'रेणुकगीताई' (अनुष्टुभ् छंदोबद्ध) हे ग्रंथ महास्वामीजींनी माझ्याकडून लिहवून घेतले. या सर्व धावपळीत पूर्वी केलेल्या लेखनसंकल्पाचा पूर्ण विसर पडला. गेल्या वर्षी (२०१८) ऑक्टोबरमध्ये काशीला असताना अचानकच त्या अपूर्ण ग्रंथलेखनाची आठवण झाली आणि पुन्हा पूज्य महास्वामीजी डी.लिट्.चा प्रबंध उघडून त्याआधारे बोलत राहिले अन् मी लिहीत गेलो. केवळ पंधरा दिवसांत 'अष्टावरण' वगळता अन्य प्रकरणे लिहून झाली आणि त्यावेळचा संकल्पित 'वीरशैव धर्मदर्शन' हा ग्रंथ आता 'वीरशैव तत्त्वदर्शन' या नावाने सिद्ध होऊन प्रकाशित होत आहे. इतक्या वर्षानंतर का होईना, पण एक जुना संकल्प पूर्ण झालेला पाहून अतीव समाधान वाटत आहे.

मूळ संस्कृत प्रबंध खूप विस्तृत असून त्यामध्ये अद्वैतवादी काश्मीरशैवदर्शन, द्वैतवादी सिद्धान्तशैवदर्शन आणि द्वैताद्वैतवादी वीरशैवदर्शन अशा तीन सिद्धान्तांची तुलना करून समन्वयवादी वीरशैवदर्शनाचे महत्त्व प्रतिपादन केलेले आहे. काश्मीरशैवदर्शनाचा

आभासवाद, सिद्धान्तशैवांचा सत्कार्यवाद आणि वीरशैवांचा अविकृत परिणामवाद यांची तुलना करीत या तिन्ही सिद्धान्तांतील ईश्वर, जीव, जगत्, बंध व मोक्ष या पाच दार्शनिक विषयांची पूज्य महास्वामीजींनी सविस्तर चर्चा केली आहे. त्यानंतर अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल या शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धान्तातील तीन तत्त्वांचा ऊहापोह केला आहे.

मूळ संस्कृत प्रबंधाचा यथामूल अनुवाद केला असता तर हा ग्रंथ विस्तृत झाला असता. परंतु मराठी वीरशैवांना वीरशैवदर्शनाचाच सविस्तर परिचय करून देणे आवश्यक असल्यामुळे वरील तीन सिद्धान्तांतील तुलनात्मक भाग प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केला नाही. त्यामुळे वीरशैव तत्त्वज्ञानाची सविस्तर मांडणी सुलभ रितीने करता आली. संस्कृत प्रबंधातील प्रकरणांची सारांशरूपाने सोप्या शब्दांत मांडणी या ग्रंथात केलेली आढळेल. 'वीरशैव म्हणजे कोण? त्यांचे तत्त्वज्ञान कोणते?' हे प्रश्न ज्यांना पडतील त्यांचे समाधान करण्याचे सामर्थ्य या ग्रंथात निश्चितच आहे. कारण परमपूज्य श्रीकाशीमहास्वामीजींच्या दैवी, साक्षेपी लेखणीतून अवतरलेला हा ग्रंथ आहे.

ग्रंथनिर्मितीला अनेकांचे हातभार लागलेले असतात. संस्कृतपंडित श्री. शिवाप्पा खके गुरुजी, चारठाणा यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. जंगमवाडी मठातील वास्तव्यकाळात मठाच्या प्रबंधिका श्रीमती नलिनी चिरमे वहिनींनी आमची सर्वतोपरी काळजी वाहिली. सर्वश्री. पंचाक्षरी लिगाडे, माधव स्वामी, शिवानंद व सौ. रंजना हिरेमठ, जगदीश व सौ. जयश्री सरूर, श्रीमती संगम्मा सालीमठ अशा सर्वांचे सहकार्य मिळाले. संगणकीय अक्षरलेखनाचे काम माझी पत्नी सौ. उषा हिने निर्दोषपणे केले. शिवानंद प्रिंटर्स, सांगली यांनी अल्पावधीत सुरेख मुद्रण करून दिले. या सर्वांविषयी कृतज्ञता.

प.पू. श्रीकाशीमहास्वामीजींच्या कृपाशीर्वादात मी अंतर्बाह्य चिंब भिजून गेलो आहे. त्यांच्याविषयी काय बोलावे? 'मन्मथ म्हणे फळा आले । मागील केले सुकृत ।।' या मन्मथमाऊलींच्या शब्दांचा प्रत्यक्षानुभव मी नित्य घेत आहे.

**पुन्हा गर्भवास हवा याचसाठी । घडावी कामाठी लेखनाची ।।**
**शिखरी जाण्यात नाही समाधान । पायरीचा मान माझ्याकडे ।।**

ही माझी भूमिका कायम आहे. सर्व वाचकांना कृतज्ञतापूर्वक वंदन!

'पसारकर भवन'
**शे. दे. पसारकर**
केकतउमरा, ता.जि. वाशीम ४४४ ५०५ चरभाष : 9420 780 570 / 95185 99152

# विषयानुक्रमणिका

शिवस्तुतिः / शक्तिस्तुतिः ..११,१२

प्रकरण पहिले

**वीरशैवधर्म व साहित्य** (पृ. १३-३७)

धर्म : व्याख्या..१३, वीरशैव : एक सनातन धर्म..१४, अतिवर्णाश्रमी धर्म..१४, उपनयनसंस्कार आणि लिंगदीक्षा..१४, इष्टलिंगपूजा : एक व्रत..१६, एकाच जन्मात मुक्ती..१६, श्रमप्रतिष्ठा व दास्यभाव..१७, वीरशैव : व्याख्या..१७, लिंगायत..१८, वीरशैव प्रभेद..१९, वीरशैवांचे धर्मग्रंथ..१९, वीरशैव धर्मसंस्थापक..२१, पंचाचार्यांची धर्मपीठे..२२, म. बसवेश्वरांचे कार्य..२६, वीरशैव साहित्य व त्याचे प्रणेते..२८, 'श्रीसिद्धान्तशिखामणी'चे अनुवाद..३४, कन्नड वीरशैव साहित्य..३६, मराठी वीरशैव साहित्य..३६

प्रकरण दुसरे

**शक्तिविशिष्टाद्वैत** (पृ. ३८-५८)

दर्शन : परिभाषा व संख्या..३८, आस्तिक व नास्तिक दर्शने..३९, दर्शनशास्त्राचे प्रयोजन..३९, वीरशैवदर्शनशास्त्र..४०, वीरशैवदर्शनातील ईश्वर..४४, शक्ति-स्वरूप..४४, शिव-शक्तिसंबंध..४५, शक्तिप्रभेद..४६, जीवस्वरूप..४७, जीवाचे अणुरूप..४८, जगत्स्वरूप (सृष्टी)..५०, अभिन्ननिमित्तोपादानकारण..५१, सृष्टिविकास..५१, छत्तीस तत्त्वांचा विकासक्रम..५२, जगत्सत्यत्व..५५, बंध-मोक्षस्वरूप..५६

प्रकरण तिसरे

**अष्टावरण** (पृ. ५९-१२४)

आवरण म्हणजे काय?..५९, श्रीगुरू..६०, लिंग..७२, जंगम..८४, पादोदक.. ८८, प्रसाद..९२, भस्म..९७, रुद्राक्ष..१०८, मंत्र..११४

प्रकरण चौथे

**पंचाचार** (पृ. १२५-१३७ )

आचार शब्दाचा अर्थ..१२५, आचार : एक अलंकार..१२५, लिंगाचार..१२६, सदाचार..१२७, शिवाचार..१२९, गणाचार..१३१, भृत्याचार..१३५, समारोप.. १३७

प्रकरण पाचवे

**षट्स्थल** (पृ. १३८-१५४)

'सूक्ष्मागमा'तील षट्स्थलविवेचन..१३९, 'श्रीसिद्धान्तशिखामणी'तील षट्स्थल-विचार.. १४१, अंगस्थलांतर्गत भक्तस्थल..१४१, अंगस्थलांतर्गत माहेश्वर-स्थल..१४४, अंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल..१४५, अंगस्थलांतर्गत प्राणलिंगि-स्थल..१४६, अंगस्थलांतर्गत शरणस्थल..१४७, अंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल..१४७, लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल..१४८, लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल..१४९, लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल..१५०, लिंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल..१५१, लिंगस्थलांतर्गत शरणस्थल..१५२, लिंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल..१५३, समारोप..१५४

प्रकरण सहावे

**उपसंहार** (पृ. १५५-१६०)

वीरशैवधर्म व साहित्य..१५५, वीरशैवदर्शन : शक्तिविशिष्टाद्वैत..१५६, अष्टावरण.. १५७, पंचाचार..१५८, षट्स्थल..१५९, समारोप..१६०

पारिभाषिक संज्ञा..१६१,

संदर्भग्रंथ..१६४,

शैवभारती शोधप्रकाशन : प्रकाशित ग्रंथ..१६९

## शिवस्तुतिः

**त्रैलोक्यसंपदालेख्यसमुल्लेखनभित्तये।**
**सच्चिदानंदरूपाय शिवाय ब्रह्मणे नमः॥१॥**

त्रैलोक्यसंपदाचित्र रेखावयास भिंत जो।
सच्चिदानंदरूपी त्या शिवब्रह्मास वंदितो॥

**ब्रह्मेति व्यपदेशस्य विषयं यं प्रचक्षते।**
**वेदान्तिनो जगन्मूलं तं नमामि परं शिवम्॥२॥**

वेदान्ती बोलती ब्रह्म शास्त्राचे प्रतिपाद्य जे।
जगताचे असे मूळ परम् शिवास त्या नमू॥

**यस्योर्मिबुद्बुदाभासः षट्त्रिंशत्तत्त्वसंचयः।**
**निर्मलं शिवनामानं तं वंदे चिन्महोदधिम्॥३॥**

फेस-लाटांपरी जेथे तत्त्वे छत्तीस भासती।
वंदितो शिव नावाच्या चित्सागरास निर्मल॥

**यद्भासा भासते विश्वं यत्सुखेनानुमोदते।**
**नमस्तस्मै गुणातीतविभवाय परात्मने॥४॥**

प्रकाशे विश्व तेजाने ज्याचिया तोषते सुखे।
नमितो तो परात्मा जो ऐश्वर्ययुक्त निर्गुण॥

**सदाशिवमुखाशेषतत्त्वोन्मेषविधायिने।**
**निष्कलंकस्वभावाय नमः शांताय शंभवे॥५॥**

सदाशिवासवे सर्व तत्त्वे करी प्रकाशित।
वंदितो शांत शंभूस ज्याचा स्वभाव निर्मल॥

**स्वेच्छाविग्रहयुक्ताय स्वेच्छावर्तनवर्तिने।**
**स्वेच्छाकृतत्रिलोकाय नमः सांबाय शंभवे॥६॥**

स्व-इच्छेने धरी देह स्व-इच्छेनेच वर्तती।
निर्मी जो विश्व स्वेच्छेने सांब शंभूस त्या नमू॥

**यत्र विश्राम्यतीशत्वं स्वाभाविकमनुत्तमम्।**
**नमस्तस्मै महेशाय महादेवाय शूलिने।।७।।**

स्वभावे श्रेष्ठ ईशत्व वसे पावे जिथे लय।
शूलधारी महेशा त्या महादेवास वंदितो।।

## शक्तिस्तुतिः

**यामाहुः सर्वलोकानां प्रकृतिं शास्त्रपारगाः।**
**तां धर्मचारिणीं शंभोः प्रणमामि परां शिवाम्।।८।।**

विद्वान सर्वलोकांचे मानिती मूलकारण।
नमितो ती पराशक्ती शिवाची धर्मचारिणी।।

**यया महेश्वरः शंभुर्नामरूपादिसंयुतः।**
**तस्यै मायास्वरूपायै नमः परमशक्तये।।९।।**

नामरूपे नटे शंभू महादेव जिच्यामुळे।
मायारूपे विराजे त्या पराशक्तीस वंदन।।

**शिवाद्यादिसमुत्पन्नशान्त्यतीतपरोत्तराम्।**
**मातरं तां समस्तानां वंदे शिवकरीं शिवाम्।।१०।।**

जन्मे शिवातुनी आद्य शान्त्यतीतोत्तरा कला।
तीहून श्रेष्ठ जी माता नमू शक्तीस मंगला।।

**इच्छाज्ञानादिरूपेण या शंभोर्विश्वभाविनी।**
**वंदे तां परमानंदप्रबोधलहरीं शिवाम् ।।११।।**

इच्छाज्ञानादि रूपाने प्रकाशे जगतास जी।
परमानंदबोधाचा प्रवाह ती नमू शिवा।।

**अमृतार्थं प्रपन्नानां या सुविद्याप्रदायिनी।**
**अहर्निशमहं वंदे तामीशानमनोरमाम्।।१२।।**

अमृतत्व हवे ज्यांस सुविद्या त्यांस देतसे।
रमवी शिवचित्तास अहर्निश तिला नमू।।

---

संस्कृत श्लोक : श्रीसिद्धान्तशिखामणी, १.१-१२ । मराठी श्लोक : रेणुकगीताई, १-१२

प्रकरण पहिले

# १. वीरशैवधर्म व साहित्य

**धर्म : व्याख्या**

चतुर्विध पुरुषार्थांमधील पहिला पुरुषार्थ धर्म होय. धर्मामुळेच अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांची प्राप्ती होते. म्हणून 'यतोऽभ्युदय नि:श्रेयस सिद्धि: स धर्म:' अशी धर्माची व्याख्या केली जाते. धर्म म्हणजे ऐहिक सुख आणि पारमार्थिक मुक्ती यांचे साधन असलेला पुरुषार्थ होय. तैत्तिरीय आरण्यकामध्ये 'धर्मे सर्वं प्रतिष्ठितम्' असे म्हटले आहे.

उत्तम आचरण म्हणजे धर्म. त्याच्या आचरणामुळे प्रत्येक जीवाला पुण्याची प्राप्ती होते आणि त्या पुण्यामुळे त्याला सर्व काही प्राप्त होते. वीरशैव धर्मग्रंथ 'श्रीसिद्धान्तशिखामणी'मध्ये व अन्य ग्रंथांमध्ये अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप व ध्यान असे दशविध धर्म सांगितले आहेत. काही आचार्यांनी व धर्मप्रवर्तकांनी या दहा धर्मांपैकी एक-दोन धर्मांना अथवा सर्व धर्मांना प्राधान्य देऊन आपापल्या मतांची स्थापना केली. शैवमत, वीरशैवमत, वैष्णवमत, शाक्तमत, गाणपत्यमत, बौद्धमत, जैनमत, ख्रिस्तमत, इस्लाममत इत्यादी. कालांतराने यांपैकी काही मतांनाच 'धर्म' अशी संज्ञा मिळाली. परंतु धर्म या शब्दाचा मूळ अर्थ आचरण असाच आहे.

संसारसमुद्रात बुडत असलेल्या आणि मृत्यूच्या जाणिवेने त्रस्त झालेल्या जीवाला केवळ धर्मच आधार असून संपत्ती आणि बांधव त्याला आधार देऊ शकत नाहीत. धर्मापेक्षा मोठा लाभ नाही, धर्मापेक्षा मोठे धन नाही, धर्मापेक्षा मोठे तीर्थ नाही आणि धर्मावाचून दुसरी गती नाही. म्हणून सर्वांनी धर्मसंग्रह केला पाहिजे. 'धर्मेण हीन: पशुभि: समान:' अर्थात् धर्महीन मनुष्य हा पशुतुल्य असतो, असे शास्त्रात म्हटले आहे. अहिंसादी दशधर्मांचा संग्रह करून त्यांचे पालन करणे हाच खरा धर्म होय. या धर्मांचा संग्रह करण्यासाठी धर्मगुरूंनी ज्या मार्गांचे प्रतिपादन केले त्या मार्गांनाच लोक धर्म असे संबोधू लागले.

## वीरशैव एक सनातन धर्म

वीरशैव हा एक सनातन धर्म आहे. 'सना भवः सनातनः' या उक्तीप्रमाणे जो सर्व काळात अस्तित्वात असतो त्याला सनातन म्हटले जाते. सनातन म्हणजे शाश्वत, नित्य, ध्रुव असा. म्हणून वीरशैवधर्माला चर्तुयुगांची परंपरा आहे. जगद्गुरू पंचाचार्यांनी चारही युगांमध्ये वेगवेगळ्या नावांनी अवतार घेऊन प्रत्येक युगात या धर्माची प्रतिष्ठापना केली. त्यामुळेच संतशिरोमणी मन्मथस्वामींनी

**जहींचा शिव तहींचा शिवाचार । नवा जाला म्हणती ते पामर ।**
**अनादि शिव तरी शिवाचार । अनादिसिद्धचि असे ।।**
**शिव जरी होता युगानुयुगीं । तरी शिवाचार असेल कीं जगीं ।**
**जैंचा शिव तैंचा भक्तांगी । शिवाचार अभंग असे ।।** परमरहस्य, १६.१३-१४

या ओवीद्वारे या धर्माचे सनातनत्व गर्जून सांगितले आहे. हा धर्म मूलतः भगवान शिवाने उपदेशिलेला व आगमांवर आधारलेला असल्यामुळे हा जगातील पहिला धर्म होय.

## अतिवर्णाश्रमी धर्म

वीरशैवधर्माला 'अतिवर्णाश्रमी धर्म' असे म्हटले जाते. कारण या धर्मात वर्ण व आश्रम असा भेद न करता सर्वांना समानरूपाने दीक्षा दिली जाते. 'शक्तिपातं समालोक्य दीक्षया योजयेदमुम्' अर्थात् इष्टलिंगदीक्षा देताना शिष्याच्या जाति-वर्णांचा विचार न करता त्याची शक्तिपातचिन्हे पाहून दीक्षा दिली जाते. शक्तिपात म्हणजे शिवकृपा. शिवकथा, शिवकीर्तन श्रवण करताना डोळ्यांत आनंदाश्रू येणे, सर्वांगावर रोमांच उभे राहणे, अंग कंपित होणे इत्यादी शक्तिपाताची लक्षणे होत. यांपैकी एक लक्षण जरी शिष्याच्या ठिकाणी दृग्गोचर झाले तरी त्याला लिंगदीक्षा द्यावी, अशी शिवाज्ञा आहे.

## उपनयन संस्कार आणि लिंगदीक्षा

वेदोक्त उपनयन संस्कार आणि आगमोक्त लिंगदीक्षा यांच्यामध्ये अंतर आहे. उपनयन संस्कार हा वर्णव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे तो ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांवरच केला जातो. शूद्रवर्णाच्या व्यक्तीवर केला जात

नाही. यामुळेच संत ज्ञानेश्वरांनी वेदांना 'कृपण' असे म्हटले आहे.

**वेदु संपन्नु होय ठाईं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं ।**
**जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ।।** ज्ञानेश्वरी, १८.१४५७

वेद ज्ञानसंपन्न आहेत, परंतु त्यांच्याइतका दुसरा कंजूष शोधूनही सापडणार नाही. कारण वेद फक्त ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांच्याच कानाशी लागतात, त्यांना ज्ञान देतात. परंतु शूद्रांना मात्र अज्ञानात ठेवतात. म्हणून ते कृपण होत, असा ज्ञानेश्वरांनी वेदांना दोष दिला आहे.

शूद्रवर्णातील व्यक्तीला वेदोक्त उपनयनाचा अधिकार नाही, परंतु आगमोक्त लिंगदीक्षा देताना मात्र वर्णव्यवस्थेला महत्त्व दिले जात नाही. शिष्याची शक्तिपातचिन्हे ही योग्यता पाहूनच सर्व वर्ण-जातींतील स्त्री-पुरुषांना लिंगदीक्षा दिली जाते. स्त्रियांना वेदोक्त उपनयनयाचा अधिकार नाही, परंतु त्यांनाही आगमोक्त लिंगदीक्षा दिली जाते. अर्थात् लिंगदीक्षाविधीत स्त्री-पुरुष असा भेद केला जात नाही. सर्व जातींना, सर्व वर्णांना आणि सर्व स्त्री-पुरुषांना समानरूपाने लिंगदीक्षा दिली जाते.

उपनयन संस्कार घेतलेला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांतील मनुष्य ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ या तीन आश्रमांत यज्ञोपवित धारण करू शकतो. यज्ञोपवित म्हणजे जानवे. परंतु तो जेव्हा संन्यास घेतो त्यावेळी त्याला जानवे काढून टाकावे लागते. संन्याशाला यज्ञोपवित धारण करता येत नाही. याउलट प्रकार लिंगदीक्षेमध्ये आहे. एकदा लिंगदीक्षा घेतल्यावर भक्ताला मृत्यूपर्यंत गळ्यात लिंग धारण करावे लागते. गळ्यातील इष्टलिंग कधीच काढून ठेवता येत नाही. लिंगधारी व्यक्तीने संन्यास घेतला तरी त्याला गळ्यातील लिंग काढता येत नाही. याचा अर्थ असा की, संन्यासाश्रमात देखील व्यक्तीला लिंगपूजेचा अधिकार असतो. म्हणून जगद्गुरू रेवणसिद्धेश्वर अर्थात् रेणुकाचार्य यांनी आद्य शंकराचार्यांना चंद्रमौलीश्वर लिंग प्रदान केले. हा उल्लेख शृंगेरी पीठातील विद्वान कवी काशी लक्ष्मणशास्त्रीरचित 'गुरुवंशकाव्या'त आलेला आहे. तेव्हापासून आजतागायत शृंगेरीपीठात सर्व शंकराचार्यांकडून चंद्रमौलीश्वर लिंगाची पूजा अव्याहतपणे चालत आली आहे.

अशाप्रकारे वीरशैवधर्मातील लिंगदीक्षा संस्कार हा वर्णव्यवस्था, आश्रम-व्यवस्था, स्त्री-पुरुषभेद हे नाकारून सर्वांना समानरूपाने दीक्षा देऊन समतेची शिकवण देतो. म्हणूनच या धर्माला 'अतिवर्णाश्रमी' म्हणजे वर्ण-आश्रमांच्या अतीत असलेला, असे म्हटले जाते.

**इष्टलिंगपूजा : एक व्रत**

सनातन वीरशैवधर्मात इष्टलिंगपूजा हे नित्यकर्म मानले जाते. इष्टलिंगपूजेला पाशुपतव्रत, महाव्रत व शिरोव्रत असे संबोधिले जाते. आणव, माया व कार्मिक या तीन मलांनी आवृत असलेला जीव म्हणजे पशू होय. या जीवरूपी पशूला त्रिमलांपासून मुक्त करून त्याला लिंगांगसामरस्य घडविते आणि त्याला पतिरूप (शिवरूप) प्राप्त करून देते असे जे व्रत ते 'पाशुपतव्रत' होय.

आपल्या देशामध्ये नित्य-नैमित्तिक अशी अनेक व्रते आहेत. त्या सर्व व्रतांमध्ये लिंगपूजाव्रत हे प्रमुख असल्याने त्याला 'महाव्रत' असे म्हणतात. देवांमध्ये जसा महादेव श्रेष्ठ तसे सर्व व्रतांमध्ये हे व्रत श्रेष्ठ होय.

ज्याप्रमाणे मनुष्याच्या देहातील सर्व अवयवांत शिर म्हणजे डोके सर्वश्रेष्ठ मानले जाते त्याप्रमाणे सर्व व्रतांत हे व्रत श्रेष्ठ असल्याने याला 'शिरोव्रत' म्हटले जाते.

**एकाच जन्मात मुक्ती**

'एकेन जन्मना मुक्तिः वीराणां तु महेश्वरी' या 'पारमेश्वरागमा'तील उक्तीप्रमाणे एकाच जन्मामध्ये मुक्ती देणारा धर्म म्हणजे वीरशैवधर्म होय, असे शिवाने पार्वतीला सांगितले आहे. लिंगदीक्षा घेतलेला साधक षट्स्थलाचे आचरण करून लिंगांगसामरस्य म्हणजे मुक्ती प्राप्त करून घेतो. म्हणून त्याला पुनर्जन्म नाही. साधकाने एकदा पिंडस्थलात प्रवेश केला की तो मागे परत येत नाही, तर पुढे पुढेच जात राहतो आणि ऐक्यस्थलापर्यंत पोहोचून मुक्त होतो. अशा प्रकारे एकाच जन्मात मुक्ती प्रदान करणारा हा विलक्षण धर्म आहे.

सर्ववर्णीय, सर्वआश्रमीय आणि सर्व स्त्री-पुरुष यांना उदारपणे समाविष्ट करून घेणारा, पाशुव्रत-महाव्रत-शिरोव्रत या विशेषणांनी गौरविलेला आणि एकाच जन्मात मुक्ती प्रदान करणारा असा हा वीरशैवधर्म होय. या धर्माच्या या वैशिष्ट्यांमुळेच भगवान शिव 'न वीरशैवसदृशं मतमस्ति जगत्त्रये' असे म्हणतात.

अर्थात् स्वर्ग–मृत्यु–पाताळ या तिन्ही लोकांत वीरशैवधर्मासारखा श्रेष्ठ दुसरा धर्म नाही.

**श्रमप्रतिष्ठा व दास्यभाव**

या धर्मात श्रमाला प्रतिष्ठा आहे. कष्ट करून संपती मिळवावी आणि मी दास आहे या भावनेने ती गुरु–लिंग–जंगमांना अर्पण करून नंतर प्रसादरूपाने स्वीकारावी, अशी या धर्मात परंपरा आहे. 'तेन त्यक्तेन भुंजीथा: मा गृध: कस्यस्वित् धनम्' म्हणजे कोणाच्याही धनाचा अपहार न करता स्वकष्टाने संपादन केलेल्या संपत्तीचा सत्पात्राला दान देऊन योग्य मार्गाने विनियोग करावा आणि अवशिष्ट संपत्तीचा प्रसादरूपाने स्वीकार करावा, हा 'ईशावास्योपनिषदा'तील विचार या धर्मात श्रद्धेने आचरिला जातो.

वीरशैव समाजातील लोकांनी कोणताही उद्योग श्रेष्ठ–कनिष्ठ न मानता सर्व उद्योग केले. व्यवसायामुळे त्यांना आडनावे मिळाली. वाणी, तेली, माळी, कोष्टी, गवळी इत्यादी. आधुनिक काळात उद्योग, शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यकीय, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रांत वीरशैव समाजाने आघाडी घेतलेली आहे. व्यवसायामुळे आडनावे आली आणि आडनावेच जाती होऊन बसली. परंतु ह्या जाती नव्हेत. सर्वच वीरशैव आहेत. सर्वांनी हे लक्षात घेऊन समानतेने व्यवहार केला पाहिजे.

'सर्वेषां हितकारकम्' या 'श्रीसिद्धान्तशिखामणी'तील उक्तीप्रमाणे वीरशैव हा संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी स्थापन झालेला धर्म असून हा विशिष्ट मानवसमूहापुरता मर्यादित नाही. म्हणूनच या धर्माचे आचार्य धार्मिक समारंभात 'मानव धर्माचा विजय असो, धर्मानेच विश्वाला शांती' असा उद्घोष करीत असतात. संपूर्ण मानवजातीचे कल्याण हेच वीरशैव धर्माचे अंतिम लक्ष्य होय.

**वीरशैव : व्याख्या**

वीरशैव शब्दामध्ये चार अक्षरे असून प्रत्येक अक्षरांचा विशिष्ट अर्थ सांगितला जातो. 'वि' म्हणजे विद्या. शिव–जीव यांचा अभेदबोध करणारी विद्या. 'र' म्हणजे रत होणे आणि 'शैव' म्हणजे शिवभक्त. शिव आणि जीव यांच्यातील अभेद बोधन करणाऱ्या विद्येत नित्य रममाण होणारा जो शिवभक्त तो वीरशैव होय. हा वीरशैव पदाचा तात्त्विक अर्थ आहे.

महर्षी व्यासांनी स्कंदपुराणातील शंकरसंहितेत डाव्या तळहातावर इष्टलिंग ठेवून त्याची अनन्यभक्तीने पूजा करणारा, देहावर सदैव इष्टलिंग धारण करणारा शिवभक्त म्हणजे वीरशैव होय, असे म्हटले आहे.

नीलकंठ शिवाचार्यांनी 'क्रियासार' ग्रंथात 'वि' म्हणजे विरोध आणि 'र' म्हणजे रहित अर्थात् कोणाबद्दल आपल्या मनात जो विरोध बाळगत नाही असा शिवभक्त म्हणजे वीरशैव होय, असे म्हटले आहे. हा वीरशैव पदाचा सामाजिक अर्थ आहे.

लिंगांगसामरस्यात रत असणारा, देहावर नित्य इष्टलिंग धारण करणारा आणि समाजात कोणालाही विरोध न करणारा शिवभक्त म्हणजे वीरशैव होय, असा या सर्व परिभाषांचा इत्यर्थ आहे.

**लिंगायत**

लिंगायत हा शब्द वीरशैव शब्दाचा पर्यायवाचक आहे. 'लिंगं आयतिः यस्य स = लिंगायतः' ही लिंगायत शब्दाची व्युत्पत्ती होय. आयति म्हणजे उत्तरकाल. 'उत्तरः काल आयतिः' (अमरकोश). लिंगदीक्षा घेतल्यानंतर पुढील काळात ज्याचे जीवन लिंगधारण, लिंगपूजा, लिंगध्यान यांमध्ये व्यतीत होते तो लिंगायत. आयत्त म्हणजे अधीन. जो निरंतर लिंगाधीन होऊन राहतो तो लिंगायत. लिंग + आयत्त म्हणजे लिंगायत्त.

क्रियादीक्षेमध्ये 'आयत्त' हा एक संस्कार आहे. दीक्षेच्या वेळी श्रीगुरू शिष्याच्या तळहातावर लिंग देऊन 'लिंगायत्तो भव' म्हणजे लिंगाच्या संपूर्ण अधीन होऊन राहा, असा उपदेश करतात. गुरूपदेशानुसार शिष्य लिंगाच्या संपूर्ण अधीन होऊन वर्तन करतो. म्हणजेच लिंग + आयत्त = लिंगायत्त होतो. 'लिंगायत्त' या शब्दाचेच सुलभीकरण 'लिंगायत' असे झाले. कालांतराने वीरशैव शब्दाचा लिंगायत हा पर्याय ठरून तो रूढ झाला. लिंगायत हा शब्द वीरशैवांच्या अनन्य लिंगनिष्ठेचा द्योतक आहे. त्यामुळे लिंगायत हा वीरशैव शब्दाचा पर्यायवाचक शब्द असून लिंगायतनामक स्वतंत्र धर्म नव्हे, हे लक्षात घ्यावयास हवे.

वीरशैवसिद्धान्तप्रतिपादक संस्कृत, कन्नड, मराठी आदी सर्व भाषांतील ग्रंथांत आचार्य, शरण, संत यांनी 'वीरशैव' याच धर्मवाचक शब्दाचा प्रयोग केलेला

आहे. कोणीही ‘लिंगायत’ असा उल्लेख केला नाही. म. बसवेश्वरांनी आपल्या एकाही वचनात ‘लिंगायत’ या शब्दाचा प्रयोग केला नाही. उलट ‘मी आधी शैव होतो, आता वीरशैव झालो’ अशी त्यांनी एका वचनात स्पष्ट नोंद केली आहे.

## वीरशैव प्रभेद

‘सूक्ष्मागमा’त आचारभेदानुसार वीरशैवांच्या सामान्य वीरशैव, विशेष वीरशैव व निराभार वीरशैव अशा तीन अवस्था वर्णिल्या आहेत. श्रीगुरूकडून प्राप्त झालेल्या इष्टलिंगावर अनन्यनिष्ठा ठेवून गुरु-लिंग-जंगमांचा जो समानरूपाने आदर करतो आणि सामान्य नियमांचे पालन करतो तो ‘सामान्य वीरशैव’. हाच सामान्य वीरशैव जेव्हा लिंगागसामरस्य प्रतिपादन करणाऱ्या भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य या षट्स्थलांचे रहस्य श्रीगुरूंकडून जाणून घेऊन त्याचे आचरण करतो तो ‘विशेष वीरशैव’. जो षट्स्थलाचे आचरण करून, व्यावहारिक जीवनाविषयी पूर्ण नि:स्पृह होऊन जीवन्मुक्ताचे विलक्षण जीवन व्यतीत करतो तो ‘निराभार वीरशैव’. सामान्य, विशेष, निराभार या तीन अवस्थांतून विकसित होऊन वीरशैव साधक शिवाशी समरस होतो.

वीरशैवधर्माचे पालन करणारा विशिष्ट समाज आहे. त्याची विशिष्ट आचारपद्धती आहे. यामध्ये गुरु-शिष्यपरंपरा अनादी कालापासून चालत आली असून आजवर टिकून आहे. षट्स्थल हा लिंगांगसामरस्य प्राप्त करून घेण्याचा मार्ग असून अष्टावरण व पंचाचार ही त्याची साधने आहेत. अष्टावरणांनी युक्त असलेला, पंचाचारांचे पालन करीत षट्स्थलमार्गाने जो लिंगांगसामरस्य प्राप्त करून घेतो तोच वीरशैव होय.

## वीरशैवांचे धर्मग्रंथ

प्रत्येक धर्माची काही तत्त्वे आणि धार्मिक आचरणाचे काही नियम असतात. जीव, चराचर सृष्टी आणि परमेश्वर यासंबंधी त्या धर्माचा दृष्टिकोन आणि तात्त्विक विचार त्या त्या धर्माच्या ग्रंथांत मांडलेले असतात. त्या धर्मग्रंथाच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्या त्या धर्माचे अनुयायी आपले धार्मिक जीवन जगत असतात. भारतीय सर्व धर्मांच्या मूलग्रंथांना ‘निगमागम’ असे म्हणतात. निगम म्हणजे वेद. ते शिवाच्या नि:श्वासातून उत्पन्न झाले म्हणून त्यांना ‘निगम’ म्हणतात. तसे

'आगम' शिवाच्या मुखावाटे म्हणजे वाणीतून आले म्हणून त्यांना 'आगम' म्हणतात. निगमागम प्रत्यक्ष शिवापासून प्राप्त झाले. त्यांचा कोणी मानव कर्ता नाही. म्हणून त्यांना 'अपौरुषेय' वाङ्मय मानले जाते. केवळ वेदाचे आदेश प्रमाण मानून त्यानुसार वागणाऱ्यांना 'वैदिक' म्हणतात. आगमांच्या आज्ञा मानून त्याप्रमाणे वागणाऱ्यांना 'आगमिक' अथवा 'तांत्रिक' म्हणतात. आगमांना 'तंत्र' असेही नाव आहे. वेदांतील तत्त्वज्ञान आणि आचारधर्म वैदिक आणि आगमांतील तत्त्वज्ञान आणि आचारपद्धती तांत्रिक होय.

वीरशैवधर्माचे तत्त्वज्ञान आणि आचारविचारांचे वर्णन मुख्य रूपाने आगमग्रंथांतून आले आहे. वीरशैव आणि शैवपंथांच्या आगमांना 'शैवागम' आणि 'शिवागम' म्हणतात. शिवागम एकूण अठ्ठावीस आहेत. त्यांची नावे अशी:-

१. कामिक, २. योगज, ३. चिन्त्य, ४. कारण, ५. अजित, ६. दीप्त, ७. सूक्ष्म, ८. सहस्र, ९. अंशुमान, १०. सुप्रभेद, ११. विजय, १२. नि:श्वास, १३. स्वायंभुव, १४. अनल, १५. वीर, १६. रौरव, १७. मकुट, १८. विमल, १९. चंद्रज्ञान, २०. बिंब, २१. प्रोद्गीत, २२. ललित, २३. सिद्ध, २४. संतान, २५. शर्वोक्त, २६. पारमेश्वर, २७. किरण, २८. वातुल.

यांपैकी क्रमाने पहिले दहा आगम शिवाकडून आणि त्यापुढील अठरा आगम रुद्राकडून उपदेशिलेले आहेत.

प्रत्येक आगमाचे चार भाग असतात. त्यांना 'पाद' म्हणतात. त्यात आलेल्या विषयावरून त्यांना क्रियापाद, चर्यापाद, योगपाद आणि ज्ञानपाद अशी नावे आहेत. त्यातील शेवटच्या ज्ञानपादात वीरशैव तत्त्वज्ञान, अष्टावरण, षट्स्थल आणि पंचाचाराचे वर्णन आले आहे. आगमांप्रमाणे वेदांतही काही ठिकाणी शिव, रुद्र, इष्टलिंगपूजा, भस्म, रुद्राक्ष, मंत्र इत्यादींचे वर्णन आलेले आहे. वीरशैवांच्या सिद्धान्ताला 'शक्तिविशिष्टाद्वैत' असे नाव आहे. त्याचे प्रतिपादन उपनिषदांतही आले आहे. वेदांतील व उपनिषदांतील या सर्व भागांना वीरशैव मानतात. परंतु मुख्यत: शैवागमांना वीरशैव मानीत असल्यामुळे वीरशैव दर्शन हे तांत्रिक-वैदिक अशा उभयस्वरूपाचे आहे.

वेद, आगम आणि उपनिषदांचे सार जसे व्यासोक्त भगवद्गीतेत आले आहे तसेच शिवागम-पुराणादी ग्रंथांचे सार वीरशैवांच्या 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या

ग्रंथात साठविले आहे. हा ग्रंथ श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी लिहिलेला आहे. वीरशैवधर्माचे आद्यजगद्गुरू श्रीरेणुकाचार्य यांनी महर्षी अगस्त्यमुनींना वीरशैव-सिद्धान्ताचा केलेला उपदेश, त्यांच्यातील संवाद, संभाषणाच्या रूपाने यात संग्रहित केला आहे. अगस्त्यमुनींच्या विनंतीवरून वीरशैवसिद्धान्तातील षट्स्थल, अष्टावरण, पंचाचार या तत्त्वांचे स्वरूप त्यांना श्रीरेणुकाचार्यांनी विशद करून सांगितले आहे. हा ग्रंथ आठव्या शतकात गेला आहे. वीरशैवांचे सर्व तत्त्वज्ञान आणि आचारांची माहिती त्यात आली असल्यामुळे तो वीरशैवधर्माचा प्रमाणग्रंथ आणि धर्मग्रंथ मानला जातो.

### वीरशैवधर्म संस्थापक

वीरशैवधर्माची स्थापना जगद्गुरू पंचाचार्यांनी केली, अशी माहिती शिवागमांत आलेली आहे. पंचाचार्यांची नावे युगानुसार पुढीलप्रमाणे आहेत:-

कृतयुग (सत्ययुग) : एकाक्षर शिवाचार्य, द्व्यक्षर शिवाचार्य, त्र्यक्षर शिवाचार्य, चतुरक्षर शिवाचार्य, पंचाक्षर शिवाचार्य.

त्रेतायुग : एकवक्त्र शिवाचार्य, द्विवक्त्र शिवाचार्य, त्रिवक्त्र शिवाचार्य, चतुर्वक्त्र शिवाचार्य व पंचवक्त्र शिवाचार्य.

द्वापरयुग : रेणुक शिवाचार्य, दारुक शिवाचार्य, घंटाकर्ण शिवाचार्य, धेनुकर्ण शिवाचार्य व विश्वकर्ण शिवाचार्य.

कलियुग : रेवणसिद्ध शिवाचार्य, मरुळसिद्ध शिवाचार्य, एकोरामाराध्य शिवाचार्य, पंडिताराध्य शिवाचार्य व विश्वाराध्य शिवाचार्य.

शिवागमांतील वीरशैवधर्माच्या मूलतत्त्वांचा उपदेश सर्वात आधी कैलासात शिवाने पार्वतीला व शिवगणांना केला. भूतलावर वीरशैव मताची स्थापना करण्यासाठी शिवाज्ञेने पूर्वोक्त पाच गण पाच आचार्यांच्या नावाने विविध ठिकाणी अवतरले. यासंबधी 'स्कंदपुराणा'त पुढील श्लोक आलेला आहे:-

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भूतले ।**
**तदा तदाऽवतारोऽयं गणेशस्य महीतले ।।**

या श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे जेव्हा जेव्हा शिवधर्माला ग्लानी येते, त्याच्यावर संकटे येतात आणि त्याचा ऱ्हास होतो त्या त्या वेळी शिव आपल्या गणांना भूतलावर अवतार घ्यायला लावून त्यांच्याकडून धर्माची स्थापना करवितात.

शिवाची पाच मुखे आहेत. सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष आणि ईशान. या पाच मुखांपासून क्रमाने वीर, नंदी, वृषभ, भृंगी आणि स्कंद हे पाच गोत्रपुरुष उत्पन्न झाले. या पाच गोत्रांचे पहिले पाच आचार्य हेच पंचाचार्य होत. चारी युगांत त्यांनी वेगवेगळ्या नावांनी भूमीवर अवतार धारण करून वीरशैवधर्माची स्थापना केलेली आहे. कलियुगाच्या प्रारंभी अवतरलेल्या पंचाचार्यांची नावे रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य अशी आहेत. आद्य पंचाचार्यांनी भारताच्या विभिन्न भागांत स्थापन केलेल्या पाच पीठांची नावे श्रीरंभापुरी पीठ, श्रीउज्जयिनी पीठ, श्रीकेदार पीठ, श्रीशैल पीठ आणि श्रीकाशी पीठ अशी आहेत. द्वापरयुगातील आचार्यांनी ज्या ऋषिमुनींना सूत्रोपदेश केला. ते असे:-

| **आचार्य** | **ऋषी** | **सूत्र** |
|---|---|---|
| रेणुकाचार्य | अगस्त्य | पडविडिसूत्र |
| दारुकाचार्य | दधीची | वृष्टिसूत्र |
| घंटाकर्ण | व्यास | लंबनसूत्र |
| धेनुकर्ण | सानंद | मुक्तागुच्छसूत्र |
| विश्वकर्ण | दुर्वास | पंचवर्णसूत्र |

श्रीरेणुकाचार्यांनी अगस्त्यमुनींना केलेला उपदेश 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथरूपाने उपलब्ध आहे, तसे अन्य आचार्यांचे उपदेशग्रंथ उपलब्ध नाहीत.

**पंचाचार्यांची धर्मपीठे**

पाच आचार्यांनी सुप्रसिद्ध पाच शिवलिंगांपासून अवतार घेऊन पाच पीठांची स्थापना केली, याची माहिती स्वायंभुव नावाच्या आगमात दिली आहे.

ही पाच पीठे अत्यंत प्राचीन असल्याचे पुरावे आहेत. अनादी कालापासून ह्या पीठांच्या परंपरेत अनेक तपस्वी व विद्वान आचार्य होऊन गेले असून आजपर्यंत ती परंपरा टिकून आहे. या पंचपीठांची माहिती, त्या पीठांचे आद्य संस्थापक, त्यांची अवतारस्थाने, त्यांच्या लीला आणि अवतारकार्य, त्यांची परंपरा आणि आज त्या पीठावर विराजमान असलेले जगद्गुरू यांचा सर्व

तपशील ‘वीरशैव पंचपीठ परंपरा’ या ग्रंथात मिळेल. हा ग्रंथ ‘शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी’ (उत्तर प्रदेश) येथून प्रकाशित झाला आहे. त्या पंचपीठांची संक्षिप्त माहिती येथे देण्यात येत आहे.

**१. श्रीजगद्गुरू रेवणाराध्य (रंभापुरी पीठ)**

श्रीरेवणाराध्य शिवाच्या आदेशानुसार वीरशैवधर्माच्या स्थापनेसाठी आंध्र प्रदेशातील सुप्रसिद्ध क्षेत्र कोलनुपाक (कोल्लीपाक) येथील श्रीसोमेश्वर लिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आले आहेत. त्यांची नावे कृतयुगात एकाक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात एकवक्त्र शिवाचार्य, द्वापरयुगात रेणुक शिवाचार्य आणि कलियुगात रेवणाराध्य अशी प्रसिद्ध आहेत.

द्वापरयुगात श्रीरेणुकाचार्यांनी श्रीसोमेश्वर लिंगापासून अवतार घेऊन वीरशैवधर्माची स्थापना केली आणि धर्मप्रचारासाठी अनेक लीला केल्या. मलय पर्वतावर विराजमान असलेल्या महर्षी अगस्त्यमुनींचे स्वागत स्वीकारून, त्यांनी विनंती केल्यावरून त्यांनी वीरशैवसिद्धान्ताचा उपदेश केला. तोच उपदेश श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ या ग्रंथात संग्रहित केला आहे.

वीरशैवधर्माच्या प्रचारासाठी रेणुकाचार्यांनी कर्नाटकात बाळेहोन्नूर या गावी एका धर्मपीठाची स्थापना केली. ते पीठ ‘रंभापुरी पीठ’ या नावाने प्रसिद्ध आहे. त्याला ‘वीरपीठ’ किंवा ‘वीरसिंहासन’ असेही म्हणतात. या पीठाचे गोत्रपुरुष वीरभद्र असून रेणुकशाखा आहे.

आज रंभापुरी पीठावर श्री १००८ जगद्गुरू प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य हे विराजमान आहेत.

**२. श्रीजगद्गुरू मरुळाराध्य (उज्जयिनी पीठ)**

भगवान शिवाच्या आज्ञेवरून श्रीजगद्गुरू मरुळाराध्य वीरशैवधर्माच्या स्थापनेसाठी मध्यप्रदेशात क्षिप्रा नदीच्या काठावर असलेल्या वटक्षेत्रातील सिद्धेश्वरलिंगापासून प्रत्येक युगात अवतार घेत आले आहेत. कृतयुगात द्व्यक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात द्विवक्त्र शिवाचार्य, द्वापरयुगात दारुक शिवाचार्य आणि कलियुगात मरुळाराध्य शिवाचार्य अशा नावांनी ते प्रसिद्ध झाले आहेत.

मध्ययुगात उत्तरेकडे राजकीय परिस्थिती फार बिघडली होती. मोगलांच्या

राजवटीत हिंदूंच्या अनेक तीर्थक्षेत्रांची हानी झाली. देवस्थाने भ्रष्ट केली गेली. या वातावरणाची झळ मध्यप्रदेशातील या सद्धर्मपीठालाही लागली. त्यामुळे या पीठास दक्षिणेकडे कर्नाटकात बेल्लारी जिल्ह्यातील उज्जयिनी नावाच्या स्थळात हलवावे लागले. आता ते त्याच ठिकाणी आहे.

या पीठाचे द्वापरयुगातील जगद्गुरू दारुकाचार्य यांनी त्या काळातील दधीची महर्षींना वीरशैवतत्त्वांचा उपदेश केला होता. या पीठाचे गोत्रपुरुष नंदिकेश्वर असून त्यांची शाखा दारुकाचार्यांची आहे. या पीठाला 'सद्धर्मसिंहासन' असेही म्हणतात. या पीठाचे कलियुगातील जगद्गुरू श्रीमरुळाराध्य यांनी आपल्या अवतारकालात देशात सर्वत्र संचार करून वीरशैवधर्माच्या स्थापनेबरोबर आपली शिष्यशाखाही खूप वाढविली आणि आपले अवतारकार्य संपल्यानंतर ते पुन्हा सिद्धेश्वरलिंगात विलीन झाले. त्यांच्यानंतर त्या गुरुपीठाची परंपरा अनेक आचार्यांनी समर्थपणे पुढे चालविली आहे. या पीठाचे सांप्रतचे अधिपती श्री १००८ जगद्गुरू सिद्धलिंग राजदेशिकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी हे आहेत.

### ३. श्रीजगद्गुरू एकोरामाराध्य (केदारपीठ)

श्रीजगद्गुरू एकोरामाराध्य यांनी शिवाच्या आदेशानुसार वीरशैवमताच्या स्थापनेसाठी द्राक्षाराम क्षेत्रातील श्रीरामनाथलिंगापासून अवतार घेतला. कृतयुगात त्र्यक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात त्रिवक्त्रशिवाचार्य, द्वापरयुगात घंटाकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात एकोरामाराध्य अशी त्यांची नावे आहेत. श्रीएकोरामाराध्यांनी धर्मप्रचारासाठी हिमालयात एका धर्मपीठाची स्थापना केली. ते 'केदारपीठ' या नावाने प्रसिद्ध आहे. यालाच 'वैराग्यसिंहासन' म्हणतात.

कलियुगाच्या आरंभी या पीठाचे जगद्गुरू एकोरामाराध्य हे होते. पुराण-काळातील बाणासुराची कन्या उषा तेथे राहून शास्त्रांचा अभ्यास करीत होती. गुरूच्या कृपेने ती मोठी विदुषी झाली. उषा आणि तिचा पती अनिरुद्ध यांची प्रेमकहाणी प्रसिद्ध आहे. त्यांनी गुरुसेवा म्हणून त्यांच्या निवासासाठी भव्य मठ बांधून दिला. तो 'उषामठ' म्हणून प्रसिद्ध आहे. त्या मठाचे नाव हल्ली 'ऊखीमठ' असे रूढ झाले आहे.

टेहरीचे नरेश या पीठाचे शिष्य आहेत. या पीठाच्या जगद्गुरूंना 'रावल' ही

उपाधी लावली जाते. टेहरी नरेशाकडून नव्या जगद्गुरूसाठी तिलकोत्सव समारंभ आयोजित केला जातो. त्या प्रसंगी जगद्गुरूंना 'रावल' ही पदवी प्रदान केली जाते. आता या पीठावर श्री १००८ जगद्गुरू भीमाशंकरलिंग शिवाचार्य हे ३२८ वे रावल आहेत. या पीठाचे गोत्रपुरुष वृषभेश्वर असून शाखा घंटाकर्ण आहे.

**४. श्रीजगद्गुरू पंडिताराध्य (श्रीशैलपीठ)**

श्रीजगद्गुरू पंडिताराध्य यांनी शिवाच्या आज्ञेने वीरशैवधर्माच्या स्थापनेसाठी आंध्रप्रदेशातील श्रीशैल क्षेत्रात मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगापासून चारी युगांत वेगवेगळ्या नावांनी अवतार धारण केला. कृतयुगात चतुरक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात चतुर्वक्त्र शिवाचार्य, द्वापरयुगात धेनुकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात पंडिताराध्य शिवाचार्य अशी त्यांची नावे आहेत. श्रीपंडिताराध्यांनी वीरशैवधर्माच्या प्रचारासाठी श्रीशैल येथेच एका धर्मपीठाची स्थापना केली. त्याला 'श्रीशैलपीठ' अथवा 'सूर्यसिंहासन' अशीही नावे आहेत.

श्रीपंडिताराध्य हे कलियुगातील या पीठाचे पहिले आचार्य. या पीठाची आचार्यपरंपरा मोठी आहे. गोत्रपुरुषाचे नाव भृंगीश्वर असून शाखा धेनुकर्ण या नावाची आहे. अनेक विद्वान आणि तपस्वी आचार्य या पीठाच्या परंपरेत होऊन गेले. त्यांनी लोकांच्या उद्धारासाठी पुष्कळ कामे केली. सांप्रत या पीठावर श्री १००८ जगद्गुरू डॉ. चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी हे विराजमान आहेत.

**५. श्रीजगद्गुरू विश्वाराध्य (काशीपीठ)**

वीरशैवधर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठी शिवाच्या आदेशानुसार श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांनी प्रत्येक युगाच्या आरंभी काशीक्षेत्रातील श्रीविश्वेश्वर ज्योतिर्लिंगातून अवतार धारण केला आहे. कृतयुगात पंचाक्षर शिवाचार्य, त्रेतायुगात पंचवक्त्र शिवाचार्य, द्वापरयुगात विश्वकर्ण शिवाचार्य आणि कलियुगात विश्वाराध्य शिवाचार्य या नावांनी ते प्रसिद्ध झाले. वीरशैवधर्माच्या प्रचारासाठी श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांनी काशीत एका धर्मपीठाची स्थापना केली. ते काशीपीठ 'ज्ञानपीठ' अथवा 'ज्ञानसिंहासन' या नावाने ओळखले जाते. आज 'जंगमवाडी मठ' या नावाने ते प्रसिद्ध आहे. मठाच्या परिसराला 'जंगमवाडी' असेच नाव आहे. पुराणात

'आनंदकानन' या नावाने प्रसिद्ध असलेल्या क्षेत्रात हा मठ विराजमान आहे. अनेक प्राचीन ऋषिमुनींनी आपल्या नावांनी येथे लिंगांची स्थापना केली आहे. आजही अनेक भक्त आपल्या पूर्वजांच्या नावाने येथे लिंगाची स्थापना करतात. त्यामुळे जंगमवाडी मठातील सर्व परिसर लिंगमय झालेला दिसून येतो.

सुप्रसिद्ध दुर्वासमहर्षींना या पीठाचे द्वापरयुगातील जगद्गुरू विश्वकर्ण शिवाचार्य यांनी शिवाद्वैतसिद्धान्ताचा उपदेश केला होता. या पीठाचे गोत्रपुरुष स्कंद असून शाखा विश्वकर्ण आहे. या पीठावरील जगद्गुरूंची परंपरा फार मोठी आहे. सांप्रतचे पीठाधीश श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी हे या परंपरेतील ८६ वे पीठाधिकारी आहेत.

वीरशैवांच्या पाच पीठांच्या आचार्यांना 'जगद्गुरू' म्हणजे जगाचे गुरू असे पद प्राप्त झाले आहे.

**तस्मात्तस्माच्च गिरिजे पंचानन समुद्भवा: ।**
**मदादि सर्व लोकानां जगद्गुरुवरोत्तमा ।।**

अर्थात् हे पार्वती, माझ्या पाच मुखांपासून उत्पन्न झालेले पंचाचार्य माझ्यासह लोकांचे श्रेष्ठ जगद्गुरू झाले आहेत. असे प्रत्यक्ष शिवच पार्वतीला पंचाचार्य स्वत:सह सर्व जगाचे श्रेष्ठ गुरू झाले असल्याचे सांगत आहेत.

हिमालयातील केदारपीठापासून कर्नाटकाच्या दक्षिण टोकाच्या रंभापुरी पीठापर्यंत वीरशैवांचे हजारो शाखामठ आहेत. या सर्व ठिकाणी वीरशैवांची वस्ती कमी-अधिक प्रमाणात अजूनही आहे.

### म. बसवेश्वरांचे कार्य

कर्नाटकातील बागेवाडी गावात मादरस आणि मादांबिका या शिवभक्त ब्राह्मण पतिपत्नीच्या पोटी एका दैवी बालकाचा जन्म झाला. हेच बालक पुढे वीरशैवधर्माचे प्रचारक 'महात्मा बसवेश्वर' या नावाने प्रसिद्ध झाले. यांच्या जन्मापूर्वी त्यांच्या मातापित्यास बागेवाडीचे ग्रामदैवत नंदिकेश्वराचा आशीर्वाद लाभला होता. म्हणून या बालकाचे नाव बसव (वृषभ = नंदी) असे ठेवण्यात आले. पुढच्या आयुष्यात त्यांच्या हातून घडलेले धर्मसुधारणेचे मोठे कार्य पाहून लोक त्यांना शिवगण नंदीचा अवतार म्हणू लागले.

वयाच्या आठव्या वर्षी बसवांचा उपनयनसंस्कार करण्याचे मातापित्यांनी योजिले. परंतु आपल्याबरोबर आपल्या बहिणीचाही उपनयनसंस्कार करावा, असा आग्रह बसवांनी धरला. वेदोक्त उपनयन संस्कारांचा स्त्रियांना अधिकार नाही, असे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे बसवांनी उपनयनसंस्कार करून घेण्याचे नाकारले. स्त्री आणि पुरुष यांच्या भेदभाव करणाऱ्या रूढीचा त्यांनी निषेध केला आणि ते कुलदैवत कूडलसंगमेश्वरच्या दर्शनास गेले. तेथे उज्जयिनीपीठाचा सारंग मठ होता.

त्यावेळी श्री जातवेदमुनी शिवाचार्य हे पट्टाधिकारी होते. बसवेश्वर त्यांना शरण गेले. तेव्हा त्यांनी आगमोक्त लिंगदीक्षा संस्कार हा स्त्री व पुरुष दोघांनाही समानरूपाने देता येतो, असे सांगितले. जात, धर्म, आश्रम, स्त्री, पुरुष असा कोणताही भेदभाव न करता ज्याच्या अंगी शक्तिपातचिन्हे आढळतात अर्थात् शिवभक्तीची लक्षणे दिसतात अशा कोणत्याही व्यक्तीला लिंगदीक्षा घेण्याचा अधिकार आहे. जातिनिर्मूलन, स्त्री-पुरुषसमानता, श्रमप्रतिष्ठा आणि दास्यभाव ही तत्त्वे आगमोक्त असून शिवभक्तीचा अधिकार सर्वांना आहे, असे जातवेद मुनींनी सांगितल्यावर बसवेश्वरांनी त्यांच्याकडून इष्टलिंगदीक्षा घेतली. तेथे काही काळ राहून वेद, आगम, पुराणे, शास्त्रे यांचे त्यांनी अध्ययन केले.

बहीण अक्कनागम्मा, चन्नबसवेश्वर आदी समविचारी तरुण मंडळी त्यांच्यासमवेत आली. म. बसवेश्वरांच्या धर्मचळवळीमुळे कर्नाटकातील वीरशैव समाजात चैतन्य संचारले. शिवशरणांची वचने सर्वतोमुखी झाली.

चालुक्यांचा दंडनायक बिज्जल याच्या पदरी मंगळवेढा येथे बसवेश्वरांनी राजसेवा केली. पुढे बिज्जलांनी कल्याणला त्यांना कोषाध्यक्षपदी नेमले. तेथे बसवेश्वरांनी समविचारी सर्व जातिधर्मातील स्त्री-पुरुषांना एकत्र करून अनुभव-मंटपाची स्थापना केली. कन्नड वचने रचून त्यांमधून सदाचरणाचा आणि भक्तिमार्गाचा उपदेश केला. जातिनिर्मूलन, स्त्रीपुरुषसमानता ही आगमग्रंथांतील धर्मतत्त्वे प्रत्यक्ष समाजात अंमलात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अनुभवमंटपात मुक्तचर्चा होऊ लागली. त्या चर्चेतूनच चोवीस हजारांपेक्षाही अधिक कन्नड वचनांची निर्मिती झाली. त्यांच्या ह्या कार्यामुळे त्यांना महात्मा ही उपाधी मिळाली. वीरशैवधर्मतत्त्वांच्या प्रसाराचे फार मोठे कार्य म. बसवेश्वरांनी केले.

## वीरशैव साहित्य व त्याचे प्रणेते

**सिद्धान्ताख्ये महातन्त्रे कामिकाद्ये शिवोदिते ।**
**निर्दिष्टमुत्तरे भागे वीरशैवमतं परम् ।।** श्रीसिद्धान्तशिखामणी, ५.१४

अर्थात् कामिकागमापासून वातुलागमापर्यंत असलेले अठ्ठावीस आगम भ. शंकरांनी सांगितले असून त्यांना सिद्धान्तागम असे म्हणतात. त्या आगमांच्या उत्तर भागामध्ये वीरशैवमताचे विवेचन केलेले आढळते, असे आचार्य रेणुक भगवत्पादांनी सांगितले आहे. त्याच अनुरोधाने पुढे वीरशैव साहित्याची रचना केली, असे मानले जाते. श्रीपतिपंडिताराध्य यांनी ब्रह्मसूत्रावर केलेले 'श्रीकरभाष्य' नावाचे भाष्य आहे. त्यावरून असे समजते की, मतसंस्थापक पाच आचार्यांपैकी रेवणसिद्ध, मरुळसिद्ध व एकोरामभगवत्पाद या तीन आचार्यांनी ब्रह्मसूत्र, वेद व उपनिषदांवर वीरशैवपर भाष्ये लिहिली. परंतु आज ती उपलब्ध नाहीत.

**अगस्त्यमुनी :** श्रीपतिपंडिताराध्यप्रणीत 'श्रीकरभाष्या'त असा उल्लेख आला आहे:-

**अगस्त्यमुनिचंद्रेण कृतां वैयासिकीं शुभाम् ।**
**सूत्रवृत्तिं समालोक्य कृतं भाष्यं शिवंकरम् ।।** मंगलाचरण, श्लोक १७

ज्या अगस्त्य ऋषींनी भगवत्पादाचार्य ज. रेणुकाचार्यांकडून 'श्रीसिद्धान्त-शिखामणी'च्या रूपात जो उपदेश श्रवण केला त्याच्याद्वारा अगस्त्यांनी 'ब्रह्मसूत्रवृत्ती' नावाचा ब्रह्मसूत्रावरील भाष्यग्रंथ लिहिला. पण तो पाहण्यात नाही. कुंभकोण नगरीत त्याची एक प्रत असल्याचे समजते. वीरशैवांच्या संस्कृत ग्रंथात ब्रह्मसूत्रवृत्तीचा उल्लेख महत्त्वाचा मानावा लागेल.

**शिवयोगी शिवाचार्य :** शिवयोगी शिवाचार्यांनी इ.स.च्या आठव्या शतकात शैवागमावर आधारित 'श्रीसिद्धान्तशिखामणी' नावाच्या पद्यात्मक ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ प्राचीन आणि प्रामाणिक आहे. रेणुकाचार्यांनी अगस्त्य महर्षीस जो उपदेश केला त्याचा काळ रामायणकाळ असावा, कारण त्यात रेणुकाचार्यांनी श्रीलंकेत जाऊन तत्कालीन लंकेश विभीषणाकडून तीन कोटी लिंगांची स्थापना करविली. हा उपदेश एवढा प्राचीन असला तरी हजारो वर्षे तो उपदेश गुरुशिष्यपरंपरेने मौखिक रूपाने जिवंत ठेवला. हा उपदेश आठव्या शतकात झालेल्या शिवयोगी शिवाचार्यांनी एकवीस परिच्छेदांत विभागून 'श्रीसिद्धान्त-

शिखामणी' नावाचा ग्रंथ पद्यरूपात निर्माण केला. यात एकूण एकशे एक स्थले आहेत. मलत्रयांनी बद्ध जीव आत्मशक्तीचा विकास करीत गुरूपदेशाने शिवत्व प्राप्त करतो. त्याच्या प्रगतीचा सोपान म्हणजे एकशे एक स्थले. भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य ही सहा प्रमुख स्थले. ही सहा अंगस्थले व सहा लिंगस्थले अशी दोन प्रकारची होतात. सहा अंगस्थलाचे उपप्रकार असे आहेत:-

भक्त- १५, माहेश्वर- ९, प्रसादी- ७, प्राणलिंगी- ५, शरण- ४, ऐक्य- ४ असे एकूण ४४ होतात. लिंगस्थलातील सहा भेदांचे उपभेद असे-

भक्त- ९, माहेश्वर- ९, प्रसादी- ९, प्राणलिंगी- ९, शरण- १२ व ऐक्य- ९ असे एकूण ५७ होतात. अंगस्थलातील ४४ व लिंगस्थलातील ५७ मिळून एकशे एक स्थले होतात. या ग्रंथावर मरितोंटदार्यांची 'तत्त्वप्रदीपिका व्याख्या' नावाची टीका आहे.

हा ग्रंथ वारद ग्रंथमालेतून इ.स. १९०५ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर प.पू. काशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी संपादन करून त्यास विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. डॉ. चंद्रशेखर कपाळे, डॉ. शे.दे. पसारकर, पं. शरणय्या अचलेरी यांनी मराठी अनुवाद केला आहे. दुसऱ्या प्रतीमध्ये डॉ. कपाळे यांनी अन्वयासह अर्थ लिहिला आहे.

**नीलकंठ शिवाचार्य :** नीलकंठ शिवाचार्य नावाचे दोन आचार्य होऊन गेले. एक, ब्रह्मसूत्रावरील भाष्य लिहिणारे हे आद्य शंकराचार्यांचे समकालीन तर दुसरे, नीलकंठ शिवाचार्य हे 'क्रियासार' नावाच्या तीन भागात कारिकारूपाने ब्रह्मसूत्र भाष्यासहित अनेक विषयांचे स्पष्टीकरण देणारे. ते म्हणतात:-

**मयापि तस्य तात्पर्यं श्रोतृणां सुखबुद्धये ।**
**कारिकारूपतः सर्वं क्रमेणैव निबध्यते ।।** क्रियासार, १.३३

त्यांच्या रचनेवरून त्यांचा काल चौदावे शतक असावा.

**श्रीपतिपंडिताराध्य :** हे इ.स. अकराव्या शतकात होऊन गेले. त्यांनी ब्रह्मसूत्रावर 'श्रीकरभाष्य' नावाचे भाष्य लिहिले आहे. हा ग्रंथ १९७७-७८ साली प्राच्यविद्या संशोधनालयाद्वारा दोन खंडांत प्रकाशित झाला. त्यात वीरशैवात अप्रचलित शिखासूत्र, एकादशी व्रताचा उल्लेख येतो. ते स्वत:ला वीरशैव मानतात.

**मायिदेव :** हे पंधराव्या शतकातील श्रेष्ठ साहित्यिक होत. त्यांचा 'अनुभवसूत्र' नावाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो वातुलतंत्रावर आधारित आहे. यांच्या 'विशेषार्थप्रकाशिका' नामक ग्रंथास अनुभवसूत्राचा उत्तरार्ध मानले जाते. या व्यतिरिक्त वीरशैवोत्कर्ष, शतकत्रयम्, इ. ग्रंथ आहेत.

**नंदिकेश्वर :** पंधराव्या शतकात झालेल्या नंदिकेश्वरांच्या नावावर 'लिंगधारण–चंद्रिका' नावाचा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. यात वैदिक मंत्राच्या आधारे इष्टलिंगधारणेचे प्रतिपादन केले आहे. या ग्रंथावर शिवकुमार मिश्र नावाच्या वीरशैवेतर विद्वानाची 'शरद्' नावाची संस्कृत टीका उपलब्ध आहे. काशी जंगमवाडी मठातर्फे या ग्रंथाचे प्रकाशन १९०५ मध्ये काशीजगद्गुरू राजेश्वर महास्वामींनी केले. इ.स. १९८८ मध्ये प्रा. व्रजवल्लभ द्विवेदींनी भाषानुवादासह संपादन करून शैवभारती भवनातर्फे प्रकाशित केले.

**स्वप्रभानंद शिवाचार्य :** 'शिवाद्वैतमंजरी' नावाच्या ग्रंथाचे कर्ते स्वप्रभानंद शिवाचार्य काश्मीरनिवासी होते. यात पहिल्यांदा द्वैतमताचे खंडन केले असून शिवाद्वैत सिद्धान्ताचे मंडन केले आहे. १७ व्या शतकात झालेल्या या आचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे संपादन ज. डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी १९८६ मध्ये करून जंगमवाडी मठातर्फे प्रकाशन केले आहे.

**मरितोंटदार्य :** सतराव्या शतकात झालेल्या या विद्वान पंडितांनी 'श्रीसिद्धान्त–शिखामणी'वर 'तत्त्वप्रदीपिका' नावाची टीका लिहिली आहे. यांचा 'श्रीसिद्धान्तशिखामणी' (सटीक) वारद ग्रंथमालेने १९०५ मध्ये प्रकाशित केला. या व्यतिरिक्त 'वीरशैवानंद चंद्रिका' नावाचा स्वतंत्र ग्रंथ निर्माण केला. यात क्रिया, वाद व कथा अशी त्रिकांडात्मक मांडणी केलेली आहे. वादकांडात चार्वाक, बौद्ध, जैन, मीमांसक, सांख्य, शाक्त, गौतमीय, योग, शंकर, रामानुज, मध्व यांचे निराकरण केले आहे व वीरशैवमतोत्कर्ष संवादरूपात सिद्ध केला. 'कैवल्यसार' नावाचा ग्रंथही त्यांच्या नावावर आहे.

**केळदीबसव भूपाल :** सतराव्या शतकातील कर्नाटकातील केळदी संस्थानचे राजे होते. ते साहित्य व धर्मप्रेमी विद्वान होते. त्यांनी 'शिवतत्त्वरत्नाकर' नावाचा ग्रंथ लिहिला. या व्यतिरिक्त 'सुभाषितसुरद्रुम' व 'सूक्तिसुधाकर' हे दोन ग्रंथही लिहिले. यातील सूक्तिसुधाकर उपलब्ध नाही. सुभाषितसुरद्रुम मैसूर प्राच्यविद्या

संशोधनालय ग्रंथालयात उपलब्ध असून त्याचे प्रकाशन झाले नाही. शिवतत्त्वरत्नाकर या ग्रंथाचे १९२७ मध्ये बी. रामराव व पी. सुंदरशास्त्री यांनी मद्रास येथे प्रकाशन केले. त्यानंतर मैसूर विश्वविद्यालयाच्या प्राच्यविद्या संशोधनालयातर्फे १९६४ मध्ये प्रथम भाग, १९६९ मध्ये द्वितीय भाग व १९८८ मध्ये तृतीय भाग क्रमाक्रमाने प्रकाशित झाले.

**उमचिगीशंकरशास्त्री :** धर्मरत्न पदवीविभूषित शंकरशास्त्रींनी ईश, केन, मुंडक व सिद्धान्तशिखोपनिषद या उपनिषद् ग्रंथांवर संस्कृत टीका लिहिल्या आहेत. याशिवाय व्यासविरचित ब्रह्मसूत्रावर 'ब्रह्मसूत्रवृत्ती' नावाची विद्वत्तापूर्ण टीका लिहिली आहे. हे सर्व ग्रंथ मैसूर येथील श्रीशंकरविलास संस्कृत पाठशालाध्यक्ष श्रीमदुज्जयिनी सद्धर्मसिंहासनाध्यक्ष ज. मरुळाराध्य शिवाचार्य महास्वामींनी प्रकाशित केले आहेत.

वीरशैवदर्शनशास्त्रावर आजपर्यंत लिहिल्या गेलेले संस्कृत ग्रंथ, त्यांचे कर्ते व रचनाकाल पुढीलप्रमाणे आहे.

१. अमृतेश्वरभाष्यम् (सर्वेश्वरयती, इ.स. १६००)
२. अनादिवीरशैवसारसंग्रह (गुलुरुसिद्धवीरणाचार्य, १६००)
३. आनंदगीता (मल्लिकार्जुनपंडिताराध्य, ११३०)
४. एकोत्तरशतस्थली (जक्कणार्य, इ.स.–)
५. कविकर्णरसायन (यत्नंदू षडक्षरकवि, १६६५)
६. कामिकाद्यष्टाविंशत्यागम–वृत्तयो दीपिकाश्च (सकलागमाचार्य, ११५०)
७. कैवल्योपनिषत्सादाशिवभाष्यम् (सदाशिवशिवाचार्य, १९४८)
८. कैवल्यसार: (मरितोंटदार्य, १६६०)
९. चन्नबसवपुराणम् (कुमारस्वामिशास्त्री)
१०. चोल–रेणुकसंवाद: शिवाधिक्यशिखामणि:, (सोसलेरेवणाराध्य, १६६०)
११. ज्ञानशतकम् (सर्पभूषणशिवयोगी)
१२. नंदिकेश्वरकारिका (नंदिकेश्वरशिवाचार्य)
१३. नीलकंठभाष्यम् (ब्रह्मसूत्रस्य) (नीलकंठशिवाचार्य, ८००)
१४. पंडिताराध्यचरितम् (गुरुराजकवि:)
१५. प्रश्नरेणुकम् (हस्तलेख:, रुद्रमुनीश्वर)

१६. बसवराजीयम् (पाल्कुरिकेसोमनाथ, ११८०)
१७. बसवेशविजयम् (कंचिशंकराराध्य)
१८. भक्ताधिक्यरत्नावलि: (षडक्षरदेव, १६६५)
१९. भगवद्गीतावीरशैवभाष्यम् (टी.जी. सिद्धप्पाराध्य, १९६६)
२०. भीमेश्वरगद्यम् (मल्लिकार्जुनपंडिताराध्य, ११३०)
२१. महानारायणोपनिषद्भाष्यम् (वृषभपंडिताराध्य, १४००)
२२. माचिदेवमनोविलास: (बसवलिंगशिवयोगी)
२३. रेणुकचंपू: (ईशानशिवगुरु, ९५०)
२४. रेणुकविजयचंपू: (सिद्धनाथशिवाचार्य, ९६०)
२५. रेवणसिद्धचरितम् (ईशानशिवगुरु, ९५०)
२६. लिंगराजीय: लिंगराज: (कोडगुनृप, १८००)
२७. लिंगोद्भवकाव्यम् (मल्लिकार्जुनपंडितराध्य, ११३०)
२८. वातुलोत्तरव्याख्यानम् (गुब्बिमल्लणार्य, ११३०)
२९. वीरमाहेश्वराचारसंग्रह: (नीलकंठनागनाथाचार्य, १३००)
३०. वीरमाहेश्वराचारसारोद्धार: (लक्ष्मीधरराराध्य:)
३१. वीरशैवधर्मशिरोमणि: (षडक्षरमंत्री, १७००)
३२. वीरशैवप्रदीपिका (मरितोंटदार्य, १६६०)
३३. वीरशैवविलास: (पादपूजाबसवलिंगदेशिकेंद्र)
३४. वीरशैवसदाचारसंग्रह: (श्रीनागनाथाचार्य)
३५. वीरशिवान्वयचंद्रिका (आराध्यवीरेशशास्त्री)
३६. वीरशैवाचारकौस्तुभ: (मौनप्पपंडित, १७००)
३७. वीरशैवाचारप्रदीपिका (गुरुदेवकवि:)
३८. वीरशैवाचारसुधानिधि: (गुरुबसव, १७००)
३९. वीरशैवाष्टावरणप्रमाणाष्टकाभरणम् (इवटूरिनंदिकेश्वरशास्त्री)
४०. वीरशैवेंदुशेखर: (पंडितसदाशिवशास्त्री, १९२०)
४१. वीरशैवोत्कर्षसंग्रह: (पी.आर. करिबसवशास्त्री, १९०८)
४२. वीरभद्रदंडकम् (षडक्षरदेव, १६६५)
४३. विवेकचिंतामणि: / लिंगराज: (कोडगुनृप, १८००)

४४. वीरशैवोत्कर्षप्रदीपिका (चन्नबसवदेशिकः)
४५. वेदान्तसारवीरशैवचिंतामणिः (निट्टूरिनंजणाचार्य)
४६. श्वेताश्वतरोपनिषद्वीरशैवभाष्यम् (शोधप्रबंध, टी जी. सिद्धप्पाराध्य, १९६५)
४७. शक्तिविशिष्टाद्वैतदर्शनम् (शोधप्रबंध, टी.जी. सिद्धप्पाराध्य, १९६५)
४८. शंकरगीता (मल्लिकार्जुनपंडिताराध्य, ११३०)
४९. शरणगीता (कन्नडवचनानां पद्यानुवादः, टी.जी. सिद्धप्पाराध्य, १९६६)
५०. शिवाधिक्यरत्नाकरः (केलदीबसवभूपाल, १६००)
५१. शिवाधिक्यरत्नावलिः (षडक्षरदेव, १६६५)
५२. शिवाद्वैतपरिभाषा (हूलीनीलकंठशिवाचार्य, १९२०)
५३. शिवाद्वैतदर्पणः (शिवानुभवशिवाचार्य)
५४. शिवपंचस्तवव्याख्या (विश्वाराध्यपंडित)
५५. शिवपंचविंशतिलीलाशतकम् (हस्तलेखः, श्रीकाशीजगद्गुरू वीरभद्र-शिवाचार्याः, १९४५
५६. शिवप्रसंगरत्नाकरः (वृषभलिंगशिवयोगी)
५७. शिवमंत्रोपविधिः (संग्रहात्मकः, मूरुसावीरमठगंगाधरस्वामी, १९२१)
५८. शिवयोगप्रदीपिका (चन्नसदाशिवयोगी)
५९. शिवलिंगसूर्योदयः (वीरशैवधर्मबोधनाटकम्, मल्लणाराध्य)
६०. शिवज्ञानदीपिका (मल्लार्यगुरु, १२००)
६१. शिवसहस्रनामभाष्यम् (संगमेश्वरयति, १७८०)
६२. शिवज्ञानप्रदीपिका (विश्वनाथाचार्य)
६३. शिवज्ञानबोधः (शिवयोगीन्द्रज्ञानशिवाचार्य)
६४. शिवज्ञानभाष्यम् (शिवयोगीन्द्रज्ञानशिवाचार्य)
६५. शिवज्ञानसमुच्चयः (जक्षराराध्यनागेशगुरु, १२००)
६६. शैवरत्नाकरः (श्रीमज्ज्योतिर्नाथ, ११००)
६७. श्रीबसवोदाहरणम् (पाल्कुरिकिसोमनाथ, ११८०)
६८. श्रुतिसारभाष्यम् (श्रीशिवपूजालिंगशिवयोगींद्र, १७४५)
६९. सव्याख्या पंचश्लोकी (श्रीमत्केलदीबसवसुमतीवास)
७०. सानंदचरितम् (पद्मराजः केरेयपद्मरस, ११८०)

७१. सारोद्धार: (लक्ष्मीदेवगुरु, १२००)
७२. सिद्धान्तसारावलि: (त्रिलोचनशिवाचार्य)
७३. सिद्धार्थबोधिनी, सिद्धान्तशिखामणे: कन्नडटीका, (सोसलेरेवणाराध्य, १६६०)
७४. स्तवनमंजरी (अभिनवकालिदासो बसवशास्त्री)
७५. हरलीला (उद्भटाराध्य, १०२०)

**'श्रीसिद्धान्तशिखामणी'चे अनुवाद**

'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा ग्रंथ वीरशैवांचे सर्वस्व आहे. या ग्रंथांमध्ये श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी आगमांतील आणि वेदांतील अवतरणे उद्धृत करून तो तो विषय या ग्रंथात समर्थपणे प्रतिपादन केला आहे. वीरशैवांच्या मूळ षट्स्थलसिद्धान्ताची १०१ सूक्ष्म स्थलांमध्ये विभागणी करून त्यांनी अत्यंत स्पष्ट व स्वच्छ अशी मांडणी केली आहे. हे कर्तृत्व निस्संशय शिवयोगी शिवाचार्यांचेच होय.

हा ग्रंथ षट्स्थलतत्त्वाला प्रकाशित करणारा दिव्य मणी असून हा ग्रंथ म्हणजे जीव व शिव यांच्या ऐक्याचे कमल विकसित करणारा सूर्यच होय. षट्स्थलाचे रहस्य दृग्गोचर करणारे असे हे चिंतामणी रत्न आहे, अशाप्रकारे शिवयोगी शिवाचार्यांनी फलश्रुतीमध्ये या ग्रंथाचे माहात्म्य वर्णिले आहे. या ग्रंथाचे जो पठण करतो तो भय, शोक यांपासून मुक्त होऊन शिवसायुज्य प्राप्त करून घेतो. जो प्रतिदिनी या ग्रंथाचे पठण करतो त्याची पूर्वजन्मीची पापे नष्ट होतात.

'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा ज्ञानसागर असून त्याचे पारायणरूपी स्नान केल्याने संसारमलाचा नाश होतो. सर्व आगम म्हणजे गाय, रेणुकगणेश्वर हे दोग्धा (म्हणजे दोहन करणारे), अगस्त्य हे वासरू आणि सुज्ञ वाचक भोक्ते असून सिद्धान्तशिखामणी हे अमृततुल्य दूध आहे. केवळ वीरशैवच नव्हे तर समस्त मानवांनी या ग्रंथाचे पारायण, अभ्यास आणि चिंतन केले पाहिजे. असा हा एक वैश्विक दर्शनग्रंथ आहे.

'श्रीसिद्धान्तशिखामणी'चा कन्नड गद्यानुवाद सोसले रेवणाराध्य यांनी सतराव्या शतकात 'सिद्धान्तबोधिनी' या ग्रंथात केला आहे. याच काळात मरितोंटदार्यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वर 'तत्त्वप्रदीपिका' नामक संस्कृत व्याख्या लिहिली.

उज्जयनीश यांनी कन्नड गद्यानुवाद केला. या ग्रंथातील विचार व आचार सर्व मानवांना उपयुक्त असून हे विचार सर्वांपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने श्रीकाशीजगद्‌गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी विविध भाषांतील विद्वानांकडून या ग्रंथाचा अनुवाद करवून घेऊन ते ग्रंथ काशीपीठातर्फे प्रकाशित केले. आतापर्यंत पुढील विद्वानांनी विविध भाषांमध्ये या ग्रंथांचे अनुवाद केले आहेत.

१. डॉ. एम. शिवकुमारस्वामी, बेंगळुरू (कर्नाटक) – संस्कृत
२. डॉ. एम. शिवकुमारस्वामी –''– – इंग्रजी
३. डॉ. राजशेखरय्या, मैसूर (कर्नाटक) – संस्कृत
४. डॉ. एस. सिद्धलिंगप्पा, बेंगळुरू (कर्नाटक) – कन्नड
५. डॉ. के. प्रताप, तिरुपती (आंध्र प्रदेश) – तेलुगू
६. डॉ. गणेशन, पुडुच्चेरी (पाँडेचेरी) – तमिळ
७. श्रीमती अंबिका अप्पुकुट्टन, केरळ – मलयालम
८. डॉ. चंद्रशेखर कपाळे, गुलबर्गा (कर्नाटक) – मराठी गद्य
९. डॉ. शे. दे. पसारकर, सोलापूर (महाराष्ट्र) – मराठी ओवी
१०. डॉ. शे. दे. पसारकर –''– – मराठी अभंग
११. डॉ. शे. दे. पसारकर –''– – मराठी अनुष्टुभ्
१२. डॉ. राधेश्याम चतुर्वेदी, वाराणसी (उत्तरप्रदेश) – हिंदी
१३. डॉ. प्रभुनाथ द्विवेदी, वाराणसी (उत्तरप्रदेश) – अवधी दोहा–चौपाई
१४. डॉ. हरिप्रसाद अधिकारी, वाराणसी (उत्तरप्रदेश) – नेपाळी
१५. डॉ. करुणा त्रिवेदी, अहमदाबाद (गुजरात) – गुजराती
१६. डॉ. प्रमोदिनी पंडा, पुरी (ओडिसा) – उडिया
१७. पं. शशिनाथ झा, दरभंगा (बिहार) – मैथिली
१८. डॉ. प्रवीणकुमार (बिहार) – भोजपुरी
१९. युलिया क्रावचेन्को (युक्रेन) – रशियन

काशी हिंदू विश्वविद्यालयातील जर्मन भाषेचे प्रा. डॉ. ओमप्रकाश आणि जपानी भाषेच्या प्रा. डॉ. कु. चांदनी हे दोघे अनुक्रमे श्रीसिद्धान्तशिखामणी'चे जर्मन व जपानी या भाषांत अनुवाद करीत आहेत.

याशिवाय या ग्रंथांवरील मराठी आशीर्वचने 'जन्म हा अखेरचा' (अनुवाद- शे. दे. पसारकर) व कन्नड 'प्रवचनप्रभे' (डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य) हे ग्रंथही प्रकाशित झाले असून याचा तेलुगू अनुवाद प्रा. मठम लिंगय्या यांनी केला आहे.

## कन्नड वीरशैव साहित्य

कन्नड भाषेत वीरशैवसाहित्याची विपुल निर्मिती झाली. अकराव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत वीरशैव तत्त्वज्ञान, साहित्य, वीरशैव व्यक्ती यांविषयीची रचना अविरत होत राहिली आहे. बसवपूर्व काळात कोडगुळी केशिराज, तेलुगू जोम्मण्णा, केंभावी भोगण्णा, जेडरदासिमय्या अशा अनेक शिवशरणांनी कन्नड वचने रचिली आहेत. जेडरदासिमय्यांना वचनसाहित्याचे प्रणेते म्हटले जाते. बसवयुगात वचनसाहित्याला अतिशय बहर आला. साधी वाक्ये, सामान्य लोकानुभव, सोप्या म्हणी यांतून वचनकारांनी असाधारण असे ज्ञान लोकांना दिले. सर्वसमभाव, स्त्रीसमानता, ज्ञानक्रियासमन्वय, कायक, दासोह, भक्ती व एकदेवतोपासना यांचा गजर केला. भक्तिभांडारी म. बसवेश्वर या चळवळीचे अग्रणी होते. या काळात अडीचशेपेक्षा अधिक वचनकारांनी वचनरचना केली. अल्लमप्रभू, सिद्धरामेश्वर, अक्कमहादेवी, चन्नबसवेश्वर आदी सर्व वचनकारांची मिळून २४००० पेक्षा अधिक वचने उपलब्ध झाली असून ती प्रकाशितही झाली आहेत. हरिहरकवीचे शिष्य महाकवी राघवांक यांच्या षट्पदीतील हरिश्चंद्रकाव्य, सिद्धरामचारित्रे, सोमनाथचारित्रे आदी रचना आहेत, तर पाल्कुरिकी सोमनाथकवीचे शतक साहित्य, भीमकवीचे बसवपुराण, केरेय पद्मरसाचे पद्मराजपुराण, निजगुण-शिवयोगींचे विवेकचिंतामणी, परमानुभवबोधे आदी ग्रंथ असे विपुल कन्नड साहित्य उपलब्ध आहे. बसवोत्तर काळातही सातत्याने वचनरचना होत राहिली. वीरशैव वचनसाहित्य ही कन्नड भाषेने विश्वाला दिलेली अमूल्य देणगी होय. (संदर्भ : 'कन्नड वीरशैव साहित्य : एक दृष्टिक्षेप', डॉ. बी. बी. पुजारी, विभूतिवैभव, अंक ६१, जुलै ते सप्टेंबर २००७, पृ. ७४-८२)

## मराठी वीरशैव साहित्य

'विसोबा खेचरविरचित षट्स्थल' हा तेराव्या शतकातील मराठी ओवीबद्ध ग्रंथ उपलब्ध झालेला असला तरी सोळाव्या शतकातच कपिलधार येथे समाधिस्थ

झालेले संतशिरोमणी मन्मथस्वामी आणि शिखरशिंगणापूरचे शांतलिंगस्वामी यांनी मराठीत वीरशैव साहित्यनिर्मिती केली. मन्मथस्वामीकृत परमरहस्य, अनुभवानंद, स्वयंप्रकाश, श्रीगुरुगीता आणि शांतलिंगस्वामीकृत विवेकचिंतामणी, कर्णहंस हे ओवीबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याशिवाय मन्मथस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, शिवदास, महादेवप्रभू, लक्ष्मण महाराज, गंगाधरस्वामी, शंकरमृगेंद्र स्वामी, बसवदास, गुरुदास, भावंडीबाई, बाळाबुवा कबाडी, चन्नप्पा वारद, शिवगुरुदास अशा अनेक संत-भक्तकवींनी विपुल अभंगरचना केली. पदे, भारुडे, आरत्या, गौळणी, अष्टके अशा त्यांच्या विविध रचना उपलब्ध आहेत. ओवीबद्ध ग्रंथांत संस्कृत ग्रंथांवरील भाष्य, संस्कृत व कन्नड ग्रंथांचे अनुवाद आणि वीरशैव संतांची चरित्रे अशा रचना आहेत. ओवी-अभंग यांबरोबरच गद्यरचनाही उपलब्ध आहेत. वीरशैवांची मराठी स्फुट रचना २०००० पेक्षा अधिक संख्येने उपलब्ध झाली आहे. अनेक जुन्या व नव्या लेखक कवींनी सातत्याने वीरशैव साहित्यात भर घातली आहे. अलीकडे काशीपीठाकडूनही मराठी वीरशैव साहित्यात मोलाची भर घातली गेली. श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत (ओवीबद्ध), श्रीसिद्धान्त-शिखामणी अभंगगाथा (अभंगबद्ध), श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय (ओवीबद्ध), रेणुकगीताई (अनुष्टुभ छंदोबद्ध) ही त्याची उदाहरणे होत. मराठी वीरशैव वाङ्मयावर पीएच.डी. संपादन केलेल्या अभ्यासकांचे दहा शोधप्रबंध काशीपीठाने प्रकाशित केले. अशाप्रकारे मराठी वीरशैव साहित्य अत्यंत समृद्ध स्वरूपात उपलब्ध आहे. (संदर्भ : 'वीरशैवों का मराठी-साहित्य', डॉ. शे. दे. पसारकर, वीरशैव संस्कृति एवं दर्शन, शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी, २०१७, पृ. ५४-६३)

अशाप्रकारे हिंदी, तेलुगू, तमिळ आदी भारतीय भाषांत देखील वीरशैव साहित्य उपलब्ध आहे.

■■

प्रकरण दुसरे

# शक्तिविशिष्टाद्वैत

भारतीय दर्शनांमध्ये वीरशैवदर्शन हे एक प्रमुख दर्शन आहे. या दर्शनाला 'शक्तिविशिष्टाद्वैत दर्शन' असे नाव आहे. जीवाची मुक्ती हे दर्शनशास्त्राचे लक्ष्य होय. वीरशैवदर्शनात मुक्ती, मोक्ष याला 'लिंगांगसामरस्य' असे नाव आहे. 'लिंग' म्हणजे म्हणजे शिव आणि 'अंग' म्हणजे जीव. या दोघांचे सामरस्य म्हणजे लिंग-अंग-सामरस्य. भक्तिरूपी शक्तिविशिष्ट जीवाची कलारूपी शक्तिविशिष्ट शिवाशी होणाऱ्या सामरस्याचे प्रतिपादन केले आहे. शक्तियुक्त जीव व शक्तियुक्त शिव यांच्या सामरस्यामुळे या दर्शनाला 'शक्तिविशिष्टाद्वैत' असे म्हटले जाते.

**दर्शन : परिभाषा व संख्या**

दर्शन याचा अर्थ तत्त्वज्ञान. दर्शन शब्दांची व्युत्पत्ती अशी करतात- 'दृश्यते साक्षात्क्रियते परमतत्त्वं येन तद् दर्शनम्.' अर्थात् ज्याच्या अध्ययनाने परमतत्त्वाचा साक्षात्कार होतो ते 'दर्शन' होय.

भारतभूमी ही दर्शनशास्त्रांची खाण आहे. या देशात अनेक ऋषिमुनींनी ध्यान-चिंतन करून स्वानुभवाने या शास्त्रांची रचना केली. शिवकवी पुष्पदंताने 'महिम्नस्तोत्रा'मध्ये म्हटल्याप्रमाणे

**रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषाम् ।**
**नृणामेकोगम्यः त्वमसि पयसामर्णव इव ।।**

दर्शने अनेक असून आपापल्या रुचिभेदानुसार कोणी सरळ मार्गाने तर कोणी आडवळणाने, परंतु एकाच ठिकाणी जाऊन पोहोचतात. ज्याप्रमाणे पावसाचे पाणी सरळ किंवा आडवाटांनी अखेर समुद्रालाच जाऊन मिळते, त्याप्रमाणे दर्शने अनेक असली तरी त्यांचे गंतव्य एकच आहे. माधवाचार्यांनी 'सर्वदर्शनसंग्रह' या ग्रंथात चार्वाक, बौद्ध, जैन, रामानुज, पूर्णप्रज्ञ, नकुलीश, पाशुपत, शैव,

प्रत्यभिज्ञा, रसेश्वर, वैशेषिक, न्याय, जैमिनीय, पाणिनीय, सांख्य, योग, शांकरवेदान्त अशा सोळा दर्शनांची संख्या नमूद केली आहे.

### आस्तिक व नास्तिक दर्शने

भारतीय दर्शनांची आस्तिक दर्शने व नास्तिक दर्शने अशी विभागणी केली जाते. पाणिनीच्या मते, 'अस्ति नास्ति दिष्टं मतिः' जे परलोक व पुनर्जन्म आहे असे मान्य करतात ते आस्तिक आणि जे मानत नाहीत ते नास्तिक होत. माधवाचार्यांच्या मते, जे ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात ते आस्तिक आणि जे ईश्वराला मानीत नाहीत ते नास्तिक होत. जे वेदागमांना मानतात ते आस्तिक व जे वेदांना नाकारतात ते नास्तिक. सारांश असा की, परलोक, पुनर्जन्म, ईश्वर व वेदागम यांना मानणारे ते आस्तिक आणि त्यांना नाकारणारे ते नास्तिक. लोक, परलोक, पुनर्जन्म, ईश्वर यांचे ज्ञान वेदागमांकडून प्राप्त होते. म्हणून सर्व शास्त्रकारांनी वेदागमांना जे मानतात ते आस्तिक आणि जे मानत नाहीत ते नास्तिक होत, असा निष्कर्ष काढला आहे.

### दर्शनशास्त्राचे प्रयोजन

आस्तिक असो किंवा नास्तिक, सर्व दर्शनांची एक विशिष्ट भूमिका आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांत मोक्ष हा परमपुरुषार्थ होय. मोक्षाची व्याख्या प्रत्येक दर्शनाने वेगळी केली असेल, परंतु मोक्षप्राप्ती हे सर्व दर्शनांचे ध्येय आहे. मोक्ष म्हणजे चिरंतन, अवीट अशा परमसुखाची प्राप्ती. प्रत्येक मनुष्याला सुख हवे असते आणि दुःख नको असते. परंतु न मिटणारे चिरंतन सुख जगात अस्तित्वात नाही. ऐश्वर्य, सत्ता, संपत्ती इत्यादींमुळे प्राप्त होणारे सुख हे तात्कालिक असून ते फार काळ टिकणारे नाही. म्हणून सुखाचा शोध अनंतकाळापासून मानव घेत आला आहे. अशा चिरंतन मोक्षसुखाचा मार्ग सर्व दर्शने दाखवतात.

या दर्शनकारांनी मुख्यतः ईश्वर, जीव, जगत्, बंध आणि मोक्ष या पाच विषयांचे चिंतन केले आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा आणि वेदान्त या भारतीय षड्दर्शनांमधील पहिली पाच दर्शने द्वैतवादी असून वेदान्त मात्र अद्वैतवादी आहे. जीव आणि ईश्वर हे वेगवेगळे आहेत असा भेद मानणे

म्हणजे द्वैत आणि जीव व ईश्वर यांच्यात अभेद मानणे हे अद्वैत होय. द्वैत व अद्वैत दर्शनांमध्ये परस्परांचे खंडन आणि स्वमताचे मंडन नित्य चाललेले असते. त्यांचा हा वाद संपविण्यासाठीच वीरशैवदर्शनाने द्वैत आणि अद्वैत मतांचा समन्वय केला आहे.

वीरशैवदर्शन असे सर्वसमावेशक असल्यामुळे ते सर्वांना ग्राह्य होय. सर्वसमावेशक आणि सर्वग्राह्य अशा वीरशैव दर्शनशास्त्राचा परिचय या पुढे करून घ्यावयाचा आहे.

**वीरशैव दर्शनशास्त्र**

वीरशैवदर्शन मूलतः आगमप्रतिपादित दर्शन असून आगमांना अनुकूल असलेल्या वेदांतील भागसुद्धा ते मान्य करते. 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथातील फलश्रुतीमध्ये श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी 'श्रीवेदागमवीरशैवसरणीम्' असे त्याचे समर्थन केले आहे. वीरशैवदर्शनाला विशेषाद्वैत, शक्तिविशिष्टाद्वैत आणि शिवाद्वैत अशीदेखील नावे आहेत. विशेषाद्वैत शब्दातील 'वि' हे अक्षर शिववाचक असून 'शेष' हा शब्द जीववाचक आहे. वि आणि शेष यांच्यातील अद्वैत प्रतिपादन करणारे जे शास्त्र ते विशेषाद्वैत.

शक्तिविशिष्ट जीव म्हणजे भक्तिरूपी शक्तीने युक्त असा जीव आणि शक्तिविशिष्ट शिव म्हणजे कलाशक्तीने युक्त असा शिव, यांच्यातील ऐक्य प्रतिपादन करणारे शास्त्र म्हणजे शक्तिविशिष्टाद्वैत. भक्ती ही श्रद्धाभक्ती, निष्ठाभक्ती, अवधानभक्ती, अनुभवभक्ती, आनंदभक्ती व समरसभक्ती अशी सहा प्रकारची असते. कला ही निवृत्तिकला, प्रतिष्ठाकला, विद्याकला, शांतिकला, शांत्यतीताकला व शांत्यतीतोत्तराकला अशी सहा प्रकारची असते. षट्स्थल-उपासनेत वरील सहा भक्तीने युक्त असलेला जीव क्रमशः सहा कलायुक्त शिवाशी समरस होतो. म्हणून शक्तिविशिष्ट जीव आणि शक्तिविशिष्ट शिव यांच्या ऐक्यस्थितीचा बोध करणारे शास्त्र म्हणजे शक्तिविशिष्टाद्वैत.

शिवाचे जीवाशी अद्वैत प्रतिपादन करणारा सिद्धान्त म्हणजे शिवाद्वैत. जीव हा शिवांश असल्यामुळे तो मूलतः शिवच आहे. शिवाचा अंशरूपी जीव साधना करून परशिवाशी समरस होतो. हेच शिवाद्वैत होय.

वीरशैवदर्शनाच्या पाच आचार्यांनी पंचसूत्रांचा उपदेश केलेला आहे. दर्शन-शास्त्राच्या इतिहासातील ही प्रारंभीची सूत्रे होत. वीरशैव पंचाचार्य हे आद्यसूत्रकार होते. पडविडी (पदविधी), वृष्टी, लंबन, मुक्तागुच्छ आणि पंचवर्ण ही पंचाचार्यांनी उपदेशिलेली पंचसूत्रे होत. जगद्गुरू रेणुकचार्यांनी अगस्त्य महर्षींना पडविडिसूत्राचा, जगद्गुरू दारुकाचार्यांनी दधीची महर्षींना वृष्टिसूत्राचा, जगद्गुरू घंटाकर्णाचार्यांनी व्यासमहर्षींना लंबनसूत्राचा, जगद्गुरू धेनुकर्णाचार्यांनी सानंद मुनींना मुक्तागुच्छ-सूत्राचा आणि जगद्गुरू विश्वकर्णाचार्यांनी दुर्वास महर्षींना पंचवर्णसूत्राचा उपदेश केला आहे. ही पंचसूत्रे क्रमश: परमपदप्राप्तीचा विधी, जीवाची उत्पत्ती व स्वरूप, ईश्वरस्वरूप, जगत्स्वरूप, बंध-मोक्ष या मुख्य पाच दार्शनिक विषयांचे प्रतिपादक होत. पुढील काळात सर्व भारतीय दार्शनिकांनी आणि पाश्चिमात्त्य तत्त्वचिंतकांनी ईश्वर, जीव, जगत्, बंध व मोक्ष यांविषयी आपापले सिद्धान्त प्रतिपादिले आहेत. वीरशैवदर्शनामध्ये या पाच विषयांविषयी वीरशैवाचार्यांची कोणती मते आहेत, याचा आपण विचार करणार आहोत.

भारतीय दार्शनिकांनी ईश्वराचे अस्तित्व मान्य केले याला पुढील तीन कारणे आहेत.

१. जगाची उत्पत्ती, पालन, संहार, निग्रह व अनुग्रह या पंचकृत्यांची व्यवस्था लावणे.

२. सर्व जीवांना त्यांच्या अदृष्टानुरूप सुखदु:खाचा भोग भोगविणे.

३. वेदांचे प्रामाण्य सिद्ध करणे.

कोणतीही वस्तू स्वत:हून उत्पन्न होत नाही, तर तिचा कोणी तरी निर्माता असतो. त्याप्रमाणे या विशाल ब्रह्मांडाची उत्पत्ती स्वत:हून झाली नसेल. तिचाही कोणीतरी निर्माता असेल. ब्रह्मांड हे कार्य आहे म्हणून त्या कार्याचा कर्ताही असणारच. अनंत ब्रह्मांडांची निर्मिती करणारा सामान्य कुवतीचा असणार नाही. म्हणून त्यांची निर्मिती अपार सामर्थ्य असलेल्या आणि सर्वज्ञत्व-सर्वकर्तृत्वादी गुण असणाऱ्या ईश्वरानेच केली असली पाहिजे. त्याचप्रमाणे जगात सर्वत्र वैचित्र्य आढळते. प्रत्येक जीव, त्याचा स्वभाव, सुरूपता, कुरूपता, श्रीमंती, दारिद्र्य, आरोग्य, अनारोग्य इत्यादी वैचित्र्यांचे कारण कोणते? तर त्या त्या जीवाचे अदृष्ट हेच त्याचे कारण आहे. अदृष्ट म्हणजे गतजन्मांतील पुण्य-पापांचे

गाठोडे. यासाठी ज्याच्या त्याच्या अदृष्टाप्रमाणे त्याचे फळ देणारा आणि त्या अदृष्टाची जाण असलेला कोणीतरी विलक्षण असा ईश्वर मानावा लागतो.

वेद आणि आगम हे ज्ञानभांडार असून त्यांची निर्मिती कोण्या एका व्यक्तीने केलेली नाही. म्हणून त्यांना 'अपौरुषेय' असे म्हटले जाते. वेद हे ईश्वराच्या उच्छ्वासातून आणि आगम त्याच्या वाणीतून प्रकट झाले, अशी मान्यता आहे. म्हणून वेदागमांचे प्रामाण्य सिद्ध करण्यासाठी ईश्वर मानावाच लागतो.

भारतीय आस्तिक दर्शनांमधील नैयायिक आचार्य असे म्हणतात की, जर जगाची उत्पत्ती ईश्वराने केली असे मानले तर जगातील विषमतेला ईश्वरच कारण ठरतो. त्यामुळे ईश्वर हा विषमबुद्धीचा व निर्घृण ठरतो. त्यामुळे केवळ ईश्वर हा जगाचे कारण होऊ शकत नाही. जीवांच्या अदृष्टामुळे विषमता उत्पन्न होते. अदृष्ट जड असल्यामुळे ते जगनिर्मितीचे कारण ठरू शकत नाही. म्हणून अदृष्टाच्या सहकार्याने ईश्वर जगनिर्मिती करतो, असेच मानले पाहिजे. नैयायिकांचे असे मत असून त्यांचा ईश्वर सर्वज्ञत्ववादी गुणांनी युक्त आहे.

वैशेषिक दर्शनात ईश्वराचा स्पष्ट उल्लेख केलेला नसला तरी वैशेषिक सूत्राचे भाष्यकार शंकर मिश्र यांनी 'तद्वचनादाम्नायस्य प्रामाण्यम्' (वैशेषिक सूत्र, १,१,३) असे सांगून वेदवचनांचे प्रामाण्य सिद्ध करण्यासाठी ईश्वर मानला पाहिजे, असे म्हटले आहे.

सांख्यदर्शन सत्कार्यवादी आहे. कार्य हे कारणामध्ये अव्यक्त रूपाने अवस्थित असते. प्रपंचरूपी कार्य हे जड असल्यामुळे त्याचे कारणही जडच आहे, असे ते म्हणतात. प्रकृती ही जड असून तीच प्रपंचाचे कारण होय. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांची साम्यावस्था म्हणजे प्रकृती. चेतनपुरुषाच्या सान्निध्यामुळे प्रकृतीच्या त्रिगुणांमध्ये वैषम्य निर्माण होऊन महत् आदी तत्त्वरूपी जग निर्माण होते. सांख्य सिद्धान्तानुसार सृष्टिनिर्मितीसाठी प्रकृती व पुरुष ही दोन तत्त्वे कारण असून त्यासाठी वेगळा ईश्वर मानण्याची आवश्यकता नाही.

योगशास्त्राच्या मते, प्रकृती जड असून पुरुष चेतन आहे. परंतु चेतन पुरुष अज्ञ आहे. प्रकृति-पुरुषाच्या संयोगाने सृष्टी होते, परंतु त्यासाठी पुरुषविशेष असा ईश्वर प्रेरक असतो. क्लेश, कर्म, विपाक आणि आशय यांच्यापासून पूर्ण अलिप्त असणारा पुरुषविशेष हाच ईश्वर होय.

(१. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश हे पाच **क्लेश**. २. शुक्ल, कृष्ण, शुक्लकृष्ण व अशुक्लअकृष्ण हे चार **कर्म**. ३. जाती, आयू व भोग हे तीन **विपाक**. विपाक म्हणजे कर्माची पक्वता. ४. **आशय** म्हणजे वासना.)

साधक अष्टांगयोगसाधनेने समाधि-अवस्था प्राप्त करून घेतो. परंतु ईश्वरकृपा लाभली तर समाधी शीघ्र प्राप्त होते. साधकाला शीघ्र समाधी लाभ व्हावा यासाठी ईश्वरप्रणिधानाची आवश्यकता असते. अर्थात् प्रकृति-पुरुषाचा प्रेरक आणि साधकावर कृपानुग्रह करणारा ईश्वर योगशास्त्राने मानला आहे. ईश्वरप्रणिधान म्हणजे भक्तिविशेष. ईश्वराचे ध्यानचिंतन केल्याने त्याची कृपा प्राप्त होते.

पूर्वमीमांसादर्शनात सूत्रकार जैमिनी आणि भाष्यकार शबरस्वामी हे दोघेही ईश्वराबद्दल मौन धारण करतात. परंतु कुमारिलभट्ट, शालिकनाथ, पार्थसारथी आदी विद्वानांनी नैयायिक व वैशेषिक आचार्यांनी सिद्ध केलेल्या ईश्वराचे खंडन करून सर्व जगव्यवहार जीवांच्या अदृष्टरूपी कर्मांनीच होतात, असे म्हटले आहे. ईश्वर हा नित्यतृप्त, कृतकृत्य व स्वतंत्र आहे, असे ते मानतात. सृष्टिनिर्मितीमागे जर ईश्वराचे प्रयोजन असेल तर त्याचे नित्यतृप्तत्व खंडित होते. सृष्टिनिर्मितीमागे जर प्रयोजन असेल तर ईश्वर बुद्धिहीन ठरेल. जर मनोविनोदनासाठी त्याने सृष्टी निर्मिली असेल तर तो कृतकृत्य ठरणार नाही. त्याने जर जीवांच्या कर्मांच्या आधारे सृष्टी निर्माण केली असेल तर त्याचे स्वातंत्र्य बाधित होईल. त्यामुळे पूर्वमीमांसक ईश्वराला मानीत नाहीत. सर्व निर्मिती जीवांच्या कर्मांमुळेच होते, असे ते मानतात.

पुढील काळात मीमांसकांनी निरीश्वरवाद दूर करण्यासाठी भवनात मिश्र, नंदीश्वर आदी विद्वानांनी ईश्वराला यज्ञेश्वराच्या रूपात स्वीकारले. यज्ञादी कार्य ईश्वरार्पण बुद्धीने केले तर ईश्वर त्याला मोक्ष प्राप्त करून देतो, असे ते मानतात.

ब्रह्म, माया, जगत्, ईश्वर, जीव आणि जीव-ईश्वरातील भेद हे अनादी आहेत, असे अद्वैतवेदान्त मानतो. ब्रह्म हे निर्विकार, अखंड असून तेथे कोणतीही क्रिया घडत नाही. मायाशक्तीने युक्त चैतन्य म्हणजे ईश्वर होय. हा ईश्वरच जगाची सृष्टी, स्थिती, विलय आदी पंचकृत्ये करतो. म्हणून अद्वैतवेदान्त मायाशक्तिविशिष्ट चैतन्य हाच ईश्वर होय, असे मानतो.

## वीरशैवदर्शनातील ईश्वर

केदारपीठाचे द्वापरयुगातील आचार्य जगद्‌गुरू घंटाकर्ण भगवत्पाद यांनी महर्षी वेदव्यासांना लंबनसूत्राचा उपदेश केला. त्यामध्ये त्यांनी सूक्ष्मरूपाने ईश्वराचे स्वरूप समजावून दिले. वेदातील 'पुरुषसूक्ता'मध्ये 'अत्यतिष्ठद्दशांगुलम्' अर्थात् समस्त विश्वाला व्यापून दशांगुले उरलेला– असे ईश्वराच्या व्यापक स्वरूपाचे वर्णन केले आहे. तेच या लंबनसूत्राच्या माध्यमातून आचार्यांनी सूत्ररूपाने व्यक्त केले आहे. उपनिषदांत या व्यापक चैतन्याला 'भूमा' असे संबोधिले आहे. जो विश्वाचा निर्माता, पालनकर्ता, संहारकर्ता, समस्त प्राणिमात्रांचा शासनकर्ता व त्यांच्यावर अनुग्रह करणारा आहे तो समस्त विश्वापेक्षा व्यापक असलाच पाहिजे. म्हणून सूत्रामध्ये त्या तत्त्वाला 'लंबन' असे म्हटले आहे. लंबन म्हणजे सर्वव्यापी. ज्याला सूत्रकारांनी 'लंबन' म्हटले त्यालाच पुढे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त लिंग, परशिव आणि 'अनुभवसूत्रा'त स्थल असे संबोधिले आहे. प्रलयकालात चराचर विश्व ज्याच्यात लय पावते आणि सृष्टिनिर्मितीच्या वेळी ज्याच्यातून ते प्रकट होते असे विश्वाच्या लयास व निर्मितीस कारण असलेले तत्त्व म्हणजे लिंग होय, असे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त (६.३७) म्हटले आहे. चराचर विश्व ज्यामध्ये स्थित असते आणि प्रलयकाली ते ज्यामध्ये लीन होते असे तत्त्व म्हणजे स्थल होय, असे 'अनुभवसूत्रा'त (२.४) म्हटले आहे.

वीरशैवदर्शनामध्ये परशिव सगुण व निर्गुण असा उभयरूप आहे. सगुण म्हणजे सकल आणि निर्गुण म्हणजे निष्कल. परशिवाजवळ अविनाभावसंबंधाने विमर्शशक्ती असते. जसे चंद्र आणि त्याची प्रभा एकरूप असतात त्याप्रमाणे. शक्तीचा विकास म्हणजे सृष्टिनिर्मिती आणि शक्तीचा संकोच म्हणजे प्रलय. शक्तीच्या विकासावस्थेत परशिव सगुण असतो आणि शक्तीच्या संकोचावस्थेत तो निर्गुण असतो. म्हणून वीरशैवदर्शनामध्ये सगुणप्रतिपादक व निर्गुणप्रतिपादक अशा दोन्ही वेदमंत्रांचा समन्वय झालेला आहे.

## शक्तिस्वरूप

ज्या शक्तीमुळे परशिव सगुण-निर्गुण असे उभयरूप धारण करतो त्या शक्तितत्त्वाचा आता विचार करू.

ज्याप्रमाणे अग्नीमध्ये उष्णता, चांदण्यामध्ये शीतलता आणि शिलेमध्ये काठिण्य असते, त्याप्रमाणे परशिवासोबत विमर्शशक्ती अविनाभावसंबंधाने युक्त असते. शिवाविना शक्तीला अस्तित्व नसणे आणि शक्तीविना शिवाला अस्तित्व नसणे हाच अविनाभावसंबंध होय.

विमर्शशक्तीच्या अविभाग–परामर्श आणि विभाग–परामर्श अशा दोन अवस्था आहेत. अविभाग–परामर्श अवस्थेत शक्ती परशिवाप्रमाणे सच्चिदानंदरूपिणी असते. परशिवाच्या ठिकाणी सत् (मी आहे), चित् (मी प्रकाशरूप आहे) आणि आनंद (मी आनंदरूप आहे) असा बोध असतो. हा बोध म्हणजेच विमर्शशक्ती होय. विमर्श म्हणजे बोध. विमर्शशक्तीलाच 'चिच्छक्ती' असेही नाव आहे. जर परशिवाठायी शक्ती नाही असे मानले तर परशिवाला स्फटिकाप्रमाणे जड मानावे लागेल. म्हणून श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी 'वन्दे तां परमानंदप्रबोधलहरीं शिवाम्' अशा शब्दांत शक्तिस्तुती केली आहे. शक्ती म्हणजे सच्चिदानंदरूपाचा बोध.

विभाग–परामर्श अवस्थेत ही सच्चिदानंदस्वरूपिणी विमर्शशक्ती इच्छा–ज्ञान–क्रियारूपिणी होऊन मायारूप धारण करते. परंतु ही माया म्हणजे वेदान्तशास्त्र मानते तशी अभावरूप माया नसून परशिवासोबत सदैव एकरूप असणारी शक्ती होय.

## शिव–शक्तिसंबंध

वीरशैवदर्शनामध्ये शिव आणि शक्तीमधील संबंधाला अविनाभावसंबंध म्हणतात. चंद्र आणि चांदणे यांमध्ये जसा अतूट संबंध आहे तसाच संबंध शिव–शक्तीमध्ये आहे, असे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवा'त याची सुंदर उदाहरणे दिली आहेत:–

**गोडी आणि गुळु । कापुरु आणि परिमळु ।**
**निवडुं जातां पांगळु । निवाडु होय ।।**
**समग्र दीप्ति घेतां । जेविं दीपुचि ये हातां ।**
**तेविं जियेचिया तत्त्वतां । शिवुचि लाभे ।।**

**जैसि सूर्यी मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ।**
**तैसि भेद गिळीत शोभा । येकचि जे ।।** १.२३-२५

गूळ आणि गोडी, कापूर आणि गंध यांच्यामध्ये भेद कसा करणार? कारण ते अभिन्न आहेत. तेजाला हाती घ्यायचे असेल तर दीपच हातात घ्यावा लागतो. त्याप्रमाणे शक्तीचा शोध घेताना शिवाचाच लाभ होतो. सूर्याच्या ठिकाणी प्रभा मिरवते तर सूर्य प्रभेचा गाभा असतो. शिव आणि शक्ती अशा प्रकारे परस्पर-अभिन्न असतात, हा वरील ओव्यांचा आशय होय.

**शक्तिप्रभेद**

परशिवासोबत अविनाभावसंबंधाने युक्त असणारी विमर्शशक्ती सृष्टिनिर्मितीसाठी चिच्छक्ती, पराशक्ती, आदिशक्ती, इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती सहा रूपे धारण करते. चिच्छक्तियुक्त शिवापासून पुढील पाच शक्ती उत्पन्न होतात. चिच्छक्तीचा सहस्रांश पराशक्ती, पराशक्तीचा सहस्रांश आदिशक्ती, आदिशक्तीचा सहस्रांश इच्छाशक्ती, इच्छाशक्तीचा सहस्रांश ज्ञानशक्ती आणि ज्ञानशक्तीचा सहस्रांश क्रियाशक्ती होय, असे 'वातुलशुद्धागमा'त (१.२४-२७) म्हटले आहे. परा-आदि-इच्छादी पंचशक्तियुक्त चिच्छक्ती सृष्टिनिर्मितीसाठी सत्त्व-रज-तम असे त्रिगुणात्म रूप धारण करते. तिलाच वीरशैवदर्शनात महामाया, परामाया, ऊर्ध्वमाया इत्यादी नावांनी संबोधितात. ही माया म्हणजेच प्रकृती. या मायेने युक्त असा ईश्वर हाच महेश्वर होय. महेश्वर केवळ इच्छेने सृष्टी, स्थिती, लय, निग्रह व अनुग्रहरूपी पंचकृत्ये करतो. सृष्टिकर्ता महेश्वरच सर्व जीवांच्या अदृष्टानुरूप सृष्टिनिर्मिती करतो. महेश्वर हा सर्व जीवांचा साक्षी, त्यांच्या कर्मांचा प्रेरक व त्यांचा हितमार्गोपदेशक आहे, असे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त (५.५०-५१) म्हटले आहे.

शक्तिविशिष्ट महेश्वर विश्वाचे उपादानकारण व निमित्तकारण आहे. अर्थात् तोच अभिन्ननिमित्तोपादानकारण होय. कोळी कीटक आपल्या शरीरातील विशिष्ट द्रवापासून जाळे निर्माण करतो. तो स्वत:च त्या जाळ्याचे उपादानकारण व निमित्तकारण असतो. त्याप्रमाणे महेश्वराचा या विश्वाशी संबंध आहे. महेश्वर जीवांच्या अदृष्टानुसार सृष्टिनिर्मिती करीत असल्यामुळे जगातील विषमता इत्यादींचा

दोष त्याला लागत नाही. त्यामुळे वैषम्य व नैर्घृण्य या दोषांपासून तो मुक्त असतो.

महेश्वर हा पूर्णकाम आहे. सृष्टिनिर्मितीमागे त्याचे प्रयोजन नाही. परंतु जीवांना त्यांचे प्रारब्धकर्म भोगविण्यासाठी त्याने सृष्टी निर्माण केली. महेश्वर प्रेरक आहे, जीव भोक्ता आहे आणि जगत् हे भोज्य आहे. महेश्वराच्या सद्योजात, वामदेव, अघोर व तत्पुरुष या चार मुखांच्या उच्छ्वासातून क्रमशः ऋग्वेद, यजुर्वेद, अर्थर्वणवेद व सामवेद हे चार वेद प्रकट झाले. त्याच्या ईशानमुखाच्या वैखरीवाणीतून कामिकागमापासून वातुलागमापर्यंत २८ शिवागम प्रकट झाले, असे 'ब्रह्मसूत्र श्रीकरभाष्या'त (१.१.३) म्हटले आहे. वेद आणि आगम ईश्वरनिर्मित असल्यामुळे त्यांचे प्रामाण्य अबाधित आहे. त्यामुळे वीरशैवदर्शन वेदागमसंमत आहे, असे म्हटले जाते.

अशा रीतीने वीरशैवदर्शनामध्ये मायाशक्तियुक्त चैतन्य हाच ईश्वर असून तोच जीवांच्या अदृष्टानुरूप सृष्टी निर्माण करतो आणि सर्व जीवांच्या सद्गतीसाठी वेदागमरूपी शास्त्र प्रदान करून सर्वांवर कृपा करतो.

**जीवस्वरूप**

उज्जयिनीपीठाचे द्वापरयुगातील आचार्य जगद्गुरू दारुकाचार्य भगवत्पाद यांनी दधीची महर्षींना वृष्टिसूत्राच्या माध्यमातून जीवस्वरूपाचा उपदेश केला आहे. जगातील सर्व जीव वृष्टिद्वारे जन्माला येतात. वृष्टी म्हणजे जल आणि जल म्हणजेच जीवन. जगद्गुरू दारुकाचार्यांनी वृष्टिद्वारे जीव कसा जन्माला येतो हे वृष्टिसूत्रामध्ये स्पष्ट केले आहे. छांदोग्योपनिषदामध्ये हाच विचार पंचाग्नी विद्येच्या आधारे पटवून दिला आहे. त्यात म्हटले आहे की, दस्युलोकरूपी अग्नीत श्रद्धेचे हवन केल्यावर सोम उत्पन्न होतो. पर्जन्यरूपी अग्नीत सोमाचे हवन केल्यावर वर्षा उत्पन्न होते. पृथ्वीरूपी अग्नीत वर्षेचे हवन केल्यावर अन्नाची उत्पत्ती होते. पुरुषाच्या जठराग्नीमध्ये अन्नाचे हवन केल्यावर सप्तधातूमधील शुक्राची उत्पत्ती होते आणि स्त्रीरूपी अग्नीत शुक्राचे हवन केल्यावर गर्भ उत्पन्न होतो. वृष्टिद्वारे जीव जगात येतात, हाच विचार उपनिषदात या रूपकातून स्पष्ट केला आहे.

जीवस्वरूपाचा विशेष विस्तार श्रीसिद्धान्तशिखामणी, श्रीकरभाष्य आदी

ग्रंथांमधून आलेला आहे. शरीर, इंद्रिये, मन, बुद्धी यांच्यापेक्षा विलक्षण असे चैतन्य म्हणजे जीव. जीव हा शिवाचा अंश असून अविद्यादी संबंधामुळे तो जीव होतो. स्फुल्लिंग हा अग्नीचा अंश असतो, परंतु अग्नीची प्रचंड दाहकता आणि अन्य वस्तूंना प्रकाशित करण्याची क्षमता त्याच्याठायी नसते. जी असते ती किंचित् असते. त्याप्रमाणे शिवाच्या ठायी असलेले सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व, परिपूर्णत्व, नित्यत्व व व्यापकत्व या शक्ती संकोचून क्रमशः कला, अविद्या, राग, काल, नियती या रूपांनी जीवाला आवृत करतात. त्याचे मूळ शिवरूप झाकून त्याला जीवरूप देतात. या पाच शक्तींना 'पंचकंचुक' असे म्हणतात. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे:–

**किंचित्कर्ता च किंचिज्ज्ञो बद्धोऽनादिशरीरवान् ।**
**अविद्यामोहिता जीवा ब्रह्मैक्यज्ञानवर्जिताः ।।**
**परिभ्रमन्ति संसारे निजकर्मानुसारतः ।**
**देवतिर्यङ्मनुष्यादिनानायोनिविभेदतः ।।** ५. ४८–४९

बद्ध जीव अनादी कालापासून शरीर धारण करीत अल्पकर्ता आणि अल्पज्ञ झाला आहे. जगातील सर्व जीव अविद्या उपाधीने आवृत झाल्यामुळे शिवजीवैक्यज्ञानशून्य होऊन आपापल्या कर्मानुसार देव, पशू, पक्षी, मनुष्य इत्यादी चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये जन्म घेऊन संसारचक्रात भ्रमत असतात.

हा जीवभाव गुरूपदेशामुळे नष्ट होऊन जीव पुन्हा शिवस्वरूप होतो.

### जीवाचे अणुरूप

न्याय, वैशेषिक, सांख्य या दर्शनांमध्ये आत्म्याला विभुपरिमाण म्हणजे व्यापक मानले आहे. आत्मा नित्य असून प्रत्येक शरीरातील आत्मा भिन्न असतो, असे ते मानतात. त्यांच्या मते जीवात्मे अनंत आहेत. काही दार्शनिक आत्म्याला मध्यमपरिमाण (म्हणजे ज्या आकाराचे शरीर असेल त्याच आकाराचा) मानतात. वीरशैवदर्शनामध्ये मात्र जीवात्म्याला अणुरूप मानले आहे. 'श्वेताश्वतर उपनिषदा'मध्ये

**वालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च ।**
**भागो जीवः स विज्ञेयः स चानन्त्याय कल्पते ।।** ५.९

केसाग्राच्या शतांशाच्या एका अंशाच्या शंभर भागाइतका जीवात्मा सूक्ष्म असतो, असे म्हटले आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'मध्ये सुद्धा हाच विचार पुढील श्लोकात स्पष्ट केला आहे:-

**वालाग्रशतभागेन सदृशो हृदये स्थित: ।**
**अशन्न कर्मफलं सर्वमात्मा स्फुरति दीपवत् ।।** १८.६

केसाग्राच्या शतांशाएवढा आत्मा जीवाच्या हृदयात दीपासारखा प्रकाशमान राहून कर्माचे फल भोगत असतो. जीव जरी अणुरूपाने हृदयामध्ये स्थित असला तरी त्याचे ज्ञान प्रकाशाप्रमाणे शरीरभर पसरलेले असते. म्हणून शरीराच्या कोणत्याही भागातील संवेदना त्याच्यापर्यंत पोहोचते.

आणवमलाने आवृत असल्यामुळे जीवात्म्याला अणुरूप प्राप्त झाले असून तो शिवाचा अंश आहे. असा शिवांशरूपी जीवात्मा अनादी अविद्येमुळे मोहित होऊन आपल्या कर्मानुसार देव, तिर्यक्, कृमी, कीटक, मनुष्य इत्यादी चौऱ्यांशी लक्ष योनींमधून सुखदु:खे भोगीत निरंतर भ्रमत असतो.

आत्म्याला विभू म्हणजे व्यापक मानता येत नाही. कारण जन्मजन्मांतरात तो अनेक शरीरांत प्रवेश करीत असतो. त्याला जर व्यापक मानले तर ही क्रिया त्याच्याकडून घडणार नाही. म्हणून जीवात्म्याला विभू म्हणजे व्यापक मानता येत नाही.

अनादी अविद्येने आवृत झालेला जीव बद्ध, संसारी, पशू आदी संज्ञांनी संबोधिला जातो. तो जेव्हा सद्‌गुरूला शरण जातो त्यावेळी त्याचे मलत्रय गुरुदीक्षेमुळे दूर होतात. राग-द्वेषादींपासून मुक्त होऊन तो शुद्ध होतो. मोक्षप्राप्तीची उत्कट इच्छा त्याच्या मनात उदय पावते. त्यावेळी त्याला 'शुद्ध जीव' असे म्हणतात. त्याआधी तो 'बद्ध जीव' असतो. दीक्षेमुळे शुद्ध झालेला जीवात्मा षट्स्थलमार्गाने लिंगांगसामरस्याचे ज्ञान प्राप्त करून घेतो त्यावेळी, शिखिकर्पूरन्यायाने म्हणजे अग्नीच्या संपर्काने कापूर जसा अग्नीरूप होतो, त्याप्रमाणे जीव शिवस्वरूप होऊन मुक्त होतो. ही जीवात्म्याची मुक्तावस्था होय.

अशा प्रकारे वीरशैवदर्शनामध्ये जीवात्म्याच्या बद्ध, शुद्ध व मुक्त अशा तीन अवस्था वर्णिल्या आहेत. जीवात्मा परमात्म्याच्या संकुचित शक्तीने युक्त असल्यामुळे तो शिवाचा अंश होतो. म्हणून तो अणुपरिमाण आहे. अणू

असल्यामुळे तो नित्य आहे आणि प्रत्येक शरीरात वसत असल्यामुळे भिन्नदेखील आहे.

वीरशैवदर्शनात शुद्ध जीवाला 'अंग' अशी संज्ञा आहे. जीव हा शिवाचे 'अंग' आहे आणि शिव हा 'अंगी' आहे. अंगी म्हणजे अनेक अंगांनी युक्त असलेला. अं म्हणजे परब्रह्म आणि ग म्हणजे गमन, जाणे. सामरस्यासाठी परब्रह्माच्या दिशेने गमन करणारा शुद्ध जीव म्हणजे 'अंग' होय. जीव एकदा 'अंग' झाला की पुढे तो 'लिंग' झाल्याशिवाय म्हणजे शिवरूप झाल्याशिवाय राहात नाही. एकाच जन्मात अंग हे लिंगरूप होत असल्यामुळे वीरशैवदर्शनामध्ये 'एकेन जन्मना मुक्तिः' असे म्हटले आहे.

**जगत्स्वरूप (सृष्टी)**

वीरशैवदर्शनामध्ये जगत्सृष्टिप्रक्रियेला 'अविकृत परिणामवाद' असे म्हटले जाते. मूळ स्वरूपात कोणताही विकार न होता रूपांतर होणे म्हणजे अविकृत परिणाम होय. या सिद्धान्तात शिवासमवेत राहणाऱ्या शक्तीचा विकास म्हणजे सृष्टी अर्थात् जगनिर्मिती आणि शक्तीचा संकोच म्हणजे प्रलय होय, असे मानले जाते. ज्याप्रमाणे कासव कवचामधून आपले हातपाय बाहेर काढतो आणि नंतर आत घेतो, त्याप्रमाणे शक्तीचा विकास आणि संकोच होतो. 'श्रीसिद्धान्त-शिखामणी'त म्हटले आहे:-

**आत्मशक्तिविकासेन शिवो विश्वात्मना स्थितः ।**
**कुटीभावाद् यथा भाति पटः स्वस्य प्रसारणात् ।।** १०.६६

एखादे वस्त्र ताणून त्याचा तंबू करता येतो आणि नंतर त्या वस्त्राची घडीदेखील करता येते. वस्त्राच्या आकारात बदल झाला तरी त्याचे रूप बदलत नाही, ते आहे तसेच राहते. अर्थात् ते विकृत होत नाही. त्याप्रमाणे शिव जगद्रूप होताना त्याच्याठायी विकार उत्पन्न होत नाही. आत्मशक्तीचा विकास करून शिव जगद्रूप होतो.

**पत्रशाखादिरूपेण यथा तिष्ठति पादपः ।**
**तथा भूम्यादिरूपेण शिव एको विराजते ।।** १०.७०

ज्याप्रमाणे मूळ, खोड, शाखा, पर्ण इत्यादी रूपांनी एकच वृक्ष उभा असतो

त्याप्रमाणे परशिव स्वत:ठायी असलेल्या शक्तीच्या योगाने पृथ्वी आदी रूपांत प्रस्फुरित होतो.

परशिवाच्या धृतिशक्तीने पृथ्वी, करुणाशक्तीने जल, उज्ज्वलतेने तेज, परमानंदस्पंदनाने वायू, चैतन्याने आकाश आणि चित्‌शक्तीच्या संकोचाने जीव निर्माण होतो.

### अभिन्ननिमित्तोपादानकारण

विश्वनिर्मितीला शक्तिविशिष्ट शिव कारण आहे. सामान्यत: उपादानकारण व निमित्तकारण भिन्न असते. घटाचे उपादानकारण मृत्तिका असते व निमित्तकारण कुंभार असतो. इतर दर्शनांत विश्वनिर्मितीसाठी माया हे उपादानकारण आणि ईश्वर हे निमित्तकारण मानतात. मग असा प्रश्न उपस्थित होईल की, अभिन्ननिमित्तोपादानकारण एकच वस्तू कशी असेल? याचे उत्तर असे की, इतर दर्शने ईश्वर व शक्ती भिन्न मानतात. म्हणून त्यांनी उपादानकारण व निमित्तकारण भिन्न मानले आहे. परंतु वीरशैवदर्शनात शिव आणि शक्ती एकरूप असल्यामुळे, त्यांच्यात चंद्र आणि त्याची प्रभा यांसारखा अविनाभावसंबंध असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने विश्वाचे उपादानकारण व निमित्तकारण एकच आहे. दोन्ही कारणे एकाच ठायी आहेत, म्हणून शिव हा विश्वाचे अभिन्ननिमित्तोपादानकारण होय. कोळीकीडा आपल्या शरीरातील द्रवातून जाळे विणतो त्याचप्रमाणे शक्तियुक्त शिवातूनच विश्व निर्माण होते. माती आणि घट, तंतू आणि वस्त्र हे जसे भिन्न नसतात त्याप्रमाणे दृश्यमान असे जग शिव-शक्तीहून भिन्न नाही.

### सृष्टिविकास

श्रीशैलपीठाचे द्वापरयुगातील आचार्य धेनुकर्ण भगवत्पाद यांनी सानंद महर्षींना मुक्तागुच्छसूत्राचा उपदेश केला आहे. हे सूत्र छत्तीस तत्त्वे स्पष्ट करते. जग म्हणजे छत्तीस तत्त्वांचा गुच्छ. या छत्तीस तत्त्वांतच समस्त विश्व सामावलेले आहे. ज्यामधून सर्व विस्तार पावते आणि ते ज्यामध्ये विस्तारते त्याला 'तत्त्व' असे म्हणतात. शिवतत्त्व हेच मूलतत्त्व असून त्यातून सर्व विश्वाचा विस्तार होतो. आणि प्रलयकाली त्यातच विश्व लय पावते. ही एकूण छत्तीस तत्त्वे आहेत. शिव, शक्ती, सदाशिव, ईश्वर, शुद्धविद्यातत्त्व ही पाच तत्त्वे 'शुद्ध तत्त्वे'

होत. माया, कला, विद्या, राग, काल, नियती व पुरुष ही सात तत्त्वे 'शुद्धाशुद्ध तत्त्वे' होत. प्रकृती, महत्, अहंकार, मनस, श्रोत्र-त्वक्-चक्षु-जिव्हा-घ्राण ही पंचज्ञानेंद्रिये, वाक्-पाणि-पाद-पायु-उपस्थ ही पंचकर्मेंद्रिये, शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध या पंचतन्मात्रा, आकाश-वायु-अग्नि-जल-पृथ्वी ही पंचमहाभूते अशी चोवीस तत्त्वे 'अशुद्ध तत्त्वे' होत. ही छत्तीस तत्त्वे म्हणजे जणू मोत्यांचा गुच्छच होय. म्हणून याला मुक्तागुच्छ असे म्हटले आहे.

### छत्तीस तत्त्वांचा विकासक्रम

**१. शिवतत्त्व :** पहिले तत्त्व शिवतत्त्व होय. परशिवाशी समरस असलेल्या चिच्छशक्तीचे जे इच्छाशक्तिरूप आहे तिचे ज्ञानशक्ती हे अंतरंग असून क्रियाशक्ती हे बहिरंग आहे. या अंतरंग-ज्ञानशक्तीमध्ये जेव्हा परशिवतत्त्वाचा प्रवेश होतो तेव्हा 'मी सर्वज्ञ आहे' असा अभिमान उत्पन्न होतो, तेच शिवतत्त्व होय. हे शिवतत्त्वच विश्वनिर्मितीचे निमित्तकारण असते. शिवतत्त्व सगुण असल्यामुळे हे उपास्य आहे. या तत्त्वालाच त्रिलोचन, चंद्रशेखर, नीलकंठ, शिव इत्यादी अभिधाने आहेत.

**२. शक्तितत्त्व :** इच्छाशक्तीचे बहिरंग असलेल्या क्रियाशक्तीमध्ये जेव्हा परशिवतत्त्व प्रवेश करते तेव्हा 'मी सर्वकर्ता आहे' असा अभिमान उत्पन्न होतो, तेच शक्तितत्त्व होय. हे शक्तितत्त्वच पुढील सदाशिवतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत चौतीस तत्त्वांचे उपादानकारण होय. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त या शक्तितत्त्वाला 'चौतीस तत्त्वरूपी मोत्यांची शिंपली' असे रूपकाने संबोधिले आहे (२.२).

**३. सदाशिवतत्त्व :** ज्ञानशक्तीच्या उद्रेकावस्थेत शक्तितत्त्व प्रवेश करते तेव्हा 'मी हे विश्व आहे' असा अभिमान उत्पन्न होतो, तेच सदाशिवतत्त्व म्हणविले जाते. पाण्यात भिजलेले हरभरे फुगून अंकुरोन्मुख होतात, त्याप्रमाणे सदाशिवतत्त्व हे सृष्टीच्या निर्मितीची पूर्वावस्था होय. सारांश, ज्ञानप्रधान अवस्थेत अंकुरोन्मुख झालेली शक्ती म्हणजे सदाशिवतत्त्व. या तत्त्वालाच सादाख्यतत्त्व व रुद्रतत्त्व अशीही नावे आहेत.

**४. ईश्वरतत्त्व :** क्रियाशक्तीच्या उद्रेकावस्थेत शक्तितत्त्व प्रवेश करते तेव्हा 'मी प्रपंचरूप आहे' असा अभिमान उत्पन्न होतो, त्यालाच ईश्वरतत्त्व म्हणतात.

ही स्थिती म्हणजे विश्वाची अंकुरित अवस्था होय.

**५. शुद्धविद्यातत्त्व :** ईश्वरतत्त्वच शुद्धविद्यातत्त्वाचे रूप धारण करते. ही सृष्टीची अंकुरावस्था होय. 'इदंता' म्हणजे विश्व आणि 'अहंता' म्हणजे ईश्वरतत्त्व. या ठिकाणी इदंता आणि अहंता एकरूप होतात. अर्थात् 'विश्व म्हणजे मीच आहे' अशी जाणीव या तत्त्वाच्या ठिकाणी होते. मयूरीच्या अंड्यात पिलाचा रंग व अवयव जसे सुप्त रूपात अवस्थित असतात त्याप्रमाणे शुद्धविद्यातत्त्वात सूक्ष्मरूपाने विश्व अवस्थित असते.

शिवतत्त्वापासून शुद्धविद्यातत्त्वापर्यंत या पाच तत्त्वांत शिवांश अधिक असल्यामुळे या तत्त्वांना 'शुद्ध तत्त्वे' म्हणतात.

**६. मायातत्त्व :** शुद्धविद्यातत्त्वाच्या ठिकाणी भेदबुद्धी उत्पन्न झाली की तीच मायातत्त्व होते. हे मायातत्त्व जीवाला भ्रमिष्ट करून त्याच्या ठिकाणी 'मी शिव नसून जीव आहे' अशी भेदबुद्धी उत्पन्न करते. त्यामुळे जीवात्मा संसारात बद्ध होऊन चौऱ्यांशी लक्ष योनींमधून जन्मजन्मांतरे घेत भ्रमत राहतो. मायातत्त्वामुळे शिवांश असलेला जीव शिवापासून विभक्त होतो. माया त्याच्या शक्ती अपहृत करते. त्याच्या शक्तींचा संकोच करते.

**७. कलातत्त्व :** सर्वकर्तृत्वशक्तीचा संकोच होऊन ती किंचित्कर्तृत्वरूप धारण करते, हेच कलातत्त्व होय. हे जीवाचे कर्तृत्व मर्यादित करते.

**८. विद्यातत्त्व :** सर्वज्ञत्वशक्तीचा संकोच होऊन ती किंचिज्ज्ञत्वरूप धारण करते, हेच विद्यातत्त्व. हे तत्त्व जीवाचे ज्ञान मर्यादित करते.

**९. रागतत्त्व :** परिपूर्णत्वशक्ती संकोचून अपूर्णता रूप धारण करते, हे रागतत्त्व होय. यामुळे जीवाच्या ठिकाणी शब्दस्पर्शादी विषयांबद्दल अनुराग उत्पन्न होतो.

**१०. कालतत्त्व :** नित्यत्वशक्तीचा संकोच होऊन ती अनित्यत्वरूप धारण करते, हेच कालतत्त्व होय. यामुळे भूत, वर्तमान, भविष्य असे काळाचे भान जीवाला होते.

**११. नियतितत्त्व :** व्यापकत्वशक्ती संकोच पावून 'मी हे करेन, मी ते करेन' अशी नियंत्रणबुद्धी जीवाच्या ठिकाणी उत्पन्न होते हेच नियतितत्त्व होय.

कलातत्त्वापासून नियतितत्त्वापर्यंत पाच तत्त्वे जीवाच्या आत्मरूपाला आच्छादून टाकतात म्हणून या पंचतत्त्वांना 'कंचुक' असे नाव आहे. कंचुक म्हणजे वस्त्र. या पाच तत्त्वांच्या बंधनामुळे जीव बद्ध होऊन संसारचक्रात भ्रमत राहतो.

**१२. पुरुषतत्त्व :** पंचकंचुकाने आवृत असलेला शिवांश असा जीव म्हणजे पुरुषतत्त्व होय. तो स्वत:ला शिवापेक्षा भिन्न मानतो. त्याची इच्छाशक्ती संकोचून आणवमलाचे रूप घेऊन त्याच्या ठिकाणी अणुभाव उत्पन्न करते. ज्ञानशक्ती संकोचून मायामलाचे रूप घेऊन त्याच्या ठिकाणी भेदबुद्धीची निर्मिती करते आणि क्रियाशक्ती संकोचून कार्मिकमलाच्या रूपाने त्याला शुभाशुभ वासनेत गुंतवते.

मायातत्त्वापासून पुरुषतत्त्वापर्यंत सात तत्त्वे 'शुद्धाशुद्ध तत्त्वे' मानली जातात.

**१३. प्रकृतितत्त्व :** भेदबुद्धी उत्पन्न करणाऱ्या मायाशक्तीमध्ये इच्छाशक्तीचा प्रवेश झाला की तेच प्रकृतितत्त्व म्हणविले जाते. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांची साम्यावस्था म्हणजे प्रकृती होय. ही प्रकृती जगाच्या निर्मितीस प्रधान असते. म्हणून या तत्त्वाला 'प्रधान' असेही नाव आहे. पुढे उत्पन्न होणाऱ्या बुद्धितत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत तेवीस तत्त्वांच्या निर्मितीचे मूलकारण हीच प्रकृती आहे.

**१४. महत्तत्त्व (बुद्धितत्त्व) :** 'निश्चयात्मका बुद्धि:' या उक्तीप्रमाणे निर्णय घेणारी शक्ती म्हणजे महत्तत्त्व. यालाच बुद्धितत्त्वही म्हणतात.

**१५. अहंकारतत्त्व :** जीवाच्या ठिकाणी 'मी मी' असा असलेला अहंभाव म्हणजे अहंकारतत्त्व.

**१६. मनस्तत्त्व :** संकल्प-विकल्प करणारे तत्त्व म्हणजे मनस्‌तत्त्व. बुद्धी, अहंकार आणि मन यांना अंत:करण म्हणतात.

**१७-२१. पंच ज्ञानेंद्रिये :** प्रकृतितत्त्व ज्ञानशक्तीच्या प्राधान्याने श्रोत्र, त्वक्, चक्षू, रसना व घ्राण या पंचज्ञानेंद्रियांत परिणत होते. ही ज्ञानेंद्रिये क्रमश: शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पंचविषयांच्या बाह्य ज्ञानाला साधनीभूत ठरतात. म्हणून यांना 'बहि:करण' असे म्हणतात.

**२२-२६. पंच कर्मेंद्रिये :** प्रकृतितत्त्व क्रियाशक्तीमध्ये प्रवेश करून रजोगुणाच्या प्राधान्याने वाक्, पाणि, पाद, पायु व उपस्थ या पंचकर्मेंद्रियांत परिणत होते. ही

कर्मेंद्रिये क्रमशः वचन, आदानप्रदान, गमनागमन, मलोत्सर्जन व प्रजोत्पत्ती या पाच क्रियांना साधनीभूत असल्यामुळे यांना कर्मेंद्रिये म्हणतात.

याप्रकारे मन, बुद्धी, अहंकार हे अंत:करण आणि पंचज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रिये हे दश बहि:करण अशी एकूण १३ साधने प्रकृतीच्या इच्छा-ज्ञान-क्रिया शक्तींची रूपे होत.

**२७-३१. पंच तन्मात्रा :** त्रिगुणात्मक प्रकृतितत्त्वाच्या तमोगुणप्राधान्याने शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध अशा पाच तन्मात्रांची उत्पत्ती होते. अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे यांना 'तन्मात्रा' म्हणतात. वेदान्तशास्त्रात यांना 'सूक्ष्म महाभूत' असे म्हटले जाते.

**३२-३६. पंच महाभूते :** पंचतन्मात्रांपासून क्रमशः पंचमहाभूते उत्पन्न होतात. शब्दतन्मात्रेतून आकाश उत्पन्न होते. आकाशातून स्पर्शतन्मात्रा उत्पन्न होते. स्पर्शतन्मात्रेतून वायू उत्पन्न होतो. वायूपासून रूपतन्मात्रा उत्पन्न होते व तिच्यापासून अग्नी उत्पन्न होतो. अग्नीपासून रसतन्मात्रा उत्पन्न होते व रसतन्मात्रेतून जलतत्त्व उत्पन्न होते. जलतत्त्वातून गंधतन्मात्रा उत्पन्न होते व गंधतन्मात्रेपासून पृथ्वीतत्त्व उत्पन्न होते.

या स्थूल पंचमहाभूतांपासून चतुर्दश भुवनांची म्हणजे ब्रह्मांडाची निर्मिती होते. अशा रीतीने शक्तिविशिष्ट असा शिव शिवतत्त्वापासून पृथ्वीतत्त्वापर्यंत छत्तीस तत्त्वरूपांत परिणत होऊन लीला करीत असतो. तो प्रलयकाली सर्व प्रपंचाचा स्वशक्तीमध्ये लय करून शक्तीला स्वरूपात समरस करून केवलावस्थेत राहतो.

**जगत्सत्यत्व**

वीरशैवदर्शनानुसार विश्व म्हणजे शिवशक्तीचा विलास आहे. शिव-शक्ती सत्य असल्यामुळे त्यांचा विलास म्हणजे विश्व हेदेखील सत्यच होय. म्हणून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे:-

**यस्मादेतत् समुत्पन्नं महादेवाच्चराचरम् ।**
**तस्मादेतन्न भिद्येत यथा कुम्भादिकं मृदः ।।**
**शिवतत्त्वात् समुत्पन्नं जगदस्मान्न भिद्यते ।**
**फेनोर्मिबुद्बुदाकारं यथा सिंधोर्न भिद्यते ।।**

**यथा तंतुभिरुत्पन्नः पटस्तन्तुमयः स्मृतः ।**
**तथा शिवात् समुत्पन्नं शिव एव चराचरम् ।।** १०.६३-६५

अर्थात् शिवापासून उत्पन्न झालेले चराचर जग शिवापासून वेगळे नाही. कुंभाराने तयार केलेली मातीची घागर जशी मातीपासून वेगळी नसते, तद्वत् विश्व आणि विश्वनाथ यांच्यात भेद नसून अभेद आहे. कारणापासून कार्य वेगळे नाही. समुद्राच्या पाण्यातील फेस, लाटा, बुडबुडे हे ज्याप्रमाणे समुद्रापासून भिन्न नाहीत, तंतूपासून उत्पन्न झालेले वस्त्र जसे तंतुमय असते, त्याप्रमाणे शिवतत्त्वापासून उत्पन्न झालेले जग शिवापासून भिन्न नाही.

शिवच जीवरूप धारण करून भोक्ता, विश्वरूप धारण करून भोज्य आणि ईश्वररूप धारण करून प्रेरयिता होतो. तोच भोक्ता, भोज्य व प्रेरयिता आहे. म्हणून सर्व सृष्टी शिव-शक्तिरूपच आहे, असे वीरशैवदर्शन मानते.

**बंध-मोक्षस्वरूप**

आणव-माया-कार्मिक या मलांनी जीवाला आवृत करणे म्हणजे बंध आणि जीवाची मलत्रयातून सुटका होणे म्हणजे मोक्ष होय. मल म्हणजे शक्तीचे संकुचित स्वरूप.

शिवाच्या इच्छाशक्तीचा संकोच म्हणजेच आणवमल होय. या मलामुळे जीवात्मा आपले परिपूर्णत्व विसरून स्वतःला देहापुरता सीमित म्हणजे अणुरूप मानतो. जीवाला अणुरूप देत असल्यामुळे या मलास 'आणवमल' असे म्हणतात.

शिवाच्या ज्ञानशक्तीचा संकोच म्हणजे मायामल होय. या मलाने आवृत झाल्यामुळे जीवाच्या मनात भेदबुद्धी उत्पन्न होते. शिव वेगळा आणि मी वेगळा, असे तो मानू लागतो. हा जीव वेगळा आणि तो जीव वेगळा, असे समजतो. जीव आणि जड यांमध्ये आणि जड आणि जड यांमध्ये भेद करतो. जड आणि ईश्वर वेगळे मानतो. अशा रीतीने सर्वत्र भेदबुद्धी पाहतो. हीच द्वैतबुद्धी होय. द्वैतबुद्धीमुळे आपला व परका असा भेद उत्पन्न होतो आणि त्यामुळे अनुकूल-प्रतिकूल भावना निर्माण होते. अनुकूल व्यक्तीविषयी राग (प्रेम) आणि प्रतिकूल व्यक्तीविषयी द्वेष निर्माण होतो. राग-द्वेषामुळे पुण्यपापाचा संचय होतो आणि हे पुण्यपाप जीवाच्या पुनर्जन्माचे कारण ठरते. अशा रीतीने मायामल जीवाला

संसारबंधनात अडकवतो.

शिवाच्या क्रियाशक्तीचा संकोच हाच कार्मिकमल होय. कार्मिकमल म्हणजे शुभ–अशुभ वासना. शुभाशुभ कर्म केल्यामुळे त्याचा संस्कार मनावर होतो. तीच वासना होय. शुभवासनेमुळे तो शुभकर्मे करतो आणि अशुभवासनेमुळे तो अशुभकर्मे करतो. वासनेत परिवर्तन झाले की जीवाच्या कर्मात परिवर्तन होते. म्हणून अशुभवासना दूर करून शुभवासना दृढ करणे हाच पुरुषार्थ होय.

आणव, माया व कार्मिक हे तिन्ही मल अनादी आहेत. त्यांनी अनादी कालापासून जीवाला जखडून ठेवले आहे. परशिव ज्याप्रमाणे इच्छा–ज्ञान–क्रियाशक्तीने युक्त असतो त्याप्रमाणे जीव त्या शक्तीच्या संकुचित रूपांनी म्हणजेच त्रिमलांनी वेढलेला असतो. त्यामुळे शिव आणि जीव यांच्यातील भेद वीरशैवदर्शन सत्य मानते. परंतु जेव्हा गुरुकृपेने जीवाच्या मलाची निवृत्ती होते तेव्हा तो पुनश्च शिवरूप होतो. त्रिमलांना 'पाश' असेही नाव आहे. या पाशाने बद्ध झाल्यामुळे जीवाला 'पशू' म्हटले जाते. पाशनिवृत्ती झाल्यावर पशुरूपी जीव पुन्हा आपले पशुपतिरूप प्राप्त करून घेतो.

बद्ध जीवाला मोक्ष मिळविण्यासाठी श्रीगुरूला शरण जावे लागते. अनेक जन्मांत केलेल्या शुभ कर्मांमुळे जीवाचे अंत:करण शुद्ध होते. अंत:करणशुद्धीमुळे त्याच्याठायी आत्मानात्मविवेक उत्पन्न होतो. या विवेकामुळे संसाराबद्दल हेयबुद्धी (तिरस्कार) त्याच्या मनात निर्माण होतो. असा शुद्धान्त:करणी, विवेकसंपन्न आणि विरक्त जीवात्मा शिष्य होऊन श्रीगुरूला शरण जाऊन

**भो! कल्याण महाभाग शिवज्ञान महोदधे ।**
**आचार्यवर्य संप्राप्तं रक्ष मां भवरोगिणम् ।।** ६.९–१०

अर्थात् हे लोककल्याण करणाऱ्या भाग्यशाली गुरुदेवा, तुम्ही शिवज्ञानाचे सागर व सर्वश्रेष्ठ आचार्य आहात. मी भवरोगी आहे. माझे रक्षण करा, अशी प्रार्थना करतो. ही प्रार्थना ऐकून श्रीगुरू त्याच्या ठिकाणी असलेल्या शक्तिपातचिन्हांचे निरीक्षण करून त्याला दीक्षा देतात. शिष्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहतात. श्रीगुरूच्या कृपादृष्टीने शिष्याच्या मनात शिवत्व प्रवेश होऊन शिवोऽहम् भावना उत्पन्न होते. यामुळे जीवाच्या

ठिकाणी असलेला आणवमल दूर होतो. हीच वेधदीक्षा होय.

वेधादीक्षेनंतर शिष्याच्या उजव्या कानात गूढपणे श्रीगुरू प्रणवपंचाक्षरी मंत्राचा उपदेश करतात. ही मंत्रदीक्षा होय. यावेळी श्रीगुरू उपदेश केलेल्या मंत्राचा तात्त्विक अर्थ समजावून देतात आणि अर्थचिंतन करीत मंत्रजप करण्याचा शिष्याला आदेश देतात. गुरूच्या आदेशानुसार शिष्य मंत्रजप करतो. त्यामुळे त्याची मायामलापासून सुटका होऊन भेदबुद्धी नष्ट होते.

श्रीगुरू शिष्याला देण्यात येणाऱ्या इष्टलिंगावर आणि शिष्यावर अभिषेक करतात. इष्टलिंगात शिवकलांची व शिष्याच्या प्राणशक्तीची प्रतिष्ठापना करून 'हे तुझे प्राणलिंग असून याला देहापासून विलग करू नकोस' असा उपदेश करतात. ही क्रियादीक्षा होय. या दीक्षेमुळे शिष्याच्या मनातील अशुभवासना नष्ट होतात आणि लिंगांगसामरस्यरूपी मुक्तीच्या प्राप्तीची शुभवासना त्याच्या मनात उत्पन्न होते. या वासनेमुळे पुढे हळूहळू साधना करीत तो भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य या षट्स्थलमार्गाने वाटचाल करीत लिंगांगसामरस्यरूपी मोक्ष प्राप्त करून घेतो.

वीरशैवदर्शनात केवळ ज्ञानामुळेच मोक्ष मिळतो असे मानत नाहीत, तर लिंगांगसामरस्यज्ञान आणि इष्टलिंगपूजारूपी कर्म अशा ज्ञान-कर्मसमुच्चयाने मुक्तिलाभ होतो असे मानतात. साधकाला इष्टलिंगपूजेसाठी अष्टावरण व पंचाचार यांचे आचरण करावे लागते. त्याबरोबर षट्स्थलमार्गावरून वाटचाल करावी लागते. यापुढे अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थल यांचा परिचय करून घेणार आहोत.

■■

प्रकरण तिसरे

# अष्टावरण

'श्रेयांसि बहुविघ्नानि' या उक्तीप्रमाणे श्रेयमार्गाचा स्वीकार करणाऱ्या साधकाला अनेक विघ्नांचा सामना करावा लागतो. विघ्नांचा परिहार केल्याशिवाय त्याला आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचता येत नाही. लिंगांगसामरस्य म्हणजे मुक्ती. ती षट्स्थल-सोपानाने साधकाला प्राप्त करून घेता येते. या मार्गात प्रवृत्त होणाऱ्या साधकाचे विघ्नांपासून रक्षण व्हावे यासाठी वीरशैवाचार्यांनी आठ प्रकारची आवरणे प्रतिपादिली आहेत. आवरण म्हणजे रक्षाकवच. गुरू, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, भस्म, रुद्राक्ष व मंत्र हे अष्टावरण होय. 'चंद्रज्ञानागमा'मध्ये यांचा उल्लेख आलेला आहे:-

**गुरुर्लिंगं जंगमस्य तीर्थं चैव प्रसादकः ।**
**भस्मरुद्राक्षमंत्राश्चेत्यष्टावरणसंज्ञिताः ।।** चंद्रज्ञानागम, क्रियापाद, २.१.२

### आवरण म्हणजे काय?

'आव्रियते देहादिकं येन तद् आवरणम्' या व्युत्पत्तीप्रमाणे देहादी वस्तूंना ज्याने आवृत म्हणजे आच्छादित केले जाते त्याला 'आवरण' म्हणतात. झाकणे, लपवणे व कुंपण घालणे इत्यादी आवरण शब्दाचे अनेक अर्थ होतात. आवरणाचे दोन उद्देश असतात. (१) कोणत्याही वस्तूचे वास्तविक रूप प्रकट होऊ न देणे, आणि (२) सर्व प्रकारच्या विनाशकारी शक्तींपासून रक्षण करणे. 'मुंडकोपनिषदा'त म्हटले आहे:-

**इमानि शिवभक्तानां भवदोषततेः सदा ।**
**निवारणैककार्याणि ख्यातान्यावरणाख्यया ।।** १.२.१२

एखादा योद्धा युद्धभूमीवर शरीररक्षणासाठी जसे रक्षाकवच धारण करतो आणि जनावरांपासून पिकाचे रक्षण करण्यासाठी शेतकरी जसा शेताला कुंपण घालतो, त्याप्रमाणे शिवदीक्षा घेतलेल्या साधकाचे कामक्रोधादी दुष्ट वृत्तींपासून अष्टावरणामुळे रक्षण होते. म्हणून त्याला 'आवरण' अशी संज्ञा आहे. अज्ञान, माया हेदेखील

आवरणच आहे. परंतु हे आवरणे आत्म्याचे मूळ स्वरूप झाकून टाकते. अष्टावरण मात्र अज्ञानादी आवरण दूर करून आत्म्याच्या मूळ स्वरूपाचे रक्षण करते. म्हणून अष्टावरणाला 'आवरण दूर करणारे आवरण' असेही म्हटले जाते. वरील अर्थाने आवरण हा शब्द अन्य कोणत्याही धर्मदर्शनात योजिलेला नाही. म्हणून 'आवरण' हा वीरशैवांचा पारिभाषिक शब्द होय.

अष्टावरणातील गुरू, लिंग व जंगम हे तीन आवरण पूजनीय आहेत. भस्म, रुद्राक्ष व मंत्र हे पूजेचे साधन आहेत, तर पादोदक व प्रसाद हे पूजेची फळे होत. वीरशैवसिद्धान्तात अष्टावरणाला 'साधकाचे अंग' अशीही संज्ञा आहे. लौकिक व्यवहार नीट व्हावेत यासाठी हात, पाय इत्यादी अंगांचा म्हणजे अवयवांचा उपयोग केला जातो, त्याप्रमाणे अष्टावरणामुळे साधकाचा परमार्थव्यवहार सुरळीत चालतो. म्हणून अष्टावरणाला 'अंग' असे म्हटले जाते. आठपैकी एक आवरण जरी कमी पडले तरी साधक लक्ष्यापर्यंत पोहोचू शकणार नाही. म्हणून प्रत्येक वीरशैवाने निष्ठापूर्वक अष्टावरणाचा अंगीकार केला पाहिजे.

यापुढे प्रत्येक आवरणाचा क्रमश: परामर्श घेऊ.

## १. श्रीगुरू

भारतीय संस्कृतीत श्रीगुरूला अग्रस्थान दिले आहे. गुरूशिवाय कोणालाही ज्ञान मिळणे शक्य नाही. जगात असा कोणताही धर्म नाही की ज्यात गुरूला स्थान नाही. 'साक्षात भर्गो नराकृति:' या वचनानुसार भारतीय संस्कृतीत गुरूला ईश्वराचाच अवतार मानतात. ईश्वर हा गुरू असला तरीही गुरूचे स्थान ईश्वरापेक्षा श्रेष्ठतम आहे. स्वाती नक्षत्रातील पाण्याचा थेंब शिंपल्यात पडून मूल्यवान मोती होतो व त्याचे मोल पाण्यापेक्षा अधिक होते, त्याप्रमाणे गुरू हा ईश्वरापेक्षा श्रेष्ठ मानला जातो. गुरुकृपेवाचून मोक्षरूपी पुरुषार्थ दुष्प्राप्य आहे. यासाठी 'मुण्डकोपनिषदा'त 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणि: श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' (१.२.१२), अर्थात् आत्मरूप जाणण्यासाठी सकलशास्त्रपारंगत व आत्मज्ञानी अशा श्रीगुरूला शरण जावे, असे म्हटले आहे. म्हणून वीरशैव सिद्धान्तात देखील आत्मकल्याणासाठी गुरूला शरण जावे असे सांगितले आहे. संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी म्हणतात:–

**शिव परब्रह्म होय सही । परि भेटि बोलणे न घडे कही ।**
**हा भेटे बोले समाधान करी सर्वही । यालागी गुरू अधिक ।।** ५.२०

**म्हणोनि गुरुपरते दैवत । नाही नाही वो निभ्रांत ।**
**यालागी पूजन भजन येकान्त । त्यासीच किजे ।।** ५.७९

**गुरु माता गुरु पिता । स्वहित कर्ता गुरुचि दाता ।**
**ज्यापरते दैवत नाही तत्त्वतां । तया गुरूसी नमो नमो ।।** ५.२

**गुरु तोचि महादेव । गुरु तोचि सदाशिव ।**
**गुरुपरता नाही देव । म्हणोनि गुरूसी भजिजे ।।** १.५०

(श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती, वाराणसी)

**प्रथम गुरू शिव**

'स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्' (योगसूत्र, १.२६) या सूत्रात महर्षी पतंजलींनी शिवाला जगाचा आद्यगुरू मानले आहे. त्यांचा हा विचार पूर्ण तर्कसंगत आहे. कारण संसाररूपी सर्पाचा दंश झालेल्या अज्ञानी जीवाच्या अज्ञाननिवारणासाठी भगवान शिवांनी वेद व आगमशास्त्र यांची निर्मिती केली. भगवान शिवाच्या सद्योजातमुखातून ऋग्वेद, वामदेवमुखातून यजुर्वेद, अघोरमुखातून सामवेद, तत्पुरुषमुखातून अथर्वणवेद आणि ईशानमुखातून कामिकादी सर्व आगम प्रकट झाले, असे 'ब्रह्मसूत्र श्रीकरभाष्या'त (१.१.३) म्हटले आहे. वेदागमांचे अध्ययन करून एक व्यक्ती जर गुरू होऊ शकते तर वेदागमांची निर्मिती करणारा शिव गुरू का बरे ठरणार नाही? कल्प, प्रलय व महाप्रलय यांत संसारी जीवांना ज्ञान व धर्म यांचा उपदेश करून मी त्यांचा उद्धार करतो, असा संकल्प ज्याच्याठायी आहे असा शिव जगताचा प्रथम गुरूच होय (योगसूत्र, भाष्य, १.२५).

युगारंभी भगवान शिवाच्या मुखातून प्रकट झालेला ज्ञानप्रवाह अजूनही अखंडपणे वाहात आहे. या ज्ञानप्रवाहाला आगमशास्त्रात 'ओघ' असे म्हटले जाते. हा ओघ दिव्यौघ, सिद्धौघ व मानवौघ असा त्रिविध आहे. साक्षात् शिवाचा उपदेश त्यांचे निकटवर्ती शिवगण अथवा देवगण प्रथम ग्रहण करतात, त्यानंतर ते सिद्ध महर्षीगणांना उपदेश करतात आणि सिद्ध महर्षी आचार्यतुल्य अशा श्रेष्ठ मानवांना तो बोध देतात. यांनाच अनुक्रमे दिव्यौघ, सिद्धौघ व

मानवौघ अशा संज्ञा आहेत. अनादिकालापासून ही ज्ञानधारा अक्षुण्ण वाहात आली आहे.

### वीरशैव दिव्यौघ

नंदी, भृंगी आदी शिवाचे असंख्य गण असून त्यांपैकी रेणुक, दारुक, घंटाकर्ण, धेनुकर्ण व विश्वकर्ण नामक पाच गण शिवाच्या अत्यंत निकट आहेत. या पाच गणांना उपदेश करून वीरशैवमतप्रतिष्ठापनेसाठी शिव त्यांना भूलोकी पाठवीत असतात. या पाच गणांनीच शिवाज्ञेने रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य व विश्वाराध्य अशा नावांनी अवतार घेऊन कलियुगारंभी वीरशैव–सिद्धान्ताची प्रतिष्ठापना केली. हे पाच गण म्हणजेच पंचाचार्य दिव्यदेहधारी असून ते प्रसिद्ध अशा सोमेश्वर, सिद्धेश्वर, रामनाथ (भीमनाथ), मल्लिकार्जुन व विश्वनाथ या लिंगांतून योगसामर्थ्याने प्रादुर्भूत झाले व अगस्त्यादी महर्षींना उपदेश करून त्याच लिंगांत पुन्हा विलीन झाले. म्हणून वीरशैवांच्या मते पंचाचार्य हे दिव्यात्मे असून त्यांना प्राप्त झालेला उपदेश हा दिव्यौघ होय.

### वीरशैव सिद्धौघ

पंचाचार्यांनी अगस्त्य, दधीची, व्यास, सानंद व दुर्वास या प्रसिद्ध महर्षींना वीरशैवसिद्धान्ताचा उपदेश केला. त्या महर्षींना प्राप्त झालेले ज्ञान म्हणजे सिद्धौघ होय. पंचाचार्यांतील जगद्‌गुरू रेणुकाचार्यांनी अगस्त्य महर्षींना शिवसिद्धाताचा उपदेश केला होता, हे ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ या ग्रंथावरून सिद्ध होते. अगस्त्य महर्षींना उपदेश केल्यानंतर ज. रेणुकाचार्यांनी ‘सर्व लोकांना शिवसिद्धान्ताचा बोध कर’ असा त्यांना आदेश दिला. त्याला अनुसरून अगस्त्य महर्षींनी ब्रह्मसूत्रावर वीरशैवमतपर एक वृत्ती लिहिली. ही वृत्ती ‘श्रीकरभाष्य’कार श्रीपती पंडितांनी अभ्यासिली होती, याचा स्पष्ट उल्लेख त्यांनी आपल्या भाष्यात केला आहे (श्रीकरभाष्य, मंगलश्लोक १७). त्याचप्रमाणे ज. दारुकाचार्यांनी महर्षी दधीचींना, ज. घंटाकर्ण शिवाचार्यांनी महर्षी व्यासांना, ज. पंडिताराध्यांनी महर्षी सानंदांना व ज. विश्वकर्ण शिवाचार्यांनी महर्षी दुर्वासांना वीरशैवसिद्धान्ताचा उपदेश केला आहे. त्याचे वर्णन पाशुपततंत्र, काशीखंड, श्रीशैलखंड व शंकरसंहिता इत्यादी ग्रंथांत आले आहे (वीरशैवरत्न, पृ. ८). हाच सिद्धौघ कालांतराने

मानवौघात परिणत झाला.

### वीरशैव मानवौघ

वरील महर्षींच्या द्वारा प्रत्यक्ष अथवा त्यांनी रचिलेल्या ग्रंथांद्वारे ऋषितुल्य अशा मानवश्रेष्ठांना जो उपदेश प्राप्त झाला तोच मानवौघ होय. या मानवौघ परंपरेत शिवयोगी शिवाचार्य, नीलकंठ शिवाचार्य, श्रीपतिपंडिताराध्य, नंदिकेश्वर शिवाचार्य आदी अनेक आचार्यांचा समावेश होतो. या आचार्यांकडूनच वीरशैव साहित्याची रचना झाली व रक्षणही झाले. याप्रमाणे परशिवापासून दिव्यौघ, सिद्धौघ, मानवौघ या रूपाने प्राप्त झालेला ज्ञानप्रवाह अध्ययन, अध्यापन व प्रचार यांद्वारे मूल पंचाचार्यांच्या पीठपरंपरेचे महाचार्यगण, त्यांचे अनुयायी शिवाचार्य यांनी आपापल्या प्रांतांत वीरशैवानुयायी भक्तांना दीक्षा देऊन व तत्त्वबोध करून आजवर अव्याहत प्रवाहित ठेवला आहे. मूळ परशिवापासून आलेले ज्ञान आजच्या आचार्यपरंपरेत असल्यामुळे आचार्यांनाही शिवासमान मानले जाते.

### गुरू शब्दाचा अर्थ

'गुणान् रुन्ध इति गुरु:' अर्थात् शिष्याच्या प्राकृत, राजस, तामस गुणांना रोधून शिवतत्त्वाचा उपदेश करणारा गुरू होय, अशी गुरू शब्दाची व्याख्या नीलकंठ शिवाचार्यांनी केली आहे (क्रियासार, १६. पृ. १३८-१३९). 'गु' म्हणजे गुणातीत व 'रु' म्हणजे रूपातीत. सत्त्व, रज व तम हे गुण होत, तर अशुद्ध माया हे रूप होय. गुणातीत व रूपातीत अर्थात् निर्गुण व निराकार असलेल्या महालिंगाचा उपदेश करणारा तो गुरू होय, असे शिवयोगी शिवाचार्यांनी स्पष्ट केले आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, १५.८). गुरूचे आचार्य हे पर्यायनाम आहे. वीरशैव-शास्त्रातील रहस्यार्थांचा संग्रह करणारा, आपल्या शिष्यांना त्याचा उपदेश करून त्याच्याकडून आचरण करवून घेणारा व स्वत:ही तसे आचरण करणारा गुरू हाच आचार्य होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, १५.९).

गुरू प्रत्यक्ष शिवस्वरूप आहे. कारण शिव मायाशक्तिविशिष्ट असल्यामुळे सामान्यांना दृष्टिगोचर होत नाही. शिवच गुरुरूपाने सर्वांना गोचर होतो व उपदेश करतो. म्हणून गुरूची पूजा केल्याने प्रत्यक्ष शिवाची पूजा केल्याचे फळ मिळते (श्रीसिद्धान्तशिखामणी, ९.५३).

## गुरूची लक्षणे

'गुणा: पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वय:' या सुभाषितानुसार मनुष्याच्या पूज्यतेसाठी त्याचे वय व लिंग महत्त्वाचे नसून त्याचे गुण महत्त्वाचे ठरतात. 'गुरुश्च गुणवान् प्राज्ञ: परमानंदभासक:' (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, २.४८)- अर्थात् परमानंदाचा बोध करणारा प्राज्ञ गुरू गुणवानच असतो, या आचार्योक्तीप्रमाणे जगाला पूज्य असणारे गुरू गुणवान असतात हे सत्य आहे. हे गुण कोणते? तर करुणायुक्त, वीतराग, निर्मत्सर, संप्रदायाचे ज्ञान असलेला, लिंगस्थल व अंगस्थलाचे भेद जाणणारा, षट्स्थलज्ञानात प्रवीण, दीक्षाकर्मात कुशल, शिवाच्या ठायी दृढ निष्ठा असणारा, गुरुवंशात जन्मलेला अर्थात् माहेश्वर.. इत्यादी गुणांनी जो युक्त आहे तो गुरू होय. तो व्यसनाधीन, ठेंगू, कुबडा, कोपिष्ट, कुटील, खल, चंचल, अपंग, चहाडखोर, रोगी, शठ, ढोंगी नसावा (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, २.४८-६६).

वरील गुणांचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, 'शिवसिद्धान्ततत्त्वज्ञ' या लक्षणाने त्याचे श्रोत्रियत्व सिद्ध होते तर 'लिंगांगयोगतत्त्वज्ञ' व 'निरूढाद्वैतवासन' इत्यादी लक्षणांनी त्याचे ब्रह्मनिष्ठत्व सिद्ध होते. याशिवाय भस्मोद्धूलननिष्णात, लिंगधारणसंयुक्त, लिंगपूजापरायण इत्यादी लक्षणांनी त्याची आचरणशीलता सांगून श्रोत्रियत्व व ब्रह्मनिष्ठत्व या गुणांत आणखी एका गुणाची भर घातली आहे. ज्ञानामृताने तृप्त अशा गुरूने देखील सर्वसामान्य लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी धर्माचरण केलेच पाहिजे, असा जगद्गुरू रेणुकाचार्यांचा आदेश आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, १६.६५).

श्रोत्रियत्व, ब्रह्मनिष्ठत्व व धर्माचरणशीलत्व हे गुण माहेश्वर वा जंगम वंशातील काही विशिष्ट व्यक्तींना आनुवंशिकतेने प्राप्त होतात. म्हणून 'कुलक्रमागताचार' व 'मठस्थलसमुत्पन्न' अशीही गुरूची लक्षणे सांगितली जातात. यावरून गुरुस्थानासाठी सद्गुणांबरोबरच सत्कुलोत्पन्नत्वही आवश्यक आहे, असे वीरशैवा-चार्यांचे मत दिसते. पंचपीठांच्या शाखामठात जंगमाबरोबरच पंचम कुलातील एखाद्या सदगुणसंपन्न बटूला जंगमदीक्षा देऊन गुरुगादीवर बसविण्याची परंपरा आहे. यावरून माहेश्वर वंश व पंचम वंश यांतील सदगुणसंपन्न व्यक्तींना समानदृष्टीने पाहणारी समाजव्यवस्था वीरशैवधर्माला अभिप्रेत आहे, असे स्पष्ट दिसते.

### एक कुल, एक गुरू

वीरशैवधर्मात एका कुळाला एकच गुरू असावा, अशी परंपरा आहे. एकाच गुरूकडून घराण्यातील सर्व लोक दीक्षा व मंत्रोपदेश घेतात. जर एकाच कुळातील व्यक्तींनी वेगवेगळे गुरू करून घेतले तर ते वीरशैवाच्या सदाचाराला बाधक ठरते. एका कुळाची निष्ठा एकाच गुरूवर असावी.

गुरूला क्रियाभेदाने दीक्षागुरू, शिक्षागुरू व ज्ञानगुरू असे म्हटले जाते.

### दीक्षागुरू

जीवाच्या ठिकाणी असलेल्या आणव, माया व कार्मिक या तीन मलांचा नाश करून त्याला शिवज्ञानाची प्राप्ती करून देणारी दीक्षा ज्या गुरूकडून मिळते त्या गुरूला 'दीक्षागुरू' असे म्हणतात. वीरशैवधर्मात सर्व व्यक्तींना दीक्षा घेणे आवश्यक मानले जाते. कुलगुरू आपल्या गोत्राच्या परंपरागत शिष्यांना संस्कारपूर्वक इष्टलिंग प्रदान करून त्यांना मंत्रोपदेश करतात. पुरुष व स्त्रिया या दोघांनाही दीक्षेत समान अधिकार आहे. जन्मानंतर आठव्या वर्षी दिलेली दीक्षा उत्तम, सोळाव्या वर्षापर्यंत दिलेली दीक्षा मध्यम व त्यानंतर दिलेली दीक्षा अधम मानली जाते (वीरशैव सदाचारसंग्रह, ११.२).

या सिद्धान्तात दीक्षेवाचून कोणीही मोक्षाचा अधिकारी होऊ शकत नाही. यासाठी 'अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा' या ब्रह्मसूत्राची व्याख्या करताना वीरशैव भाष्यकार श्रीपती पंडिताराध्यांनी 'अथ' या शब्दाचा 'दीक्षेद्वारा इष्टलिंगधारणादी अष्टावरणाच्या प्राप्तीनंतर' असा अर्थ केला आहे (ब्रह्मसूत्र, श्रीकरभाष्य, १.१.१). दीक्षेवाचून इष्टलिंगपूजा शिवार्पित होत नाही. दीक्षेशिवाय केली जाणारी धार्मिक क्रिया निष्फल होते. यावरून वीरशैवधर्मातील सर्व व्यक्तींसाठी दीक्षा हा एक अनिवार्य व आवश्यक संस्कार आहे, असा निष्कर्ष निघतो. स्वाती नक्षत्रात शिंपल्यात पडलेला जलबिंदू मोती बनतो, त्याचे पुन्हा बिंदूत रूपांतर होत नाही त्याप्रमाणे दीक्षासंस्कार झालेला जीव पुन्हा भवचक्रात येत नाही. त्याचा हा जन्म अंतिम असतो.

दीक्षा घेण्याचा अधिकार सर्वांनाच स्वभावत: प्राप्त होत नाही. परंतु अनेक जन्मांत नित्य-नैमित्तिक कर्मे करून ज्याचे आणवादी मलत्रय पक्व होतात आणि ज्याच्यावर ईश्वरानुग्रहरूपी शक्तिपात होतो तोच दीक्षेचा अधिकारी होतो.

## मलपरिपाक

'जीवत्वं दु:खसर्वस्वं तदिदं मलकल्पितम्' (श्रीसिद्धान्तशिखामणी, १८.१८) या आचार्योक्तीनुसार आणव, मायीय व कार्मिक या मलत्रयांमुळे आत्म्याला दु:खरूप असा जीवभाव प्राप्त झाला आहे. इच्छाशक्तीचा संकोच म्हणजे आणवमल, ज्ञानशक्तीचा संकोच म्हणजे मायीयमल आणि क्रियाशक्तीचा संकोच म्हणजे कार्मिकमल होय. या तीन मलांच्या आम व पक्व अशा दोन अवस्था आहेत (शिवमहापुराण, ७.१.३१–७२). तपश्चर्येने जेव्हा मल क्षीण होतात तेव्हा त्या अवस्थेला 'पक्व' असे म्हणतात. हाच मलपरिपाक होय. त्याच्या विपरीत अवस्थेला 'आम' असे म्हटले जाते. ज्याचे मल पक्व झाले आहेत अशा साधकाला 'तप्ततनू' म्हणतात तर त्याच्या विपरीत अवस्थेतील साधकाला 'अतप्ततनू' अशी संज्ञा आहे. अनेक जन्मांत संचय केलेल्या सुकृतामुळे ज्याचे मल परिपक्व होऊन सांसारिक वासना नष्ट झाल्या आहेत अशा साधकावर ईश्वरानुग्रहरूपी शक्तिपात होतो. ज्ञानोदयामुळे, व कर्मसाम्यामुळेही शक्तिपात होतो. शक्तिपातासंबंधी अशी तीन मते आहेत (आगम और तंत्रशास्त्र, पृ. १०८–११०). वीरशैवाचार्यांनी मलपरिपाक हे शक्तिपाताचे कारण मानले आहे.

## शक्तिपात

शक्तिपात म्हणजे ईश्वराचा अनुग्रह. ज्याच्या अंत:करणात शिवभक्तीचा उदय झाला आहे त्याच्यावर शक्तिपात झाला आहे असे नि:शंकपणे समजावे. शक्तिपाताचे हे प्रमुख लक्षण आहे. जसजशी भक्ती दृढ होत जाते तसतसा शक्तिपात अधिक होत जातो. प्रसादामुळे अर्थात् ईश्वराच्या अनुग्रहामुळे ईश्वराची भक्ती उत्पन्न होते आणि भक्तीमुळे ईश्वराचा अनुग्रह होतो. ज्याच्यावर शक्तिपात होतो त्याची अवस्था कशी होते? तर त्याच्याठायी मुक्तीबद्दल अत्यंत उत्कंठा उत्पन्न होते. संसाराविषयी अनासक्ती निर्माण होते, शिवभक्ताविषयी अनुराग व शिवाविषयी श्रद्धा जागी होते आणि त्याच्याठायी रोमांच, कंप, अश्रुपात आदी अष्टसात्त्विकभाव दृग्गोच्चर होतात (वेदान्तसार वीरशैवचिंतामणि, ६.७–८). शक्तिपात झाल्याशिवाय जीव शुद्ध होत नाही आणि मोक्षाचा अधिकारीही होत नाही. म्हणून आपल्याकडे आलेल्या शिष्याच्या शक्तिपातचिन्हांचे निरीक्षण

केल्यावर गुरू त्याच्यावर दीक्षासंस्कार करतात.

जन्मजन्मांतरात पुण्यसंचय केल्यामुळे एखाद्या उत्कृष्ट जीवाच्या मनात दीक्षा घेण्याची इच्छा उत्पन्न झाली तर त्याच्यावर शिवाचा अनुग्रह झाला हे निश्चित. परंतु इतरांचा दीक्षासंस्कार पाहून किंवा त्याविषयी ऐकून एखाद्या सामान्य जीवाच्या मनात दीक्षा घेण्याविषयी अनुकूलता उत्पन्न झाली तर तोदेखील ईश्वराचा अनुग्रह समजून त्याला दीक्षा देण्यात येते.

**दीक्षेचे स्वरूप व भेद**

गुरुकृपेने प्राप्त होणारा एक विलक्षण संस्कार म्हणजे दीक्षा. या संस्काराने साधकाच्या कारण, सूक्ष्म व स्थूल या देहांमध्ये वसणाऱ्या आणव, मायीय व कार्मिक या तीन मलांची निवृत्ती होऊन साधकाला भावलिंग, प्राणलिंग व इष्टलिंग यांची प्राप्ती होते. 'दी' म्हणजे लिंगसंबंध देणारा आणि 'क्षा' म्हणजे मलत्रयाचा क्षय करणारा, असा 'दीक्षा' या शब्दाचा अर्थ आहे (कारणागम, क्रियापाद, १.१२). दी = शिवज्ञान देणारी व क्षा = पाशबंधनाचा क्षय करणारी, असाही एक अर्थ सांगितला जातो (श्रीसिद्धान्तशिखामणी, ६.११). जीवस्वरूपाला आवृत करणारे मल तीन असल्यामुळे त्यांची निवृत्ती करणारी दीक्षासुद्धा वेधदीक्षा, मंत्रदीक्षा व क्रियादीक्षा अशी त्रिविध आहे.

**वेधदीक्षा**

श्रीगुरूच्या दिव्य दृष्टिपाताने आणि श्रीगुरूचा हस्त व शिष्याच्या मस्तक-संयोगाने शिष्याच्या अंत:करणात असलेल्या चिन्मयस्वरूपाचे ज्ञान करून देणारा जो संस्कारविशेष तीच 'वेधदीक्षा' होय. या दीक्षेमुळे शिष्याच्या ठिकाणी असलेला आणवमल नष्ट होऊन त्याच्या मनात शिवोऽहम् (मी शिव आहे) अशी भावना निर्माण होते. ही भावना म्हणजेच भावलिंग होय. शिवोऽहंभावनेने शिव आणि जीव या दोहोंच्या सामरस्यरूप योगाची प्राप्ती होते, म्हणून आणवमलापासून मुक्त झालेल्या कारणदेहाला 'योगांग' असे म्हणतात. वेधदीक्षेत गुरूकडून शिष्याला सात प्रकारचे उपदेश केले जातात.

१. दीक्षासंस्कारापूर्वी आपल्या बांधवांवर तू जसे प्रेम करीत होतास तसे आता त्यांच्याऐवजी शिवभक्तांवर कर. हा 'समयोपदेश' होय. समय म्हणजे सिद्धान्त.

२. शरीरादी इंद्रियांत ममत्वबुद्धीने केला जाणारा व्यवहार म्हणजे संसार. शरीराच्या उपचारातच संसारी जीव मग्न असतात. हे प्राकृतिक उपचार सोडून तू शिवपूजेत मग्न हो. हा 'निस्संसारोपदेश' होय.

३. तापत्रयांनी युक्त अशा भयावह संसारातून प्रयत्नपूर्वक मन बाहेर काढ. हा 'निर्वाणोपदेश' होय.

४. अंगतत्त्व व लिंगतत्त्व नीट जाणून त्यांच्या सामरस्याचे ज्ञान करून घे. हा 'तत्त्वोपदेश' होय.

५. इष्टलिंगात आपला प्राण व प्राणात आपले इष्टलिंग समरस करून इष्टलिंगात निरंतर दृष्टी ठेवून लिंगप्राणी हो. अर्थात् इष्टलिंगावर नितांत प्रेम ठेव. हा 'अध्यात्मोपदेश' होय.

६. शब्दस्पर्शादी विषयरूपी तत्त्वांचा उपभोग घेण्याआधी नासिकादी षडेंद्रियात राहणाऱ्या आचारलिंगादी षड्लिंगांना ते अर्पण करून त्या शुद्ध तत्त्वांचे प्रसाद म्हणून ग्रहण कर व जितेंद्रिय हो. हा 'तत्त्वसंशोधनोपदेश' होय.

७. सच्चिदानंद परशिवब्रह्म तूच आहेस, हे 'तत्त्वमसि' (तत् त्वम् असि) महावाक्याद्वारा निश्चयपूर्वक समजून घेऊन त्याचे निरंतर अनुसंधान कर. हा 'तत्त्वबोधोपदेश' होय. (कारणागम, क्रियापाद, १.९६–१०८)

**मंत्रदीक्षा**

शिष्याच्या उजव्या कानात अत्यंत गोपनीयता बाळगून पंचाक्षर महामंत्राचा श्रीगुरू उपदेश करतात. तीच 'मंत्रदीक्षा' होय. या दीक्षेत उपासना किंवा मनन करण्यासाठी शिवाच्या मंत्रमय स्वरूपाचा उपदेश केला जातो. शिव हा पंचाक्षरमंत्रस्वरूपच आहे. म्हणून त्या मंत्राच्या आवृत्तीने मनोवृत्ती तदाकार झाल्यावर प्रपंचात भेदबुद्धी करणारा मायामल नष्ट होतो. या दीक्षेने शिष्याला चिद्रूपोऽहम् (मी चिद्रूप आहे) असा बोध होतो. या चित्–अहंतेलाच 'प्राणलिंग' असे म्हणतात. अशा प्रकारे शिष्याच्या मायामलाचे निवारण करून प्राणलिंगाचा बोध करणारा संस्कारविशेषच मंत्रदीक्षा होय. मंत्रदीक्षासंपन्न साधक आपल्या उपभोग्य वस्तू शिवार्पित करूनच नंतर त्यांचा उपभोग घेतो. म्हणून मायामलापासून मुक्त झालेल्या त्याच्या सूक्ष्म देहाला 'भोगांग' असे म्हणतात.

मंत्रदीक्षेत शिष्याला श्रीगुरूकडून पुढील सात प्रकारचे उपदेश केले जातात.

१. इष्टलिंगपूजासमयी अन्य कोणत्याही वस्तूचे दर्शन व चिंतन न करता एकाग्रतेने केवळ इष्टलिंगाकडेच पाहा. हा 'चितैकाग्रतोपदेश' होय.

२. इष्टलिंगपूजाव्रताचे आमरण आचरण कर हा 'दृढव्रतोपदेश' होय.

३. लिंग पती व मी सती असा दृढ निश्चय करून तुझे तन, मन व भाव हे इष्ट, प्राण व भाव या लिंगांना अर्पण कर. हा 'पंचेंद्रियार्पणोपदेश' होय.

४. सर्व प्राण्यांना आत्मवत् मानून कोणत्याही प्राण्याची हिंसा करू नकोस. हा 'अहिंसोपदेश' होय.

५. आदि-मध्य-अंतरहित परब्रह्मस्वरूप अशा लिंगतत्त्वात नितांत निष्ठा ठेव. हा 'लिंगनिष्ठोपदेश' होय.

६. लिंगस्वरूपाचे चिंतन करीत तुझे मन त्यात विलीन कर. हा 'लिंगमनोलयोपदेश' होय.

७. आम्ही केलेल्या उपदेशावर संशयरहित मनाने नितांत श्रद्धा ठेवशील तरच तुला मुक्ती मिळेल. हा 'सद्योन्मुक्त्युपदेश' होय.

(कारणागम, क्रियापाद, १.११२-११८)

**क्रियादीक्षा**

जिच्यात क्रिया प्रधान आहे अशी दीक्षाच 'क्रियादीक्षा' होय. या दीक्षा-संस्काराच्या वेळी शुभमुहूर्तावर मठ किंवा मंदिर अशा पवित्र स्थानी मंडप तयार करून पंचाचार्यप्रतीकरूप पंचकलशांची स्थापना केली जाते व त्यात श्रीगुरू आपल्या आम्नायानुसार वीरशैवांचे मूळ आचार्य श्रीरेवणाराध्य, श्रीमरुळाराध्य, श्रीएकोरामाराध्य, श्रीपंडिताराध्य व श्रीविश्वाराध्य या पाच आचार्यांना आवाहन करतात. त्यांच्या साक्षीने शिष्याला समोर बसवून पंचगव्यप्राशन, अभिषेक इत्यादींच्या द्वारा त्याच्या शरीराला शुद्ध केले जाते. या शुद्ध शरीरालाच 'मंत्रपिंड' असे म्हणतात. याप्रमाणे अंगशुद्धीनंतर पंचसूत्रप्रक्रियेने निर्मित शिलामय शिवलिंगावर त्याच्या जडत्वनिवृत्तीसाठी जलाधिवास, धान्याधिवास इत्यादी अधिवासक्रिया केल्या जातात. नंतर त्या शिवलिंगात शिवकलानियोजनाद्वारे प्राणप्रतिष्ठा केली जाते.

असे संस्कारित शिवलिंग अर्थात् इष्टलिंग शिष्याच्या हाती देऊन श्रीगुरू त्याला सांगतात की, आपल्या प्राणासारखे हे इष्टलिंग सदैव कंठात धारण केले पाहिजेस. लिंगाला कदापि शरीराचा वियोग होऊ नये. त्यानंतर गुरू शिष्याला पंचाक्षरी मंत्राचा उपदेश करून मंत्राचा छंद, ऋषी व देवता यांचे ज्ञान देऊन न्यासपद्धती समजावून सांगतात. याप्रमाणे इष्टलिंगधारणेसाठी केल्या जाणाऱ्या संस्काराला क्रियादीक्षा म्हणतात. या दीक्षेमुळे जीवाचा कार्मिकमल म्हणजे संचित कर्म व अशुभ वासना यांचा नाश होतो (अनुभवसूत्र, ५.४१, ५८, ५९).

याप्रकारे क्रियादीक्षेद्वारा कार्मिकमलाचा नाश होऊन इष्टलिंगप्राप्ती झाल्यावर साधकाच्या स्थूलदेहाला 'त्यागांग' असे म्हटले जाते. क्रियादीक्षेत पुढील सात प्रकारचे संस्कार केले जातात.

१. आज्ञादीक्षा : सदाचाराचा त्याग करून स्वेच्छाचारी होऊ नकोस, अशी आज्ञा करणे.

२. उपमादीक्षा : आपल्या पूर्वाचार्यांप्रमाणे तूदेखील आचारसंपन्न हो, अशी पूर्वाचार्यांची उपमा देऊन उपदेश करणे.

३. कलशाभिषेकदीक्षा : पंचगव्य (गोमय, गोमूत्र, गोक्षीर, गोदधी व गोघृत), पंचामृत (दूध, दही, तूप, मध व साखर), पंचब्रह्म (सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान) आणि पंचाचार्य (रेणुकाराध्य, दारुकाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य व विश्वाराध्य) यांना आवाहन केलेल्या पंचकलशांतील जलाने अंग व लिंग यांना अभिषेक करणे.

४. स्वस्तिकारोहणदीक्षा : शिष्याच्या मांसपिंडाच्या निवृत्तीसाठी त्याच्या पायापासून मस्तकापर्यंत सहा अंगांमध्ये (तळपायापासून गुढग्यापर्यंत वर्णाध्व, गुढग्यापासून नाभीपर्यंत पदाध्व, नाभीपासून हृदयापर्यंत मंत्राध्व, हृदयापासून कंठापर्यंत कलाध्व, कंठापासून भ्रूमध्यापर्यंत तत्त्वाध्व आणि भ्रूमध्यापासून सहस्रारचक्रापर्यंत भुवनाध्व अशाप्रकारे) वर्ण, पद, मंत्र, कला, तत्त्व व भुवन या सहा अध्वांचा संबंध स्थापित करणे.

५. भूतिपट्टदीक्षा : शिष्याच्या अनादी मलनिवारणासाठी शुद्ध गोमयनिर्मित विभूतीने शिष्याला भस्मस्नान, भस्मोद्धूलन व त्रिपुंड्र धारण करणे.

६. आयत्तदीक्षा : श्रीगुरूंनी अंगुष्ठमात्र इष्टलिंग संस्कारित केल्यावर ते स्वत:च्या डाव्या तळहातावर ठेवून, शिष्याला दाखवून 'हे शिष्या, हे तुझे इष्टलिंग असून तू आजपासून लिंगाच्या आधीन (आयत्त) हो (लिंगायत्त हो)' असा उपदेश करणे.

७. स्वायत्तदीक्षा : श्रीगुरूनी आपल्या तळहातावरील इष्टलिंग मंत्रोपदेशपूर्वक शिष्याच्या डाव्या तळहातावर ठेवून त्याच्या स्वाधीन करणे.

(कारणागम, क्रियापाद, १.४३-९५)

याप्रकारे तिन्ही दीक्षांतील एकवीस संस्कारांमुळे सुसंस्कृत झालेला जीव मलत्रयापासून मुक्त होऊन षट्स्थलब्रह्मजिज्ञासेचा अधिकारी होतो. असा विधियुक्त दीक्षासंस्कार करणारा कुलगुरू हाच दीक्षागुरू होय.

**शिक्षागुरू :** दीक्षागुरूच दीक्षेनंतर लिंगपूजेचे नियम आणि इष्टलिंगाला प्राणाप्रमाणे अत्यंत सावधानपूर्वक निरंतर धारण करण्याचे शिक्षण देतो. याबरोबरच मंत्रसाधना व प्राणलिंगानुसंधानपद्धती शिकवतो. त्यांच्या नियमांच्या पालनावर भर देतो. हाच शिक्षागुरू होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, १५.१२-२०).

**ज्ञानगुरू :** वीरशैवागमांतील विषय आपल्या अनुभवाने आणि अनेक युक्तिप्रयुक्तीनी प्रतिपादन करीत शिष्याचा संदेह दूर करून जीवन्मुक्तीचे कारण अशा शिवाद्वैतज्ञानाचा उपदेश करणाराच ज्ञानगुरू होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, १५.२१-२९).

या प्रकारे आपल्या घराण्याचा वंशपरंपरागत एकच गुरू दीक्षा, शिक्षा, ज्ञान यांचा उपदेश करणारा असल्यामुळे त्यालाच दीक्षागुरू, शिक्षागुरू व ज्ञानगुरू अशा संज्ञा दिल्या जातात. वीरशैवांच्या अष्टावरणातील प्रथम आवरण असलेला गुरू दीक्षात्रयाने मलत्रय नष्ट करून लिंगत्रयाचा उपदेश करतो आणि शिष्याला सन्मार्गाकडे प्रवृत्त करून षड्रिपूंपासून त्याचे रक्षण करतो. म्हणून गुरू हे रक्षाकवचरूपी आवरण होय. मराठी संतकवी श्रीमन्मथस्वामी यांनी गुरूचे माहात्म्य मोठ्या बहारदार शब्दांत वर्णिले आहे:-

**जेणे कैवल्याचे कैवल्य केले । रंकासि राजेपण दिधले ।**
**जीवासी शिवपदी बैसविले । जया गुरुनाथे ।।** ५.७५

**शेखी शिवत्वही नेले । निर्गुणत्व जेणे दिल्हे ।**
**गुण नास्ति म्हणोनि निर्गुणत्वही वाळिले । अनुपम्य केले गुरुराये ।।** ५.७६
(श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती, वाराणसी)

## २. लिंग

प्रपंचाची उत्पत्ती, स्थिती व लय यांचे कारण असलेल्या परशिवब्रह्माला 'लिंग' अशी संज्ञा आहे. बृहत् म्हणजे व्यापक. बृहत् असल्यामुळे त्याला 'ब्रह्म' असे म्हणतात. लिंग व ब्रह्म ही परशिवाची दोन पर्यायनामे होत. शिवयोगी पंचक्लेश (अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश) आणि मलत्रय (आणव, माया, कार्मिक) यांच्या पाशांपासून मुक्त होऊन शेवटी याच परमतत्त्वात लीन होतात. त्यामुळेही परशिवाला 'लिंग' असे म्हटले जाते. लिंग हे शक्तिविशिष्ट शिवाचे द्योतक आहे. स्थूलरूपाने लिंगात बाण व पीठ असे दोन भाग असतात. यांपैकी बाण हे शिवाचे पीठ हे शक्तीचे चिन्ह आहे. या दोन्हीच्या संयुक्त स्वरूपालाच 'लिंग' असे म्हणतात. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'कार म्हणतात:–

**पीठिका परमाशक्तिर्लिंगं साक्षात् परः शिवः ।**
**शिवशक्तिसमायोगं विश्वं लिंगं तदुच्यते ।।** ११.३२

या श्लोकाचा अर्थ असा की, पीठिका म्हणजे शाळुंका ही सर्वोत्कृष्ट क्रियाशक्ती असून चिद्रूप परमेश्वर ही पिंडी होय. शिव व शक्ती यांचा संयोग म्हणजे हे विश्व.

लिंग हे उपासकांच्या दृष्टीने, स्थूल, सूक्ष्म व परात्पर असे तीन प्रकारचे होते. यांनाच वीरशैव सिद्धान्तात इष्टलिंग, प्राणलिंग व भावलिंग अशी नावे आहेत.

### इष्टलिंग

हे लिंगाचे स्थूल स्वरूप होय. स्फटिक किंवा श्रेष्ठ पर्वतीय पाषाणापासून याची निर्मिती केली जाते. पंचसूत्राच्या परिमाणाप्रमाणे ते घडविले जाते. लिंगात बाण, पीठ व गोमुख असे तीन भाग असतात. वरील गोलाकाराला बाण (पिंड), बाणाच्या खालील आधारभूत भागाला पीठ आणि पाणी वाहून जाणाऱ्या पीठाच्या निमुळत्या भागाला गोमुख म्हणतात.

### पंचसूत्र लिंग

(१) प्रथम बाण तयार करून त्याचा परीघ मोजतात. परीघ म्हणजे बाणाचे गोलाकार माप. (२) त्या मापाएवढी गोलाकार पीठाची लांबी. (३) त्या मापाएवढी गोलाकार पीठाची रुंदी. (४) तेवढीच पीठाची उंची. (५) परिघाच्या निम्म्या मापाएवढी गोमुखाची लांबी. याला 'पंचसूत्रपरिमाण' म्हणतात. या प्रमाणाप्रमाणे निर्माण केलेल्या लिंगास 'पंचसूत्र लिंग' म्हणतात (वीरशैवाचार–प्रदीपिका, १.९४–९५). या प्रक्रियेने बनविलेल्या लिंगाचे पीठाच्या तळभागापासून मस्तकापर्यंतचे माप व लिंगपीठाच्या टोकापासून गोमुखापर्यंतचा भाग यांचे माप समान असते.

पंचसूत्र परिमाणात न्यूनाधिक्य झाल्यास म्हणजे बाणापेक्षा पीठ लहान असल्यास त्या लिंगाच्या पूजेमुळे अपमृत्यू होतो आणि बाणापेक्षा पीठ मोठे असल्यास धनक्षय होतो. बाण व लिंग समप्रमाणात असलेल्या लिंगाच्या पूजेमुळे भोग व मोक्ष प्राप्त होतात (क्रियासार, भाग ३, पृ. ४१).

पंचसूत्रानुसार निर्मित केलेले अंगुष्ठमात्र लिंग क्रियादीक्षेच्या वेळी गुरूकडून संस्कारित होऊन जेव्हा शिष्याला प्राप्त होते तेव्हा त्याला 'इष्टलिंग' असे म्हणतात. विधीशिवाय धारण केलेले लिंगधारण हे न केल्यासारखेच होय (पारमेश्वरागम, १.७७). जर कोणी बाजारातून पंचसूत्र लिंग विकत आणून गुरुदीक्षेशिवाय धारण केले तर ते असंस्कारित लिंग इष्टलिंग होऊ शकत नाही. एखाद्या स्त्रीने विवाहसंस्काराशिवाय आपल्या हाताने गळ्यात मंगळसूत्र बांधून घेतले तर ती सौभाग्यवती ठरेल काय? यासाठी वीरशैवांनी श्रीगुरूकडून दीक्षासंस्कारपूर्वक इष्टलिंग धारण करणे आवश्यक आहे.

### इष्टलिंग नाव का?

श्रीगुरूकडून दीक्षासंस्कारपूर्वक प्राप्त झालेल्या लिंगाच्या पूजेमुळे संसारपाशरूप अनिष्टांचे निवारण होते, म्हणून त्या लिंगाला 'इष्टलिंग' असे म्हणतात. ज्योतिर्लिंग अथवा स्थावरलिंग यांचीही पूजा करून शिवभक्त अनिष्टनिवारण व इष्टप्राप्ती करून घेतात, मग अशा स्थावरलिंगाला इष्टलिंग का म्हणू नये? तर याचे उत्तर असे की, येथे इष्टलिंगाचा केवळ योगार्थ (शब्दार्थ) अभिप्रेत नसून त्याचा योगरूढार्थ अभिप्रेत आहे. 'पंकज' या शब्दाचा योगार्थ 'चिखलात जन्मलेले

कमळ, कृमि–कीटक इत्यादी..' असा असला तरी त्याचा रूढार्थ मात्र 'कमळ' असाच आहे. त्याचप्रमाणे इष्टलिंग शब्दाच्या योगार्थाने शरीरावरील लिंग, स्थावरलिंग इत्यादी निर्देशित करता येत असले तरी देखील त्याचा रूढार्थ मात्र 'देहावर धारण केलेले लिंग' असाच आहे. स्थावरलिंगांना रामेश्वर, घृष्णेश्वर, विश्वेश्वर आदी नामांनीच संबोधिले जाते. त्यांना इष्टलिंग असे कुठेही म्हटले जात नाही.

इष्ट दोन प्रकारचे असते. लौकिक इष्ट व पारमार्थिक इष्ट. ऐहिक व पारलौकिक फलप्राप्तीची इच्छा म्हणजे लौकिक इष्ट होय आणि मुक्तीची इच्छा हे पारमार्थिक इष्ट होय. तीर्थक्षेत्रात वसणाऱ्या विश्वेश्वर इत्यादी लिंगांच्या आराधनेमुळे धर्म, अर्थ व काम या लौकिक इष्टांची प्राप्ती होते. परंतु मुक्ती या पारमार्थिक इष्टाची मात्र प्राप्ती होत नाही. कारण स्थावरलिंगाची उपासना ही प्रतीकोपासना आहे. प्रतीकोपासना व अहंग्रहोपासना अशी दोन प्रकारची उपासना असते. उपास्य आणि उपासक यांच्यात भेदबुद्धी ठेवून लौकिक फलाच्या अपेक्षेने केली जाणारी उपासना ही 'प्रतीकोपासना' असून सोऽहं (तो मीच आहे) या भावनेने उपास्य आणि उपासक यांच्या अभेदबुद्धीने सामरस्यरूपी मुक्तीच्या अपेक्षेने केली जाणारी उपासना 'अहंग्रहोपासना' होय. इष्टलिंग हे आत्म्याचे प्रतीक असून त्याची उपासना अभेदबुद्धीने केली जाते त्यामुळे इष्टलिंगाच्या निरंतर अहंग्रहोपासनेमुळे लिंगांगसामरस्यरूपी मुक्ती प्राप्त होते. इष्टलिंगाच्या उपासनेमुळे जर मुक्तीसारखे दुर्लभ पारमार्थिक इष्ट प्राप्त होते, तर लौकिक इष्टप्राप्ती सहज होईल यात काय संशय? म्हणून केवळ लौकिक इष्टप्राप्ती करून देणाऱ्या स्थावरलिंगापेक्षा लौकिक व पारमार्थिक अशी उभय इष्टप्राप्ती करून देणाऱ्या शरीरावरील लिंगाला इष्टलिंग म्हणणे अधिक युक्तिसंगत होय. मायिदेव आपल्या 'अनुभवसूत्रा'त यासंबंधी म्हणतात:–

> **इष्टेहि पूजा तया नित्यमिष्टं पूजितमादरात् ।**
> **इष्टलिंगमिति प्रोक्तमाचार्येर्लिंग पूजकैः ।**
> **इष्टमर्थं स्व भक्ताना मनुयच्छति सर्वदा ।।** ३.९–१०

'इष्ट्या इष्टं लिंगं इष्टलिंगम्' या व्युत्पत्तीनुसार प्रतिदिन आदरपूर्वक ज्या लिंगाची पूजा केली जाते त्याला 'इष्टलिंग' अशी संज्ञा आहे. वीरशैवसिद्धान्तात

इष्टलिंगपूजेला नित्यकर्म मानले जाते. नित्यकर्म हे प्रतिदिन जीवनभर करावे लागते. शरीरावर धारण केलेले लिंग वीरशैवाकडून प्रतिदिन आदरपूर्वक पूजिले जाते. म्हणून त्यालाच इष्टलिंग म्हटले पाहिजे. स्थावरलिंगाची पूजा आदरपूर्वक निरंतर होत असली तरी ती एकाच व्यक्तीकडून होत नाही. म्हणून स्थावरलिंगाला इष्टलिंग संबोधणे युक्तिसंगत ठरणार नाही. वीरशैव आपल्या शरीरावर निरंतर लिंग धारण करतात व परगावी गेल्यावर देखील त्यांच्या लिंगपूजेत खंड पडत नाही. म्हणून शरीरावर धारण केले जाणारे लिंग हेच इष्टलिंग होय. स्थावरलिंगाला इष्टलिंग म्हणणे इष्ट नव्हे. याप्रकारे विचार केल्यावर हे निर्विवादपणे सिद्ध होते की, शरीरावर सदैव धारण केले जाणारे, ज्याची पूजा इष्टलिंगधारकाकडून नित्य आदरपूर्वक होते असे, ज्याच्या पूजेमुळे संसारपाशरूपी अनिष्टांचे निवारण होऊन लिंगांगसामरस्यरूपी इष्टाची प्राप्ती होते असे लिंगच इष्टलिंग होय.

वीरशैवसिद्धान्तानुसार सर्व प्रपंच हा चिद्रूप म्हणजे चैतन्यरूप आहे. सामान्यत: माती, दगड इत्यादींना जड मानले जाते. परंतु 'अत्यंतगूढचैतन्यं जडमव्यक्तमुच्यते' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ५.४३) या आचार्योक्तीनुसार अत्यंत गूढ अशा चैतन्याला लोक जड मानतात. वीरशैवांच्या मते कोणती वस्तू जड नसून ती चैतन्यरूप असते. म्हणून शिवलिंग (इष्टलिंग) जड नसून गूढचैतन्ययुक्त आहे. दीक्षासमयी केलेल्या संस्कारांमुळे त्यातील गूढचैतन्य अभिव्यक्त होते. इष्टलिंगाची पूजा ही जड पदार्थाची पूजा नव्हे.

**लिंग–प्राणसंबंध**

सामान्यत: सर्व लोकांचा प्राणसंबंध त्यांच्या सूक्ष्म शरीराशी असतो. सूक्ष्म शरीरात मन व बुद्धी यांचे प्राबल्य असते. मनोबुद्धीच्या निर्देशानुसारच प्राण व इंद्रिये यांचा व्यवहार होतो. म्हणून योगी आपल्या संकल्पबळाने देहत्याग करून परकायाप्रवेश करतात. यावरून मन व बुद्धी जेथे आसक्त होतात तेथे त्याचा प्राण राहतो, हे सिद्ध होते. आपल्या शरीराशिवाय धन, शेती, पुत्र, कलत्र इत्यादी ठिकाणी अन्य लोक अत्यंत आसक्ती बाळगून असतात. म्हणून धन, शेती इत्यादींचा क्षय झाल्यावर त्यांचा मृत्यू होताना आपण पाहतो. जेव्हा एखाद्या वस्तूशी व्यक्तीचा प्राणसंबंध जडतो तेव्हा त्या वस्तूवर त्याचे आत्यंतिक प्रेम असते हे निश्चित.

अज्ञ लोकांचे प्रेमाधिक्य सांसारिक वस्तूंमध्ये असते, त्याप्रमाणे भक्ताचे प्रेमाधिक्य आपल्या इष्टलिंगात असते. म्हणून दीक्षेच्या वेळी लिंग देताना श्रीगुरू शिष्याला सांगतात:-

> **प्राणवद्धारणीयं तत्प्राणलिंगमिदं तव ।**
> **कदाचित् कुत्रचिद्वापि न वियोजय देहत: ।।** श्रीसिद्धान्तशिखामणी, ६.२६

हे शिष्या, हे तुझे प्राणलिंग आहे. प्राणासारखे याचे रक्षण कर. शरीरापासून याला कदापि दूर करू नकोस.

या गुरूपदेशाने दीक्षासंपन्न शिष्य 'लिंगप्राणी' होतो. लिंगाला स्वत:च्या प्राणासमान मानणारा भक्त म्हणजे लिंगप्राणी. प्रमादाने अथवा कोणत्याही कारणाने शरीरापासून इष्टलिंग दूर होताच भक्ताने तत्काळ प्राणत्याग करावा, असे शास्त्रात म्हटले आहे. यालाच 'वीरव्रत' असे म्हणतात. वीरव्रत पाळणारा तोच वीरशैव होय. लोकव्यवहारात आपण असे पाहतो की नितांत प्रेम असलेल्या एखाद्या वस्तूचा वा व्यक्तीचा वियोग होताच मनुष्याचा प्राण धक्का बसल्यामुळे निघून जातो. त्याप्रमाणे ज्याचे लिंगावर नितांत प्रेम असते त्याचाही प्राण लिंगाचा वियोग होताच सहज निघून जाऊ शकतो.

लिंगाचा वियोग झाल्यावर जर एखाद्या शिवभक्ताने शास्त्रादेश पाळण्यासाठी जाणिवपूर्वक प्राणत्याग केला तरीही त्याला आत्महत्येचा दोष लागत नाही व तो जीव दुर्गतीला जात नाही, असे शास्त्रात सांगितले आहे. 'गते लिंगे त्यजेत् प्राणम्' या उक्तीनुसार 'लिंगाचा वियोग झाल्यावर प्राणत्याग कर' या विधिवाक्याचे तात्पर्य प्राणत्याग करण्याचा आग्रह नसून प्रेमपूर्वक निरंतर लिंगधारण करण्याचा आग्रह करणे, हे आहे.

प्राणरहित स्थूल शरीराला 'प्रेत' असे म्हणतात, त्याप्रमाणे प्राणलिंगरूपी इष्टलिंगाच्या अभावामुळे वीरशैवाच्या शरीराला प्रेतासमान मानले जाते. संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी म्हणतात:-

> **तेवीं लिंग गेलियां जो राहे । तो वीरशैवचि नोहे ।**
> **प्राण गेलिया देह । प्रेतचि बोलीजे ।।** ३.९

(श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती शोधप्रतिष्ठान, वाराणसी)

मन्मथस्वामींनी इष्टलिंगविरहित वीरशैवाला प्रेत असे संबोधले आहे. या

पाठीमागे वीरशैवांनी निष्ठापूर्वक लिंगधारण करावे, अशी त्यांची तळमळ दिसून येते. म्हणून प्रत्येकाने या प्रेतकलंकापासून मुक्त होण्यासाठी विधिपूर्वक लिंगधारण केले पाहिजे.

मनुष्याकडून जेव्हा दुराचार घडतो तेव्हा तो सगळ्यांपासून लपवून केला जातो. परंतु ज्याच्या शरीरावर सदोदित इष्टलिंग असते त्याच्या हातून दुराचार घडणे शक्य नाही. इष्टलिंगधारणेमागे समाजातील दुर्वव्यवहाराचा लोप व्हावा, असाही एक उद्देश आहे.

**लिंगधारणेची स्थाने**

शरीरावर इष्टलिंगधारणेसाठी आचार्यांनी मस्तक, कंठ, वक्षस्थल, काख, पोट व तळहात अशी सहा स्थाने सांगितली असून जटा, पाठ, मलस्थान, नाभीच्या खालचा भाग ही स्थाने निषिद्ध मानली आहेत (श्रीसिद्धान्तशिखामणी, ६.५२–५३).

'वातुलागमा'त मस्तक, कंठ, बाहू, हात, हृदय व नाभिमंडल यांपैकी कोणत्याही एका स्थानावर लिंगधारण करावे असे सांगितले आहे (१०.३६). सोने, चांदी, पितळ, तांबे इत्यादी धातूंनी निर्मिलेल्या सज्जिकेत (लिंगपेटीत) इष्टलिंग ठेवून दोऱ्याने बांधून वरीलपैकी एखाद्या स्थानी धारण करावे. सज्जिकेचा आकार नंदीसारखा, आम्रफळासारखा, मोदकासारखा अथवा शिवलिंगासारखा असावा. सूत्राची म्हणजे शिवदोऱ्याची निर्मिती वरील धातूंपासून करावी अथवा साध्या दोऱ्यातही बांधता येते. हा दोरा छत्तीस पदरांचा असावा. वीरशैवसिद्धान्तात छत्तीस तत्त्वे मानली जातात. त्याचे प्रतीक म्हणून छत्तीस पदरांचा दोरा असावा.

इष्टलिंगपूजा हे वीरशैवांचे नित्यकर्म असल्यामुळे लिंगपूजा सकाळी, दुपारी व सायंकाळी करावी. तीन वेळा शक्य नसेल तर दोन वेळा आणि तीही शक्य नसेल तर किमान एकदा तरी निश्चित करावी, असा शास्त्रादेश आहे (सूक्ष्मागम, क्रियापाद, ६.५१–५२). मन्मथस्वामींनी तर सहा वेळा पूजा करावी, असे म्हटले आहे.

नित्यकर्म केल्यामुळे विशेष पुण्यप्राप्ती होत नाही, परंतु ते न केल्यामुळे पाप मात्र होते. नित्यकर्म न केल्यामुळे होणारे पाप लिंगपूजा केल्याने होत नाही, हेच त्याचे फळ होय.

इष्टलिंग डाव्या तळहातावर ठेवून त्याची पूजा करावी. अन्य कोणत्याही पीठावर ठेवून करू नये, असे शास्त्र सांगते. सामान्यत: डावा हात अपवित्र आहे असे लोक मानतात. परंतु पुष्पांजली अर्पण करताना, नमस्कार करताना, अर्घ्य देताना व पूर्णाहुती देताना डाव्या व उजव्या अशा दोन्ही हातांचा उपयोग केला जातो. म्हणून डावा हात हा उजव्या हातापेक्षा कनिष्ठ आहे असे म्हणता येत नाही.

### सूतकांचा निषेध

इष्टलिंगधारण व इष्टलिंगपूजा यांमध्ये पुरुष व स्त्री यांना समान अधिकार आहे. धर्मशास्त्रात जननसूतक, मरणसूतक, रज:सूतक, उच्छिष्टसूतक व जातिसूतक अशी पंचसूतके मानली आहेत. घरात जन्म वा मृत्यू झाल्यास अथवा घरातील स्त्री रज:स्वला झाल्यास सूतक पाळले जाते. सूतकाच्या काळात त्या घरात पूजापाठ निषिद्ध मानले जातात. अशा परिस्थितीत स्त्रियांना इष्टलिंगदीक्षा दिल्यावर रज:सूतकाच्या काळात इष्टलिंगपूजा कशी करता येईल? यासाठी वीरशैवाचार्यांनी इष्टलिंगपूजेसाठी सूतकांचा निषेध केला आहे. 'सिद्धान्तागमा'त स्पष्ट म्हटले आहे:–

**स्वेष्टलिंगैकपूजायां नैवाशौचं विधीयते ।**
**पौण्डरीके रज: स्त्रीणां स्वाग्निहोत्रे यथा तथा ।।**
**अकरस्पर्शयोग्याऽपि यथा जिह्वा महेश्वरि ।**
**मंत्रोच्चारणमात्रस्य पूता भवति भूतले ।।**
**तथा सूतकिन: शैवा: पूजामात्रसुनिर्मला: ।**
**नान्यस्पर्शानुकूला: स्युरिति वेदानुशासनम् ।।** ब्रह्मसूत्र, श्रीकरभाष्य, १.१.१

'श्रीकरभाष्या'त श्रीपतिपंडितांनी 'सिद्धान्तागमा'तील वरील श्लोक उद्‍धृत करून वीरशैव स्त्रियांनी केवळ इष्टलिंगपूजेच्या वेळी सूतक पाळू नये, परंतु अन्य व्यवहारात ते पाळावे, असे स्पष्ट केले आहे. वरील श्लोकांचा अर्थ असा, ज्याप्रमाणे पौंडरीकादी दीर्घकालीन यज्ञ करीत असताना यजमानाची पत्नी जर रज:स्वला झाली तर ती स्नान करून ओले वस्त्र धारण करून पुन्हा यज्ञात सामील होते, त्याप्रमाणे वीरशैव स्त्री रज:स्वला किंवा प्रसूत झाल्यावर देखील

त्याच दिवशी स्नान, गुरुचरणोदकप्रोक्षण इत्यादी करून शुद्ध होते व इष्टलिंगपूजेची अधिकारी होते. याप्रमाणेच घरात कोणाचा मृत्यू झाल्यास त्या घरातील लोकदेखील अंत्यसंस्कारानंतर स्नान करून व गुरुतीर्थाच्या प्रोक्षणाने घर शुद्ध करून आपले इष्टलिंगपूजारूपी नित्यकर्म करू शकतात. म्हणून इष्टलिंगपूजेत मरणसूतक पाळण्याची आवश्यकता नाही. याप्रमाणे स्त्रियांना इष्टलिंगपूजेसाठी सूतकातून मुक्त करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्यात आला.

'लिंगधारणचंद्रिका'कार नंदिकेश्वरांच्या मते, वीरशैव स्त्रीवर दीक्षासंस्कार होऊन तिच्या मांसपिंडाचे मंत्रपिंडात परिवर्तन झाल्यामुळे ती सूर्य, अग्नी व वायू यांच्याप्रमाणे सदैव निर्मल व परिशुद्ध असते; म्हणून वीरशैव स्त्रीने केवळ लिंगपूजासमयीच नव्हे, तर अन्य कोणत्याही कार्यात सूतक पाळू नये. काही लोक लिंगपूजेच्या काळात स्त्रीने सूतक पाळू नये, परंतु इतर व्यवहारात पाळावे असे म्हणतात. परंतु ते युक्तिसंगत नव्हे. लोकव्यवहारात विरोध होतो म्हणून स्वयंपाकादी कार्यात स्त्रीने सूतक पाळावे असे म्हटले तर लोकव्यवहारात अन्यधर्मीय पूजेच्या वेळी देखील सूतक पाळतात. त्याला विरोध करून वीरशैवधर्मात सूतक पाळले जात नाही, मग अन्य कार्यात सूतक पाळण्यासाठी लोकव्यवहाराची भीती कशाला? असा तर्कसंगत युक्तिवाद नंदिकेश्वरांनी केला आहे.

शंकरशास्त्री यांनी 'सिद्धान्तागमा'वरील भाष्यात वरील दोन्ही मतांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते, शरणस्थलामध्ये पोहोचलेल्या उच्च कोटीच्या स्त्रियांसाठी सूतकांचा सर्वत्र निषेध केलेला असून अन्य स्थलांतील स्त्रियांसाठी मात्र केवळ लिंगपूजेच्या वेळीच सूतकनिषेध केला आहे. असे मानले तरच 'सिद्धान्तागम' व 'लिंगधारणचंद्रिका या दोन्ही ग्रंथांतील वचनांत विरोध राहात नाही.

नंदिकेश्वर शिवाचार्य व शंकरशास्त्री यांची वरील मते आपापल्या परीने युक्तिसंगत असली तरी ऋतुकालात स्त्रियांना विश्रांतीची आवश्यकता असते, असे आधुनिक शरीरशास्त्र मानते. ऋतुकाल हा अपवित्र म्हणून नव्हे तर विश्रांतीसाठी आवश्यक म्हणून वीरशैव स्त्रियांनी लिंगपूजेचा अपवाद करून अन्य कार्यात आवश्यकतेनुसार सूतक पाळण्यास हरकत नाही.

**लिंगधारणेचे प्राचीनत्व**

शरीरावर लिंगधारणेची प्रथा काही लोक मानतात त्याप्रमाणे अलीकडची नसून अत्यंत प्राचीन आहे. वेद, आगम, पुराणे व शास्त्रे यांत लिंगधारणेचे उल्लेख आढळतात. 'लिंगपुराणा'त

> **वेदेषु शास्त्रसंघेषु पुराणेश्वागमेषु च ।**
> **ब्राह्मणस्य समाख्यातं लिंगधारणमुत्तमम् ।।** लिंगपुराण, उत्तरार्ध, २१.९७

असे म्हटले असून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त

> **वेदशास्त्रपुराणेषु कामिकाद्यगमेषु च ।**
> **लिंगधारणमाख्यातं वीरशैवस्य निश्चयात् ।।** ६.५८

असा उल्लेख आहे. यावरून लिंगधारण अत्यंत प्राचीन आहे असे सिद्ध होते. वेदवाङ्मयात इष्टलिंगाला 'पवित्र' (ऋग्वेद, १.८३.१), 'पाणिमंत्र' (यजुर्वेद) आदी शब्दांनी संबोधिलेले आहे. इष्टलिंग सदैव पवित्र असून त्याचे धारण केल्याने शरीर पवित्र होते, म्हणून ते पवित्र होय. ज्याच्या मननामुळे साधकाचे रक्षण होते त्या परशिवाला 'मंत्र' असे म्हणतात. पाणि याचा अर्थ हात. अर्थात् पाणिपीठावर म्हणजे हस्ततलावर ठेवून ज्याची पूजा केली जाते अशा परशिवाला 'पाणिमंत्र' असे म्हणतात. दीक्षासमयी श्रीगुरू शिष्याच्या हातावर मंत्रपूर्वक इष्टलिंग देतात यासाठीही त्याला पाणिमंत्र म्हटले जाते (लिंगपुराण, उत्तरार्ध, २१.१०३–१०५).

> **पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते प्रभुर्गात्राणि पर्येषि विश्वत: ।**
> **अतप्ततनुं तदामो अश्नुते श्रृतास इद्वंहस्तत्समाशत ।।** ऋग्वेद, ८३.१

या ऋग्वेदातील वचनातही लिंगधारणेचा स्पष्ट उल्लेख आढळतो. लिंगधारणेने शरीर पवित्र होते, लिंगधारणसंस्काराने जे शरीर तप्त होत नाही ते अपवित्र होय, असा या वचनाचा आशय आहे. 'स्कंदपुराणा'तील केदारखंडात

> **यथोक्त: शिवधर्मा हि नंदिनापरिकीर्तिता: ।**
> **शैलादेन महाभागा विचित्रा लिंगधारका: ।।**
> **शवस्योपरि लिंगं च ध्रियते च पुरातनै: ।**
> **लिंगेन सह पंचत्वं लिंगेन सह जीवितम् ।।** ७.४१–४२

असे लिंगधारकाचे वर्णन आलेले आहे. अर्थ असा की, हे लिंगधारी फार विचित्र असून अत्यंत पुरातन परंपरा असलेले हे लोक प्रेतालासुद्धा लिंगधारण करतात. जिवंतपणी यांच्या गळ्यात लिंग असते आणि मृत्यूनंतरही यांच्या गळ्यात लिंग असते, म्हणून हे लोक विचित्र होत.

या ठिकाणी लिंगधारकासाठी 'पुरातन' असा शब्दप्रयोग केलेला असल्यामुळे व्यासांनासुद्धा लिंगधारण हे अत्यंत प्राचीन आहे याची जाणीव होती, असे दिसते.

ब्रह्मा, विष्णू आदी देव, गौतमादी ऋषी आणि लक्ष्म्यादी शक्ती हे शिवभक्त असून ते आपापल्या मस्तकावर अहर्निश लिंगधारण करीत असत (श्रीसिद्धान्त–शिखामणी, ६.५६–५७). इंद्रादी दिक्पाल, गंधर्व विभिन्न रत्नांनी निर्मिलेली लिंगे धारण करीत असत, असे व्यासमहर्षींनी वर्णिलेले आहे. पंढरपूरचा विठ्ठल, बार्शीचा भगवंत, कोल्हापूरची महालक्ष्मी, बळ्ळारीचा नृसिंह, काश्मीरची शारदा, तुळजापूरची भवानी, कांची येथील कामाक्षी, काशीची विशालाक्षी व श्रीराममूर्ती इत्यादींच्या मस्तकांवर लिंगे आढळतात (वीरशैवरत्न, पृ. ८). यावरून लिंगधारणेची परंपरा अतिशय प्राचीन व सर्वमान्य होती असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

बाह्यलिंगधारणेची चर्चा केल्यानंतर अंतर्लिंगधारणेचा विचार करावयाचा आहे.

**प्राणलिंग**

मंत्रदीक्षेच्या वेळी श्रीगुरूकडून उपदेशिलेले आपले चिद्रूप हेच प्राणलिंग होय. आत्मा सत्, चित्, आनंदरूप असून इष्टलिंग हे आत्म्याचे सद्रूप, प्राणलिंग हे चिद्रूप आणि भावलिंग हे आनंदरूप होय. प्राणलिंगाचा साक्षात्कार योगाभ्यासाशिवाय होत नाही. जे शिवयोगी आहेत त्यांना त्याचा सहज अनुभव येतो. याविषयी ज. रेणुकाचार्य 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हणतात, मूलाधारात स्थित झालेल्या अपानवायूवर जेव्हा प्राणायामप्रक्रियेने प्राणवायूचा आघात होतो, तेव्हा तेथे एक दिव्य ज्योती निर्माण होते. कुंडलिनीला जागृत करून सुषुम्नेच्या मार्गाने हृदयातील अनाहतचक्राच्या द्वादशदलातील मध्यकर्णिकेत येऊन ती स्थिर होते. ती ज्योती अंगठ्याएवढी व पोवळ्याच्या रंगाची असते. ह्या ज्योतीला

शिवयोगी ‘प्राणलिंग’ असे म्हणतात. सूर्योदयानंतर धुके ज्याप्रमाणे त्याच्या प्रकाशात विलीन होऊन जाते त्याप्रमाणे हृदयातील या दिव्य ज्योतीत प्राणवायूचा विलय होतो. या प्राणशक्तिविशिष्ट ज्योतीलाच प्राणलिंग म्हणतात.

योग्याच्या मूलाधार, हृदय व भ्रूमध्य या स्थानांत ज्योतिर्लिंग सदैव प्रकाशमान असते, असे आचार्यांनी म्हटले असून मूलाधारस्थानात सुवर्णासारखे, हृदयात पोवळ्यासारखे व भ्रूमध्यात स्फटिकासारखे त्याचे ध्यान करावे, असा त्यांनी आदेश दिला आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ६.३५,४०). प्रत्येक मनुष्याच्या वरील स्थानांत ज्योतिर्लिंगाचे अस्तित्व असते, परंतु ते तमोगुण इत्यादीच्या मालिन्याने आवृत असल्यामुळे सहजपणे त्याचा अनुभव येत नाही. यासाठी प्राणायामाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. महर्षी पतंजलीनी ‘ततःक्षीयते प्रकाशावरणम्’ (योगसूत्र, २.५२) या सूत्रात प्राणायामाने ज्योतिर्लिंगावरील अज्ञानावरणाची निवृत्ती होते, असे म्हटले आहे. अंतर्लिंगानुसंधान सामान्य जनांसाठी थोडे कठीण असले तरी योगाभ्यासामुळे ते साध्य होऊ शकते.

‘अत्राऽयं पुरुषः स्वयंज्योतिः’ (बृहदाण्यक, ४.३.९). या श्रुतीत देखील आत्म्याचे चिद्रूप वर्णिले आहे. स्वप्नावस्थेत या चिद्रूपाचा अनुभव सर्वांना येतो. कोणतीही वस्तू प्रकाशाशिवाय दिसत नाही. सूर्याच्या प्रकाशात दिवसा व दीपाच्या प्रकाशात रात्री सर्व व्यवहार चालतात. स्वप्नात बाह्य प्रकाशाचा अभाव असला तरीही सर्व पदार्थ स्पष्ट दिसून येतात. त्या पदार्थांच्या प्रतीतीचे कारण आत्मप्रकाश होय. जागृतावस्थेत प्राणायाम व ध्यान या साधनेमुळे आत्मप्रकाशाचा अनुभव येऊ शकतो. यासाठी वीरशैवांनी इष्टलिंगपूजनाबरोबर शास्त्रविहित मार्गाने प्राणलिंगाचे अर्चन केले पाहिजे.

### प्राणलिंगार्चना

ज्योतिर्मय प्राणलिंग अंतरंगात असल्यामुळे त्याची पूजादेखील अंतरंगसामग्रीने केली जाते. प्राणलिंगाच्या अभिषेकासाठी क्षमा हे जल, नित्यानित्यवस्तुविवेक हे वस्त्र, सत्यवचन हे आभूषण, वैराग्य ही पुष्पमाला, समाधिस्थिती हे गंध, निरहंकारभावना ही अक्षता, दृढश्रद्धा हा धूप, आत्मज्ञान हा दीप, भ्रांतिनिवृत्ती हा नैवेद्य, मौन हा घंटानाद, विषयसमर्पण हा तांबूल, भेदबुद्धीची निवृत्ती ही

प्रदक्षिणा आणि अभेदचिंतन करणाऱ्या वृत्तीचा प्राणलिंगात विलय हाच नमस्कार होय. वीरशैवाचार्यांनी या प्रकारे प्राणलिंगार्चनविधी सांगितला आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, १२,१६-२०).

याप्रमाणे निरंतर केल्या जाणाऱ्या प्राणलिंगार्चनेमुळे साधकाची मनोवृत्ती अंतर्मुख होऊन त्यापेक्षाही सूक्ष्म अशा भावलिंगाच्या अर्चनेसाठी समर्थ होते.

**भावलिंग व त्याची अर्चना**

सर्व बाह्य क्रियांचा विलय झाल्यावर शिवोऽहम् भावनेने अर्थात् तैलधारेप्रमाणे अखंड चिंतनरूप निदिध्यासाच्या बळाने साधकाला आपल्या ब्रह्मरंध्रातील सहस्रारकमलात ज्या दिव्यज्योतिस्वरूप परशिवाचा स्वात्मरूपाने साक्षात्कार होतो त्याला 'भावलिंग' असे म्हणतात.

शिवोऽहम् अशा शुद्ध भावनेने भावलिंगाचा साक्षात्कार होतो व त्याच भावनेने त्याची पूजा केली जाते. भावलिंगालाच 'तृप्तिलिंग' असेही नाव आहे. भावलिंगाचे ध्यान करीत त्यात समरस होणे हे वीरशैवसिद्धान्ताचे लक्ष्य आहे. इष्टलिंगाची पूजा करीत साधक अंतर्मुख होऊन अंतर्लिंगार्चनेसाठी समर्थ होतो. ते करीत तो लिंगांगसामरस्यरूपी ऐक्य प्राप्त करून घेतो. आंतरिक साधनेसाठी बाह्यलिंगपूजेची आवश्यकता आहे.

इष्टलिंग, प्राणलिंग व भावलिंग हे अनुक्रमे आत्म्याचे सद्रूप, चिद्रूप व आनंदरूप होत. स्वस्वरूपाला पूर्ण जाणून घेण्यासाठी या तिन्ही लिंगांची अर्चना साधकाने करावयास हवी. पंचेंद्रियांपैकी नेत्रेंद्रियांद्वारे मनुष्याचे मन सतत बर्हिमुख होत असते. तळहातावर इष्टलिंग ठेवून अर्धोन्मिलित दृष्टीने त्याच्याकडे पाहात राहिल्यास बर्हिमुख होणारी वृत्ती अंतर्मुख होते. याप्रकारे इष्टलिंगोपासनेमुळे बाहेर धावणारी मनोवृत्ती आत वळते. प्राणलिंगोपासनेमुळे ती अंतर्हृदयात स्थिर होते आणि भावलिंगोपासनेमुळे बुद्धी शिवोऽहम् भावनारूप होते.

इष्टलिंगधारणेमुळे शरीराकडून दुर्व्यवहार घडत नाही, प्राणलिंगानुसंधानाने मनात दुर्विचार उत्पन्न होत नाही व भावलिंगोपासनेमुळे बुद्धीत दुर्भाव निर्माण होत नाही. अशाप्रकारे स्थूल, सूक्ष्म व कारण या तिन्ही देहांचे इष्ट, प्राण व भाव या लिंगांमुळे रक्षण होते. म्हणून लिंग हे आवरण साधकाचे रक्षाकवच होय.

# ३. जंगम

स्थावर व जंगम असे जगताचे स्वरूप द्विविध आहे. स्थिर असलेले ते सर्व स्थावर आणि चलनवलन करणारे ते सर्व जंगम. जंगम या शब्दाचा हा सामान्य अर्थ असून 'जंगम' हा वीरशैवसिद्धान्तातील पारिभाषिक शब्द आहे.

**जानन्त्यतिशयाद् ये तु शिवं विश्वप्रकाशकम् ।**
**स्वस्वरूपतया ते तु जंगमा इति कीर्तिताः ।।** श्रीसिद्धान्तशिखामणी, ११.३६

विश्वप्रकाशक स्वयंज्योती अशा परशिवाला जो आपल्या आत्म्याशी अभिन्न मानतो म्हणजेच ज्याच्या मनात शिवाविषयी अभेदभाव निर्माण झालेला असतो त्या आत्मज्ञानी पुरुषाला 'जंगम' असे नाव आहे. अर्थात् जंगम म्हणजे जीवन्मुक्त पुरुष. जंगम शब्दाचा अक्षरार्थ पुढीलप्रमाणे केला जातो.

ज = जन्मरहित, ग = गमनरहित, म = मरणरहित.

जननमरणरूपी गमनागमनापासून जो मुक्त आहे तो जंगम होय (वीरशैवसदाचार संग्रह, १५.६-८). हा निःस्पृह व निरहंकारवृत्तीने लोककल्याणासाठी आपले आयुष्य वेचतो. त्याला 'शिवयोगी' अशीही संज्ञा आहे. 'ब्रह्म जानातीति ब्राह्मणः' या व्युत्पत्तीनुसार ब्रह्मज्ञानी पुरुषाला जसे ब्राह्मण म्हटले जाते त्याप्रमाणेच शिवज्ञानसंपन्न पुरुषाला जंगम म्हटले जाते.

ज्याप्रमाणे ब्राह्मण हा शब्द तात्त्विक दृष्टीने ब्रह्मज्ञानी पुरुषाचा वाचक असला तरी व्यवहारात तो जातिवाचकही आहे, त्याप्रमाणे जंगम हा शब्द तात्त्विक दृष्टीने शिवसाधनारत जीवन्मुक्त पुरुषाचा वाचक असला तरीही व्यवहारात तो जातिवाचकदेखील आहे. वीरमाहेश्वर वंशात जन्मलेल्या लोकांना जंगम म्हणतात. 'विशिष्टवीर' व 'वीरमाहेश्वर' हे जंगम शब्दाचेच पर्याय होत (वीरशैवसदाचार संग्रह, ११.४५). जंगमांना 'लिंगिब्राह्मण' अशीही संज्ञा होती, हे महाभारतातील पुढील श्लोकावरून दिसून येते:-

**किमाहुर्भरतश्रेष्ठ विप्राः पात्रं सनातनम् ।**
**लिंगिनं ब्राह्मणं चैव ब्राह्मणं चाप्यलिंगिनम् ।।**
**सद्वृत्तिमन्तं विज्ञाय लिंगिने चेतराय च ।**
**देयमाहुर्महाराज उभावेतौ तपस्विनौ ।।** महाभारत, अनुशासनपर्व, २२.१-२

अर्थात् हे भरतश्रेष्ठा, ब्राह्मण हे सनातन काळापासून दानासाठी पात्र असून त्यांच्यात लिंगिब्राह्मण व अलिंगिब्राह्मण असे दोन भेद आहेत. दोघेही तपस्वी असल्याने त्यांच्यातील जो कोणी लिंगी अथवा अलिंगी सदाचारसंपन्न असेल त्याला दान द्यावे.

ब्रह्मदेवाला सृष्टिनिर्मितीचे ज्ञान देण्यासाठी शिवाने जी सृष्टी निर्माण करून दाखविली तीच शिवसृष्टी होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, २.२५-२७). या शिवसृष्टीत वीर, नंदी, भृंगी, वृषभ व स्कंद हे पाच गणाधीश्वर आणि कालारी, पुरारी, वेदारी, स्मरारी व मखारी हे पाच पंचम म्हणजे गणाधीश्वरांचे शिष्य झाले. गणाधीश्वरांचा जो वंश तो जंगमवंश असून पंचमांचा वंश हा पंचम अर्थात् भक्तवर्ग होय. वीरशैव समाजात जंगमवंशाविषयी अत्यंत आदरभाव बाळगला जातो. कोणताही सण किंवा पर्वकाल असल्यावर जंगमांना घरी अत्यादराने बोलावून त्यांची पादपूजा केली जाते. ही प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कारण जंगमवंशात शिवज्ञानसंपन्न जीवन्मुक्त पुरुष होऊन गेले आहेत. त्यांच्याविषयीचा आदरभाव व्यक्त करण्यासाठीच त्यांच्या वंशजांच्या पूजेची प्रथा चालत आली आहे. आधुनिक काळात सर्वच जंगम शिवज्ञानसंपन्न नसले तरी आपला शुद्ध आचार, विचार व व्यवहार यांमुळे ते वीरशैव समाजात पूज्य मानले जातात.

प्राचीन काळात दोन वेदांचे अध्ययन करणारा तो द्विवेदी, तीन वेदांचे अध्ययन करणारा तो त्रिवेदी व चार वेदांचे अध्ययन करणारा चतुर्वेदी, असे संबोधिले जात असे. कालांतराने कोणतेही अध्ययन न करता देखील ही आडनावे रूढ झालेली दिसतात. वेदाचा गंध नसणाऱ्या मनुष्याचे देखील आडनाव चतुर्वेदी असते. त्याप्रमाणेच आज जंगम हेदेखील एक उपनाम झालेले दिसते. जंगमकुळातील मूळ आचार्यांनी वीरशैवधर्माची स्थापना केली. शिवयोगी शिवाचार्य, श्रीपतिपंडिताराध्य, नीलकंठ शिवाचार्य, मायिदेव, मरितोंटदार्य, शांतलिंगस्वामी, मन्मथस्वामी इत्यादी आचार्यांनी व संतांनी समाजासाठी दार्शनिक व धार्मिक ग्रंथांची रचना केली. समाजाच्या अभिवृद्धीसाठी तपश्चर्या केली, त्याग केला. त्यांच्याकडून समाजावर जे ऋण झाले ते चुकविण्यासाठी त्यांच्या वंशजांची आजही आदरपूर्वक पूजा केली जाते. जंगमेतर कोणीही वीरशैवाने जर

असे कार्य केले आणि आपल्या साधनाबळाने जीवन्मुक्तावस्था प्राप्त करून घेतली तर त्याचाही जंगमांसारखाच आदर केला जातो आणि तो केला पाहिजे.

लिंगामध्ये मंत्रसंस्कार झाल्यानंतर शिव वास्तव्य करतात. परंतु जंगमामध्ये शिवाचे निरंतर वास्तव्य असते. म्हणून जंगमाला चरलिंग (संचार करणारे लिंग) असे म्हणतात. जंगम हे लिंगाचे मुख मानले जाते. जंगमाला भोजन दिल्याने लिंगतृप्ती होते. जंगमाला अर्पण केलेल्या वस्तू लिंगार्पित होतात, याविषयी 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे:-

**शिवयोगिनि संतृप्ते तृप्तो भवति शंकर: ।**
**तत्तृप्त्या तन्मयं विश्वं तृप्तिमेति चराचरम् ।।** ९.९१

अर्थ असा की, शिवयोगी तृप्त झाल्यावर प्रत्यक्ष शंकर तृप्त होतात आणि शंकर तृप्त झाल्यामुळे त्याचेच स्वरूप असलेले समस्त चराचर विश्व तृप्त होते.

शिवज्ञानसंपन्न जीवन्मुक्त जंगमाच्या स्वय, चर व पर अशा तीन अवस्था आहेत. या अवस्थासंपन्न जंगमाला स्वयजंगम, चरजंगम व परजंगम असे म्हणतात.

**स्वयजंगम**

हा स्वत:ला सर्वत्र पाहतो. अर्थात् प्राणिमात्रात आपलेच स्वरूप पाहतो, म्हणून याला 'स्वयजंगम' म्हणतात. हा कोणावर कृपा करीत नाही की कोणाचा द्वेष करीत नाही. याची सर्वांत समत्वदृष्टी असते. हा स्वतंत्र स्वभावाचा असून कोणाच्या अधीन राहात नाही. इष्टलिंगपूजेबरोबर मूलाधार, हृदय व भ्रूमध्य या ठिकाणी प्रकाशमान ज्योतिर्लिंगाची उपासना करतो. शिवध्यान, शिवज्ञान, एकान्तशीलता व भिक्षारत ही याची वैशिष्ट्ये होत (श्रीसिद्धान्तशिखामणी, १५.५२-५६).

**चरजंगम**

स्वरूपज्ञानाच्या आनंदात रममाण होऊन स्वच्छंदपणे विहार करणारा तो चरजंगम होय. कोणत्याही एका निश्चित ठिकाणी हा राहात नाही. शिवाद्वैतज्ञानाने सर्व प्रपंचाला शिवस्वरूप जाणतो. मानापमानात समबुद्धी ठेवतो. लौकिक संपत्तीविषयी नि:स्पृह असतो. सदैव संतुष्ट असतो. संचार करीत असताना दर्शन व शिवज्ञानोपदेश यांच्याद्वारे सामान्यांचा उद्धार करतो. लोकोद्धार हेच त्याच्या

संचाराचे प्रयोजन होय.

चरजंगमाला 'चरपट्टाधिकारी' असेही म्हणतात (वीरशैवसदाचारसंग्रह, १५,२२-३१). प्राचीन काळात वीरशैवांच्या गुरुवर्गी मठात दोन व्यक्तींना पट्टाभिषेक केला जात असे. त्यापैकी एक पट्टाधिकारी असे तर दुसरा चराधिकारी. पट्टाधिकारी मठात राहून तेथे भक्तांना दीक्षासंस्कार करीत आणि चराधिकारी घरोघरी जाऊन भक्तांना वीरशैवसिद्धान्ताचा बोध करीत. ही प्रथा केवळ मठातच नव्हे तर प्रमुख पंचपीठांतही प्राचीन काळापासून चालत आलेली होती. परंतु आधुनिक काळात मात्र सुव्यवस्थेसाठी एकाच व्यक्तीला चर-पट्टाधिकार देण्याची प्रथा रूढ झाली आहे. आता वीरशैव मठाधीश वर्षभर भ्रमंतीही करतात आणि मठात राहून कार्यभारही सांभाळतात. सारांश प्राचीन ग्रंथात चरपट्टाधिकाऱ्यांना चरजंगम म्हटले आहे.

**परजंगम**

पर म्हणजे श्रेष्ठ आणि जंगम म्हणजे जीवन्मुक्त. जीवन्मुक्तांत जो श्रेष्ठ तो 'परजंगम' होय. जीवन्मुक्तीची अवस्था ही अंतिम अवस्था असते. तिला तुर्यावस्था वा परमहंसावस्था असेही म्हणता येईल. 'परं नास्ति' अर्थात् स्वत:पासून कोणी वेगळा नाही असा बोध ज्याच्याठायी दृढ असतो, त्याला परजंगम असे म्हणतात. व्यावहारिक भेदांचाही बोध त्याच्याठायी राहात नाही. तो कोणाला उपदेश करीत नाही, परंतु त्याचे दर्शन घेऊन किंवा त्याला स्पर्श करून मनुष्याचा उद्धार होतो. तो देहधारी असूनही विदेही असतो. त्याचे भोजनादी शरीर-व्यवहारदेखील तो विदेही असल्यामुळे इतरांच्या मदतीने केले जातात. त्याच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले पाणी सामान्य लोकांसाठी तीर्थ होते तर त्याच्या वास्तव्यामुळे त्याचे निवासस्थान पवित्र क्षेत्र होते.

जंगम शब्दाच्या या चर्चेतून हे सिद्ध होते की वीरमाहेश्वरवंशोत्पन्न, शिवज्ञानसंपन्न, स्वय-चर-पर अवस्थायुक्त, चर-पट्टाभिषिक्त असा गुरुवर्गी मठात जो जीवन्मुक्त महापुरुष आहे तोच जंगम होय. तो सर्वत्र संचार करीत भक्तांना शिवज्ञानाचा उपदेश देतो, कामक्रोधादी षड्रिपूंपासून त्यांचे रक्षण करतो म्हणून त्याला आवरण मानले जाते. माहेश्वरवंशीय, चरपट्टाधिकारी व शिवज्ञानयुक्त

असा जंगम शब्दाचा तात्त्विक अर्थ असला तरीदेखील जंगमकुळातील सर्वसाधारण व्यक्तीचाही वीरशैव समाजात आदर केला जातो.

## ४. पादोदक

'पादयोरुदकं पादोदकम्' या विग्रहानुसार पादतीर्थ अथवा चरणामृताला पादोदक असे म्हणतात. वीरशैव पूजापद्धतीमध्ये गुरू, लिंग व जंगम यांची पादपूजा करून प्राप्त झालेल्या पादोदकाला गुरुपादोदक, लिंगपादोदक व जंगमपादोदक अशा संज्ञा आहेत. या त्रिविध पादोदकाचे भक्तिपूर्वक सेवन केल्यावर मनोमालिन्य दूर होऊन कर्म व जन्म दग्ध होतात.

**पाकार: परमं ज्ञानं दोकारो दोषनाशन: ।**
**दकारो जन्म दहति ककार: कर्मनाशन: ।।** वीरशैवानंदचंद्रिका, पृ. ११५

'शिवरहस्या'त पादोदकाचा अक्षरार्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे:-

पा = परमज्ञानदायक, दो = दोषनाशक, द = जन्मदाहक, क = कर्मनाशक असे तीर्थ म्हणजे पादोदक.

विशिष्ट पूजाविधीतून पवित्र पादोदक सिद्ध होते. केवळ पाय धुतलेले पाणी पादोदक होत नाही. गुरू किंवा जंगम यांची पादपूजा करताना त्यांच्या अंगठ्यात रुद्र, तर्जनीत शंकर, मध्यमेत महादेव, अनामिकेत त्र्यंबक, कनिष्ठिकेत ईशान, पायाच्या वरच्या भागात कपर्दिक, पायाच्या तळव्यात सदाशिव, घोट्यात (गुल्फ) रुद्र व भर्ग याप्रकारे पायाच्या विविध भागांत शिवाच्या अनेक मूर्तींची भावना करावी. कनिष्ठिकेपासून अंगठ्यापर्यंत बोटांनी नकारापासून यकारापर्यंत (न म शि वा य) पाच अक्षरांचा संबंध करावा. नंतर भस्म, गंध इत्यादींनी पादपूजा करावी. विधियुक्त पूजा संपल्यावर दोन्ही पायांच्या अंगठ्यांवर जलाचा अभिषेक करून पायाखाली एका भांड्यात ते एकत्र करावे. याप्रकारे विधियुक्त पादोदक सिद्ध होते (पारमेश्वरतंत्र, ७.४७-५०).

वीरशैवाने प्रतिदिन गुरुपादोदक, लिंगपादोदक, जंगमपादोदक यांचे सेवन केले पाहिजे. गुरू व जंगम उपलब्ध नसतील तर इष्टलिंगावरच तीन वेळा जल घालून गुरुपादोदक, लिंगपादोदक व जंगमपादोदक अशा भावनेने ते सेवन करावे.

गुरुपादोदक सेवन करताना जंगमपादोदकाची व जंगमपादोदक सेवन करताना गुरुपादोदकाची भावना करावी. गुरू किंवा जंगम यांच्या पादपूजेत सहभागी झालेल्या सर्व भक्त-माहेश्वरांनी साष्टांग नमस्कार करून तळहातावरील इष्टलिंगावर तीन वेळा पादोदक घालून त्याचे सेवन करावे. पादपूजेत सहभागी झालेले सर्व भक्त क्रमाक्रमाने पादोदकाचे सेवन करतात. यावेळी उच्छिष्टसूतक पाळले जात नाही. याविषयी संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी म्हणतात:-

**तीर्थ भेद धरिता घडे दोष । प्रसाद उच्छिष्ट म्हणता पाप विशेष ।**
**तीर्थभेद जाणे तो महेश । वीरशैव तो जाणिजे ।।** २.६

(श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती शोधप्रतिष्ठान, वाराणसी)

'चंद्रज्ञानागमा'त गुरू व जंगम यांच्या पादोदकाची महिमा अशी वर्णिली आहे. पादोदक हे पापरूपी पंकाचे शोषक असून ज्ञानज्योतीचे प्रकाशक आहे. पादोदक असे विलक्षण आहे की ते घेतल्यावर संसारवृक्ष उन्मळून पडतो. सप्तसागरांपर्यंत सर्व तीर्थांत स्नान केल्याने जे फळ मिळते ते गुरुपादोदकतीर्थाने मिळणाऱ्या फलाच्या एकसहस्रांशाइतकेही नसते. जंगमपादोदकाची महिमा वर्णन करणे तर अशक्य आहे. त्याच्या स्पर्शाने चराचर अशा सर्वांनाच मुक्ती मिळते (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ५.१६-१८, १९).

आतापर्यंत पादोदकाच्या स्थूल स्वरूपाचे विवेचन केले. यानंतर त्याच्या सूक्ष्म स्वरूपाचे विवेचन करावयाचे आहे. पाद याचा अर्थ परमानंद व उदक याचा अर्थ ज्ञान असा आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी. १९.८). आपल्या आत्म्याचे व परमात्म्याचे आनंदस्वरूपज्ञान हेच पादोदक होय. हा तात्त्विक अर्थ होय. पादोदक दीक्षा, शिक्षा व ज्ञान असे त्रिविध आहे.

### त्रिविध पादोदक

पाद म्हणजे गुरू व उदक म्हणजे शिष्य. वेधदीक्षेद्वारा या दोन्हींचा ऐक्यबोध होणे हेच दीक्षापादोदक होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, १९.७). दीक्षादी संस्कारांनी आणि तत्त्वज्ञानोपदेशाने अज्ञानादी मलांचे निवारण होऊन शिष्य हा गुरुतुल्य होतो. गुरूला ज्या परशिवस्वरूपाच्या आनंदाचा अनुभव येतो तोच अनुभव शिष्यालाही येतो. दीक्षेमुळे द्वैत दूर झाल्यावर गुरु-शिष्याची ऐक्यस्थिती होते.

परशिवाचा अनुभवानंद दोघांनाही लाभतो. ज्याला दीक्षापादोदक प्राप्त झाले असा साधक भवरोगापासून मुक्त होऊन आपल्या आत्मस्वरूपात रममाण होतो.

श्रीगुरूने उपदेशिलेले परशिवब्रह्मानंदाचे ज्ञान जेव्हा मननप्रक्रियेने दृढ होते तेव्हा त्याला 'शिक्षापादोदक' म्हणतात (श्रीसिद्धान्तशिखामणी, १९.१२). मननप्रक्रियेने प्राप्त झालेल्या ज्ञानाची निदिध्यासाने जेव्हा निरंतर अनुभूती येते तेव्हा त्याला 'ज्ञानपादोदक' म्हणतात. दीक्षा, शिक्षा व ज्ञान ही पादोदके आत्मानुभवरूपी असून त्यांच्या प्राप्तीचे साधन बाह्य पादोदक होय.

प्रत्येक माणसाच्या ठायी अहंकार विद्यमान असतो. ईश्वर भक्त यांच्यामध्ये अहंकार एखाद्या पहाडासारखा उभा असतो. जन्मजन्मांतरापासून जीवात्म्याच्या ठिकाणी साचलेला हा अहंकार तो जेव्हा गुरूसमोर नतमस्तक होतो तेव्हा हळूहळू कमी होऊ लागतो. एकांग, त्र्यंग, पंचांग व अष्टांग[1] असे चढत्या श्रेणीचे नमस्कार जेव्हा शिष्याकडून घडतात तेव्हा अहंकाराचे निवारण झाले आहे असे समजावे. परंतु खऱ्या अर्थाने मनात कोणताही भेद न ठेवता गुरूचे पादोदक जेव्हा शिष्य परमादराने सेवन करतो तेव्हाच त्याचा अहंकार गळून पडतो. अहंकारशून्यतेसाठी पादोदकाचे सेवन अत्यंत आवश्यक व फलप्रद आहे. अहंकारशून्य झाल्याशिवाय लिंगांगसामरस्याची प्राप्ती होत नाही. पादोदकसेवनात ज्याची श्रद्धा अधिक प्रगाढ आहे त्याला त्याचे अधिक फळ मिळते. नियमित जलसिंचन केल्याने वृक्ष ज्याप्रमाणे वाढत जातो, फळत जातो, त्याप्रमाणे नित्य पादोदकसेवनाने भक्तिवृक्ष वृद्धिंगत होऊन मुक्तिफळ प्राप्त होते. पादोदक सर्व मंगलांत मंगल, सर्वपातकनाशक, सर्वसिद्धिदायक आहे.

पादोदकात हे सामर्थ्य कुठून आले? तर ज्यांनी शास्त्रविहित मार्गाने आपले सबंध जीवन व्यतीत केले आहे अशा महात्म्याचे पाद, हस्त, वाणी, नेत्र, किंबहुना सर्वच अवयवांत तपःशक्ती ओतप्रोत भरलेली असते. मधुर रसाने ओथंबलेल्या द्राक्षासारखे त्यांचे संपूर्ण शरीर तपःसामर्थ्याने ओथंबलेले असते.

---

१. **एकांग नमस्कार**– केवळ मस्तक झुकविणे. **त्र्यंग नमस्कार**– दोन हात जोडून मस्तक झुकविणे. **पंचांग नमस्कार**– दोन्ही हात जोडून, दोन गुडघे टेकवून मस्तक झुकविणे. **साष्टांग नमस्कार**– दोन हात, दोन पाय, वक्षस्थळ, पोट, मस्तक जमिनीला टेकवून मन नम्र करणे.

त्यांच्या स्पर्शाने व दृष्टिपाताने पतित लोक पुनीत होतात. त्यांच्या आशीर्वचनातून संसारतप्त जीवांवर अमृतवर्षाव होतो. त्यांच्या वाक्सिद्धीमुळे न घडणारी घटना घडते. त्यांच्या पदस्पर्शाने लाकडी खडावादेखील पूजनीय ठरतात. मग त्यांच्या स्पर्शाने जल पवित्र होईल यात काय आश्चर्य? सदाचारसंपन्न गुरू व जंगम यांच्या पादोदकाचे सेवन केल्याने केवळ स्वत:चाच नव्हे तर मागील दहा पिढ्यांचा आणि पुढील दहा पिढ्यांचा उद्धार होतो (वीरशैवानंदचंद्रिका, पृ. ११३). शास्त्रविहित वाटेवरच ज्यांची पावले सदैव पडतात ती पावले पवित्र होत. शिष्य जेव्हा सद्‌गदित होऊन श्रीगुरूचे चरणसंवाहन करून पादपूजा करतो तेव्हा श्रीगुरू द्रवित होतात आणि त्यांची करुणा त्यांच्या पायांच्या अंगठ्यांद्वारे पादतीर्थात मिसळते. वासराने गाईच्या स्तनाला मुख लावताच तिला पान्हा फुटतो त्याप्रमाणे. म्हणून पादतीर्थाला 'करुणाजल' असेही म्हणतात. क्रियापादोदक व ज्ञानपादोदक यांच्या सेवनामुळे साधकाचा देह व मन दोन्ही पवित्र होऊन दुर्मार्गात त्याची प्रवृत्ती होत नाही.

जननमरणरूपी संसाराचे दहन करून परमज्ञानाची प्राप्ती होते व शिवभक्ताचे सदैव रक्षण होते, म्हणून पादोदक हे आवरण अर्थात् रक्षाकवच होय. पादोदका-विषयी संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी 'परमरहस्या'त म्हणतात:-

**सागरीचे जल । सृष्टीचे तीर्थ सकळ ।**
**परि गुरुतीर्थ थेंबाचे फळ । सहस्रांशे अधिक ।।**
**गुरुतीर्थाची बिंदाची सरी । काशी न पवे कोटीवरी ।**
**मा इतर तीर्थाची थोरी । पादतीर्थापुढे न ये ।।**
**काशी मेलिया मुक्ती देत । विश्वासे सेविता गुरुतीर्थ ।**
**तरी साक्षात्कारे पावे मुक्त । न मरताचि ।।**
**गंगातीर्थी एक अवगुण । खोलिये जाता जाय बुडोन ।**
**गुरुतीर्थ न बुडविता तारण । करी भावे सेविता ।।** प.र., शैवभारती, २.१७-२०

पृथ्वीवरील सर्व पुण्यप्रद तीर्थे पादोदकात समाविष्ट आहेत. पादोदकाच्या सेवनाने अनेक रोगांचे निवारण होते. अनेक पातकांचा आणि उपपातकांचा नाश होतो. जो पादोदकाचे पान करतो त्याला पुन्हा मातेचे स्तन्यपान करावे लागत नाही, अर्थात् त्याला पुनर्जन्म नाही (वीरशैवानंदचंद्रिका, पृ. ११०-११५).

# ५. प्रसाद

'नैर्मल्यं मनसो लिंगं प्रसाद इति कथ्यते' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ११.६) या उक्तीप्रमाणे मनाची प्रसन्नता हाच प्रसाद होय. अन्नाचा सूक्ष्म परिणाम म्हणजे मन. 'अन्नमयं हि सोम्य मन:' (छांदोग्योपनिषद, ६.५-४). अन्न खाल्ल्यानंतर त्याचे तीन भागांत रूपांतर होते. अन्नापासून रक्त, मांस, मज्जा, शुक्र, शोणित इत्यादी तयार होतात, त्यांना 'स्थविष्ठ' म्हणतात. अन्नाच्या काही भागाची विष्ठा होते त्याला 'पुरिष्ठ' म्हणतात आणि अन्नापासून सूक्ष्म असे जे मन तयार होते त्याला 'अनुष्ठ' असे नाव आहे. शुद्ध सात्त्विक अन्नाचे सेवन केले तरच मन सात्त्विक होते. दूषित अन्न खाल्ले तर मनही दूषित होते. शिवाला अर्पण केलेल्या पदार्थांना शिवनिर्माल्य अर्थात् प्रसाद म्हणतात. त्याचे सेवन केल्यावर मन अत्यंत निर्मल होते. शिवाच्या अनुग्रहाला म्हणजे शिवकृपेला देखील प्रसाद अशी संज्ञा आहे. याप्रमाणे मनाची निर्मलता आणि शिवाची कृपा यांना 'प्रसाद' म्हटले जाते.

आहारशुद्धीमुळे सत्त्वशुद्धी (मन:शुद्धी) होते. सत्त्वशुद्धीमुळे दृढ स्मृती प्राप्त होते आणि दृढस्मृतीमुळे अविद्यारूपी हृदयग्रंथी मोकळ्या होतात. मन:शुद्धीला कारणीभूत असलेली अन्नशुद्धी कशी होते? तर उत्तम व्यवहाराने अर्थार्जन करून मिळविलेले अन्न शिवार्पित केल्यावर ते अन्न शुद्ध होते.

आहार याचा अर्थ केवळ अन्न नसून 'आह्रियते यत्ताद् आहार:'- अर्थात् जे बाहेरून आत घेतले जाते, आहरण केले जाते त्याला आहार म्हणतात. या व्युत्पत्तीनुसार शब्द, स्पर्श इत्यादी पंचविषयांना देखील आहार असे म्हटले जाते. पंचविषय हे पंचेंद्रियांचे आहारच होत. मन देहाच्या आत बसून बाहेरचे शब्दादी पंचविषय ज्ञानेंद्रियांद्वारे आत घेत असते. जसे दूषित अन्नसेवनामुळे मन दूषित होते तसे शिवार्पित न केलेल्या शब्दस्पर्शादी विषयांच्या उपभोगाने मन मोहित होऊन जीवाची भोगलोलुपता वाढीस लागते व तो पुन:पुन्हा संसारचक्रात भ्रमत राहतो. महाभारतातील ययाती म्हणतो:-

> **न जातु काम: कामानामुपभोगेन शाम्यति।**
> **हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते।।** महाभारत, आदिपर्व, ८५.१२

ज्याप्रमाणे हविर्द्रव्ये अर्पण केल्यावर अग्नी अधिकच वर्धमान होतो त्याप्रमाणे कामोपभोगाने कामाग्नी वाढतच जातो. त्याचे शमन होत नाही. म्हणून भर्तृहरीने 'भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः'– भोगांचा उपभोग आम्ही घेत नाही तर भोगच आमचा उपभोग घेतात (वैराग्यशतक, ७), असे म्हटले आहे. या वचनाप्रमाणे अनेक लोक विषयांचा उपभोग घेत मृत्युमुखी पडले आहेत, पडत आहेत.

विषय हे विषरूप असले तरी त्यांच्या उपभोगापासून मनुष्याची सुटका नाही. डोळ्यांनी पाहावे लागते, कानाने ऐकावे लागते, जिव्हेने रस चाखावे लागतात, नाकाने गंध हुंगावे लागतात आणि त्वचेने स्पर्श अनुभवावाच लागतो. मग या विषयांतील विष मनुष्यास बाधणारच. या विषाची निवृत्ती कशी होणार? परंतु उपभोग घेण्याआधी जर विषय शिवार्पित केले तर त्यांच्यातील दोष दूर होऊन ते प्रसादरूप होतात. शब्द हा विषय शब्दप्रसाद, स्पर्श हा स्पर्शप्रसाद, रूप हा रूपप्रसाद, रस हा रसप्रसाद आणि गंध हा गंधप्रसाद होतो. या प्रकारे विषयांचे प्रसादात रूपांतर झाल्यामुळे ते बाधक ठरत नाहीत. प्रत्यक्ष विषदेखील प्रसादरूप झाल्याने संत मीराबाईला बाधले नाही, असे इतिहासात नमूद आहे.

म्हणून वीरशैवसिद्धान्तात पंचविषयांना प्रसादरूप करण्यासाठी ते विषय ग्रहण करणाऱ्या पंचेंद्रियांच्या ठिकाणी पाच लिंगांचे अधिष्ठान मानले आहे. त्यानुसार पंचज्ञानेंद्रियांच्या ठिकाणी क्रमशः श्रवणेंद्रियात प्रसादलिंग, त्वगेंद्रियात चरलिंग (जंगमलिंग), नेत्रेंद्रियात शिवलिंग, रसनेंद्रियात गुरुलिंग आणि घ्राणेंद्रियात आचारलिंग या लिंगांचे अधिष्ठान असते. याचप्रमाणे कर्मेंद्रियांच्या ठिकाणी क्रमशः वागिंद्रियात (वाणी) प्रसादलिंग, पाणींद्रियात (हस्त) चरलिंग, पादेंद्रियात (पाय) शिवलिंग, पायु-इंद्रियात (जननेंद्रिय) गुरुलिंग आणि उपस्थेंद्रियात (गुदस्थल) आचारलिंग या लिंगांचे अधिष्ठान असते. सर्व इंद्रियांचा स्वामी जे मन त्याच्या ठिकाणी महालिंगाचे अधिष्ठान असते.

याप्रमाणे पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये व मन अशा अकरा इंद्रियांत सहा लिंगांचे अधिष्ठान मानले आहे. म्हणून वीरशैव साधकाला 'सर्वांगलिंगी' असे म्हटले जाते (अनुभवसूत्र, ६.२,५-८). असा सर्वांगलिंगी साधक विषय सेवन करण्याआधी त्या त्या इंद्रियात अधिष्ठित असलेल्या लिंगांना विषय अर्पण करून त्यांचे प्रसाद म्हणून सेवन करतो. या अर्पणक्रियेमुळे शब्द हा विषय शब्दप्रसाद

होतो. त्याचप्रकारे इतर विषयदेखील प्रसादरूप पावतात. सर्व इंद्रियांपासून मिळणारे सुख हा मनाचा विषय असून तो महालिंगाला अर्पण केल्यावर तृप्तिप्रसाद मिळतो. त्यामुळे साधक संतृप्त होतो.

म्हणून सर्व हितकारक उपभोग्य पदार्थ प्रथम शिवाला अर्पण करून नंतर सेवन करावेत. त्यामुळे चित्तशुद्धी होते. शिव हा जन्ममरणरूप रोगाचे निवारण करणारा वैद्य असून त्याला अर्पिलेल्या पदार्थांचे सेवन करणे म्हणजे जन्ममरणरूप रोगनिवारणासाठी रसायन सेवन करणे होय.

उपभोग्य पदार्थ भोग्य व धार्य असे दोन प्रकारचे असतात. अन्न, जल इत्यादी भोग्य पदार्थ व वस्त्रालंकार इत्यादी धार्य (धारण करण्यायोग्य) पदार्थ होत. प्रत्येक वीरशैवाने आपल्या भोग्य व धार्य वस्तूंना शिवार्पित करून नंतरच प्रसाद म्हणून त्यांचा उपभोग घ्यावा, असे वीरशैवसिद्धान्तात सांगितले आहे (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ५.२४).

पदार्थ आणि प्रसाद यांच्यामध्ये फरक आहे. जो पदार्थांचा संग्रह करतो त्याच्या मनात पदार्थांविषयी ममत्व असते. जेव्हा ते पदार्थ शिवार्पित होतात तेव्हा त्यामधील ममत्व नाहीसे होऊन 'हे पदार्थ शिवाचे, आपले नव्हेत' अशी भावना निर्माण होते. त्यावेळी तो प्रसाद होतो. एखादा मनुष्य देवाच्या नैवेद्यासाठी फळे किंवा काही पदार्थ घेऊन मंदिराकडे जात असताना जर कोणी त्याला विचारले, 'हे काय आहे आणि कोणाचे आहे?' तर तो उत्तर देतो, 'ही फळे आहेत आणि ती माझी आहेत.' नैवेद्य दाखवून परत येताना जर त्याला वरील प्रश्न विचारले तर तो उत्तर देतो की, 'हा प्रसाद आहे आणि हा शिवाचा आहे.' शिवार्पित होण्याआधी पदार्थांची केळी, नारळ, साखर इत्यादी वेगवेगळी नावे असतात, परंतु शिवार्पण केल्यानंतर मात्र त्या सर्व पदार्थांना फक्त 'प्रसाद' असेच संबोधिले जाते. पदार्थ स्वार्थी वृत्तीने मनुष्य एकटाच खातो, परंतु प्रसाद मात्र सर्वांना वाटून खातो.

प्रसाद हा आरोग्यदायक आहे. कारण प्रसाद थोडा मिळाला तरीही मनुष्य संतुष्ट होतो, पदार्थ कितीही मिळाला तरी त्याची तृप्ती होत नाही. अतृप्ती व असंतुष्टी ही अनारोग्याचे कारण होय. मानसिक असमाधान आजच्या काळात फार वाढले आहे. त्याचे कारण सर्व लोक पदार्थभोगी झाले आहेत. प्रसादभोगी

कोणी होत नाही. प्रसादामुळे अंत:करण शुद्ध होते. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक हा तापत्रयरूप महारोग नष्ट होतो. त्यामुळे उत्तम विद्या वृद्धिंगत होते. वैराग्य प्राप्त होऊन ब्रह्मानंदाची वृद्धी होते.

सर्व उपभोग्य पदार्थ शिवार्पित करून त्यांचा प्रसाद म्हणून स्वीकार करावा. त्यामुळे स्वार्थ क्षीण होऊन 'वसुधैव कुटुंबकम्' अशी विशाल भावना बळावते. माणसाचे अंत:करण विशाल होते. त्याच्या मनातील द्वेष, घृणा इत्यादी जळमटे दूर होऊन सुसंस्कृत नागरिक म्हणून जगण्यास तो पात्र ठरतो.

**शिवनिर्माल्य**

शिवार्पित केलेले सर्व पदार्थ म्हणजे शिवनिर्माल्य. निर्माल्याचे देवस्व, देवद्रव्य, नैवेद्य, निवेदित, चंडद्रव्य व बहि:क्षिप्त असे सहा प्रकार आहेत. देवाला अर्पण केलेले गाव, भूमी, दास, दासी म्हणजे देवस्व. देवाला अर्पिलेले सोने, चांदी, रत्ने म्हणजे देवद्रव्य. संकल्पपूर्वक देवाला अर्पण केलेले अन्न, जल, पुष्प, फल म्हणजे नैवेद्य. देवाला दाखविलेले अन्न, जल, पुष्प, फल म्हणजे निवेदित. स्थावरलिंगाला अर्पण केलेल्या द्रव्य, अन्न इत्यादी पदार्थावर चंडेश गणाचा अधिकार असल्यामुळे ते चंडद्रव्य आणि भूतपिशाच्चासाठी बाहेर फेकलेले अन्न, द्रव्य म्हणजे बहि:क्षिप्त होय. यांपैकी देवस्व, देवद्रव्य, नैवेद्य हे शिवासाठीच असल्यामुळे ही निर्माल्ये स्वीकारण्याचा इतरांना अधिकार नाही. चंडद्रव्यावर चंडेशाचा व बहि:क्षिप्तावर भूतपिशाच्चांचा अधिकार असल्यामुळे ही दोन निर्माल्ये इतरांना ग्राह्य नाहीत. उर्वरीत निर्माल्य म्हणजे हे निवेदित हे सर्व दोषांचे हरण करणारे असून मुमुक्षू शिवभक्तांना स्वीकरणीय आहे. ते स्वीकारल्यामुळे त्यांना कोणताही दोष लागत नाही. परंतु जे शिवसंस्काररहित, भक्तिशून्य व जिव्हालोलुप आहेत अशांनी मात्र निवेदित निर्माल्य स्वीकारू नये. ते स्वीकारल्यास त्यांना दोष लागतो (ईशावास्योपनिषद, शांकरीव्याख्या, १.६).

स्थावरलिंगावर श्रद्धा ठेवणाऱ्या शिवभक्तांना केवळ निवेदित निर्माल्य स्वीकारण्याचाच अधिकार आहे. परंतु इष्टलिंगधारक वीरशैवांना मात्र इष्टलिंगाला जे जे अर्पण केले जाईल ते ते सर्व श्रद्धापूर्वक स्वीकारण्याचा अधिकार आहे. येथे निर्माल्यभेदाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वीरशैवांना गुरू, लिंग व जंगम ही

तीन आराध्ये असून या तिघांना प्रथम अर्पण करून त्यांचा प्रसाद म्हणून स्वीकार केला जातो. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे:-

**तस्माद् गुरुं महादेवं शिवयोगिनमेव च।**
**पूजयेत् तत्प्रसादान्नं भुंजीयात् प्रतिवासरम्।।** ९.७९

याचा अर्थ असा की, गुरू, महादेव (लिंग) व शिवयोगी (लिंग) या तिघांना समान मानून त्यांची भक्तिपूर्वक पूजा करावी आणि त्यांच्या प्रसादरूपी अन्नाचे सेवन करावे.

## त्रिविध प्रसाद

गुरू, लिंग व जंगम यांना अर्पण करून प्राप्त झालेला प्रसाद हा शुद्धप्रसाद, सिद्धप्रसाद व प्रसिद्धप्रसाद असा त्रिविध असतो. गुरूकडून प्राप्त झालेला शुद्धप्रसाद, लिंगाकडून प्राप्त झालेला सिद्धप्रसाद आणि जंगमाकडून प्राप्त झालेला प्रसिद्धप्रसाद होय. मायिदेवांनी इष्टलिंगार्पित प्रसाद हा शुद्धप्रसाद, प्राणलिंगार्पित प्रसाद हा सिद्धप्रसाद आणि भावलिंगार्पित प्रसाद हा प्रसिद्धप्रसाद होय, असे म्हटले आहे (अनुभवसूत्र, ७.२२).

गुरू व जंगम यांच्या भोजनानंतर अवशिष्ट जो प्रसाद असतो तो यज्ञात प्राप्त झालेल्या पुरोडाशाप्रमाणे पवित्र व ग्राह्य आहे (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ५.३४,३६), असे शास्त्रवचन असल्यामुळे पादोदकसेवनात जसा उच्छिष्ट दोष लागत नाही त्याप्रमाणे येथेही उच्छिष्टदोष लागत नाही.

अशाप्रकारे प्रसाद हा मनाला प्रसन्नता देणारा, शिवानुग्रह प्राप्त करून देणारा आणि शिवसायुज्य प्रदान करणारा आहे. त्याचे माहात्म्य शास्त्रात अनेक प्रकारे वर्णिलेले आहे. प्रसाद हा जनक, भक्ती ही जननी व मुक्ती ही कन्या आहे (वीरशैवचिंतामणी, पृ. ११४), म्हणजे भक्तिपूर्वक प्रसादसेवन केल्यावर सायुज्यमुक्ती सहज प्राप्त होते. म्हणून वीरशैवांनी गुरू, लिंग व जंगम यांना उपभोग्य वस्तू अर्पण करून त्यांचे प्रसादरूपाने श्रद्धापूर्वक सेवन करावे.

त्रिविध प्रसादसेवनाने आधी (मानसिक व्यथा) व व्याधी (शारीरिक व्यथा) यांचा नाश होतो आणि मन शुद्ध होते. मन सदैव प्रसन्न ठेवून साधकाचे रक्षण करतो, म्हणून प्रसाद हे रक्षाकवचरूपी आवरण होय.

## ६. भस्म

भस्म शिवाला अत्यंत प्रिय असून सर्वांग भस्मलेपनामुळे त्याला 'कर्पूरगौर' असे म्हटले जाते. भस्माचे माहात्म्य पुढीलप्रमाणे सांगितले जाते.

**धिक् भस्मरहितं फालं धिक् ग्रामं अशिवालयम्।** क्रियासार, भाग २, पृ. ८४

अर्थात् ज्या कपाळावर भस्म नाही आणि ज्या गावात शिवालय नाही त्याचा धिक्कार असो.

परशिवप्रकाश व गोमयनिर्मित विभूती यांना 'भस्म' अशी संज्ञा आहे. 'स एष भस्मज्योतिः (बृहज्जाबाल, ७.२), 'भस्मज्योतिसमाम्नातम्' (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ६.६४), 'भस्मेदं शांभवं ज्योतिः' (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ६.६६) इत्यादी निगमागमांच्या वचनानुसार परशिवप्रकाश हाच भस्म शब्दाचा तात्त्विक अर्थ आहे. परशिव स्वयं ज्योतिस्वरूप आहे. त्याच्याच प्रकाशाने समस्त विश्व प्रकाशित झाले आहे (मुंडकोपनिषद, २.२.१० व श्रीसिद्धान्तशिखामणी, १.१४).

शिव विश्वव्यापक व विश्वप्रकाशक असूनही त्याचे सहज प्रकटस्थान मनुष्याचे हृदय हेच होय. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हटले आहे:-

**समस्त जगदात्माऽपि शंकरः परमेश्वरः ।**
**भक्तानां हृदयां भोजे विशेषेन विराजते ।।** १०.७१

सर्व जगाचा आत्मा असलेला शंकर भक्ताच्या हृदयात विशेषत्वाने राहतो.

गीतेतदेखील 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' (गीता, १८.६१) असे म्हटले आहे. चंद्रकांत मण्यात जल, सूर्यकांत मण्यात अग्नी व बीजात अंकुर स्वाभाविकपणे असतो, त्याप्रमाणे सर्व जीवांचे नियमन करणारा यंत्रचालकासारखा शिव प्रत्येक प्राण्याच्या हृदयात राहतो.

हृदयस्थ परशिवाचे ज्ञान नसल्यामुळे जीवात्मे संसारचक्रात परिभ्रमत असतात. या अनर्थाच्या निवारणासाठी आत्मज्योतीचे ध्यान करणे आवश्यक आहे. चिद्रूप परशिव म्हणजे भस्म आणि त्या चिद्रूपाचे सतत चिंतन करणे म्हणजे अंतरंग भस्मधारण होय. या अंतरंग भस्मधारणालाच 'निरुपाधिक भस्मधारण' असे नाव असून हेच श्रेष्ठ भस्मधारण होय. या भस्मधारणामुळे शिवसायुज्याची प्राप्ती होऊन जीवाचे पुनरागमन होत नाही.

आरुणी, श्वेतकेतू, दुर्वास, ऋभू, निदाघ, जडभरत, दत्तात्रेय, रैवतक, भुशुंड इत्यादी परमहंसांनी निरुपाधिक भस्मधारणाने मुक्ती प्राप्त करून घेतली (बृहज्जाबाल, ७.२). 'शिवमहापुराणा'त महर्षी व्यासांनी निरुपाधिक भस्माला 'महाभस्म' असे म्हटले आहे (विद्येश्वर खंड, २४.२). अशाप्रकारे महाभस्म, निरुपाधिक भस्म, चिद्भस्म, भस्मज्योती इत्यादी परशिवप्रकाशाची पर्यायी नामे आहेत.

## सोपाधिक भस्म

लोकव्यवहारात गोमयनिर्मित विभूतीला 'भस्म' म्हणतात. त्याच्या धारणाने शारीरिक व मानसिक दोषांचा नाश होऊन परशिवज्ञानाचा अधिकार प्राप्त होतो. यालाच 'सोपाधिक भस्म' असे म्हणतात. अल्पभस्म हे याचे पर्यायनाम होय.

शिवाला सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान अशी पाच मुखे आहेत. पंचमुखी शिवाला सदाशिव असे नाव आहे. सदाशिवाच्या पंचमुखांतूनच चराचरसृष्टी उत्पन्न झाली. ही पंचमुखे क्रमशः पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर व ऊर्ध्व या दिशांची मानली जातात. या शिवाच्या पाच शक्ती होत. पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही पंचमहाभूते; निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती व शांत्यतीता या पाच कला; नंदा, भद्रा, सुरभी, सुशीला व सुमना या पाच दिव्य गाई हे सर्व शिवाच्या पंचमुखांतूनच उत्पन्न झाले आहेत. वरील पाच गाईंच्या गोमयापासून तयार केलेले भस्म सोपाधिक भस्म असून गाईंच्या भेदांमुळे त्याचे विभूती, भसित, भस्म, क्षार व रक्षा असे पाच भेद होतात. उत्पत्तीमुळे, धारण केल्यावर मिळणाऱ्या फलांमुळे व धारणविधीमुळे हे पाच भेद झाले आहेत.

## विभूती

सदाशिवाचे पूर्वदिशेकडे असलेले मुख सद्योजात होय. 'सद्यः जातः सद्योजातः' या व्युत्पत्तीनुसार आर्त भक्तांच्या रक्षणार्थ तत्काळ अवतार घेतो म्हणून शिवाला 'सद्योजात' असे म्हणतात. सृष्टीच्या आरंभी या मुखापासून कपिल वर्णाची नंदा नामक गाय उत्पन्न झाली. 'नंदयतीति नंदा' म्हणजे अनेक उपकार करून जी लोकांना आनंद देते ती नंदा होय. आजच्या काळातील कपिल वर्णाची गाय ह्या नंदेची संतती मानली जाते. नंदेच्या शेणापासून शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेल्या भस्माला 'विभूती' असे म्हणतात. विधिपूर्वक श्रद्धेने विभूती धारण केल्यास भूती

म्हणजे ऐश्वर्याची प्राप्ती होते, म्हणून याला 'विभूती' असे नाव आहे (श्रीसिद्धान्त-शिखामणी, ७.५). लौकिक व पारलौकिक असे ऐश्वर्याचे दोन प्रकार असून धन, धान्य व अणिमा इत्यादी अष्टसिद्धी हे लौकिक ऐश्वर्य असून आत्मस्वरूपाचे ज्ञान हे पारलौकिक ऐश्वर्य होय. गाईच्या भिन्न अवयवांत अनेक देवतांचा निवास असतो. गोमयात लक्ष्मीचा निवास असतो म्हणून तिच्या गोमयापासून निर्माण झालेली विभूती धारण करणाऱ्यावर लक्ष्मीची कृपा होऊन ऐश्वर्यप्राप्ती होते. विभूती धारण केल्याने प्राचीन काळात अनेक महर्षींना अणिमादी अष्टैश्वर्य सिद्धी प्राप्त झाली, असे ग्रंथात उल्लेख आढळतात (क्रियासार, भाग दोन, पृ. १३०-१३१).

ज्याप्रमाणे भांड्याला बाहेरून अग्नी दिल्यावर आतील अग्नी शिजते त्याप्रमाणे बाह्य शरीरावर विभूती धारण केल्यामुळे शरीरात राहणारे मन आत्मज्ञानप्राप्तीला पात्र होते. म्हणून आत्मज्ञानरूपी पारलौकिक ऐश्वर्याला विभूती कारणीभूत होते.

'धारयेन् नित्य कार्येषु विभूतिं च प्रयत्नत:' या आचार्योक्तीनुसार नित्य कर्मे करताना विभूतीचे धारण केले पाहिजे. इष्टलिंगपूजा, पंचाक्षरमहामंत्रजप, श्रीरुद्रपारायण, शिवागमशास्त्राध्ययन, प्राणलिंग-भावलिंगाचे ध्यान ही वीरशैवांची नित्यकर्मे होत. यावेळी विभूती धारण अवश्य करावी, अन्यथा नित्यकर्मे अपूर्ण मानली जातात.

**भसित**

सदाशिवाचे दक्षिण दिशेकडे असलेले मुख वामदेव मुख होय. 'वामश्चासौ देवश्च वामदेव:' या विग्रहानुसार शिवाचे स्वरूप अत्यंत सुंदर आहे, म्हणून त्याला वामदेव म्हणतात. या मुखातून सृष्टीच्या आरंभी कृष्णवर्णाची भद्रा नामक गाय उत्पन्न झाली. 'भद्रं कल्याणं मंगलं शुभम्' (अमरकोश, १.४.२५) या उक्तीनुसार अनेकविध कल्याण करणारी असल्याने तिला 'भद्रा' म्हणतात. आजच्या काळातील कृष्णवर्णी गाय भद्रेची संतती मानली जाते. भद्रेच्या गोमयापासून शास्त्रोक्त रीतीने तयार केलेल्या भस्माला 'भसित' असे म्हणतात.

'भसितं तत्त्वभासनात्' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.५) या आचार्योक्तीनुसार हे भस्म तत्त्वाला प्रकाशित करणारे असल्याने याला 'भसित' असे म्हणतात.

अनारोपित रूपाला तत्त्व म्हणतात. वीरशैवसिद्धान्तात चराचर विश्व तत्त्वात्मक मानले जाते. येथे शिवापासून पृथ्वीपर्यंत छत्तीस तत्त्वे मानली आहेत. या सर्व तत्त्वांना शिवस्वरूप जाणणे म्हणजे 'तत्त्व-ज्ञान' होय. पाने, फांद्या, फुले इत्यादी रूपाने जसा एकच वृक्ष उभा असतो तसा भूमी इत्यादी रूपाने एकच शिव विराजमान असतो (श्रीसिद्धान्तशिखामणी, १०.७). या तत्त्वांचे ज्ञान होण्यासाठी शास्त्रश्रवण हे कारणीभूत ठरत असले तरी त्याआधी अंत:करणाची शुद्धी आवश्यक आहे. भसिताच्या धारणामुळे अंत:करण शुद्ध होते व त्यामुळे तत्त्वज्ञानाची प्राप्ती होते.

'नैमित्तिकेषु भसितम्' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१०) या उक्तीप्रमाणे नैमित्तिक कर्मे करताना भसित धारण करावे. निमित्ताने घडणारी कर्मे नैमित्तिक होत. गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, चौल, शिवदीक्षा, विवाह व अंत्येष्टी या दशसंस्कारांच्या निमित्ताने घडणारी कर्मे नैमित्तिक होत. या वेळी वीरशैवांनी भसित धारण केले पाहिजे.

**भस्म**

सदाशिवाचे पश्चिम दिशेकडे असलेले मुख अघोर होय. 'न घोर: अघोर:' या विग्रहानुसार शिवाचे हे शांतस्वरूप होय. म्हणून श्रुतीत शिवाच्या मंगलमय रूपाला 'शिवा अघोरा' असे संबोधिले आहे (तैत्तिरीय संहिता, ४.५.१-१). अघोर मुखातून सृष्टीच्या आरंभी लाल रंगाची सुरभी नामक गाय उत्पन्न झाली. सुरभी म्हणजे सुगंध. ही गाय सुगंधित असून सुगंधद्रव्यदायक आहे. आजच्या काळातील रक्तवर्णी गाय सुरभीची संतती मानली जाते. तिच्या गोमयापासून शास्त्रोक्त विधीने निर्माण केलेल्या विभूतीला 'भस्म' असे म्हणतात.

'पापानां भर्त्सनात् भस्म' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.५) या उक्तीप्रमाणे मानसिक, वाचिक व शारीरिक पापांना भीतिदायक असल्याने याला भस्म असे म्हणतात. सर्व पापांचे भक्षण करणारे असल्याने याला भस्म म्हटले जाते (बृहज्जाबाद, १.१). नानाविध पापांचा नाश करण्यासाठी स्मृतिशास्त्रात अनेक प्रायश्चित्ते सांगितली असून ती घेणे सर्वांना शक्य होत नाही. म्हणून श्रुती व स्मृती या शास्त्रांत सर्व प्रकारच्या पापांचा नाश करण्यासाठी भस्मधारणव्रत

करण्याचा उपदेश केला आहे. या व्रतात भस्मस्नान, भस्मोद्धूलन व त्रिपुंड्रधारण केले जाते. जो निष्ठेने हे व्रत पाळतो त्याला भस्मनिष्ठ असे म्हणतात. भस्मनिष्ठाची सर्व पापे जळून जातात. शरीराच्या ज्या ज्या भागावर भस्म धारण केले जाते त्या त्या भागाकडून घडलेली पापे भस्म होतात (क्रियासार, भाग २, पृ. ८५).

'प्रायश्चित्तेषु सर्वेषु भस्म नाम यथाविधी' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.११) या आचार्योक्तीनुसार सर्व प्रकारची प्रायश्चित्तकर्मे करताना भस्म धारण केले पाहिजे. विहित कर्मे न केल्याने, निषिद्ध कर्मे केल्याने, इंद्रियांच्या असंयमाने मनुष्याकडून पापे घडतात व त्याला हीन योनीत जन्म घ्यावा लागतो. त्यासाठी तप-स्वाध्यायाने शरीरशोषण करणे, गंगास्नान करणे, हिरण्यगोभूमिदान करणे अशी प्रायश्चित्तकर्मे सांगितली आहेत. 'कारणागमा'त वीरशैवांची प्रायश्चित्तकर्मे विस्ताराने सांगितली आहेत. त्याचा सारांश असा-

इष्टलिंगपूजेची निश्चित वेळ चुकल्यास व पूजेसाठी पुष्पपत्रे न मिळाल्यास पंचाक्षर मंत्राचा १०८ वेळा जप करावा. पूजेचा भंग झाल्यास १००० वेळा पंचाक्षरी मंत्राचा जप करावा. पूजासमयी लिंग खाली पडल्यास त्याला आदराने तळहातावर स्थापित करून पुन्हा १०८ वेळा मंत्रजप करावा. लिंग भग्न झाल्यास श्रीगुरूकडून दुसरे लिंग घ्यावे. इष्टलिंग हरवल्यास तत्काळ प्राणत्याग करावा. ते शक्य नसल्यास एकवीस दिवस निराहार राहून पंचाक्षरमंत्राचा जप करीत लिंगाचा शोध करावा. लिंग सापडल्यास गुरुहस्ते विधिपूर्वक पुन्हा धारण करावे आणि न सापडल्यास प्राणत्याग करावा, अथवा गुरूकडून दुसरे लिंग घ्यावे. दुसरे लिंग धारण केल्यावर पहिले लिंग सापडल्यास ते गुरूला अर्पण करावे. ही वीरशैवांची प्रायश्चित्तकर्मे असून ती करताना विधिपूर्वक भस्म धारण करावे (कारणागम, क्रियापाद, १०.१-४५).

**क्षार**

सदाशिवाचे उत्तर दिशेकडे असलेले मुख तत्पुरुष होय. 'स एव पुरुषः तत्पुरुषः' या विग्रहानुसार शिव हाच एकमात्र पुरुष आहे. म्हणूनच महर्षी पतंजलींनी क्लेशकर्मादींपासून मुक्त असलेल्या ईश्वराला 'पुरुषविशेष' असे संबोधिले आहे (योगसूत्र, १.२४). शिवाच्या तत्पुरुष मुखापासून सृष्टीच्या आरंभी श्वेतवर्णाची

सुशीला गाय उत्पन्न झाली. 'शोभनं शीलं यस्या: सा सुशीला' या वचनानुसार सर्व प्राण्यांत तिचे चारित्र्य उत्तम असल्यामुळे तिला सुशीला म्हटले जाते. आजच्या काळातील पांढऱ्या रंगाची गाय सुशीलेची संतती मानली जाते. तिच्या गोमयापासून शास्त्रोक्त रीतीने तयार केलेल्या भस्माला 'क्षार' असे म्हणतात.

'क्षारणात् क्षारमापदाम्' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.५) या आचार्योक्तीनुसार तापत्रयापासून उत्पन्न झालेल्या विपत्तींचा क्षय करणारे असल्याने याला 'क्षार' असे म्हटले जाते. 'क्षारं काम्येषु सर्वदा' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१०) या उक्तीप्रमाणे सर्व काम्यकर्मांचे अनुष्ठान करीत असताना क्षार भस्माचे धारण करावे. फलाच्या उद्देशाने केली जाणारी कर्मे काम्यकर्मे होत. प्राय: सर्व लोक पशू, पुत्र, धन ही ऐहिक व स्वर्गादी पारलौकिक कामना बाळगून असतात. ही काम्यकर्मे करताना क्षार भस्माचे धारण केल्यास मनोरथ पूर्ण होतात.

**रक्षा**

सदाशिवाच्या ऊर्ध्व मुखाला ईशानमुख म्हणतात. 'ईशत इति ईशान:' या विग्रहाप्रमाणे सर्व प्राण्यांचा, सर्व विद्यांचा, सर्व देवतांचा नियामक असल्यामुळे शिवाला ईशान असे नाव आहे. ईशान मुखातून सृष्टीच्या आरंभी धूम्रवर्णाची सुमना नामक गाय उत्पन्न झाली. 'शोभनं मनो यस्या: सा सुमना' या वचनानुसार सर्व प्राण्यांत अत्यंत सात्त्विक असल्यामुळे तिला सुमना हे नाव आहे. आजच्या धूम्रवर्णाच्या सर्व गाई सुमनांची संतती असून तिच्या गोमयापासून शास्त्रोक्त विधीने तयार केलेल्या भस्माला 'रक्षा' असे म्हणतात.

'रक्षणात् सर्वभूतेभ्यो रक्षेति परिगीयते' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.६). रक्षाभस्मधारणाने भूतप्रेतादी अनिष्ट ग्रहांपासून भस्मधारकाचे रक्षण होते, म्हणून या भस्माला रक्षा असे म्हणतात. रक्षाधारणामुळे तापत्रयापासून मनुष्याचे रक्षण होते (क्रियासार, भाग २, पृ. ८४). आध्यात्मिक, आधिभौतिक, व आधिदैविक हे तापत्रय असून बाह्य व आंतर असे आध्यात्मिक तापाचे दोन भेद आहेत. वात, पित्त, कफ यांच्या प्रकोपामुळे निर्माण झालेल्या रोगांपासून होणारे दु:ख हे बाह्य दु:ख आणि राग–द्वेष इत्यादींपासून होणारे दु:ख हे आंतर दु:ख होय. राजा, चोर व्याघ्र इत्यादींपासून होणाऱ्या दु:खांना आधिभौतिक ताप म्हणतात तर भूत, प्रेत, ग्रह, यक्ष इत्यादींपासून होणाऱ्या पीडेला आधिदैविक ताप असे म्हटले

जाते. अशा या तापत्रयापासून रक्षाभस्मधारकाचे रक्षण होते.

'रक्षा च मोक्षकार्येषु प्रयोक्तव्या सदा बुधैः' (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.११) या आचार्योक्तीनुसार मोक्षकार्यात अर्थात् निष्काम कर्मात रक्षाभस्म धारण करावे. त्यामुळे अंत:करण शुद्ध होऊन मोक्षप्राप्ती होते. म्हणून निष्काम कर्माला मोक्षकर्म असे म्हणतात.

**भस्मनिर्मितिविधी**

कल्प, अनुकल्प, उपकल्प व अकल्प अशा भस्मनिर्मितीच्या चार प्रक्रिया आहेत. यामध्ये कल्पप्रक्रिया सर्वश्रेष्ठ असून अन्य प्रक्रिया दुय्यम मानल्या जातात.

**कल्प प्रक्रिया :** शुक्लपक्षातील किंवा कृष्णपक्षातील चतुर्दशीच्या दिवशी स्वत: उपवास करून गाईला स्नान घालावे. मंत्रसंस्कारयुक्त गवत व पाणी तिला खाण्यास व पिण्यास द्यावे. दुसऱ्या दिवशी प्रात:काळी उठून मंत्रस्नान केल्यावर गोदोहन करण्यासाठी वासरू सोडावे. वासरू स्तन्यपान करीत असताना जेव्हा गाय शेण टाकते ते सद्योजातमंत्राचा उच्चार करीत जमिनीवर पडू न देता वरच्यावर झेलावे. त्यानंतर वामदेवमंत्रोच्चार करीत त्याचे लहान लहान गोळे करावेत. तत्पुरुषमंत्राचा उच्चार करीत ते वाळवावे. अघोरमंत्रपठण करीत ते गोळे अग्नीत जाळून त्याचे भस्म करावे. ते भस्म ईशानमंत्राचा जप करीत गोळा करून बिल्व, रजत, सुवर्ण यांपैकी एखाद्या पात्रात ठेवावे. ही कल्पप्रक्रिया होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१४-१५).

ज्या गाईच्या शेणाचे भस्म करावयाचे आहे तिच्याविषयी पुढील काळजी घ्यावी. ती अपंग, उन्मत्त, दुष्ट, अस्वच्छ, हडकुळी, अशांत, वांझ, दूध न देणारी व म्हातारी नसावी. ती केस, वस्त्र, अस्थी खाणारी नसावी, नवप्रसूता व रोगी नसावी (बृहज्जाबाल, ३.१).

**अनुकल्प प्रक्रिया :** अरण्यात मिळालेले वाळलेले शेण (रानगोवऱ्या) आणून त्याचे चूर्ण करावे. अघोरमंत्रोच्चार करीत ते जाळावे. ईशानमंत्रोच्चार करीत ते गोळा करून पूर्वी सांगितल्याप्रमाणे एखाद्या पात्रात ठेवावे. भस्मनिर्मितीच्या या पद्धतीला अनुकल्प प्रक्रिया म्हणतात (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१६-१७). या प्रक्रियेत गोमयसंचय, त्याचे गोळे करणे व सुकविणे या क्रिया घडत नाहीत. त्यामुळे सद्योजात, वामदेव व तत्पुरुष या तीन मंत्रसंस्कारांचा येथे लोप होतो.

त्यामुळे कल्पप्रक्रियेपेक्षा न्यून असल्यामुळे हिला अनुकल्प म्हणतात.

**उपकल्प प्रक्रिया :** दुकानातील भस्म विकत घेऊन त्याचे चूर्ण करावे. वस्त्रगाळ करून त्यात गोमूत्र मिसळून त्याचे गोळे बनवून वाळवावे. मग अघोरमंत्रोच्चार करीत ते जाळावे. ईशानमंत्रोच्चार करीत एका पात्रात ते साठवावे. (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१७-१८). हे भस्म स्वत:च्या हाताने प्रत्यक्ष गोमयापासून न बनविल्यामुळे व यातही तीन मंत्रसंस्कारांचा लोप झाल्यामुळे या प्रक्रियेस उपकल्प म्हणतात.

**अकल्प प्रक्रिया :** वर सांगितलेला कोणताही विधी न पाळता अन्य कोणत्याही प्रक्रियेने भस्म तयार करणे ही अकल्प प्रक्रिया होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.१८).

या प्रकारे प्रक्रियाभेदामुळे भस्म हे कल्पभस्म, अनुकल्पभस्म, उपकल्पभस्म व अकल्पभस्म असे चार प्रकारचे होते. यांमध्ये कल्पभस्म हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. कोणत्याही प्रक्रियेद्वारा सिद्ध केलेले भस्म धारण करण्याआधी ते गुरूकडून अथवा जंगमाकडून त्यांच्या पादतीर्थाने शुद्ध करून घ्यावे व नंतर त्याचा उपयोग करावा.

### भस्मधारणविधी

भस्मस्नान, भस्मोद्धूलन आणि त्रिपुंड्र असा तीन प्रकारचा भस्मधारणविधी वीरशैवागमांत सांगितला आहे.

**भस्मस्नान :** जलस्नानानंतर अंग स्वच्छ पुसून नित्यकर्मे करण्याआधी पूर्वी सांगितलेल्या कल्पादी प्रक्रियेपासून बनविलेले भस्म डाव्या तळहातावर ठेवून ते उजव्या हाताने झाकावे. दोन्ही हात तसेच उजव्या मांडीवर ठेवावे. मौन धारण करून आठ वेळा पंचाक्षरमंत्राचा जप करीत ते अभिमंत्रित करावे. नंतर सर्वांगावर त्याचे सिंचन करावे. हेच भस्मस्नान होय. भस्मस्नान तीन प्रकारे करता येते. मस्तकापासून पायापर्यंत भस्मसिंचन करणे, पायापासून मस्तकापर्यंत भस्मसिंचन करणे आणि हृदयापासून मस्तकापर्यंत व हृदयापासून पायापर्यंत भस्मसिंचन करणे. भस्मस्नान करताना ईशानमंत्राने मस्तकावर, तत्पुरुषमंत्राने मुखावर, अघोरमंत्राने हृदयावर, वामदेवमंत्राने गुह्यस्थानावर, सद्योजातमंत्राने दोन्ही पायांवर

आणि ॐकारमंत्रजप करीत सर्वांगावर भस्मसिंचन करावे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.२०–२२).

भस्मस्नान करताना ते अवधानपूर्वक करावे. भस्माचा एकही कण भूमीवर पडता कामा नये. अन्यथा जेवढे कण जमिनीवर पडतील तेवढी हजार वर्षे नरकात राहावे लागते, असे 'क्रियासार' या ग्रंथात म्हटले आहे (भाग २, पृ. २२). यामागे पूज्य वस्तूचा अनादर घडू नये हे सांगण्याचा उद्देश आहे.

**सप्त स्नाने :** धर्मशास्त्रात मंत्रस्नान, भौमस्नान, आग्नेयस्नान, वायव्यस्नान, दिव्यस्नान, वारुणस्नान व मानसस्नान अशी सप्तविध स्नाने सांगितली आहेत. 'आपो हिष्ठा मयोभुव:' इत्यादी वैदिक मंत्रांचे पठण करीत मस्तकावर जलप्रोक्षण करून घेणे याला 'मंत्रस्नान' म्हणतात. गंगा, यमुना इत्यादी पवित्र नद्यांतील मातीचा टिळा गंधासारखा कपाळावर लावून घेणे हे 'भौमस्नान' होय. याला पार्थिव स्नान असेही एक नाव आहे. भस्मस्नानाला 'आग्नेयस्नान' म्हणतात. अग्नीत सर्व वस्तूंचे दहन करण्याची शक्ती असते त्याप्रमाणे भस्मात सर्व शारीरिक व मानसिक दोष दूर करण्याचे सामर्थ्य असते. सायंकाळी गाईंच्या पावलांमुळे उडालेली धूळ ज्या वायूत असते अशा वायूचा अंगाला स्पर्श झाला तर ते 'वायव्यस्नान' होय. सकाळी अथवा सायंकाळी उन्हात पडणाऱ्या पावसातील स्नान हे 'दिव्यस्नान' असून वाहत्या नदीत अथवा तलावात अवगाहन करून केलेले स्नान हे 'वारुणस्नान' होय. परमात्म्याचे निरंतर चिंतन करणे याला 'मानसस्नान' म्हणतात (शब्दकल्पद्रुम, पृ. ४५३).

सप्तस्नानांपैकी मांत्र, भौम, वायव्य, दिव्य व वारुण या स्नानांमुळे बाह्य दोषांचे निवारण होते तर मानसस्नानाने आंतरिक दोषांचे निवारण होते. परंतु भस्मस्नान मात्र आंतर व बाह्य दोन्ही प्रकारच्या दोषांचे निवारण करणारे असल्यामुळे ते सर्व स्नानांत श्रेष्ठ मानले जाते (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.२४).

भस्मस्नानामुळे ब्रह्मादी देवता, नारदादी महर्षी, सनकादी योगी, बाणादी दानव हे शिवभक्त सर्व दोषांपासून मुक्त होऊन शुद्ध झाले. या स्नानात जेवढे भस्मकण शिरावर पडतात तेवढी लिंगे शरीरावर धारण केल्याएवढे पुण्य मिळते.

गाईचे दूध, दही, तूप, शेण व मूत्र यांना पंचगव्य अशी संज्ञा असून दीक्षासंस्काराच्या वेळी शारीरिक व मानसिक शुद्धीसाठी ते प्राशन केले जाते.

गोमय व गोमूत्र यांच्यामध्ये रोगाणुनाशक शक्ती असल्यामुळे त्याचा प्राचीन काळापासून गृहसंमार्जन व रोगचिकित्सा यांत उपयोग केला जातो. गोमयापासून विधिपूर्वक सिद्ध केलेल्या भस्मात देखील हे सामर्थ्य असल्यामुळे भस्मस्नान हे रोगप्रतिकारक मानले जाते. भस्मस्नानामुळे शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक शांतीही प्राप्त होते.

**भस्मोद्धूलन :** भस्मस्नान करताना शरीरावर पडलेल्या भस्मकणांचे सर्वांगावर लेपन करून घेणे याला 'भस्मोद्धूलन' म्हणतात. नियमित भस्मोद्धूलन केल्यामुळे शरीरातील परमाणूंतही परिवर्तन होते असे म्हणतात. म्हणून बहिरंग व अंतरंग यांच्या शुद्धीसाठी भस्मोद्धूलन अवश्य करावे.

**त्रिपुंड्रधारण :** भस्मस्नान व भस्मोद्धूलनानंतर त्रिपुंड्रधारणविधी सांगितला आहे. भस्मधारणविधीत त्रिपुंड्रधारण हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. सर्वांगावर भस्मोद्धूलन केले तरी जर त्रिपुंड्रधारण केले नाही तर ते उद्धूलन एका त्रिपुंड्रधारणाएवढेही फलप्रद होत नाही. म्हणून भस्मोद्धूलन केले नाही तरी त्रिपुंड्रधारण मात्र अवश्य करावे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त त्रिपुंड्रधारणविधी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

साधकाने आपल्या डाव्या तळहातावर भस्म घेऊन त्यावर उजवा हात झाकावा. नंतर 'अग्निरिति भस्म' या मंत्राने त्याला स्पर्श करून सात वेळा पंचाक्षरमंत्राचा जप करीत त्यावर सात वेळा पाणी शिंपडावे. नंतर पाण्याने भिजविलेले भस्म पुढील पंधरा स्थानांवर क्रमश: प्रणवपंचाक्षरमंत्रोच्चारपूर्वक लावावे. मस्तक, कपाळ, दोन्ही कान, कंठ, दोन भुजा, हृदय, नाभी, पाठ, दोन दंड, मान व दोन मनगटे. या रीतीने केलेल्या भस्मधारणास 'शांभवव्रत' असे म्हणतात. बृहज्जाबालोपनिषद, चंद्रज्ञानागम व शिवमहापुराण या ग्रंथांत त्रिपुंड्रधारणेची बत्तीस, सोळा, आठ व पाच अशी स्थाने सांगितली आहेत.

**बत्तीस स्थाने :** मस्तक, कपाळ, दोन कान, दोन नेत्र, दोन नाकपुड्या, तोंड, कंठ, दोन खांदे, दोन हातांचे कोपरे, दोन मनगटे, हृदय, दोन फासळ्या, नाभी, गुदा, लिंग, दोन मांड्या, दोन नितंब, दोन गुडघे, दोन पोटऱ्या व दोन पावले.

**सोळा स्थाने :** मस्तक, कपाळ, कंठ, दोन खांदे, दोन भुजा, हातांचे दोन कोपरे, दोन मनगटे, हृदय, नाभी, दोन फासळ्या व पाठ.

**आठ स्थाने :** मस्तक, कपाळ, दोन कान, दोन खांदे, हृदय व नाभी.

**पाच स्थाने :** मस्तक, दोन भुजा, हृदय व नाभी.

वरील स्थानांवर त्रिपुंड्रधारण केल्यावर त्या त्या अवयवांकडून घडलेल्या पापांचा नाश होतो. अधिकाधिक स्थानांवर भस्म धारण करणे हे अधिक लाभप्रद आहे. अधिक स्थानांवर त्रिपुंड्रधारण करणे अशक्य झाले तरी कपाळावर मात्र अवश्य धारण करावे. एवढेही न करणाऱ्याचा शास्त्रात धिक्कार केला आहे.

'श्रीसिद्धान्तशिखामणी'त मात्र वर उल्लेखिलेल्या पंधरा स्थानांवर त्रिपुंड्रधारण अवश्य करावे, असे सांगितले आहे. शिवयोगी शिवाचार्यांनी सर्व शिवागमांचे व सर्व शास्त्रपुराणांचे अध्ययन करून 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथाची रचना केली आहे. म्हणून त्यांनी निश्चित केलेल्या पंधरा स्थानांवर वीरशैवांनी अवश्य भस्मधारण करावे. उपरोक्त तीन ग्रंथांत भस्मधारणेसाठी अधिकाधिक बत्तीस स्थाने व कमीत कमी पाच स्थाने सांगितली आहेत. याचा अर्थ असा की, शक्यतो बत्तीस स्थानी भस्म धारण करावे, ते शक्य नसेल तर सोळा स्थानी, आठ स्थानी किंवा पाच ठिकाणी तरी धारण करावे. सर्वसामान्य शैवांसाठी ही स्थाने सांगितली असून वीरशैवांसाठी मात्र शिवयोगी शिवाचार्यांनी पंधरा स्थाने सांगितली आहेत. अन्य शैवांपासून वीरशैवांचे वेगळेपण उठून दिसावे यासाठी वीरशैवांनी पंधरा ठिकाणी भस्मधारण केले पाहिजे.

**ऊर्ध्व व तिर्यक् त्रिपुंड्र :** त्रिपुंड्रातील तीन रेखा ब्रह्मा, विष्णू व महेश यांची प्रतीके आहेत (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ६.४३). त्रिपुंड्र असे समन्वयात्मक असल्याने या तिन्ही देवतांच्या भक्तांनी ते धारण केले पाहिजे. वैष्णव ऊर्ध्व (उभे) त्रिपुंड्र तर शैव तिर्यक् (आडवे) त्रिपुंड्र धारण करतात. ऊर्ध्व त्रिपुंड्रापेक्षा तिर्यक् त्रिपुंड्र धारण करणे स्वाभाविक असून योग्य आहे. कारण मनुष्याचे कपाळ तिर्यक् म्हणजे आडवे असून त्यावर पडणाऱ्या आठ्यादेखील आडव्याच आहेत. कपाळाच्या या नैसर्गिक रचनेमुळे तिर्यक् त्रिपुंड्रच धारण केले पाहिजे, असा शास्त्राचा आग्रह आहे (क्रियासार, भाग दोन, पृ. ८०).

**त्रिपुंड्रधारणाचे प्रकार :** त्रिपुंड्रधारणाचे दोन प्रकार आहेत. उजव्या हाताच्या तर्जनी, मध्यमा व अनामिका या तीन बोटांनी सहा अंगुलीएवढे कपाळभरून अथवा दोन्ही डोळ्यांच्या मर्यादेतील कपाळावर अथवा मस्तकावरील समोरील केसांएवढ्या मर्यादेत त्रिपुंड्रधारण करणे. हा पहिला प्रकार आहे. मध्यमा व

अनामिका या दोन बोटांनी प्रथम डावीकडून उजवीकडे व नंतर अंगठ्याने दोन रेषांच्या मध्ये उजवीकडून डावीकडे असा कपाळावर त्रिपुंड्र लावणे. ही दुसरी पद्धत असून तिला अनुलोम-विलोम पद्धती म्हणतात (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.३६-३७).

भस्माच्या रेखा अतिशय सरळ, शुभ्र, एकमेकीस स्पर्श न करणाऱ्या, अखंड व ठळक असाव्या. हे त्रिपुंड्र जर श्रोत्रप्रमाण म्हणजे डाव्या कानापासून उजव्या कानापर्यंत असले तर सर्व मनोरथ पूर्ण होतात. सकाळी, दुपारी व संध्याकाळी जो त्रिपुंड्र धारण करतो तो प्रत्यक्ष रुद्रस्वरूपच असतो. त्याला तीन वेदाध्ययनाचे, तीन वेळा अग्नीत हवन केल्याचे आणि तीन वेळा पुष्करतीर्थस्नानाचे फळ मिळते. तो साक्षात् शिवस्वरूपच असतो (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.३९-४०).

वेद, आगम, उपनिषदे व पुराणे यांत वर्णिलेले हे भस्मधारण वीरशैवांसाठी इष्टलिंगपूजेचे एक अंग मानले जाते. अन्य शैव याला एक स्वतंत्र व्रत मानतात. याला 'पाशुपतव्रत' असे नाव आहे. हे व्रत कोणी आजीवन, कोणी बारा वर्षे, कोणी सहा वर्षे, कोणी तीन वर्षे, कोणी एक महिना तर कोणी बारा दिवसांपर्यंत करतात (क्रियासार, भाग २, पृ. २५). परंतु भस्मधारण हे वीरशैवांच्या इष्टलिंगपूजेचे एक अंग असल्याने ते वीरशैवांसाठी एक जीवनव्रत आहे.

भस्म आठ प्रकारचे ऐश्वर्य देऊन शिवतत्त्वाचे प्रकाशन करते. मन-वाणी-शरीरजन्य पापांचे भस्म करून तापजन्य विपत्तींचा क्षय करते आणि ग्रहयक्षादींपासून भस्मधारकाचे रक्षण करते. म्हणून भस्म हे रक्षाकवचरूपी आवरण मानले जाते. संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी 'परमरहस्या'त म्हणतात:-

**भाळी त्रिपुंड्र मुखी षडक्षरी मंत्र । कंठी रुद्राक्षमाळा शोभे पवित्र ।**
**तो साक्षात् जाणिजे महारुद्र । यासि संशयो नाही ।।** ६.२७

(श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती शोधप्रतिष्ठान, वाराणसी)

## ७. रुद्राक्ष

अष्टावरणात सातवे आवरण रुद्राक्ष आहे. 'रुद्रस्य अक्षः रुद्राक्षः' या व्युत्पत्तीनुसार रुद्रदृष्टीला 'रुद्राक्ष' म्हटले जाते. चराचर प्रपंचाला शिवस्वरूपात पाहणे हीच रुद्रदृष्टी म्हणजे शिवदृष्टी होय. विद्याविनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, श्वान, श्वपच या सर्वांना जो समदृष्टीने पाहतो तोच पंडित होय, असे गीतेत

(५.१८) म्हटले आहे. समाजात शांती प्रस्थापित होण्यासाठी समदृष्टीची आवश्यकता आहे. यासाठी प्राचीन काळापासून भारतीय दार्शनिक प्रयत्नशील आहेत. समदृष्टी प्राप्त करणे हेच मानवी जीवनाचे चरम लक्ष्य होय. 'मनसा सीव्यतीति मनुष्य:' या निरुक्तीनुसार मनाच्या संकुचित वृत्तीने बांधला जाऊन मनुष्य पशूसारखा व्यवहार करतो. सर्व प्रपंचाला शिवरूप पाहणारी दृष्टी जेव्हा त्याला लाभते तेव्हा तो या बंधनातून मुक्त होतो. मनुष्याच्या ठिकाणी असलेला संकुचितपणा नाहीशी करणारी दृष्टी ही रुद्रदृष्टी होय. हा रुद्राक्ष शब्दाचा तात्त्विक अर्थ आहे.

भगवान रुद्राच्या नेत्रजलापासून उत्पन्न झालेल्या विशिष्ट वृक्षाच्या बीजाला रुद्राक्ष म्हटले जाते. त्याच्या धारणानेदेखील अंत:करण शुद्ध होऊन रुद्रदृष्टी प्राप्त होते. म्हणून या वृक्षबीजाला रुद्राक्ष अशी संज्ञा आहे.

### रुद्राक्षाची उत्पत्ती

रुद्राक्षाच्या उत्पत्तीविषयी कथा प्रसिद्ध आहे. तारकाक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली नामक तीन असुर तारकासुराचे पुत्र होते. या तिघांनी तपश्चर्येने ब्रह्मदेवाचे वरदान मिळवून तीन अभेद्य नगरे मिळविली. अमरत्वाच्या अहंकाराने ते देवांवर अत्याचार करू लागले. त्यांच्या पीडेमुळे संत्रस्त होऊन देवांनी आपल्या रक्षणासाठी त्रिपुरासुरांचा संहार करावा, अशी शंकराची करुणा भाकली. त्यांची प्रार्थना ऐकून शंकर त्रिपुरासुरांचा संहार करण्यासाठी असुरांची तिन्ही नगरे एकत्र होईपर्यंत निर्निमेष दृष्टी लावून बसले. त्यावेळी त्यांच्या तिन्ही नेत्रांतून जलबिंदू खाली पडले व त्यातून वृक्ष निर्माण झाले. या वृक्षांचे बीजच रुद्राक्ष होत. रुद्राच्या नेत्रांतून निर्माण झाले म्हणून रुद्रनेत्रांप्रमाणे रुद्राक्षही पवित्र समजले जातात (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.४७–४८).

### रुद्राक्षांचे प्रकार

लोकांना पवित्र करणारे रुद्राक्ष उत्पत्तिभेदाने अडतीस प्रकारचे होतात. भगवान रुद्राच्या सूर्यनेत्रातून कपिल वर्णाचे बारा, चंद्रनेत्रातून शुभ्र वर्णाचे सोळा आणि अग्निनेत्रातून कृष्ण वर्णाचे दहा असे एकूण अडतीस प्रकारचे रुद्राक्ष निर्माण झाले (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.४९–५१).

सूर्याच्या तपिनी, तापिनी, धूम्रा, मरिची, ज्वालिनी, रुची, सुषम्ना, भोगदा,

विश्वा, बोधिनी, धारिणी व क्षमा अशा बारा कला आहेत. यासाठी सूर्याला 'द्वादशात्मा' असेही म्हटले जाते. म्हणून सूर्यनेत्रातून बारा प्रकारचे रुद्राक्ष उत्पन्न झाले.

चंद्राच्या अमृता, मानदा, पूषा, तुष्टी, पुष्टी, रती, धृती, शशिनी, चंद्रिका, कांती, ज्योत्स्ना, श्री, प्रीती, पूर्णा, पूर्णामृता व कामदायिनी अशा सोळा कला आहेत. म्हणून चंद्रनेत्रातून सोळा प्रकारचे रुद्राक्ष उत्पन्न झाले.

अग्नीच्या धूम्र, अर्ची, उष्मा, ज्वलिनी, ज्वालिनी, विस्फुल्लिंगिनी, सुश्री, सुरूपा, कपिला व हव्यकव्यवहा अशा दहा कला (जिव्हा) आहेत. म्हणून अग्निनेत्रातून दहा प्रकारचे रुद्राक्ष उत्पन्न झाले. अशाप्रकारे रुद्राक्षांच्या प्रकारात सूर्य, चंद्र व अग्नी यांचे कलाभेद कारणीभूत आहेत (शारदातिलक, २.१२–१६).

**रुद्राक्षाची मुखे व त्यांची फळे**

रुद्राक्ष एकमुखापासून चौदा मुखांपर्यंत असतात. रुद्राक्षजाबालोपनिषद, (२.११–१६), शिवमहापुराण (विद्येश्वरसंहिता, २५.६४–८०), शिवार्चनाचंद्रिका (पृ. १६) आदी ग्रंथांत रुद्राक्षांच्या मुखांप्रमाणे रुद्राक्षधारणाची वेगवेगळी फले सांगितली आहेत.

१. एकमुखी रुद्राक्ष साक्षात् परशिवस्वरूपच होय. त्याच्या केवळ दर्शनाने ब्रह्महत्यादी पातके नष्ट होतात. त्याच्या पूजेने सर्व प्रकारची संकटे नष्ट होऊन अखंड लक्ष्मीची प्राप्ती होते व शेवटी शिवसायुज्य प्राप्त होते.

२. द्विमुखी रुद्राक्ष अर्धनारीश्वराचे स्वरूप होय. त्याच्या धारणाने अर्धनारीश्वराचा अनुग्रह होऊन गोवधजन्य पापांचा नाश होतो.

३. तीनमुखी रुद्राक्ष हे गार्हपत्य, दक्षिण व आहवनीय या अग्नित्रयाचे स्वरूप असून याच्या धारणामुळे अग्निदेवाची कृपा होऊन सर्व विद्यांची प्राप्ती होते.

४. चारमुखी रुद्राक्ष चतुर्मुख ब्रह्माचे स्वरूप असून त्याच्या धारणाने नरहत्येचा दोष नष्ट होऊन याच्या दर्शन–स्पर्शाने धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ती होते.

५. पंचमुखी रुद्राक्ष सदाशिवाचे स्वरूप असून त्याच्या धारणामुळे अभक्ष्यभक्षण व अपेयपान इत्यादींपासून होणारे पाप नष्ट होऊन सर्व मनोरथ पूर्ण होतात.

६. सहामुखी रुद्राक्ष षण्मुखाचे स्वरूप होय. हे उजव्या बाहूवर धारण केल्याने आरोग्यप्राप्ती होते व मनोबुद्धीची शुद्धी होऊन ब्रह्महत्येच्या पापाचा नाश होतो.

७. सप्तमुखी रुद्राक्ष हे सप्तमातृकांचे स्वरूप असून याच्या धारणाने आरोग्य, संपत्ती व ज्ञान यांची प्राप्ती होते.

८. आठमुखी रुद्राक्ष अष्टवसूंचे व भैरवाचे स्वरूप होय. याच्या धारणामुळे दीर्घायुष्य प्राप्त होते व गंगास्नानाचे फळ मिळते.

९. नऊमुखी रुद्राक्ष नवदुर्गेचे स्वरूप असून हा डाव्या हातात धारण केल्यावर लक्षावधी महापातके नष्ट होऊन रुद्राक्षधारक सर्वेश्वर होतो.

१०. दशमुखी रुद्राक्ष यमाचे स्वरूप असून त्याच्या धारणामुळे ग्रह, यक्ष, पिशाच्च आदी बाधा नष्ट होते व सर्व प्रकारचे मनोरथ पूर्ण होतात.

११. अकरामुखी रुद्राक्ष रुद्राचे स्वरूप असून याच्या धारणाने प्रत्येक ठिकाणी विजय मिळतो व सौभाग्य प्राप्त होते. हा रुद्राक्ष शिखास्थानी धारण केल्यावर शंभर वाजसनेय यज्ञांचे व हजार गोदान केल्याचे पुण्य मिळते. शेवटी रुद्रसायुज्याची प्राप्ती होते.

१२. बारामुखी रुद्राक्ष द्वादश आदित्याचे स्वरूप होय. तो कंठात धारण केल्यास अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते. याच्या धारणाने हिंस्र प्राणी, चोर व अग्नी यांपासून अभय मिळते व सर्व पापांचा क्षय होतो.

१३. तेरामुखी रुद्राक्ष कामदेवाचे स्वरूप असून याच्या धारणाने सर्व भोगांची प्राप्ती होते व त्याचे सातत्याने मंगल होत राहते. यामुळे मातृ-भ्रातृ-स्त्रीवधाने होणारे पाप नष्ट होते.

१४. चौदामुखी रुद्राक्ष परशिवाचे स्वरूप असून याच्या धारणाने सर्व रोगांचे निवारण होऊन आरोग्याची प्राप्ती होते. हा मस्तकावर धारण केल्यास अनेक सिद्धींची प्राप्ती होते.

रुद्राक्ष धारण केल्यावर साधकाने शुद्ध सात्त्विक आहार घ्यावा. निषिद्ध पदार्थांचे सेवन करू नये. सदोदित सदाचारसंपन्न जीवन व्यतीत करावे. असे केले तरच रुद्राक्षधारण फलप्रद ठरेल, अन्यथा ठरणार नाही (रुद्राक्षजाबालोपनिषद, २.१७)

रुद्राक्षधारण करण्यापूर्वी त्याचे नीट परीक्षण करावे. ज्याला किड्याने छिद्र

पाडलेले नाही, ज्याचा रंग सोन्यासारखा आहे, जो पूर्वी कोणी धारण केला नाही असा नवीन व उत्तम रुद्राक्ष निवडून घ्यावा. रुद्राक्ष कसा असावा? तर तांब्याच्या रंगाचा, स्निग्ध, ठणक, टपोरा व काटेरी असावा. ज्याप्रमाणे निकषावर सोने घासल्यावर त्याची रेघ उमटते त्याप्रमाणे रुद्राक्ष निकषावर घासला तर त्याची रेघ उमटली पाहिजे. असा रुद्राक्ष उत्तम मानला जातो. आवळ्याच्या आकाराएवढा रुद्राक्ष उत्तम, बोराएवढा मध्यम तर हरभऱ्याएवढा अधम होय (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ७.१४,१७.९-१०).

**रुद्राक्षधारणविधी**

'श्रीसिद्धान्तशिखामणी'त वीरशैव साधकासाठी इष्टलिंगपूजेच्या वेळी रुद्राक्षधारणाचा विधी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

शिखास्थानी एकमुखी एक रुद्राक्ष, मस्तकावर दोन-तीन-बारा मुखांचे एकेक असे तीन रुद्राक्ष, मस्तकाभोवती अकरा मुखांचे छत्तीस रुद्राक्ष, दोन्ही कानांवर पाच-सात-दहा मुखांचे प्रत्येकी दोन असे सहा रुद्राक्ष, कंठात सहा मुखांचे सोळा व आठ मुखांचे सोळा असे बत्तीस रुद्राक्ष, वक्षस्थळावर चार मुखांचे पन्नास रुद्राक्ष, दोन्ही दंडांवर तेरा मुखांचे पन्नास रुद्राक्ष, दोन्ही मनगटांत नऊ मुखांचे बारा बारा रुद्राक्ष आणि चौदा मुखांचे १०८ रुद्राक्ष यज्ञोपविताप्रमाणे कंठात धारण करावेत (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.५४-५८).

वर सांगितल्याप्रमाणे विविध मुखांचे रुद्राक्ष न मिळाल्यास अशा वेळी सहजपणे मिळणारे पंचमुखी रुद्राक्षच वर सांगितल्याप्रमाणे धारण करावे. ते दोऱ्यात गुंफून धारण करावेत 'तन्मुखे मुखं तत् पुच्छे पुच्छम्' (अक्षमालोपनिषद, १) या वचनानुसार रुद्राक्षांच्या मुखाला मुख व पाठीला पाठ लावून माळ गुंफावी. याप्रमाणे विधिपूर्वक रुद्राक्ष धारण केल्याने धारकाच्या सर्व पापांचा नाश होतो.

धर्मशास्त्रात अतिपातक, महापातक, अनुपातक, उपपातक, संकरीकरण, अपात्रिकरण, जातिभ्रंशकरण, मलावह व प्रकीर्तक अशी नऊ प्रकारची पातके सांगितली असून ही सर्व पातके रुद्राक्षधारणाने नष्ट होतात. किंबहुना, रुद्राक्षाच्या दर्शनाने, स्पर्शाने, स्मरणाने, पूजनाने किंवा धारण केल्याने या प्रपंचातील सर्व लोक पापांपासून मुक्त होतात. रुद्राक्षधारण करणारा ब्राह्मण असो, अंत्यज

असो, मूर्ख असो किंवा पंडित असो, तो रुद्राक्षधारणाने सर्व पातकांपासून मुक्त होतो. एवढेच नव्हे, तर कोटी गोदान केल्याचे पुण्यदेखील रुद्राक्षधारणाने लाभते. मृत्युसमयी रुद्राक्षप्रक्षाळित जल पाजल्यास मरणाऱ्यास रुद्रलोकाची प्राप्ती होते. म्हणून सर्व वीरशैवांनी विधिपूर्वक रुद्राक्षधारण करावे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ७.६०–६४).

रुद्राक्ष हे केवळ धार्मिक चिन्ह नसून एक वनस्पतिविशेषदेखील आहे. त्याच्या धारणामुळे रक्तदाब, हृदयविकार इत्यादी रोगांना प्रतिबंध होत असल्यामुळे आरोग्य इच्छिणाऱ्या लोकांनी रुद्राक्षधारण करावयास हरकत नाही. रुद्राक्षधारण करण्यास कोणत्याही प्रकारचा वर्णाश्रमभेद व जातिभेद आड येत नाही. म्हणून किमान एक तरी रुद्राक्ष शरीरावर अवश्य धारण करावा. 'चंद्रज्ञानागमा'त (७.४६) म्हटले आहे की, त्रिपुंड्ररहित मनुष्य जसा धिक्कारयोग्य असतो तसाच अनेक पुण्यप्रद असा एकदेखील रुद्राक्ष ज्याच्या शरीरावर नाही त्या मनुष्याचा जन्म निरर्थक होय.

श्रीरुद्राच्या नेत्रांतील जलबिंदूंपासून उत्पन्न झाल्यामुळे रुद्राक्षात एवढी शक्ती आली आहे. नेत्रजलाला सामान्यत: 'अश्रू' असे म्हटले जाते. दु:खाश्रू, आनंदाश्रू व योगाश्रू असे तीन प्रकारचे अश्रू असतात. सांसारिक तापामुळे अथवा इतरांकडून दु:ख झाल्यामुळे डोळ्यांत जे अश्रू येतात ते दु:खाश्रू होत. इच्छित पदार्थाची प्राप्ती झाल्यावर डोळ्यांत येणारे अश्रू हे आनंदाश्रू आणि योगाभ्यासात त्राटक करताना डोळ्यांत येणारे अश्रू हे योगाश्रू होत. अश्रूंचे शुभ अथवा अशुभ फळ व्यक्तीला भोगावे लागते. दुसऱ्याला दु:ख देऊन रडविले तर त्याचे अशुभ फळ आणि दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण केला तर त्याचे शुभ फळ भोगावेच लागते. सामान्य माणसांच्या अश्रूत जर एवढे सामर्थ्य आहे तर रुद्राच्या योगाश्रूत केवढे सामर्थ्य असेल? दुष्टांचा संहार व सुष्टांचे रक्षण करण्यासाठीच शंकर निर्निमेष दृष्टी लावून बसले होते. त्यावेळी त्यांच्या नेत्रजलातून रुद्राक्षाची निर्मिती झाल्यामुळे त्या रुद्राक्षांच्या धारणामुळे दुर्वासनांचा संहार होऊन सद्भावनांचे संरक्षण होते. म्हणून वीरशैवाचार्यांनी रुद्राक्षाला रक्षाकवच अर्थात् आवरण मानले आहे.

रुद्राक्षधारणाने शारीरिक व मानसिक दोषांचा नाश होऊन स्वास्थ्यलाभ होतो.

सद्भावनेने रुद्राक्ष निरंतर धारण केल्यावर रुद्रदृष्टीचा लाभ होतो. यामुळे मनुष्याच्या मनात समताभाव व त्यामुळे समाजात शांती प्रस्थापित होते. याप्रकारे रुद्राक्ष व्यक्ती व समाज यांचे रक्षक असल्याने हे रक्षाकवच होय.

## ८. मंत्र

अष्टावरणातील आठवे आवरण मंत्र होय. 'मंत्र्यते गुप्तं परिभाष्यते इति मंत्रः' या व्युत्पत्तीप्रमाणे दीक्षासंस्काराच्या वेळी श्रीगुरूकडून अत्यंत गोपनीयतेने आपल्या इष्टदेवतेच्या नामाचा जो उपदेश केला जातो तो 'मंत्र' होय. मंत्राच्या पुन:पुन्हा आवृत्तीमुळे साधकाचे रक्षण होत असल्याने याला मंत्र म्हणतात (योगशिखोपनिषद, २, ७-८).

सात कोटी मंत्र आहेत, असे मंत्रशास्त्रात सांगितले आहे. त्यामध्ये पंचाक्षरी हादेखील एक मंत्र आहे. ज्याप्रमाणे लोकव्यवहारात प्रत्येक व्यक्तीला एक नाव असते त्याप्रमाणे पंचाक्षरमंत्र हे परशिवाचे नाव आहे. नावाने हाक मारल्यावर ती व्यक्ती आपल्यासमोर येते, त्याप्रमाणे शिवाचे अभिधान असलेल्या पंचाक्षरमंत्राने शिव सन्मुख होतो (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.६).

**मंत्राचे स्वरूप**

ज्याच्या प्रारंभी 'नमः' ही अक्षरे असून नंतर 'शिवाय' ही अक्षरे आहेत, तो पंचाक्षरमंत्र होय. यात पाच अक्षरे असल्यामुळे याला पंचाक्षर असे म्हणतात. दीक्षासंस्काराच्या वेळी श्रीगुरूकडूनच मंत्रश्रवण करण्याची पद्धत असल्यामुळे प्राचीन ग्रंथात स्पष्टपणे मंत्र न सांगता तो सांकेतिक पद्धतीने सांगत असत. उदाहरणार्थ, 'परमरहस्य' या ग्रंथात पंचाक्षरमंत्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितले आहे:-

> **दान्तं बान्तं च यान्तं तु तृतीयस्वरभूषितम् ।**
> **लान्तयान्तसमायुक्तो मंत्रः पंचाक्षरो भवेत् ॥** ६.१५

या प्रकारे संकेताने पंचाक्षरमंत्राचे स्वरूप वर्णिले आहे. याचा अर्थ असा- दान्त म्हणजे त वर्गातील अंतिम वर्ण **न**. बान्त म्हणजे प वर्गातील अंतिम वर्ण **म**. यान्त म्हणजे यकारापासून पाचवा वर्ण **श**, तो तृतीयस्वरभूषित म्हणजे 'इ'

स्वराने युक्त = **शि**. लान्त म्हणजे यकारापासून चौथा वर्ण = **वा** आणि यान्त म्हणजे अंती यकारयुक्त = **य**. यावरून पंचाक्षरमंत्र सरळ सांगण्याची प्रथा नव्हती. कारण तो गुरूकडूनच घ्यावा अशी परंपरा आहे. परंतु 'चंद्रज्ञानागम' आणि 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या ग्रंथांत अधिक स्पष्टपणाने या मंत्राचे स्वरूप सांगितले आहे. प्रथम 'नम:' शब्दाचा प्रयोग करावा आणि नंतर 'शिवाय' म्हणावे. परंतु असे सांगूनदेखील मंत्राचे एकत्र नाव या ग्रंथांत सांगितलेले नाही.

**पंचाक्षरमंत्राचे श्रेष्ठत्व**

शिवतत्त्वाहून श्रेष्ठ असे दुसरे कोणतेच तत्त्व नाही, तसे पंचाक्षरीपेक्षा श्रेष्ठ असा दुसरा मंत्र नाही. ब्रह्मा, विष्णू इत्यादी सर्व देवांत जसा शिव हा महान आहे त्याप्रमाणे सप्तकोटी मंत्रांत पंचाक्षरी मंत्र सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्या श्रेष्ठत्वाला त्यामधील 'शिव' ही दोन अक्षरे कारणीभूत आहेत. 'शिव' ही दोन अक्षरे सर्व वेदांचे सारसर्वस्व असून याविषयी अप्पय दीक्षित म्हणतात, 'अठरा विद्यांमध्ये श्रुती उत्कृष्ट आहे, श्रुतीत श्रीरुद्र उत्कष्ट, श्रीरुद्रात आठवा अनुवाक् उत्कृष्ट, आठव्या अनुवाकात 'नम: शिवाय च शिवतराय च' या मंत्रात आलेला पंचाक्षरमंत्र त्यापेक्षा उत्कृष्ट आणि त्यातही 'शिव' ही दोन अक्षरे उत्कृष्ट होत (ब्रह्मसूत्र, श्रीकंठभाष्य, शिवार्कमणिदीपिका, पृ. ४).

**शिव शब्दाचे अर्थ**

प्राणिमात्रांचे कल्याण करण्याची इच्छा असल्याने महादेवाला 'शिव' म्हटले जाते. स्वत: भगवान शिव आपल्या शिवनावाचे स्पष्टीकरण करतात की, दानव असो, देव असो, माझ्यासाठी सर्व समान असून मी सर्वांचे कल्याण इच्छितो. असे शिवतत्त्व माझ्यात असल्यामुळे माझे नाव शिव आहे (महाभारत, ८.२-४).

'शिवा: गुणा: अस्य संतीति शिव:' या व्युत्पत्तीनुसार शिवाच्या ठायी सर्वज्ञत्व, नित्यतृप्तत्व, अनादिबोधत्व, स्वतंत्रत्व, अलुप्तशक्तिमत्व व अनंतशक्तिमत्व हे षड्गुणैश्वर्य असल्यामुळे त्याचे नाव शिव आहे (वायुपुराण, १२.३९).

'शोभनत्वात् शिव:' या व्युत्पत्तीप्रमाणे जो शोभन म्हणजे शुद्ध (मलत्रयरहित) आहे त्याला शिव म्हणतात (वीरशैवानंतचंद्रिका, पृ. १७३).

‘वष्टीति शिव:’ या व्युत्पत्तीनुसार वश् या धातूचा अर्थ प्रकाशमान असा आहे. जो स्वयंप्रकाश आहे आणि ज्याच्या प्रकाशाने समग्र प्रपंच प्रकाशित होते तो शिव होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, १.३-४).

‘शेतेऽस्मिन् सर्वमिति शिव:’ या व्युत्पत्तीनुसार सर्व प्राण्यांचे जे विश्रांतिस्थान आहे त्याचे नाव शिव आहे. अर्थात् शिव हा सर्व चराचर प्रपंचाचा आधार आहे (वीरशैवानंदचंद्रिका, पृ. १७५).

‘श्याम्यतीति शिव:’ या व्युत्पत्तीनुसार जो विकाररहित आहे तो शिव होय (वीरशैवानंदचंद्रिका, पृ. १७५).

यावरून प्राणिमात्रांचे कल्याण करणारे, उत्कृष्ट गुणसंपन्न, मलत्रयरहित, स्वयंप्रकाशित, विश्वप्रकाशित करणारे, सर्व प्रपंचाचा आधार असलेले आणि विकाररहित असे जे परब्रह्म चैतन्य तेच शिव होय, हे सिद्ध होते.

भगवान महादेवाची सहस्र नामे असताना शिव या नावालाच एवढे महत्त्व का? तर शिव ही दोन अक्षरे मुख्यवृत्तीने परब्रह्माची प्रकाशक होत. त्याशिवाय भव, शंकर, ईशान इत्यादी नावे गुणवृत्तीने परब्रह्माची प्रकाशक आहेत. ज्याप्रमाणे सिंह व पुरुषसिंह या दोन शब्दांपैकी ‘सिंह’ या शब्दाने सिंहाच्या साक्षात् स्वरूपाचा बोध होतो. ‘पुरुषसिंह’ या शब्दाने सिंहाच्या क्रूरत्वादी गुणांचा बोध होतो, प्रत्यक्ष सिंहाचा होत नाही. त्याचप्रमाणे शिव शब्दाने साक्षात् परब्रह्माचा बोध होतो तर इतर नावांनी त्याच्या गुणांद्वारे त्याचा बोध होतो. उदा.- शंकर = सुख देणारा देव, महादेव = महान असा देव इत्यादी. म्हणून शिव हे नाम मुख्यवृत्तीने साक्षात् परब्रह्मबोधक असल्याने सर्व नामांत ते श्रेष्ठ आहे आणि पंचाक्षरमंत्रात शिव हा शब्द असल्यामुळे हा मंत्र सर्व मंत्रांत श्रेष्ठ मानला जातो.

### पंचाक्षरीचा अर्थ

शिवाचे अभिधान असलेला पंचाक्षरमंत्र ‘तत्त्वमसि’ (तत् त्वम् असि = ते परब्रह्म तू आहेस) या महावाक्यासारखा शिवजीवैक्यबोधक आहे. पंचाक्षरी मंत्रातील ‘नम:’चा अर्थ जीवात्मा असा असून ‘शिव’चा अर्थ परमात्मा असा आहे. ‘अय’ शब्दाचा अर्थ ऐक्य असा आहे. अशा रीतीने पंचाक्षरी मंत्र शिवजीवैक्यबोधक आहे, असे मायिदेव म्हणतात (अनुभवसूत्र, ६.४५-४६).

ऐक्यबोधक असल्यामुळेच हा मंत्र अन्य मंत्रांपेक्षा श्रेष्ठ मानला जातो.

## पंचाक्षरमंत्राची नावे

पंचाक्षरमंत्राची मूलमंत्र, विद्यामंत्र, शिवमंत्र, शैवसूत्रमंत्र व पंचाक्षरमंत्र अशी पाच नावे 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त सांगितली आहेत. ज्याप्रमाणे परशिव प्रपंचाच्या उत्पत्तीला मूळ कारण आहे त्याप्रमाणे पंचाक्षरमंत्रसुद्धा समस्त प्रपंचाचे व वर्णमालेचे मूलकारण आहे. म्हणून याला 'मूलमंत्र' असे म्हणतात. पंचब्रह्म (सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान), पंचतन्मात्रा (गंधतन्मात्रा, रूपतन्मात्रा, स्पर्शतन्मात्रा, रसतन्मात्रा, शब्दतन्मात्रा), पंचमहाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश), पंचज्ञानेंद्रिये (घ्राण, जिव्हा, चक्षू, त्वक्, श्रोत्र), पंचकर्मेंद्रिये (उपस्थ, पायू, पाद, पाणि, वाक्) आणि प्रपंचातील सर्व पंचके या सर्वांची उत्पत्ती पंचाक्षरी मंत्रातून झाली आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.१४-१६). सप्तकोटी मंत्रांची उत्पत्ती व विलय पंचाक्षरी मंत्रात होतो, म्हणून याला 'मूलमंत्र' म्हणतात (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.४५).

शिवजीवैक्यबोधक अशा या मंत्राचा जप केल्यानंतर शुद्धविद्येचा उदय होतो. विद्येच्या उत्पत्तीचे कारण असल्यामुळे या मंत्राला 'विद्यामंत्र' असे नाव आहे. याचा जप सतत केल्यामुळे अनेक प्रकारचे कल्याण होते, म्हणून याला 'शिवमंत्र' म्हणतात. शिवासंबंधी सर्व विषय यात एकवटलेले आहेत, हा मंत्र शिवाचा सूचक आहे आणि शिव व जीव यांच्यामधील सूत्र असल्यामुळे याला 'शिवसूत्रमंत्र' असे म्हणतात. पाच अक्षरांनी युक्त असल्याने याला 'पंचाक्षरमंत्र' म्हणतात. याप्रमाणे निमित्तभेदाने या मंत्राची पाच नावे सांगितली आहेत (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.२३).

## षडक्षर मंत्र

पंचाक्षरमंत्र जेव्हा ॐकारयुक्त होतो तेव्हा त्याला षडक्षर मंत्र असे म्हणतात. षडक्षर मंत्रालाच मूलपंचाक्षर असेही नाव आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.१७).

प्रणव म्हणजे ॐकार हादेखील शिवाचा वाचक आहे. 'तस्य वाचक: प्रणव:' (योगसूत्र, १.२७) या सूत्रात महर्षी पतंजलींनी याचे समर्थन केले आहे. प्र उपसर्गयुक्त णू धातूपासून बनलेल्या 'प्रणवा'चा अर्थ 'उत्कृष्ट स्तुती' असा आहे

(योगसूत्र, भोजवृत्ती, १.२७). व्यास म्हणतात की, संसाररूपी सागरात तरून जाणारी नूतन नौका म्हणजे प्रणव. प्र = प्रपंच, ण = नाही आणि व = तुम्हाला अर्थात् प्रणव जपणाऱ्या तुम्हाला, संसार नाही. ज्याच्याकडून साधक बलपूर्वक मोक्षाकडे खेचले जातात तो प्रणव होय (शिवमहापुराण, विद्येश्वरसंहिता, १७.४–५). ॐकारापासूनच पंचाक्षरीमंत्राची उत्पत्ती झाली आहे. सर्व जगताचे मूल असलेल्या पंचाक्षरीचे मूळ प्रणव असल्यामुळे प्रणवाला मूलमंत्र असे म्हटले जाते.

ॐकारातील अकार, उकार व मकार हे तीन वर्ण सत्, चित् व आनंद यांचे वाचक आहेत. म्हणून एका प्रणवाने सच्चिदानंदस्वरूप, अद्वितीय व निष्प्रपंच अशा परशिवब्रह्माचा बोध होतो. ॐकार हा निष्प्रपंच ब्रह्माचा प्रतिपादक कसा? तर सोऽहम् हा अजपा गायत्री मंत्र असून तो एका दिवसात २१,६०० वेळा जपला जातो. सोऽहम् म्हणजे तो (परमात्मा) मीच आहे. हा मंत्र भेदघटित असल्यामुळे त्यामधील सकाराचा व इकाराचा त्याग केल्यावर ॐ हे एकाक्षर अवशिष्ट राहते. म्हणून ॐकार हा निष्पप्रंपच ब्रह्माचा प्रतिपादक आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.१९–२०). अथर्वशिर उपनिषदात सुद्धा ॐकार सच्चिदानंदब्रह्मप्रतिपादक आहे हे स्पष्ट केले आहे (२.३).

षडक्षरमंत्रातील ॐकारामुळे शिवाच्या निष्कल रूपाचा बोध होतो व पंचाक्षरीमुळे शिवाच्या सकल रूपाचा बोध होतो म्हणून षडक्षरमंत्र हा शिवाच्या निष्कल (निराकार) व सकल (साकार) अशा उभयस्वरूपाचा वाचक होय. या मंत्रजपामुळे सकल शिवाचा अनुग्रह होतो आणि निष्कल शिवाची प्राप्ती होते (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.२१–२२).

षडक्षरमंत्रातील सहा अक्षरे मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा या षट्चक्रांत वसणाऱ्या आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग या षड्लिंगांची बीजाक्षरे आहेत, असे मरितोंटदार्य म्हणतात. (अनुभवसूत्र, ६.४७–५२).

प्रणवसहित पंचाक्षरमंत्र जेव्हा वेगवेगळ्या बीजाक्षरांनी युक्त होतो तेव्हा तो प्रसादपंचाक्षर, मायापंचाक्षर, सूक्ष्मपंचाक्षर, स्थूलपंचाक्षर व मूलपंचाक्षर या नावांनी ओळखला जातो.

### मंत्रजपाचा अधिकार

**दीक्षापूर्वं गुर्रोलब्ध्वा मंत्रमाज्ञां समाहितः ।**
**संकल्प्य च जपेन्नित्यं पुरश्चरणपूर्वकम् ।।** चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.४८

अर्थ असा की, श्रीगुरूकडून दीक्षापूर्वक मंत्र घेऊन त्यांची आज्ञा शिरोधार्य मानून पुरश्चरण केल्यानंतर प्रतिदिवशी संकल्प करून जप करावा. या आगमोक्तीप्रमाणे गुरूकडून दीक्षा घेतलेला मनुष्यच मंत्रजपाचा अधिकारी आहे. जो दीक्षेशिवाय ग्रंथात लिहिलेला मंत्र वाचून जप करतो त्याचा जप सफल होत नाही व त्याला दोष लागतो. याप्रमाणे मंत्रजापकाने प्रथम दीक्षा घेणे अगत्याचे आहे.

### जप व त्याचे प्रकार

'तज्जपस्तदर्थभावनम्' (योगसूत्र, १.२८) या महर्षी पतंजलींच्या सूत्रानुसार मंत्रार्थाचे निरंतर अनुसंधान करणे म्हणजे जप होय. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त 'जपः पंचाक्षराभ्यासः प्रणवाभ्यास एव वा' (९.२३) अर्थात् पंचाक्षर अथवा प्रणवाचा अभ्यास म्हणजे जप होय, असे म्हटले आहे. पुन:पुन्हा आवृत्ती करणे याला अभ्यास म्हणतात. अशा प्रकारे निरंतर घडणाऱ्या अभ्यासाला 'जपयज्ञ' असे म्हणतात. वीरशैवांच्या पंचयज्ञात जप हा एक यज्ञ आहे. पशुहिंसेने दूषित अशा सोमादी यज्ञापेक्षा जपयज्ञ उत्तम मानला जातो.

मंत्रजप करताना जर त्याचा ऱ्हस्व उच्चार झाला तर ते रोगाचे कारण होते. दीर्घ उच्चार झाला तर संपत्तीचा क्षय होतो. मंत्रोच्चार करताना मंत्राच्या अक्षरांत अंतर असू नये. त्याचा उच्चार सलग करावा (हिंदी विश्वकोश, पृ. १७५).

जपाचे वाचिक, उपांशू व मानस असे तीन प्रकार आहेत. शेजारी बसलेल्या माणसाला स्पष्ट ऐकू येईल असा केलेला जप 'वाचिक जप' होय. जपाचा हा कनिष्ठ प्रकार असला तरी तो मन, वाणी व शरीर यांच्यापासून होणाऱ्या पापांचा नाश करणारा आहे (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.२७-२८, चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.५७). वाचिक जपामुळे अत्यंत चंचल असे चित्त स्थिर होते. यासाठी प्रारंभिक अवस्थेत साधकाने वाचिक जप करावा. याचा अभ्यास निर्जनस्थानी केला पाहिजे.

जप करताना जेव्हा ओठांची किंचित हालचाल होते, परंतु जवळ बसलेल्या

लोकांना मंत्रोच्चार ऐकू येत नाही असा मंद उच्चार ज्या जपात होतो तो 'उपांशू जप' होय. हा जप सर्व जपांपेक्षा उत्कृष्ट परंतु मानसजपापेक्षा कनिष्ठ असून या जपामुळे मानसिक स्थैर्य प्राप्त होते.

जीभ किंवा ओठ न हलविता मंत्रार्थाचे चिंतन करीत मनातला मनात केला जाणारा जप हा 'मानसिक जप' होय. हा जप सर्व जपांत उत्कृष्ट मानला जातो. वाचिक जप एकपट फलदायक, उपांशू जप शतपट फलदायक तर मानसिक जप सहस्रपट फलदायक आहे. म्हणून मानसिक जपच सर्वश्रेष्ठ होय (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.३१-३२).

वाचिक, उपांशू व मानसिक या तीन जपांचे प्रत्येकी पुन्हा अगर्भ, सगर्भ व सध्यान असे तीन भेद होतात. प्राणायाम न करता केलेला 'अगर्भ जप' असून प्राणायाम करून केलेला 'सगर्भ जप' होय. शिवध्यान करीत केला जाणारा 'सध्यान जप' आहे. सगर्भ जप करताना चोवीस वेळा, पाच वेळा अथवा तीन वेळा इच्छेनुसार प्राणायाम करावा. अगर्भ जपापेक्षा सगर्भ श्रेष्ठ, तर सगर्भापेक्षा सध्यान जप श्रेष्ठ आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त देखील जप करण्याआधी तीन वेळा प्राणायाम करून ध्यानपूर्वक जप करावा, असे स्पष्ट सांगितले आहे (८.२५-२६). अर्थात् सगर्भ सध्यान जप करावा, असा याचा अर्थ आहे.

### जपविधी

मंत्रजप करण्यापूर्वी त्याची देवता व न्यासपद्धती जाणून घ्यावी. पंचाक्षरमंत्राचे ऋषी 'वामदेव' आहेत. छंद 'पंक्ती' असून 'सदाशिव' ही देवता आहे. 'ॐकार' हे बीज असून 'उमा' ही शक्ती आहे. 'शिव' याचा कीलक होय. मंत्रजप करताना वर सांगितलेल्या ऋषी इत्यादींना आपल्या शरीराच्या विभिन्न स्थानांशी भावनेने संबंधित करणे याला 'न्यास' म्हणतात. मस्तकात ऋषी, मुखात छंद, हृदयात देवता, आधारचक्रात बीज व शक्ती आणि पायात कीलक याची भावना करणे हाच न्यास होय.

न्यास हा करन्यास, देहन्यास व अंगन्यास असा त्रिविध आहे. याशिवाय सृष्टिन्यास, स्थितिन्यास, व संहारन्यास असे याचे तीन प्रकार होतात. सृष्टिन्यास ब्रह्मचाऱ्यासाठी, स्थितिन्यास गृहस्थांसाठी व संहारन्यास वानप्रस्थ-संन्याशांसाठी

सांगितलेला आहे. वीरशैवसिद्धान्तात आश्रमभेद मानत नाहीत. म्हणून वरील तिन्हीपैकी आवडीप्रमाणे कोणताही न्यास साधकाने करावा. आपल्या दीक्षागुरूकडून न्यासाविषयी माहिती घ्यावी.

घर, गाईचा गोठा, पुण्यारण्य, उद्यान, रम्य पर्वत, नदीकिनारा, देवालय इत्यादी ठिकाणी सूर्य, अग्नी, गुरू, चंद्र, दीप, जल, विप्र व गाय यांच्या सान्निध्यात मंत्रजप करावा. त्यामुळे तो अधिक फलप्रद होतो. सूर्य इत्यादींच्या साक्षीने मंत्रजप केल्यास तो शत, सहस्र, अयुत, लक्ष, कोटी पटींनी फलप्रद होतो तर डाव्या तळहातावर इष्टलिंग ठेवून त्याच्यावर दृष्टी ठेवून जेव्हा जप केला जातो तेव्हा त्याचे फळ सांगणे अशक्य आहे, असे 'चंद्रज्ञानागमा'त म्हटले आहे (क्रियापाद, ८.७२–७४). म्हणून वर सांगितलेल्या स्थानी इष्टलिंगाच्या साक्षीने वीरशैवांनी जप करावा.

जपाच्या वेळी कृष्णाजिन, व्याघ्रचर्म, कुशासन वा कंबलासन अशी आसने सांगितलेली असली तरी वीरशैव साधकाने कुशासन अथवा कंबलासन यांपैकी कोणत्याही एका आसनावर सुखासन किंवा सिद्धासन घालून पूर्व अथवा उत्तर दिशेकडे मुख करून बसावे. दिशांची वेगवेगळी फले सांगितली आहेत. पूर्व दिशा– इष्टसिद्धी, दक्षिणदिशा–शत्रुनाश, पश्चिमदिशा–धनप्राप्ती, उत्तरदिशा–शांतिप्राप्ती (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.५३,७६).

जप करण्यासाठी अंगुलीरेखा, पुत्रजीवी, शंखमणी, प्रवाळ, स्फटिक, मोती, कमलबीज, सुवर्ण, दर्भ आणि रुद्राक्ष यांपैकी कोणतीही माला वापरावी. यामध्ये पहिल्यापेक्षा दुसरी उत्तरोत्तर श्रेष्ठ मानली जातो. म्हणून रुद्राक्षमाला सर्वश्रेष्ठ व अनंत फलदायक आहे. माळ जपताना त्यातील मणी अंगठ्याने ओढला तर मोक्षप्राप्ती, तर्जनीने ओढला तर शत्रुनाश, मध्यमेने ओढला तर धनप्राप्ती, अनामिकेने ओढला तर शांतिप्राप्ती व कनिष्ठिकेने ओढला तर आकर्षणशक्ती लाभते (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.६५–७०). मुमुक्षू साधकाने अंगठ्याने मणी ओढून जप करावा.

### मंत्रदोष

जप करणाऱ्या साधकाने फेटा बांधून, सदरा घालून, नग्न होऊन, केस मोकळे सोडून जप करू नये. जप करताना जप अपवित्र असू नये. त्यावेळी बोलू नये.

क्रोध, मद, भूक, आळस, जांभई यांपासून दूर राहावे. जप करताना ही विघ्ने आली तर जप थांबवून आचमन करावे व नंतर शिवस्मरण व प्राणायाम करून जप करावा. त्याचप्रमाणे भोजन करताना, झोप येत असताना, चालताना, उभे राहून, रथात बसून आणि अमंगल स्थानी जप करू नये. पाय लांबवून, चिंताग्रस्त होऊन जप करू नये (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.७७-८०). श्रीगुरूने उपदेशिलेला मंत्र अत्यंत गुप्त ठेवावा. कोणालाही सांगू नये. मंत्रातील कोणत्याही अक्षराचा लोप करू नये अथवा चुकीचा उच्चार करू नये.

वरील सर्व नियम पाळून व दोष टाळून अवधानपूर्वक जप करणे आवश्यक आहे. अन्यथा मूक, सुप्त, मृत, नग्न, वीर्यहीन, वृथाफल, भुजंग, कीलित व शून्य हे दोष उत्पन्न होतात. न्यासाशिवाय जप केला तर तो **मूक**, आसनाशिवाय केला तर **सुप्त**, ॐकाराशिवाय मंत्रोच्चार केल्यास **मृत**, नमः स्वाहा वशट् वौशट् हुम् फट् इत्यादी पल्लवरहित केला तर **नग्न**, अधिक वर्णांचा उच्चार झाल्यास **वीर्यहीन**, गुरूपदेशाशिवाय जप केला तर **वृथाफल**, ऋषि-देवता-छंदविहीन केल्यास **भुजंग**, अनेक बीजाक्षरांनी व्याप्त झाल्यास **कीलित** आणि दुसऱ्यांना ऐकू येईल असा केल्यास **शून्य** हे दोष उत्पन्न होतात (लिंगधारणचंद्रिका, पृ. २३४-२३५).

याशिवाय अभक्त, अक्षरभ्रांती, लुप्त, छिन्न, ऱ्हस्व, दीर्घ, कथन व स्वप्नकथन हे मंत्रोच्चारासंबंधी दोष आहेत. मंत्रावर श्रद्धा नसणे हा **अभक्त** दोष, गुरू किंवा शिष्य यांच्या प्रमादाने मंत्राक्षरे मागेपुढे होणे म्हणजे **अक्षरभ्रांती**. मंत्रातील एखादे अक्षर लुप्त होणे हा **लुप्त** दोष. मंत्रातील जोडाक्षरांचा स्वतंत्र उच्चार करणे हा **दीर्घ** दोष. गोपनीय मंत्र इतरांना सांगणे हा **कथन** दोष आणि स्वप्नात कोणाला मंत्र सांगणे हा **स्वप्नकथन** दोष होय (वीरशैवानंदचंद्रिका, पृ. ६४).

अक्षरभ्रांतीपासून स्वप्नकथनापर्यंत कोणताही दोष घडला तर गुरूकडून पुन्हा मंत्रोपदेश घ्यावा. अभक्तदोषाच्या निवृत्तीसाठी मंत्रावरील श्रद्धा दृढ करावी. मंत्रजप करताना वरील दोष घडल्यास मंत्रजप फलदायी ठरत नाही.

**पुरश्चरण**

आपल्या इष्टदेवतेच्या मंत्रसिद्धीसाठी निश्चित संख्येने जप करून त्याच्या

दशमांश होम, तर्पण, अभिषेक आदी कर्मे करणे याला 'पुरश्चरण' म्हणतात (हिंदी विश्वकोश, पृ. १७६).

'चंद्रज्ञानागमा'त पंचाक्षरी मंत्राचे पुरश्चरण पुढीलप्रमाणे सांगितले आहे. मंत्रात जेवढी अक्षरे आहेत त्यातील प्रत्येक अक्षरासाठी एक लक्ष (एकूण पाच लक्ष), त्याच्या चारपट म्हणजे एकूण वीस लक्ष जप करावा. गुरूकडून दीक्षा घेतल्यावर युक्ताहारी व संयमी होऊन घरातील पूजाघरात अथवा एखाद्या पवित्रस्थानी बसून इष्टलिंगाच्या साक्षीने वीस लक्ष जप पूर्ण करावा. त्यानंतर त्याच्या दशमांश होम, होमाच्या दशमांश तर्पण, तर्पणाच्या दशमांश अभिषेक व अभिषेकाच्या दशमांश भोजन ही कर्मे करावीत. हे सर्व मिळून पंचाक्षरी मंत्राचे एक पुरश्चरण होय.

याप्रमाणे पुरश्चरण केल्यावर मंत्र सिद्ध होतो. त्यानंतर प्रतिदिन विधिपूर्वक १००, ५००, १००० एवढ्या संख्येने शक्य होईल तेवढा जप करावा. जो भोजनापूर्वी स्नान करून प्रतिदिनी १००८ जप करतो त्याला सद्‌गती प्राप्त होते (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ८.१२,१३,४९,५१).

मंत्रशास्त्रात मंत्राचे सुसिद्ध, सिद्ध, साध्य व रिपू असे चार प्रकार सांगितले आहे. श्रीगुरूने स्वतः पुरश्चरण करून उपदेशिलेला मंत्र **सुसिद्ध** मंत्र होय. गुरूने पुरश्चरण करीत असताना मधल्या काळात उपदेशिलेला मंत्र हा **सिद्ध** मंत्र, पुरश्चरण न करता गुरूने उपदेशिलेला मंत्र हा **साध्य** मंत्र होय. पंचाक्षरी मंत्र सुसिद्ध, सिद्ध, साध्य असू शकतो. परंतु कोणाचाही **रिपू** (शत्रू) असू शकत नाही.

आतापर्यंत जपाचे अनेक नियम सांगितलेले असले तरी जर कोणी सश्रद्ध मनुष्य एखाद्या नियमाचा भंग करून पंचाक्षरी मंत्राचा जप करील तरीही त्याचा जप निष्फळ होत नाही (चंद्रज्ञानागम, ८.८४). मंत्र, तीर्थ, ब्राह्मण, देवता, ज्योतिषी व औषधी यांच्यामध्ये ज्याची जशी भावना असते तशी त्याला सिद्धी मिळते. म्हणून जपविधीत नियमांपेक्षा श्रद्धेची नितांत आवश्यकता आहे. श्रद्धाळू व्यक्तीकडून नियमभंग झाला तरी त्याचा जप निष्फळ होत नाही (वातुलशुद्धाख्यतंत्र, १०.७-८).

अन्य मंत्रांचा अनेकदा जप केल्यावर ते फलप्रद होतात, परंतु महाशक्तिमान

असा पंचाक्षरी मंत्र मात्र केवळ एकदाच उच्चारला तरी तो फलप्रद होतो (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.४०-४१). म्हणून वीरशैवांनी पंचाक्षरी मंत्राचा शक्य होईल तेवढा जप करावा. या मंत्राच्या निरंतर जपाने साधकाच्या मांसपिंडाचे मंत्रपिंडात रूपांतर होते. याचा अर्थ साधकाचे शरीर मंत्रमय होऊन जाते. असा साधक साक्षात् शिवस्वरूप मानला जातो (अनुभवसूत्र, ६.५३-५५).

**पंचाक्षरमाहात्म्य**

पंचाक्षर महामंत्राचे माहात्म्य अपार आहे. सानंदनामक योगीश्वराने या मंत्राचा एकवेळा उच्चार करून अठ्ठावीस कोटी पाप्यांचा नरकातून उद्धार केला. शतानंद महर्षींनी याच मंत्राचा उच्चार करून नरकाचा स्वर्ग बनविला. उपमन्यू महर्षी या मंत्रजपामुळे शैवाचार्य झाले. वसिष्ठ, वामदेव इत्यादी महर्षी या मंत्रजपाने शापानुग्रहसमर्थ बनले. ब्रह्मा, विष्णू व रुद्र या तिघांनी सृष्टि-स्थिति-संहारसामर्थ्य याच मंत्रजपाने प्राप्त केले. एवढेच नव्हे, तर प्रणवसहित पंचाक्षरजपाने व इष्टलिंगपूजेमुळे दुरितांपासून मुक्त होऊन त्यांनी मोक्षलक्ष्मी प्राप्त करून घेतली (श्रीसिद्धान्तशिखामणी, ८.४४-४९).

प्रणवसहित पंचाक्षरमंत्र हा 'जपतो नास्ति पातकम्' या उक्तीनुसार पातकांचे निवारण करून परम मुक्ती देऊन साधकाचे सांसारिक दुःखांपासून रक्षण करतो. म्हणून मंत्राला रक्षाकवचरूप आवरण मानले आहे.

ज्याप्रमाणे हस्तपादादी अंगाशिवाय लौकिक व्यवहार करणे शक्य होत नाही त्याप्रमाणे साधकाचा आध्यात्मिक व्यवहार अष्टावरणाशिवाय शक्य होत नाही. म्हणून वीरशैव साधकाने अष्टावरणाचे अवश्य पालन करावयास हवे.

■■

प्रकरण चौथे

# पंचाचार

शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धान्ताला वीरशैवसिद्धान्त असे म्हणतात. मोक्षरूपी पुरुषार्थाच्या प्राप्तीसाठी साधकाला पूर्वोक्त अष्टावरण साहाय्यक होतात, त्याप्रमाणे पंचविध आचारदेखील त्याला साहाय्यक साधने होत. पंचाचारामुळे काया, वाचा आणि मन या त्रिकरणांची शुद्धी होते. म्हणून या प्रकरणात प्रथम आचाराचे स्वरूप स्पष्ट करून नंतर पंचाचारांचे विवेचन केले आहे.

### आचार शब्दाचा अर्थ

आचार, आचरण व अनुष्ठान हे समानार्थक शब्द आहेत. शास्त्रविहित धर्मविशेषाला आचार म्हटले जाते. 'सतां सज्जनानामाचार: सदाचार:' अर्थात् सज्जनलोक जे आचरण करतात त्याला सदाचार म्हणतात. आचार हेच धर्माचे मूल आहे. सदाचाराच्या विरुद्ध जे आचरण त्याला दुराचार असे म्हटले जाते.

### आचार : एक अलंकार

आचार हा मनुष्यमात्राचा उत्कृष्ट अलंकार होय. वस्त्र आणि सुवर्णालंकार यांपेक्षा आचार अधिक श्रेष्ठ मानला जातो. वस्त्रादींनी अलंकृत झालेले लोक जर आचारसंपन्न नसतील तर त्यांची सर्वत्र निंदाच केली जाते. वस्त्रालंकार नसलेले आचारसंपन्न असे लोक मात्र जगात पूज्य मानले जातात. ज्ञान आणि आचार यांची तुलना केल्यास ज्ञान हे अधिक उत्कृष्ट आहे असे म्हटले जाते. परंतु आचारशून्य ज्ञानदेखील शिवाचा अनुग्रह प्राप्त करून घेण्यास असमर्थ ठरते. म्हणून शिवानुग्रहाच्या प्राप्तीसाठी आमरण सदाचारशील राहिले पाहिजे. 'चंद्रज्ञानागमा'त स्पष्ट सांगितले आहे:-

**आचार एव सर्वेषामलंकाराय कल्पते ।**
**आचारहीन: पुरुषो लोके भवति निंदित: ।।** क्रियापाद, ९.१६

सदाचारयुक्त ज्ञानामुळे महेश्वर प्रसन्न होतो. म्हणून ज्ञानी जनांनी देहपात होईपर्यंत आचारसंपन्न असले पाहिजे. आचार हाच परमधर्म असून आचार हे

श्रेष्ठ धन होय. लौकिक आणि पारमार्थिक जीवनात आचाराची आवश्यकता असते. आचारशील पुरुषाचा अंतरात्मा सदैव प्रसन्न असतो. त्याचे शरीरस्वास्थ्य उत्तम राहते आणि तो दीर्घायुषी होतो. दुराचारी लोक लोकनिंदेस पात्र ठरतात. आधी-व्याधीने ग्रस्त होतात आणि अल्पायुषी ठरतात. म्हणून सदाचार हा माणसासाठी कल्पवृक्षासमान आहे. सदाचारामुळेच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची प्राप्ती होते. वीरशैवसिद्धान्तात केवळ ज्ञान हे मुक्तीचे कारण मानले जात नसून आचारयुक्त ज्ञानाला मोक्षाचे कारण मानले आहे. या सिद्धान्तात ज्ञान-कर्माचा समुच्चय मान्य केलेला आहे. या सिद्धान्तात ज्ञान होण्यापूर्वी आणि ज्ञानोत्तर अवस्थेत देखील सर्व वीरशैवांसाठी पंचाचारांचे पालन आवश्यक आहे. 'चंद्रज्ञानागमा'त म्हटले आहे:-

**लिंगाचार: सदाचार: शिवाचारस्तथैव च ।**
**भृत्याचारो गणाचार: पंचाचारा: प्रकीर्तित: ।।** क्रियापाद, ९.५

लिंगाचार, सदाचार, शिवाचार, भृत्याचार आणि गणाचार हे पंचाचार होत.

## १. लिंगाचार

अंग म्हणजे जीवात्मा लिंगस्वरूपाच्या प्राप्तीसाठी जे आचरण करतो त्याला 'लिंगाचार' म्हटले जाते. कायेने लिंगपूजन, मनाने शिवचिंतन आणि भावनेने त्याचे निदिध्यासन करणे म्हणजे लिंगाचार होय. श्रीगुरू शिष्याला क्रियादीक्षेद्वारा इष्टलिंग प्रदान करतात, मंत्रदीक्षा देऊन प्राणलिंगस्वरूपाचा उपदेश करतात आणि वेधदीक्षेत भावलिंगाचा बोध करतात. अशा प्रकारे त्रिविध दीक्षेद्वारा प्राप्त इष्टलिंग, प्राणलिंग व भावलिंग यांचे गुरूपदेशानुसार पूजन, चिंतन आणि निदिध्यासन करणे यालाच लिंगाचार म्हणतात.

दीक्षासंपन्न वीरशैवांना इष्ट, प्राण, भाव या लिंगांव्यतिरिक्त अन्य देवांचे पूजन निषिद्ध मानले आहे. ज. रेणुकाचार्यांनी या त्रिविध लिंगांशिवाय अन्य स्थावरलिंग किंवा अन्य देवतांचे अर्चन यांचा निषेध केला आहे. ते म्हणतात:-

**सदा शिवैकनिष्ठानां वीरशैवाध्ववर्तिनाम् ।**
**नहि स्थावरलिंगानां निर्माल्याद्युपयुज्यते ।।** श्रीसिद्धान्तशिखामणी, ९.३४

अर्थात् शिवलिंगनिष्ठ वीरशैवमार्गी भक्तासाठी स्थावरलिंगाचे निर्माल्य, प्रसाद

अयोग्य मानला गेला आहे. म्हणून त्याचा स्वीकार करू नये.

या ठिकाणी अन्य देवार्चनाचा निषेध करण्याचा उद्देश त्या देवतांना कमी लेखणे हा नसून इष्टलिंगार्चनेमध्ये साधकाची श्रद्धा दृढ व्हावी, हा आहे. वीरशैवांची लिंगोपासना सती-पतिभावमय आहे. वीरशैव साधक स्वत:ला सती आणि इष्टलिंगाला पती समजून उपासना करीत असतो. लोकव्यवहारात पतिव्रता आपल्या पतीवाचून अन्य पुरुषावर प्रेम करीत असेल तर ती अयोग्य मानली जाते. त्याप्रमाणे साधक भक्त इष्टलिंगाव्यतिरिक्त अन्य देवतेच्या उपासनेत रत झाला तर तो दोषी मानला जातो. त्यामुळे या सिद्धान्तात अन्यदेवोपासना निषिद्ध मानली जाते. लिंगाचाराच्या पालनामुळे इष्टलिंगोपासनेविषयी साधकाची निष्ठा दृढ होऊन तो अंर्तमुख होतो आणि आंतरलिंगार्चनासाठी समर्थ होतो.

## २. सदाचार

वीरशैवांच्या पंचाचारातील दुसरा आचार सदाचार आहे. शिव आणि शिवभक्तांना आनंदित करणारा असल्यामुळे याला सदाचार म्हणतात. सज्जनांना आनंदित करणाऱ्या या सदाचाराचे स्वरूप 'चंद्रज्ञानागमा'त स्पष्ट केले आहे:-

**धर्मार्जितेन द्रव्येण यत् संतर्पणमन्वहम् ।**
**गुरुलिंगजंगमानां सदाचार इति स्मृत: ।।** क्रियापाद, ९.६

याचा अर्थ असा- वीरशैवधर्मदर्शनात गुरू, लिंग आणि जंगम यांना आराध्य मानले जाते. या तिघांचा अनुग्रह प्राप्त करण्यासाठी धर्ममार्गाने द्रव्यार्जन करून या तिघांना अन्न, वस्त्र व धन आदी दान करून यांची साधकाने सेवा केली पाहिजे. दान केल्याशिवाय अन्नादी वस्तूंचा उपभोग घेणारा मनुष्य पापी समजला जातो. हे दानदेखील कर्तव्यभावनेने करावे लागते. दान करताना फलाची अपेक्षा ठेवू नये. वीरशैवसिद्धान्तात दानाचे सोपाधिक, निरुपाधिक आणि सहज असे तीन प्रकार मानले जातात. फलाच्या अपेक्षेने केले जाणारे दान हे सोपाधिक असून फलाची अपेक्षा न ठेवता ईश्वरार्पण बुद्धीने केलेले दान निरुपाधिक दान होय. दान घेणारा, दान देणारा आणि दानवस्तू हे शिवच होय अशी भावना ठेवून स्वत:ला दानी न मानता जे दान केले जाते त्याला सहजदान म्हणतात. त्रिविध

दानांत सहजदान उत्कृष्ट असून या दानाने गुरू, लिंग आणि जंगम यांना संतुष्ट करणे हाच वीरशैवांचा सदाचार होय. सदाचाराच्या अंतर्गत 'चंद्रज्ञानागमा'त आठ शीलतत्त्वे सांगितली आहेत. ती खालीलप्रमाणे:–

१. अंकुरशील : सद्गुरूने दिलेल्या दीक्षेने भक्ताचे शरीर दिव्य होते. त्याच्याठायी असलेले त्रिमल (आणवमल, मायीयमल, कार्मिकमल) नष्ट होतात. त्यामुळे त्याच्या हृदयात दिव्यभाव निर्माण होतो. तो दिव्यभाव म्हणजे 'अंकुरशील' होय.

२. उत्पन्नशील : भक्त ज्या दीक्षासंस्काराने परिशुद्ध होतो, तोच दीक्षासंस्कार पत्नी, पुत्र, नातू इत्यादींना गुरूकडून करवून तो त्यांच्या सहवासात राहतो. या आचाराला 'उत्पन्नशील' म्हणतात.

३. द्विदलशील : प्रत्येक कुटुंबातील प्रौढांनी भगवान शिवाला आवडणाऱ्या वस्तू म्हणजे इष्टलिंग, भस्म, रुद्राक्ष ही शिवचिन्हे आपल्या शरीरावर अत्यंत आनंदाने धारण करावीत. त्याबद्दल मुळीच संकोच बाळगू नये. त्यामुळे बालक आणि युवक यांच्यासमोर आदर्श राहील. यालाच 'द्विदलशील' म्हणतात.

४. प्रवृद्धशील : साधकाने भगवान शिवाचे सदैव गुणसंकीर्तन करावे, श्रवण केलेल्या ज्ञानाचे मनन करावे, मनन केलेल्या ज्ञानाचा निदिध्यास धरावा. यामुळे भक्ती वृद्धिंगत होते. म्हणून याला 'प्रवृद्धशील' म्हणतात.

५. सप्रकांडशील : इष्टलिंगपूजेचे व्रताचरण साधकाने अत्यंत दक्षतेने केले पाहिजे. इष्टलिंगपूजा केल्याशिवाय काहीही सेवन न करण्याचा संकल्प केला पाहिजे. हा संकल्प म्हणजे 'सप्रकांडशील' होय.

६. सशाखशील : इष्टलिंगाला अर्पण केल्याशिवाय कोणताही पदार्थ न स्वीकारणे म्हणजे 'सशाखशील' होय. 'तेन त्यक्तेन भुंजीथा:' असे श्रुतिवचन आहे. 'आधी अर्पण मगच ग्रहण' हे महत्त्वपूर्ण सूत्र आहे.

७. सपुष्पशील : भगवान शिवाला अर्पण केलेला पदार्थ प्रसाद म्हणून स्वीकारला पाहिजे. त्याचा मुळीच त्याग करू नये. शिवार्पित केलेले अन्न किंवा पदार्थ याचा त्याग करणे हे वीरशैवधर्माने निषिद्ध मानले आहे. दीक्षासंस्कार झालेले भक्त प्रसादसेवनानंतर ताट धुवून ताटातील पाणी पितात. अन्नाचा एक कणही टाकला जाऊ नये हा उद्देश या आचारामागे असतो. या आचाराला

'सपुष्पशील' म्हणतात.

८. सफलशील : गुरू, लिंग आणि जंगम यांना समभावनेने पाहणे म्हणजे 'सफलशील' होय. परशिवाची एकच मूर्ती कार्यभेदाने त्रिविध स्वरूपांत दिसते. गुरू उपदेशासाठी, लिंग पूजेसाठी आणि जंगम आचाराच्या आदर्शासाठी असतात. 'एक मूर्ति: त्रयो भागा: गुरुलिंगजंगम:' म्हणून तिघांबद्दल आपण समान पूज्यभाव बाळगला पाहिजे.

जे भक्त अत्यंत निष्ठेने ही आठ शीलतत्त्वे आपल्या आचरणात आणतात त्यांना भगवान शिवाच्या अनुग्रहाने तत्काळ परमसुखाची प्राप्ती होते.

**सदाचारप्रिय: शंभु: सदाचारेन पूज्यते ।**
**सदाचारं विना तस्य प्रसादो नैव जायते ।।** श्रीसिद्धान्तशिखामणी, १६.६६

अर्थात् शिवाला सदाचार प्रिय आहे. सदाचाराशिवाय शिवाचा कृपाप्रसाद लाभणार नाही. त्यामुळे ज्ञानी व्यक्तीने सदाचाराचे पालन केले पाहिजे.

## ३. शिवाचार

**शिव एव परं ब्रह्म पंचकृत्यपरायण:।**
**न ततोऽन्या गतिरिति शिवाचारो हि कीर्तित:।।** चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ९.७

अर्थात् सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह व अनुग्रह या पंचकृत्यांचा कर्ता शिव आहे. तोच माझा अनन्यरक्षक आहे, अशा भावनेने वर्तन करणे यालाच 'शिवाचार' म्हणतात. अशा शरणागतीमुळे हळूहळू साधकाच्या मनात शिवभाव दृढ होऊन त्याच्याठायी शिवदृष्टी उत्पन्न होते. शिवदृष्टीमुळे साधकाची संकुचित बुद्धी नष्ट होते. समस्त विश्व शिवमय आहे अशी भावना त्याच्या मनात निर्माण होऊन तो कुणाचा द्वेष करीत नाही किंवा कुणाची घृणा करीत नाही. अशा शिवाचारामुळे व्यक्तीची उन्नती आणि समाजाचीही उन्नती होते.

भाव शुद्ध झाल्याशिवाय शिवाचार उत्पन्न होत नाही. म्हणून भावशुद्धीसाठी उपभोग्य पदार्थांची शुद्धी करणे आवश्यक ठरते. म्हणून शिवाचारात द्रव्य, क्षेत्र, गृह, भांड, तृण, काष्ठ, वीटिका, पाक, रस, भव, भूत, भाव, मार्ग, काल, वाक् आणि जन अशा सोळा पदार्थांची शैवागमपद्धतीनुसार शुद्धी करण्याची प्रक्रिया

प्रतिपादन केली आहे. या सोळा शुद्धी पुढीलप्रमाणे:–

१. द्रव्यशुद्धी : फल, मूळ इत्यादींचे शुद्धीकरण हे भक्ताच्या हस्तस्पर्शाने, गुरुपादोदकाने अथवा शुद्ध भस्माच्या प्रोक्षणाने करावे.

२. क्षेत्रशुद्धी : शेताच्या चारी कोपऱ्यात नंदीच्या मुद्रेने अंकित शिला (दगड) किंवा काष्ठ (लाकूड) ठेवून शेताची शुद्धी करावी.

३. गृहशुद्धी : घर बांधताना दगड, विटा, इत्यादी वस्तूंना अभक्तांचा स्पर्श होतो. त्यामुळे बांधकामात दोष येतो. म्हणून घर भक्तांनी बांधलेले असावे अथवा घर शिवलिंगांकित करून शुद्ध करावे. अशा शुद्ध घरातच राहावे.

४. भांडशुद्धी : दैनंदिन व्यवहारात लागणारी भांडी भक्तांनी तयार केलेली असावीत. अथवा भांडी शिवलिंगांकित करून शुद्ध करावीत. अशी शुद्ध भांडीच वापरावीत.

५. तृणशुद्धी : भक्तांनी आणलेले गवत शुद्ध समजावे. अभक्तांनी ते आणलेले असल्यास ते भस्मप्रोक्षण करून शुद्ध करावे.

६. काष्ठशुद्धी : भक्तांनी आणलेले किंवा विभूतीने संस्कार करून शुद्ध केलेले काष्ठ स्वीकारावे. अभक्तांनी आणलेले शक्यतो टाळावे.

७. वीटिकाशुद्धी : पानाचे विडे करताना नागवेलीची पाने भक्ताच्या बागेतील असावीत किंवा भस्माने शुद्ध केलेली असावीत. तसेच सुपारी व इतर पदार्थही असेच शुद्ध करून स्वीकारावेत.

८. पाकशुद्धी : शिवदीक्षा घेतलेल्या व्यक्तीने तयार केलेले आणि अभक्तांनी न पाहिलेले अन्नच ग्रहण करावे.

९. रसशुद्धी : दूध, दही, ताक, तूप इत्यादी पदार्थ म्हशीचे किंवा शेळीचे स्वीकारू नयेत. पवित्र गाईचे दूध, दही, ताक, तूप स्वीकारावे.

१०. भवशुद्धी : काम्यकर्माचा त्याग करावा. निष्काम कर्म करून अंत:करण निर्मल ठेवावे. पुनर्जन्म होऊ नये अशी स्थिती आणि असे ज्ञान संपादन करावे. हीच भवशुद्धी होय.

११. भूतशुद्धी : सर्व प्राणिमात्रांविषयी दयाभाव बाळगावा. कोणत्याही भूताला म्हणजे जीवाला दोष देऊ नये. ही भूतशुद्धी होय.

१२. भावशुद्धी : सर्व प्रकारच्या कामनांचा (इच्छांचा) परित्याग करून

मनात सदैव शिवभाव रुजवावा. ही भावशुद्धी होय.

१३. मार्गशुद्धी : रस्त्याने चालताना मुंग्यांसारखे लहान कीटक पायाखाली दबून त्यांची हिंसा होऊ नये. त्यासाठी काळजीपूर्वक चालावे. ही मार्गशुद्धी.

१४. कालशुद्धी : शास्त्राने दर्शविल्याप्रमाणे नीरव, मनोहर अशा वेळी शिवलिंगाची आराधना करावी. ही कालशुद्धी होय.

१५. वाक्शुद्धी : असत्य, कठोर, बीभत्स, दांभिक भाषण टाळावे. ही वाक्शुद्धी होय. 'साच आणि मवाळ। मितुले आणि रसाळ। का शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे।।' या संतवचनाप्रमाणे आपले बोलणे असावे.

१६. जनशुद्धी : आपण नेहमी सद्भक्तांच्या संगतीत असावे. सज्जनांची संगत सुखावह व हितावह असते. ही जनशुद्धी होय.

अशाप्रकारे सर्व मानवांनी आपल्या नित्य व्यवहारात वरील सोळा पदार्थांची शुद्धी करून शिवाचाराचे पालन केले तर व्यक्ती आणि समाज यांना स्वास्थ्य लाभून साधकाला शिवसायुज्याची प्राप्ती होते.

## ४. गणाचार

वीरशैवांच्या पंचाचारांपैकी गणाचार हा एक महत्त्वाचा आचार होय. 'अनुष्ठितो भक्तगणैर्गणाचार इतीरितः' (चंद्रज्ञानागम, क्रियापाद, ९.५१) या आगमोक्तीनुसार शिवभक्तगणांकडून ज्या आचाराचे अनुष्ठान केले जाते त्याला 'गणाचार' म्हणतात. इष्टदेवता, श्रीगुरू आणि धर्मग्रंथ यांच्याविषयी कोण्या अधार्मिकाकडून निंदा घडली तर सामोपचाराने अथवा दंडोपायाने त्याचा विरोध करून अधार्मिकाला धार्मिक बनवणे हा गणाचार होय. शिवभक्ताने अत्यंत निष्ठेने गणाचाराचे पालन केले पाहिजे. समाज अथवा व्यक्ती यामधील दुर्गुणांना दूर करणे हे गणाचाराचे मुख्य प्रयोजन आहे. निंदा हा दुर्गुण असून ती करणारा निंदक हा जसा दोषी असतो त्याप्रमाणे निंदा ऐकणारा श्रोताही दोषी मानला जातो म्हणून शिवभक्ताने शिवनिंदा कदापि ऐकू नये. आपली इष्टदेवता, सद्गुरू, धर्मशास्त्र, पवित्र क्षेत्रे यांच्यासंबंधी भक्तांच्या मनात नितांत श्रद्धा असते. भक्तांचे ते मानबिंदू असतात. त्यांची कोणी निंदा केल्यास, हेटाळणी अथवा अवमान केल्यास भक्तांना सहन होत नाही. स्वाभाविकपणे भक्तांकडून जी प्रतिक्रिया व्यक्त केली जाते किंवा जे

आचरण केले जाते तो 'गणाचार' होय.

ज्या ठिकाणी स्थावरलिंगाचा नाश होत असेल आणि जेथे गजचर्म, गंगाकपाल, भस्म, कंथा, कमंडलू, भिक्षापात्र, दंड आदी शिवचिन्हे धारण करणाऱ्या जंगमदेवांना आणि शिवभक्तांना उपद्रव होत असेल त्या ठिकाणी वीरशैवांनी स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता शिवलिंगाचा नाश होऊ देऊ नये. शिवभक्तांची व जंगमांची पीडा दूर करावी. या कार्यात त्यांचा प्राण गेला तर त्यांना शिवसायुज्य प्राप्त होते. शिवकार्यासाठी खर्च केलेल्या प्राणाचे सार्थकच होते (श्रीसिद्धान्त–शिखामणी, ९.३४–३५).

जो शिवकार्यासाठी प्राणत्याग करतो, त्याला शिवसायुज्य प्राप्त होते. शिवनिंदा करणाराला उपदेश करून त्याच्या दुर्बद्धीचा संहार करावा. हे शक्य नसेल तर ते स्थान सोडून दुसरीकडे जावे. गणाचार निष्ठेने आचरणाऱ्यांना ऐहिक सुखांची आणि मोक्षाची प्राप्ती होते अशी आगमोक्ती आहे. समाजाचा घटक या नात्याने प्रत्येकाची काही कर्तव्ये असतात. ती कर्तव्ये काही वेळा कठोरपणाने आणि काही वेळेला प्राणपणाने पार पाडावी लागतात. गणाचारातून वीरशैवांचे धैर्य, शौर्य आणि निर्भयता हे गुण दृष्टोत्पत्तीस येतात.

गणाचारातील आचरणीय अशा चौसष्ट शीलांचा विचार 'चंद्रज्ञानागमा'त विस्ताराने सांगितलेला आहे.

**सप्तविध वाचिक शील :** वाचा म्हणजे वाणी, बोलणे. वाणीचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (१) वाचेने यथार्थ भाषण करावे. (२) कुणालाही खूष करण्यासाठी असत्य बोलू नये. सत्य अप्रिय असेल तर बोलूच नये. (३) धर्माचा व ज्ञानाचा बोध करणाऱ्या वेदांचा, आगमांचा आणि पुराणांचा अभ्यास करावा. (४) शिव, शिवभक्त आणि गुरू यांची निरंतर प्रशंसा करावी. (५) शिवाखेरीज इतर कोणत्याही देवतांची आणि मनुष्यांची मुळीच प्रशंसा करू नये. (६) आत्मप्रौढी व आत्मस्तुती कधीही करू नये. (७) कोणत्याही देवतेची आणि मनुष्याची कधीही निंदा करू नये.

**पंचविध पाणिगत शील :** पाणि म्हणजे हात. हातांचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (८) गुरू, लिंग व जंगम यांना आदरपूर्वक नमस्कार करावा. (९) शिवपूजेसाठी रात्रंदिवस पूजासामग्री जमवावी. (१०) रुद्राक्षमाळेने

नेहमी मूलमंत्राचा (पंचाक्षरी मंत्राचा) जप करावा. (११) गुरू, लिंग व जंगमांची नित्य पूजा-अर्चा करावी. (१२) गुरू व जंगमांना यथाशक्ती दान करावे.

**चतुर्विध पादगत शील :** पाद म्हणजे पाय. पायाचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (१३) गुरू आणि जंगमांकडे भक्तीने चालत जावे. (१४) गुरू आणि जंगमांना प्रदक्षिणा घालावी. (१५) पूजासामग्री जमविण्यास चालत जावे. (१६) गुरू व लिंगाच्या पूजेसाठी स्थिर आसन घालावे.

**द्विविध त्वगिंद्रिय शील :** त्वचेने कसे आचरण करावे ते येथे सांगितले आहे. (१७) नित्य इष्टलिंग धारण करावे म्हणजे त्याच्या स्पर्शात असावे. इष्टलिंगाचा वियोग कधीही होऊ नये. (१८) इष्टलिंगाच्या स्पर्शाने रोमांचित व्हावे.

**द्विविध चक्षुरिंद्रियगत शील :** चक्षू म्हणजे डोळे. डोळ्यांचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (१९) अविश्रांतपणे अनुरागपूर्वक इष्टलिंगाचे दृष्टीने अनुसंधान करावे. (२०) शिवलिंग पाहून डोळे आनंदाने भरून यावेत.

**एक जिव्हागत शील :** जिव्हा म्हणजे जीभ. जिभेचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (२१) लिंगाला अर्पिलेल्या नैवेद्याचा स्वीकार करावा.

**एक घ्राणगत शील :** घ्राण म्हणजे नाक. नाकाचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (२२) लिंगार्पित पुष्पांचा सुगंध घ्यावा.

**द्विविध श्रोत्रेंद्रियगत शील :** श्रोत्र म्हणजे कान. कानाचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (२३) गुरू, लिंग व भक्तांची स्तोत्रे ऐकावीत. (२४) गुरू, लिंग व भक्तांची निंदा ऐकू नये.

**पंचविध कायशोधन शील :** काया म्हणजे शरीर. शरीराचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (२५) गुरू, लिंग व जंगम यांचा प्रसाद घेऊन काया शुद्ध करावी. (२६) निषिद्ध विषयांचा इंद्रियनिरोध करावा. (२७) अस्पृश्य वस्तूंच्या स्पर्शानंतर शरीर जलस्नानाने किंवा भस्मस्नानाने पवित्र करावे. (२८) बसताना, झोपताना, वाहनात बसताना, गोठ्यात वावरताना वीरशैव-दीक्षारहित व्यक्तींचा स्पर्श टाळावा. (२९) शरीरावर विभूती, रुद्राक्ष व इष्टलिंग सर्वदा धारण करावे.

**पंचत्रिंशद्विध (३५) मानसिक शील :** मनाचे आचरण कसे असावे ते येथे सांगितले आहे. (३०) निषिद्ध भोगविषयांचा संकल्प करू नये. (ब्रह्मचर्य पाळावे.) (३१) भक्तीशिवाय इतर विषयांची आवड नसावी. (३२) अधर्मावर क्रोध असावा, वैऱ्यावर क्रोध असू नये. (३३) धनाचा लोभ नसावा, शिवपूजेचा असावा. (३४) भक्तांचा मोह असावा, स्त्रीपुत्रादिकांचा मोह असू नये. (३५) इंद्रियांचा मत्सर करावा, व्यक्तीचा करू नये. (३६) धर्म व प्रपंच यांच्याबद्दल मद नसावा, मायेवर जय मिळविण्यास मद असावा. (३७) गुरू व जंगमांचे गुण-अवगुण पाहू नये. (३८) प्राणिमात्रांना त्रास देऊ नये. (३९) प्राणिमात्रांना होत असलेले दु:ख सहन करू नये. (४०) दुसऱ्याला वाईट वाटणार नाही असे आपले बोलणे व वागणे असावे. (४१) शत्रू असो की पुत्र, त्यांच्यात भेदभाव करू नये. (४२) गुरूंनी उपदेशिलेले आगम व निगम यांच्यावर दृढ विश्वास ठेवावा. (४३) मोठ्यात मोठ्या आपत्तीतही धर्म सोडू नये. (४४) शत्रूलाही दोष न देता क्षमा करावी. (४५) मन भोगासक्तरहित असावे. (४६) वाणी व क्रिया यांनी प्रमाद घडू नये. (४७) भगवान शिवाखेरीज अन्य कोणत्याही वस्तूसंबंधी संकल्प करू नये. नेहमी अंत:करणात शिवसंकल्पच करावा. (४८) परद्रव्याचा परिग्रह करू नये. (४९) एखादी इच्छित वस्तू प्राप्त झाली नाही तरी आपली वृत्ती समाधानी असावी. (५०) नेहमी परमेश्वराच्या नामाचे व रूपाचे स्मरण करावे. (५१) भगवान शिवाच्या नामाचे, रूपाचे व गुणांचे चिंतन करावे. (५२) भगवान शिवाची पादसेवन-भक्ती करावी. (५३) भगवान शिवाची आवाहनादिक उपचारांनी मानसपूजा करावी. (५४) भगवान शिवाच्या चरणांना नेहमी प्रणाम करावा. (५५) भगवान शिव हे सेव्य आहेत व मी त्यांचा दास आहे, ही भावना मनात सदैव बाळगावी. (५६) मंगलस्वरूप शिव माझे मित्र आहेत अशा भावनेने वागावे. (५७) आपले सर्वस्व शिवाला अर्पण करावे. (५८) मूलमंत्राचा मानसिक जप करावा. (५९) हृदयात शिवाच्या दिव्य रूपाचे ध्यान करावे. (६०) शिवामध्ये तेलाच्या धारेप्रमाणे मन केंद्रित करावे. (६१) शांत, स्थिर दीपाप्रमाणे मन शिवामध्ये दृढपणे ठेवावे. (६२) सोऽहंभावाने ध्यान करीत इंद्रियव्यवहाराचा भाव मनातून नाहीसा करावा. (६३) शिवाचे अखंडपणे अनुसंधान करावे, चिंतन करावे.

(६४) आपणच शिव आहोत हे जाणून शिवानंद प्राप्त करून घ्यावा. सर्व जग आत्मरूप आहे असे समजावे.

गणाचाराच्या यथायोग्य आचरणाने साधकास शिवसायुज्य प्राप्त होते.

## ५. भृत्याचार

भृत्य म्हणजे सेवक. सेवाभावनेने करायचा आचार म्हणजे 'भृत्याचार' होय. वीरशैवाने शिव आणि शिवाची लिंगरूपे यांच्याशी विनम्र भावनेने आणि सेवाभावनेने वागले पाहिजे. गुरूशीही तसेच वागावे. कारण गुरूच सदाचाराचा, धर्माचरणाचा मार्गदर्शक असतो. त्याचप्रमाणे जीवन्मुक्त, जंगम आणि शिवभक्त यांच्याशीही 'दासोऽहं' अशा भावनेने वागले पाहिजे.

'दासोऽहं' याचा अर्थ 'मी दास आहे' असा होतो. जीवन्मुक्त, जंगम आणि शिवभक्त यांचा मी सेवक आहे, त्यांच्यासाठी सर्व प्रकारचा त्याग करून त्यांची अत्यंत नम्रतापूर्वक सेवा करीन, हा भाव मनात दृढ करून निरंतरपणे त्यांची सेवा वीरशैवांनी केली पाहिजे. सर्व शिवभक्त शिवाची मुले असून ते आपले बांधव आहेत, अशी भावना प्रत्येकाने मनात बाळगावी. प्रत्येक वीरशैवाने परस्पराशी सेवावृत्तीने, आदराने आणि नम्रतापूर्वक वागावे. सर्व प्राणिमात्रावर दया दाखवावी. अहिंसाव्रताचे दक्षतेने पालन करावे. कोणत्याही व्यसनाचा अवलंब करू नये. शिवभक्तापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही, हे आपल्या आचरणाचे सूत्र ठेवावे. सर्व समाजबांधवाशी अत्यंत स्नेहाने, सहकार्याने आणि सेवाभावनेने आचरण करावे.

दासोऽहंभाव नम्रता सूचित करणारा आहे. 'चंद्रज्ञानागमा'त असे म्हटले आहे:-

**शिवभक्त: जना: सर्वे वरिष्ठा: पृथिवितले ।**
**तेषां भृत्योऽहमिति यद्भृत्याचार इति स्मृत: ।।** क्रियापाद, ९.९

या पृथ्वीतलावरील शिवभक्त हे सर्वात श्रेष्ठ आहेत. त्यांचा मी दास आहे असे समजून केले जाणारे आचरण म्हणजे भृत्याचार होय.

सेव्य-सेवकभाव अंगी आल्यावर 'सेव्य हे श्रेष्ठ आणि मी कनिष्ठ' असा भाव मनात सहजपणे दृढ होतो. म्हणून अशा व्यक्तींच्या मनाला अहंकाराचा स्पर्श

मुळीच होत नाही. अहंकाररहित स्थिती प्राप्त झाल्यावरच भृत्याचाराचे आचरण शक्य होते. अन्यथा भृत्याचार आचरणात आणणे शक्य होत नाही. म्हणूनच मन्मथमाऊली म्हणतात:–

**गुरु आणि लिंग–जंगमाची सेवा । देई मज देवा जन्मोजन्मी ।।**

(म्हणे मन्मथशिवलिंग, पृ. २४८)

'श्रीकरभाष्या'चे कर्ते श्रीपतिपंडिताराध्य म्हणतात, 'हे शंकरा, तुमच्या दासांचे जे दास आहेत त्यांचा दास होण्याची बुद्धी मला जन्मोजन्मी देऊन माझे रक्षण करा.'

वीरशैवांसाठी गुरू, लिंग व जंगम हे सेव्य आहेत. त्यांची सेवा आदरपूर्वक केली पाहिजे. जगद्गुरू रेणुकाचार्य 'श्रीसिद्धान्तशिखामणी'त म्हणतात:–

**शिवयोगी शिवः साक्षादिति कैंकर्यभक्तितः ।**
**पूजयेदादरेणैव यथा लिंगं तथा गुरुः ।।** ९.३६

'शिवयोगी हा साक्षात् शिवच आहे असे मानून, समजून गुरू व लिंग यांच्याप्रमाणे त्यांची पूजा आदरपूर्वक सेवकभावाने करावी.'

भृत्याचाराची दोन रूपे आहेत. १. भृत्यभाव, २. वीरभृत्यभाव.

गुरु–लिंग–जंगमांची किंकरभावाने सेवा करणे हा भृत्यभाव होय.

भक्तीच्या उत्कर्षात गुरूला तन, लिंगाला मन व जंगमाला धन अर्पण करून केवळ मोक्षाची अभिलाषा बाळगणे, हा वीरभृत्यभाव होय. वीरभृत्यभाव भक्ताला शिवानुग्रह प्रदान करतो, असे 'चंद्रज्ञानागमा'त म्हटले आहे.

भृत्यभावाने मनुष्याचा अहंकार नाहीसा होतो. अहंकार मनुष्याच्या षड्रिपूंपैकी सर्वात भयंकर रिपू आहे. अहंकारामुळे आपल्या समाजबांधवाबद्दलची सहानुभूतीची, सहकार्याची आणि आत्मीयतेची भावना नष्ट होते. अहंकारामुळे मनुष्याच्या मनात मद, उन्मत्तपणा निर्माण होतो. मदामुळे इतरांबद्दल मत्सर निर्माण होतो. मत्सरामुळे क्रोध निर्माण होतो. क्रोधामुळे कामभाव निर्माण होतो. कामभावामुळे मोह निर्माण होतो. मोहामुळे विवेकशक्ती लोपते. विवेकनाशामुळे बुद्धीचा नाश होतो. बुद्धिनाशामुळे आत्मनाश होतो. आत्मनाश म्हणजे सर्वनाश होय.

भृत्यभाव हा खालच्या स्तरावरील साधकांनाच आवश्यक आहे असे नाही. उच्च स्तरावरील साधकांना सुद्धा भृत्यभाव आवश्यक आहे. उच्च स्तरावरील साधकांच्या मनातही अहंकार निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्याच मनात अहंकार निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. अहंभाव म्हणजे सर्वनाशाचे मूळ आहे. अशा दृष्टिकोनातून भृत्याचाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भृत्यभावानेच समाजातील लोकांत स्नेहभाव, सहकारभाव आणि बंधुभाव निर्माण होईल. परस्परांतील द्वेष, मत्सर, कटुता आणि शत्रुता या दुर्गुणांचा नाश होईल. सर्वत्र स्नेह, समाधान आणि शांती यांचे साम्राज्य अवतरेल.

**समारोप**

वरील पंचविध आचारांना 'पंचाचार' म्हणतात. वीरशैव परंपरेतील सर्व भक्त पंचाचारसंपन्न असतात.पंचाचाराच्या पालनाने सर्वांचे व्यावहारिक जीवन व्यवस्थितपणे चालते. आचारशून्य पुरुष ज्ञानसंपन्न असून देखील लोकनिंदेला पात्र ठरतात. म्हणून अज्ञ असो की सुज्ञ, सर्वांनीच आचरणशील असले पाहिजे. वीरशैव तर पंचप्राणाप्रमाणे पंचाचाराचे पालन करतात.

याप्रमाणे अष्टावरण-पंचाचारयुक्त वीरशैव साधक भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण, ऐक्य या षट्स्थलमार्गाचा अवलंब करून शिवसायुज्य प्राप्त करून घेतो. यासाठीच वीरशैवसिद्धान्तात मोक्षमार्गातील साहाय्यक म्हणून अष्टावरण व पंचाचार यांची आवश्यकता प्रतिपादिली आहे. पंचाचार केवळ वीरशैवांसाठीच नव्हे तर सर्व मानवांना उपयुक्त असल्यामुळे यांचे पालन सर्वांनी करावयास हवे.

■■

प्रकरण पाचवे

# षट्स्थल

वीरशैवदर्शनामध्ये मुक्तीला 'लिंगांगसामरस्य' अशी संज्ञा आहे. षट्स्थलमार्गाने लिंगांगसामरस्याची प्राप्ती होते. शुद्धान्त:करणी, विवेकसंपन्न आणि विरक्त असा जीवात्मा अष्टावरणयुक्त होऊन पंचाचाराचे पालन करीत षट्स्थलमार्गाने लिंगांग-सामरस्यरूपी मुक्ती प्राप्त करून घेतो. लिंगस्थल व अंगस्थल यांची समरसता म्हणजे लिंग-अंग-सामरस्य. या ठिकाणी लिंगस्थल आणि अंगस्थल म्हणजे नेमके काय, अशी जिज्ञासा उत्पन्न होते. 'पारमेश्वरागमा'त परशिवाला 'स्थल' असे संबोधिले आहे (६.७). मायिदेवानी 'अनुभवसूत्रा'मध्ये

**स्थकार: स्थानवाची स्याल्लकारो लयवाचक: ।**
**तयो: कारणभूतं यत् तदेव स्थलमुच्यते ।।** २.४

अर्थात् चराचर विश्व ज्याच्याठायी स्थित असून प्रलयकाली ज्याच्यात लय पावते, असे विश्वाच्या उत्वत्ति-स्थिति-लयाला कारणीभूत असलेले तत्त्व म्हणजे 'स्थल' होय. चिच्छक्तिविशिष्ट स्थलतत्त्व उपासनेसाठी अंगस्थल व लिंगस्थल असे विभक्त होते. लिंगस्थल विभक्त झाल्यावर त्याच्याठायी असलेली चिच्छक्तीदेखील कला व भक्ती अशी दोन ठिकाणी विभक्त होते. भक्ती अंगस्थलाचा आश्रय घेते तर कला लिंगस्थलाचा आश्रय घेते.

कलाशक्ती ही निवृत्तिकला, प्रतिष्ठाकला, विद्याकला, शांतिकला, शांत्यतीताकला व शांत्यतीतोत्तराकला अशी षड्विध होते. त्याचप्रमाणे भक्ती देखील श्रद्धाभक्ती, निष्ठाभक्ती, अवधानभक्ती, अनुभवभक्ती, आनंदभक्ती व समरसभक्ती अशी सहा प्रकारची होते.

कलाशक्तियुक्त लिंगस्थल आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग अशी सहा रूपे धारण करते. तसेच अंगस्थलदेखील भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य अशी सहा रूपे धारण करते. श्रद्धाभक्तीने युक्त असा भक्त भक्तीच्या साहाय्याने क्रमश: पुढील स्थलांत प्रवेश करीत अखेर लिंगाशी समरस होतो.

‘श्रीसिद्धान्तशिखामणी’मध्ये षट्स्थलसिद्धान्त १०१ उपस्थलांमध्ये विभागून वर्णिलेला आहे. ‘पारमेश्वरागमा’मध्ये भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य या षट्स्थलाचे स्वरूप वर्णिले असून भक्त क्रमश: पुढील स्थलात प्रवेश करून मनोविकास करीत ऐक्यस्थलामध्ये लिंगांगसामरस्य प्राप्त करून घेतो, असे म्हटले आहे.

**‘सूक्ष्मागमा’तील षट्स्थलविवेचन**

‘सूक्ष्मागमा’तील क्रियापादात आठव्या पटलामध्ये षट्स्थलाचे वर्णन आढळते. ‘स्थल’ म्हणजे परशिवब्रह्म. हे स्थलतत्त्व अंगस्थल व लिंगस्थल असे द्विविध होते. लिंगस्थल भक्ताच्या उपासनेसाठी आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग अशी सहा रूपे धारण करते. या लिंगांची प्रत्येकी आणखी तीन रूपे होतात.

**लिंगस्थल**

१. आचारलिंग हे सदाचारलिंग, नियताचारलिंग, गणाचारलिंग असे त्रिविध होते. ज्या आचरणामुळे सज्जन लोक व शिवभक्त संतुष्ट होतात ते सदाचारलिंग होय. एकदा स्वीकारलेल्या सदाचाराचा कधीही त्याग न करणे आणि अनवधानाने त्याग घडला तर प्रायश्चित्त म्हणून प्राणत्याग करणे हे नियताचारलिंग. गुरु-लिंग-जंगमाची निंदा न ऐकणे आणि कोणी निंदा करीत असेल तर त्याला शासन करणे हे गणाचारलिंग.

२. गुरुलिंग हे दीक्षागुरुलिंग, शिक्षागुरुलिंग, अनुभावगुरुलिंग असे त्रिविध होते. वेधदीक्षा, मंत्रदीक्षा व क्रियादीक्षा देणारा गुरू हाच दीक्षागुरुलिंग होय. गुरु-लिंग-जंगम ही तीन वेगवेगळी तत्त्वे नसून मूलत: एकच तत्त्व आहे, हे ज्ञान ज्याच्याकडून मिळते ते शिक्षागुरुलिंग (शिक्षा = शिक्षण). अनेक जन्मांतील संस्कार आणि पुण्य यांमुळे ज्ञानाधिक्य प्राप्त होते ते अनुभावगुरुलिंग.

३. शिवलिंग हे इष्टलिंग, प्राणलिंग व भावलिंग असे त्रिविध होते. क्रियादीक्षेच्या वेळी श्रीगुरूकडून मंत्रपूर्वक प्राप्त होते ते इष्टलिंग होय. देहेंद्रियांच्या विकारांपासून मुक्त होऊन शिवाला अंत:करण अर्पण करणे व त्याच्याठायी मन लीन होणे हे प्राणलिंग. जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांत अनुरक्त राहणे व

अज्ञान निवृत्त होणे हे भावलिंग.

४. जंगमलिंग हे स्वयजंगमलिंग, चरजंगमलिंग व परजंगमलिंग असे त्रिविध होते. देहावर नित्य इष्टलिंग व भस्म-रुद्राक्षादी शिवचिन्हे धारण करणे, लिंगपूजेव्यतिरिक्त अन्य कर्मे वर्ज्य करणे आणि सदैव आनंदमग्न राहणे म्हणजे स्वयजंगमलिंग. लिंगाबरोबर समरस होणे व भेदबुद्धिरहित होऊन सर्वत्र संचार करणे हे चरजंगमलिंग. द्वंद्वरहित, स्थिर, गमनागमनरहित होऊन ज्योतिर्लिंगस्वरूप होऊन राहणे हे परजंगमलिंग.

५. प्रसादलिंग हे शुद्धप्रसादलिंग, सिद्धप्रसादलिंग व प्रसिद्धप्रसादलिंग असे त्रिविध होते. पूर्वाचरणाचा त्याग करून व कामक्रोधादींपासून दूर राहून गुरुप्रसादाचा स्वीकार करणे म्हणजे शुद्धप्रसादलिंग. इष्ट, प्राण व भाव या त्रिविध लिंगांच्या ठायी ऐक्यबुद्धी ठेवून त्या लिंगांना अर्पण करून प्रसाद स्वीकारणे हे सिद्ध प्रसादलिंग. शिवोऽहम् भावनेने युक्त होऊन, मन निश्चल ठेवून जंगमाला प्रसाद अर्पण करणे हे प्रसिद्धप्रसादलिंग.

६. महालिंग हे पिंडजमहालिंग, अंडजमहालिंग व बिंद्वाकाशमहालिंग असे त्रिविध होते. देह हे शिवालय व जीवात्मा हा देव आहे, अशी निश्चल भावना म्हणजे पिंडजमहालिंग. पृथ्वी ही पीठिका, आकाश ही पिंडी व हे ब्रह्मांडरूपी लिंग सृष्टीचे कारण आहे असे नि:संदेह ज्ञान होणे हे अंडजमहालिंग. आत्म्याच्या ठायी आकाश आणि आकाशात आत्मा मानणे हे बिंद्वाकाशमहालिंग होय.

**अंगस्थल**

वरील लिंगांची पूजा करण्यासाठी अंगतत्त्व हे भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य अशी सहा रूपे धारण करते. भक्तस्थलाचे गुरुभक्त, लिंगभक्त व जंगमभक्त असे तीन भाव मानले आहेत. वीरशैवदर्शनानुसार गुरू, लिंग व जंगम अशी भक्ताची तीन आराध्ये आहेत. त्यामुळे त्यांची भक्ती करणारा भक्तदेखील त्रिविध मानला आहे. परंतु हे तीन प्रकार नसून गुरु-लिंग-जंगम हे एकरूप असल्यामुळे त्यांची उपासना करणारा भक्तदेखील एकच होय.

१. भक्तस्थलातील भक्त आचारलिंगाची सहा प्रकारे उपासना करीत असल्यामुळे त्याचेही सहा प्रकार मानतात. स्त्रीपुत्रादींचा मोह सोडून आचाराविरुद्ध

वागणाऱ्या पुत्रादिकांचा त्याग करणारा व इष्टलिंगपूजेवाचून अन्य कोणत्याही आचाराचे पालन न करणारा भक्त हा 'आचारलिंगमोही' होय. पूर्वाश्रमातील आचारांचा त्याग करून शिवाचाराचे पालन करणारा हा 'आचारलिंगभक्त' होय. अन्य देवतांची पूजा न करता केवळ लिंगपूजेतच तत्पर असणारा 'आचारलिंगपूजक' होय. प्राणावर संकट आले तरी जो आपला आचार कधीही सोडत नाही तो 'आचारलिंगवीर' होय. शुद्धाशुद्ध, ग्राह्याग्राह्य असा विचार न करता लिंगप्रसाद ग्रहण करणारा 'आचारलिंगप्रसादी' होय आणि जो शिवनिंदा कधीच ऐकत नाही तो 'आचारलिंगप्राणी' भक्त होय.

२. माहेश्वरस्थलातील भक्त गुरुलिंगाची उपासना सहा प्रकारे करतो. बंधुपुत्रादिकांवरील मोहाचा त्याग करून जो केवळ गुरूचाच मोह धरतो तो 'गुरुलिंगमोही'. लौकिक बांधवांचा त्याग करून गुरूलाच बांधव मानून सदा संतुष्ट राहतो तो 'गुरुलिंगभक्त'. अन्य पूजांचा त्याग करून केवळ गुरुलिंगाचीच निष्ठेने पूजा करतो तो 'गुरुलिंगपूजक'. गुरूची आज्ञा सर्वतोपरी पाळणारा तो 'गुरुलिंगवीर'. गुरूशिवाय अन्य कोणाचीही आज्ञा न पाळता गुरूच्या आज्ञेचे कधीच उल्लंघन न करणारा तो 'गुरुलिंगप्रसादी'. अन्य कोणाची सेवा न करता केवळ गुरुलिंगाचीच सेवा करतो तो 'गुरुलिंगप्राणी'.

३. प्रसादिस्थलातील भक्त शिवलिंगाची पुढील सहा प्रकारे उपासना करतो. अन्य सर्व मोह सोडून जो केवळ लिंगाचाच मोह करतो तो 'शिवलिंगमोही'. अन्य कोणाची भक्ती न करता केवळ शिवलिंगाचीच भक्ती करतो तो 'शिवलिंगभक्त'. अन्य कोणाची पूजा न करता शिवलिंगाचीच पूजा करतो तो 'शिवलिंगपूजक'. कोणतीही तीर्थयात्रा न करता केवळ लिंगपूजेतच तत्पर असतो तो 'शिवलिंगवीर'. सांसारिक सुखदुःखांपासून अलिप्त राहणारा तो 'शिवलिंग–प्रसादी'. विषयभोग वर्जित करणारा तो 'शिवलिंगप्राणी'.

४. प्राणलिंगिस्थलातील भक्त सहा प्रकारे जंगमलिंगाची उपासना करतो. सर्व सांसारिक मोहाचा त्याग करून जंगमलिंगाचा मोह धरतो तो 'जंगमलिंगमोही'. देहादिकांचा अभिमान त्यागून केवळ जंगमलिंगाचाच अभिमान बाळगतो आणि केवळ जंगमलिंगाचीच भक्ती करतो तो 'जंगमलिंगभक्त'. अन्य कोणाची पूजा न करता जंगमलिंगाचीच पूजा करतो तो 'जंगमलिंगपूजक'. संपत्ती, प्राण आदी

सर्वस्व जंगमलिंगाला अर्पण करतो आणि प्राणापेक्षाही अधिक प्रेम करतो तो 'जंगमलिंगवीर'. सर्व भोग्य व धार्य पदार्थ जंगमलिंगाला अर्पण करून नंतर ते प्रसादरूपाने स्वीकारतो तो 'जंगमलिंगप्रसादी'. शिवस्वरूप जंगमलिंगावर प्राणवत् प्रेम ठेवून अन्य कोणताही विचार मनात येऊ देत नाही तो 'जंगमलिंगप्राणी'.

५. शरणस्थलातील भक्त प्रसादलिंगाची सहा प्रकारे उपासना करतो. पूर्वाश्रमातील सर्व पूजाविधींचा त्याग करून अन्य देवतांना अर्पण केलेल्या पदार्थांत रुची न ठेवणारा आणि अन्य कोणताही मोह न बाळगणारा जो शरण तो 'प्रसादलिंगमोही'. लिंगपूजेआधी आहार ग्रहण करीत नाही तो 'प्रसादलिंगभक्त'. कोणाबद्दल राग द्वेष न बाळगता प्रसादलिंगाचेच पूजन करतो तो 'प्रसादलिंगपूजक'. परद्रव्यास स्पर्श न करता नि:स्पृह भावनेने प्रसादसेवन करणारा तो 'प्रसादलिंगवीर'. ज्याचा हात कोणतीही वस्तू घेण्यासाठी वा देण्यासाठी पुढे होत नाही तर केवळ प्रसादासाठीच पुढे होतो तो 'प्रसादलिंगप्रसादी'. कधीही जीवहिंसा न करणारा अथवा कोणालाही हिंसेसाठी प्रवृत्त न करणारा तो 'प्रसादलिंगप्राणी'.

६. ऐक्यस्थलातील भक्त महालिंगाची सहा प्रकारे उपासना करतो. लोकव्यवहाराचा त्याग करून लिंगाच्या ठायी अनन्यनिष्ठा ठेवतो व कशाचाही मोह बाळगत नाही तो 'महालिंगमोही'. पूर्वी करीत असलेल्या सर्व कर्मांचा त्याग करून अन्य कोणत्याही देवाची भक्ती करीत नाही तो 'महालिंगभक्त'. अज्ञानी लोकांची संगत टाळून त्यांच्याशी भाषण न करणारा व केवळ सात्त्विक वृत्तीने वागणारा तो 'महालिंगपूजक'. जनन-जीवन-मरण अशा जीवभावाचे स्मरण न ठेवणारा आणि अन्य कोणत्याही देवतेला शरण न जाणारा तो 'महालिंगवीर'. पूर्वकर्मे अंतर्लिंगाला अर्पण करून संस्कारहीन लोकांच्या पंगतीत न बसणारा अर्थात् एकांतात प्रसाद ग्रहण करणारा तो 'महालिंगप्रसादी'. पत्रपुष्पादी बाह्य सामग्रीने पूजा न करता भावद्रव्याने अंतरंगपूजा करणारा आणि महालिंगाला आत्मा अर्पण करणारा तो 'महालिंगप्राणी'.

अशा रीतीने 'सूक्ष्मागमा'त लिंगस्थलाचे १८ भेद आणि अंगस्थलाचे ३६ भेद केलेले आढळतात. भक्त षड्लिंगांची सहा प्रकारच्या उत्कृष्ट भावनांनी उपासना करीत शेवटी महालिंगप्राणी होतो, अर्थात् लिंगांगसामरस्य प्राप्त करून घेतो.

### ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’तील षट्स्थलविचार

‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ या ग्रंथामध्ये श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी अंगस्थलाची ४४ उपस्थले आणि लिंगस्थलाची ५७ उपस्थले अशी विभागणी करून, पिंडस्थलापासून ज्ञानशून्यस्थलापर्यंत १०१ स्थलांचे सूक्ष्मातिसूक्ष्म विवेचन केले आहे. या ग्रंथाच्या आधारे षट्स्थलाच्या १०१ उपस्थलांचा यापुढे विचार करू.

## अंगस्थलांतर्गत भक्तस्थल

भक्तस्थल हे पहिले स्थल असून या स्थलात पंधरा उपस्थले आहेत. ही उपस्थले भक्ताची योग्यता व त्याचे आचरण स्पष्ट करणारी स्थले होत. आपले आराध्य असलेल्या शिवावर नितांत निष्ठा ठेवणारा मनुष्य म्हणजे भक्त होय. भक्ताला परिपक्व होण्यासाठी पंधरा प्रकारचे आचरण करावे लागते. ते आचरण सांगणारे स्थल म्हणजे भक्तस्थल.

**१. पिंडस्थल :** मागील अनेक जन्मांत निष्काम कर्म करून ज्याचे अंत:करण अत्यंत शुद्ध होते असा साधक म्हणजे पिंड. हा पिंडस्थली साधक होय.

**२. पिंडज्ञानस्थल :** पिंडस्थली स्वत:ला अनात्म अशा शरीरापासून आणि शिवापासून भिन्न मानतो व शिवाला कर्मप्रेरक मानतो तेव्हा तो पिंडज्ञानी होतो.

**३. संसारहेयस्थल :** दु:खदायक अशा संसाराबद्दल हेयबुद्धी म्हणजे त्याज्य बुद्धी निर्माण होणे.

**४. गुरुकारुण्यस्थल :** श्रीगुरूला शरण जाऊन, श्रीगुरूची सेवा करून त्याची कृपा प्राप्त करून घेणे म्हणजे गुरुकारुण्यस्थल.

**५. लिंगधारणस्थल :** दीक्षाविधीमध्ये श्रीगुरूकडून प्राप्त झालेले इष्टलिंग देहावर निरंतर धारण करणे, त्याचे आणि प्राणलिंग आणि भावलिंग यांचे चिंतन करणे.

**६. भस्मधारणस्थल :** शास्त्रोक्त अशा कल्पादी विधीने सिद्ध केलेल्या भस्माने भस्मस्नान, भस्मोद्धूलन करून शरीरावर पंधरा ठिकाणी त्रिपुंड्र धारण करणे.

**७. रुद्राक्षधारणस्थल :** इष्टलिंगपूजा करताना एकमुखी ते चौदामुखी रुद्राक्ष अंगावर धारण करणे.

**८. पंचाक्षरीजपस्थल :** दीक्षेच्या वेळी गुरूकडून प्राप्त झालेल्या पंचाक्षरी मंत्राचा वाचिक, उपांशू व मानस आदी पद्धतींनी जप करणे.

**९. भक्तमार्गक्रियास्थल :** तप, कर्म, जप, ध्यान व ज्ञान या पंचयज्ञांचे आचरण करीत लिंगाराधना करणे व ती करताना पंचसूतकांचे बंधन न पाळणे.

**१०. उभयस्थल :** शिव व गुरू यांना एकरूप मानून शिवाप्रमाणेच निष्ठापूर्वक गुरूची भक्ती करणे.

**११. त्रिविधसंपत्तिस्थल :** गुरू, लिंग व जंगम हीच आपली संपत्ती आहे अशी दृढ श्रद्धा बाळगणे.

**१२. चतुर्विधसारायस्थल :** गुरू, लिंग, जंगम आणि त्यांचा पादोदक-प्रसाद हे संसारातील चार प्रकारचे सार आहे असे मानणे.

**१३. सोपाधिक दानस्थल :** फलाच्या अपेक्षेने केले जाणारे दान म्हणजे सोपाधिक दान होय.

**१४. निरुपाधिक दानस्थल :** फलाची अपेक्षा न ठेवता केलेले दान म्हणजे निरुपाधिक दान.

**१५. सहजदानस्थल :** देणारा व घेणारा हे शिव असून दानवस्तूदेखील शिवच होय, अशा अकर्तृत्वभावनेने केलेले दान आणि शिव व शिवभक्त यांना केलेले दान म्हणजे सहजदान होय.

वरील पंधरा उपस्थलांतील आचारांचे श्रद्धाभक्तिपूर्वक जो पालन करतो तो भक्तस्थलातील साधक परिपूर्ण भक्त होतो.

## अंगस्थलांतर्गत माहेश्वस्थल

सहजदानात निष्णात, ब्रह्मादी देवतांच्या ऐश्वर्यांविषयी नि:स्पृह, वैराग्याच्या सामर्थ्याने शिवभक्तीचा परमोत्कर्ष झालेला आणि महेश्वरासमान श्रेष्ठ कोणीही नाही असे मानून त्याच्यावर दृढ भक्ती ठेवणारा असा निष्ठाभक्तीने युक्त शिवभक्तच माहेश्वर होय. या स्थलामध्ये पुढील नऊ उपस्थले आहेत.

**१६. माहेश्वरप्रशंसास्थल :** विषयसुखात निरिच्छ, शिवकार्यात सदोदित मग्न, आगमांच्या अभ्यासात रत झालेला, अहंकार-ममत्व वर्जिलेला, शिवनिंदकाचा नि:पात करणारा, शिवभक्तांच्या मेळाव्यात रमणारा इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असा माहेश्वर.

**१७. लिंगनिष्ठास्थल :** कोणतीही आपत्ती आली तरी लिंगपूजेचा त्याग न

करणे व लिंगपूजा केल्याशिवाय अन्नाचा कणही ग्रहण न करणे म्हणजे लिंगनिष्ठास्थल.

**१८. पूर्वाश्रयनिरसनस्थल :** लिंगनिष्ठेला विरोधी असलेल्या पूर्वाश्रमातील आचरणांचा त्याग करणे व दीक्षा घेतल्यानंतर कोणत्याही प्रकारचा जातिभेद न मानणे.

**१९. सर्वाद्वैतनिरसनस्थल :** शिव हा उपास्य असून मी उपासक आहे अशी भेदभावना बाळगून अद्वैताचे निरसन म्हणजे अस्वीकार करणे.

**२०. आह्वाननिरसनस्थल :** दीक्षाप्रसंगी श्रीगुरूंनी इष्टलिंगात शिवकलांची प्रतिष्ठापना केलेली असल्यामुळे लिंगात शिवाचे नित्य वास्तव्य असते. त्यामुळे लिंगपूजा करताना शिवाला आवाहन न करणे.

**२१. अष्टमूर्तिनिरसनस्थल :** पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, सूर्य, चंद्र व आत्मा या शिवाच्या अष्टमूर्ती होत. अष्टमूर्ती शिवाचे कार्य असल्यामुळे त्या शिवापासून भिन्न आहेत, अशी भावना बाळगणे.

**२२. सर्वगतनिरसनस्थल :** शिवाला सर्वव्यापक मानले तर अनेक रूपांत त्याची पूजा करावी लागेल आणि ते लिंगनिष्ठेला विरोधी ठरेल. त्यामुळे केवळ इष्टलिंगातच शिव राहतो अशी दृढ भावना करणे.

**२३. शिवजगन्मयस्थल :** समस्त जग शिवरूप आहे अशा भावनेने जगाकडे पाहणे.

**२४. भक्तदेहिकलिंगस्थल :** संपूर्ण विश्वात शिव व्याप्त असला तरी भक्ताच्या हृदयात तो विशेषत्वाने राहतो अशी भावना बाळगणे.

माहेश्वरस्थलातील या नऊ प्रकारच्या आचारांचे निष्ठाभक्तीने पालन केल्यावर साधक पूर्ण माहेश्वर होतो.

## अंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

लिंगनिष्ठेमुळे सर्व पापे नष्ट झालेल्या प्रसन्नचित्त माहेश्वरालाच प्रसादी असे म्हणतात. या स्थलात पुढील सात उपस्थले आहेत.

**२५. प्रसादमाहात्म्यस्थल :** शिवप्रसादाने प्रसन्नतेचा लाभ होतो. प्रसाद म्हणजे प्रसन्नता. शिवार्पित केलेले सर्व पदार्थ प्रसादरूप होतात. भोग्य व धार्य असे सर्व पदार्थ शिवाला अर्पण करून नंतर त्यांचा प्रसादरूपाने स्वीकार करणे हेच

प्रसादमाहात्म्यस्थल.

**२६. गुरुमाहात्म्यस्थल :** गुरुकृपेने सर्व कार्ये सिद्ध होतात. म्हणून गुरू म्हणजे साक्षात् शिवच होय, अशी दृढ भावना बाळगणे.

**२७. लिंगमाहात्म्यस्थल :** सर्व जगाचे आणि वेदागमांचे मूळ लिंग असून तेच ज्योतिरूपाने योग्यांच्या हृदयात प्रकाशमान असते. त्याची पूजा सर्व देवदेवता करतात. असे हे लिंग सर्व ब्रह्मांडाचे नियामक आहे, अशी भावना बाळगणे.

**२८. जंगममाहात्म्यस्थल :** विश्व प्रकाशित करणाऱ्या शिवाला आत्मवत् मानणारा जंगम निःस्पृह असून त्याच्या पायधुळीमुळे गृह पावन होते, अशी भावना बाळगणे.

**२९. भक्तमाहात्म्यस्थल :** कायावाचामनाने जे शिवाची भक्ती करतात ते भक्त होत. वेदाभ्यास, शास्त्राध्ययन, यज्ञ आणि तप हे सारे शिवभक्तीशिवाय व्यर्थ होत. म्हणून शिवभक्तांविषयी परमादर बाळगणे.

**३०. शरणमाहात्म्यस्थल :** शिवाला अनन्यभावाने जो शरण जातो तो शरण होय. त्याचे कुल शुद्ध ठरून जीवन सफल होते. अशा शरणांविषयी आदरभाव बाळगणे.

**३१. प्रसादमाहात्म्यस्थल :** शिवकृपा म्हणजे शिवप्रसाद. यज्ञ, तप, जप हे शिवकृपा प्राप्त व्हावी यासाठी केले जातात. शिवकृपेमुळे गर्भात असलेला, जन्म घेणारा, जन्मलेला, शूद्र असो की ब्राह्मण, तो तत्काळ मोक्षपदास प्राप्त होतो. म्हणून शिवप्रसाद सर्वश्रेष्ठ आहे, अशी दृढ भावना बाळगणे.

वरील सात उपस्थलांचे जो अवधानभक्तीने आचरण करतो तो प्रसादी होय.

## अंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

हृदयस्थ अशा चिद्रूप प्राणलिंगाची जो उपासना करतो तो प्राणलिंगी होय. या स्थलात पाच उपस्थले आहेत.

**३२. प्राणलिंगिस्थल :** प्राणायामप्रक्रियेने प्राणवायू व अपानवायू संघटित करून हृदयात स्थिर झालेली ज्योती हे प्राणलिंग होय, असे ज्ञान होणे.

**३३. प्राणलिंगार्चनस्थल :** हृदयस्थ प्राणलिंगाची क्षमा, विवेक, सत्य, वैराग्य आदी भावसामग्रीने पूजा करणे.

**३४. शिवयोगसमाधिस्थल :** मस्तकातील सहस्रारचक्रामध्ये हंसरूपी शिवाचे सोऽहंभावनेने ध्यान करणे.

**३५. लिंगनिजस्थल :** अंतरंगात स्थित असलेल्या लिंगरूप शिवाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे.

**३६. अंगलिंगस्थल :** अंतरंगातील ज्योतिस्वरूप लिंगाला जाणून त्याची भावद्रव्यांनी जो पूजा करतो तो अंगलिंगी. अर्थात् अंगामध्ये लिंगाची पूजा करणे.

वरील पाच उपस्थलांचे अनुभवभक्तीने जो आचरण करतो तो प्राणलिंगी होय.

## अंगस्थलांतर्गत शरणस्थल

अंग (जीवात्मा) सती असून लिंग (शिव) हा पती आहे, असा सतीपतिभाव बाळगून अलौकिक आनंदाची जो अनुभूती घेतो तो शरण होय. शरणस्थलाची चार उपस्थले आहेत.

**३७. शरणस्थल :** शिव हा सर्व जीवांचे शरण्य आहे, अशा दृढ भावनेने अन्य देवतांकडे दुर्लक्ष करून केवळ शिवालाच शरण जाणे.

**३८. तामसनिरसनस्थल :** तामसी जीवाला सद्‌गती लाभत नाही म्हणून शमदमविवेकादी दशगुण अंगी बाणवून तमोगुणाचा निरास करणे.

**३९. निर्देशस्थल :** संसारप्रवृत्तीला कारण असलेला तमोगुण दूर करून गुरूकडून उत्तम ज्ञानाने शरणस्थलाचा साधक निर्देशिला जातो. सूर्याविाचून जसा अंधार दूर होत नाही तसा गुरूपदेशाशिवाय तमोगुण दूर होत नाही म्हणून शरणस्थली निर्देशिला जातो.

**४०. शीलसंपादनस्थल :** गुरूच्या निर्देशामुळे शिवतत्त्व जाणण्याची उत्कट जिज्ञासा निर्माण होते त्याला शील म्हणतात. या शीलाचे संपादन करण्याची तीव्र इच्छा बाळगणे म्हणजे शीलसंपादन होय.

वरील चार स्थलांचे आनंदभक्तिपूर्वक आचरण करणारा साधक हा शरण होय.

## अंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

शिवासोबत ऐक्यस्थिती प्राप्त करून घेणारा साधक ऐक्यस्थली होय. या स्थलात चार उपस्थले आहेत.

**४१. ऐक्यस्थल :** त्रिमलरहित, निष्कलंक असा साधक शिवोऽहम् भावनेत आरूढ होणे म्हणजे ऐक्यस्थल.

**४२. आचारसंपत्तिस्थल :** शिवैक्यभावनायुक्त, कोणत्याही आचारापासून व सूतकापासून अलिप्त असणारा तो आचारसंपत्तिस्थली होय.

**४३. एकभाजनस्थल :** विश्व शिवमय आहे अशी भावना करून शिवाबरोबर समरस होणे.

**४४. सहभोजनस्थल :** शिव, विश्व, गुरू आणि आपण स्वत: भिन्न नसून चिद्रूप आहोत, अशी भावना दृढ होणे म्हणजे सहभोजनस्थल होय.

वरील चार स्थलांचे समरसभक्तिपूर्वक आचरण करणारा साधक हा ऐक्यस्थली होय.

पिंडस्थलापासून सहभोजनस्थलापर्यंत ४४ उपस्थलांमध्ये साधक श्रद्धा, निष्ठा, अवधान, अनुभव, आनंद व समरस या भक्तींच्या आधारे भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य या षट्स्थलातून विकसित होऊन लिंगांगसामरस्यस्थिती प्राप्त करून घेतो. ही एकप्रकारची जीवन्मुक्तीच होय.

वीरशैवसिद्धान्तामध्ये 'ज्ञानामृतेन तृप्तोऽपि योगी धर्मं न संत्यजेत्' (श्रीसिद्धान्त-शिखामणी, १६.६५) या आचार्यांच्या आज्ञेनुसार जीवन्मुक्त शिवयोग्याला सुद्धा इष्टलिंगपूजारूपी धर्माचरण शेवटच्या क्षणापर्यंत करावे लागते. म्हणून जीवन्मुक्त झालेला योगी त्या अवस्थेत राहून देखील षट्स्थलाचे आचरण कसे करतो, हे स्पष्ट करण्यासाठी एकूण ५७ उपस्थलांतून लिंगस्थलाचे प्रतिपादन केलेले आहे.

## लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल

ऐक्यस्थलामध्ये पोहोचून लिंगांगसामरस्य प्राप्त करून जीवन्मुक्त झाला तरी पुढेही धर्माचरण करावेच लागते. या जीवन्मुक्तावस्थेतील षट्स्थल येथे स्पष्ट केले आहे. या भक्तस्थलात पुढील नऊ उपस्थले आहेत.

**४५. दीक्षागुरुस्थल :** मलत्रयाचे निवारण करून परमज्ञान देणारा संस्कार म्हणजे दीक्षा. असा दीक्षासंस्कार प्रदान करणाऱ्या श्रीगुरूला शरण जाणे.

**४६. शिक्षागुरुस्थल :** दीक्षागुरू शिष्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्याचे समाधान करतो. त्याचा संशय दूर करतो. शिवज्ञानाचे औषध देऊन त्याचा संसाररोग नष्ट

करणाऱ्या शिक्षागुरूची लक्षणे स्पष्ट करणारे स्थल.

**४७. ज्ञानगुरुस्थल :** प्रबोधदीपाने शिष्याच्या अंतरंगातील अज्ञानाचा अंध:कार जो दूर करतो तो ज्ञानगुरू. या ज्ञानगुरूची लक्षणे स्पष्ट करणारे स्थल.

**४८. क्रियालिंगस्थल :** ज्या लिंगाची पूजा केल्याने अन्य कोणतीही क्रिया करावी लागत नाही, म्हणजे तेथे सर्व क्रिया लय पावतात. एक लिंगपूजा केली की सर्व क्रिया केल्यासारख्याच होत. अशा रीतीने जो कृतकृत्य होतो तो क्रियालिंगस्थली. इष्टलिंग हेच क्रियालिंग होय. त्याचे स्वरूप स्पष्ट करणारे हे स्थल आहे.

**४९. भावलिंगस्थल :** ज्या ठिकाणी भावना लीन होतात ते भावलिंगस्थल होय. मूलाधारचक्र, हृदय व भ्रूमध्य या तीन ठिकाणी चिल्लिंगाची भावना करून भावद्रव्यांनी त्याचे पूजन करणे.

**५०. ज्ञानलिंगस्थल :** सच्चिदानंदस्वरूप परशिवब्रह्माचा बोध ज्यामुळे होतो त्याला ज्ञान म्हणतात. ते ज्ञान हेच लिंग होय, हे स्पष्ट करणारे स्थल.

**५१. स्वयस्थल :** बाह्यवृत्ती त्यागून स्वस्वरूपात निरंतर रममाण असणे म्हणजे स्वयस्थल.

**५२. चरस्थल :** आत्मस्वरूपात रममाण होऊन लोककल्याणासाठी स्वच्छंदपणे सर्वत्र भ्रमण करतो तो चरस्थली. त्याची वैशिष्ट्ये विशद करणारे स्थल.

**५३. परस्थल :** स्वस्वरूपापेक्षा 'पर' म्हणजे वेगळे असे काही नसून आत्मतत्त्वच 'पर' म्हणजे श्रेष्ठ होय, अशी दृढ भावना बाळगणे.

जीवन्मुक्त शिवयोगी ज्ञानोत्तर स्थितीत वरील नऊ उपस्थलांचे आचरण करीत असतो.

## लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल

या माहेश्वरस्थलात पुढील नऊ उपस्थले आहेत.

**५४. क्रियागमस्थल :** परस्थलातील शिवयोगी साक्षात् शिवस्वरूप असतो. तो पूजा आदी ज्या क्रिया करतो त्या क्रिया स्पष्ट करणाऱ्या शास्त्राला क्रियागम म्हणतात. ज्ञानी पुरुषाने कर्मत्याग करू नये. या क्रियेचे स्पष्टीकरण करणारे स्थल.

**५५. भावागमस्थल :** भावहीन ज्ञान व भावहीन क्रिया निष्फल होतात. ज्ञान व क्रियेला भावनेची जोड लागते. त्या भावनेचे रूप स्पष्ट करणारे स्थल.

**५६. ज्ञानागमस्थल :** केवळ कर्म आणि भावना यांमुळे मोक्षप्राप्ती होत नाही. त्यांच्यासोबत ज्ञानही असावे लागते. अशा ज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करणारे स्थल.

**५७. सकायस्थल :** काया म्हणजे शरीर. ज्ञान, कर्म, भावना यांना कायेचाच आधार असतो. कायेनेच लोकांवर कृपा केली जाते. जीवन्मुक्त शिवयोगी आपल्या कायेने जे कार्य करतो, ते स्पष्ट करणारे स्थल.

**५८. अकायस्थल :** शिवयोग्याला देहाभिमान नसल्यामुळे देहधारी असूनही त्याला देहविकार बाधक ठरत नाहीत. म्हणून 'सकाय' असूनही तो 'अकाय' असतो, हे स्पष्ट करणारे स्थल.

**५९. परकायस्थल :** इंद्रिये, मनोवृत्ती व कर्म यांमुळे उत्पन्न होणारी वासना हे सर्व ज्या ठिकाणी लय पावतात ते परमतत्त्व असून हे तत्त्व ज्याची काया आहे तो परकाय होय.

**६०. धर्माचारस्थल :** परकाय शिवयोग्याचे आचरण हाच लोकांसाठी धर्माचार होय. सत्य-अहिंसा आदी दशधर्मांचे स्वरूप विशद करणारे स्थल.

**६१. भावाचारस्थल :** परिपूर्ण शिवाधीन झालेली शिवयोग्याची मनोवृत्ती हाच भाव असून तो लोकांसाठी भावाचार ठरतो, हे सांगणारे स्थल.

**६२. ज्ञानाचारस्थल :** शिवतत्त्वाला प्रकाशित करणारे ज्ञान हेच खरे ज्ञान असून त्याचे अनुसरण करणारे आचरण म्हणजे ज्ञानाचार.

वरील नऊ उपस्थलांचे आचरण करणारा हा लिंगस्थलातील माहेश्वर होय.

## लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

या प्रसादिस्थलामध्ये पुढील नऊ उपस्थले आहेत.

**६३. कायानुग्रहस्थल :** कायेने म्हणजे शरीराने शिवयोगी सर्वांवर कृपा करतो. परंतु शरीरात राहूनदेखील तो देहभावापासून अलिप्त असतो, हे स्पष्ट करणारे स्थल.

**६४. इंद्रियानुग्रहस्थल :** शिवयोग्याने हस्तस्पर्श, दृष्टिपात अशाप्रकारे बाह्येंद्रियांद्वारे लोकांवर अनुग्रह करणे.

**६५. प्राणानुग्रहस्थल :** प्राणायाम-प्रक्रियेने प्राणाचा निरोध करून शिवमय दृष्टीने जगाकडे पाहात लोकांवर अनुग्रह करणे.

**६६. कायार्पितस्थल :** कायेवरील म्हणजे देहावरील अभिमान त्यागून लिंगार्चन करणे.

**६७. करणार्पितस्थल :** करण म्हणजे मन, बुद्धी, चित्त, अहंकार ही चार अंतरिंद्रिये आणि पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये ही दहा बहिरिंद्रिये शिवपूजा करताना शिवाला समर्पित करणे.

**६८. भावार्पितस्थल :** एकाग्रतेने मनातील सर्व भावना शिवाला समर्पित करणे.

**६९. शिष्यस्थल :** निग्रहयुक्त शिवयोग्याकडून जो प्रशासित होतो तो शिष्य होय. अशा शिष्याचे विवेचन करणारे स्थल.

**७०. शुश्रूषुस्थल :** शुश्रूषु म्हणजे श्रवण करण्याची उत्कट इच्छा. अशी इच्छा ज्याच्याजवळ आहे तो शुश्रूषु होय. त्याची लक्षणे स्पष्ट करणारे स्थल.

**७१. सेव्यस्थल :** सेव्य म्हणजे सेवा करण्यायोग्य असा. गुरूपदेश श्रवण करून शिवाद्वैत प्राप्त करून घेतलेला शुश्रूषु शिष्य हाच इतरांकडून सेवा करून घेण्यास योग्य म्हणजे सेव्य होय.

## लिंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

**७२. आत्मस्थल :** गुरूपदेशाने जीवभाव त्यागून आत्मस्वरूपात स्थित होणे. या अवस्थेचे प्रतिपादन करणारे स्थल.

**७३. अंतरात्मस्थल :** जीवभावाचा त्याग घडला, परंतु परमात्मभाव लाभला नाही, अशी मधली स्थिती म्हणजे अंतरात्मस्थल.

**७४. परमात्मस्थल :** अंतरात्मस्थितीतील साधक परमात्म्यात समरस होणे.

**७५. निर्देहागमस्थल :** परमात्मस्थितीला पोहोचलेला योगी देहधर्मांपासून अलिप्त होणे.

**७६. निर्भावागमस्थल :** स्वस्वरूपभावनेशिवाय अन्य भावविकारांपासून अलिप्त राहणे.

**७७. नष्टागमस्थल :** ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय हा त्रिपुटीव्यवहार नष्ट होणे.

**७८. आदिप्रसादिस्थल :** आदि म्हणजे सर्वांचे अधिष्ठान असलेले तत्त्व शिव. त्या शिवाचा अनुग्रह प्राप्त करून घेणे.

**७९. अन्त्यप्रसादिस्थल :** ज्यामध्ये सर्वांचा अन्त (लय) होतो तो अन्त्य होय. अन्त्य अशा शिवाचा अनुग्रह प्राप्त करून घेणे.

**८०. सेव्यप्रसादिस्थल :** शिवस्वरूप श्रीगुरू हा सेव्य होय. अशा सेव्य श्रीगुरूकडून उपदेशरूपी प्रसाद प्राप्त करून घेणे.

## लिंगस्थलांतर्गत शरणस्थल

**८१. दीक्षापादोदकस्थल :** पाद म्हणजे गुरू आणि उदक म्हणजे शिष्य. या दोघांची अद्वैतस्थिती म्हणजे पादोदक. श्रीगुरूने दिलेल्या चिन्मय दीक्षेमुळे ही स्थिती प्राप्त होते. या स्थितीचे विवेचन करणारे स्थल.

**८२. शिक्षापादोदकस्थल :** शिक्षा म्हणजे उपदेश, बोध. ज्या बोधामुळे गुरु-शिष्यांमधील भेद नष्ट होतो ते शिक्षापादोदकस्थल होय.

**८३. ज्ञानपादोदकस्थल :** श्रीगुरूकडून प्राप्त झालेल्या ज्ञानामुळे गुरु-शिष्यांमधील अभेदत्वाचा बोध होणे.

**८४. क्रियानिष्पत्तिस्थल :** शिवयोग्याकडून घडणाऱ्या कर्मापासून जन्मांतर देणारे फल निष्पन्न न होणे.

**८५. भावनिष्पत्तिस्थल :** शिवयोग्याच्या मनात उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही भावनेपासून फलनिष्पत्ती न होणे.

**८६. ज्ञाननिष्पत्तिस्थल :** शिवयोग्याकडून ज्ञानव्यवहार घडत असला तरी त्याचे फल निष्पन्न न होणे.

**८७. पिंडाकाशस्थल :** आकाश सर्वव्यापक असून ते पिंडामध्ये (देहामध्ये) व्याप्त असते त्याप्रमाणे सर्वव्यापक परमात्मा पिंडात व्याप्त आहे, असा बोध होणे.

**८८. बिंद्वाकाशस्थल :** आकाश ज्याप्रमाणे अंतर्बाह्य सर्वत्र व्याप्त आहे त्याप्रमाणे परमात्मतत्त्वदेखील अंतर्बाह्य सर्वत्र व्याप्त आहे, असे दृष्टान्त देऊन स्पष्ट करणारे स्थल.

**८९. महाकाशस्थल :** पिंडामध्ये असलेले आकाश महाकाशापासून भिन्न

नाही त्याप्रमाणे पिंडामधील आत्मा परमात्म्यापासून वेगळा नाही, असे प्रतिपादन करणारे स्थल.

९०. **क्रियाप्रकाशस्थल :** सर्वत्र परिपूर्ण व ज्ञानप्रकाशरूप असलेल्या परशिवाचे आत्मरूपाने ध्यान करण्याची क्रिया प्रतिपादन करणारे स्थल.

९१. **भावप्रकाशस्थल :** सागरावर उत्पन्न होणारे तरंग सागरापासून भिन्न नसतात त्याप्रमाणे शिवयोग्याच्या मनात उत्पन्न होणाऱ्या सर्व भावना शिवापासून वेगळ्या नसतात, असे स्पष्ट करणारे स्थल.

९२. **ज्ञानप्रकाशस्थल :** अविद्यायुक्त चैतन्य म्हणजे जीव व मायायुक्त चैतन्य म्हणजे शिव, हा जीव व शिव या शब्दांचा वाच्यार्थ होय. अविद्या-उपाधिविरहित चैतन्य म्हणजे जीव आणि माया-उपाधिविरहित चैतन्य म्हणजे शिव, हा या शब्दांचा लक्ष्यार्थ होय. जीव-शिवाचे ऐक्य प्रतिपादन करताना वाच्यार्थ बाधक ठरतो. म्हणून लक्ष्यार्थाने या ऐक्याचे प्रतिपादन करणारे स्थल.

## लिंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

९३. **स्वीकृतप्रसादिस्थल :** लक्ष्यार्थाने लिंगांगसामरस्यस्थिती प्राप्त करून घेतल्यानंतर त्या सामरस्याच्या आनंदरूपी प्रसादाचा अनुभव घेणे.

९४. **शिष्टौदनस्थल :** जगत्कारण असलेली माया ही जीवन्मुक्त शिवयोग्यासाठी घासभर अन्नासारखी असते. ती त्याच्यासाठी दासीप्रमाणे असते, हे स्पष्ट करणारे स्थल.

९५. **चराचरलयस्थल :** शिवयोग्याला चर आणि अचर विश्वाचे भान नसते. त्याच्यापुरता चराचराचा लय झालेला असतो.

९६. **भांडस्थल :** ब्रह्मांडाची सृष्टि-स्थिति-लय ज्यामध्ये होतो त्या विमर्शशक्तीला भांड अशी संज्ञा आहे. तिचे विवेचन.

९७. **भाजनस्थल :** भांड असलेली विमर्शशक्ती ज्या परशिवब्रह्मात प्रतिष्ठित असते ते परशिवब्रह्म भाजन होय. त्याचे विवेचन करणारे स्थल.

९८. **अंगालेपस्थल :** ज्याप्रमाणे आकाशात उडालेली धूळ व धूर आकाशाला स्पर्श करू शकत नाही, त्याप्रमाणे शिवयोग्याच्या देहाकडून घडणाऱ्या कोणत्याही क्रियेमुळे शिवयोगी लिप्त होत नाही, हे स्पष्ट करणारे स्थल.

**९९. स्वपराज्ञस्थल :** आत्मानंदात रममाण झालेल्या शिवयोग्याला स्वत:बद्दल आणि इतरांबद्दल कोणतेही ज्ञान नसणे, अशी स्व-पर-अज्ञस्थिती.

**१००. भावाभावलयस्थल :** शिवयोगी चिदाकाशरूपी शिवात विलीन झाल्यामुळे त्याच्याठायी भावात्मक व अभावात्मक वृत्ती उरत नाही.

**१०१. ज्ञानशून्यस्थल :** भावाभावलय झालेला शिवयोगी स्वस्वरूपज्ञानामध्ये लीन झाल्यामुळे त्याच्याठायी भावात्मक व अभावात्मक ज्ञान शून्य होते. याचे विवेचन करणारे स्थल.

## समारोप

अशा रीतीने श्रीशिवयोगी शिवाचार्य यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी'मध्ये षट्स्थलसिद्धान्ताचे १०१ स्थलांमध्ये अत्यंत सूक्ष्म असे विश्लेषण केले आहे. असे विश्लेषण वीरशैवधर्मातील अन्य कोणत्याही ग्रंथात आढळत नाही. म्हणून हे विश्लेषण अपूर्व आहे असेच म्हणावे लागते. यावरून असे दिसते की, श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी स्वत:च १०१ स्थलांचे आचरण करून स्वानुभवाने ही मांडणी केली आहे. या ग्रंथाबद्दल त्यांनी स्वत: 'सर्वस्वं वीरशैवानां सकलार्थप्रकाशनम्' असे सार्थ उद्‌गार काढले. अर्थात् वीरशैवांचे हे सर्वस्व असून वीरशैवसिद्धान्ताचे प्रकाशन करणारा हा ग्रंथ होय. म्हणून जिज्ञासू साधकांनी अंगस्थले व लिंगस्थले यांचे सूक्ष्म अध्ययन करून षट्स्थलमार्गाची साधना करावी आणि आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे.

षट्स्थलातील भक्त व माहेश्वर ही दोन स्थले क्रियाप्रधान असून जीव व ईश्वर यांमधील भेद प्रतिपादन करणारी आहेत. प्रसादी व प्राणलिंगी ही दोन स्थले क्रियेसहित ज्ञान व योग यांना प्राधान्य देणारी असून ती द्वैताद्वैत प्रतिपादन करतात. शरण व ऐक्य ही दोन स्थले ज्ञानप्रधान असून अद्वैतप्रतिपादक आहेत. म्हणून वीरशैवसिद्धान्तात द्वैत, द्वैताद्वैत व अद्वैत या सर्व श्रुतींचा सुंदर समन्वय असल्यामुळे याला 'सर्वश्रुतिसमन्वयक सिद्धान्त' म्हटले जाते.

■■

प्रकरण सहावे

# उपसंहार

'वीरशैव तत्त्वदर्शन' या ग्रंथामध्ये वीरशैवधर्म, दर्शन, साहित्य व आचारविचार यांविषयी सखोल माहिती दिली आहे. या सर्व विषयांचे सार या प्रकरणात पाहावयाचे आहे.

**वीरशैवधर्म व साहित्य**

धर्म हे मानवी जीवनाचे अधिष्ठान आहे. पाया मजबूत असेल तर इमारत मजबूत व उंच होते, त्याप्रमाणे धर्म हा मानवी जीवनाचा पाया असून धार्मिक मनुष्यच ऐहिक भोगभाग्याचा अनुभव घेऊन शेवटी लिंगांगसामरस्यरूपी मुक्ती प्राप्त करून घेऊ शकतो. यामुळेच धर्म हा अभ्युदय आणि नि:श्रेयस यांना कारणीभूत आहे, असे आचार्यांनी म्हटलेले आहे. जगातील सर्व धर्माचार्यांनी आपापल्या परीने आपल्या अनुयायांना आपापल्या धर्ममार्गांचा उपदेश केला आहे. जगातील सर्व धर्मांमध्ये वीरशैव हा एक सनातन धर्म मानला जातो.

इष्टदेवतेची प्रतिष्ठापना मंदिरात न करता शरीर हेच मंदिर मानून त्यावर इष्टलिंगाच्या रूपाने शिवाला धारण करण्याचा सिद्धान्त या धर्माने प्रतिपादिलेला आहे. बाह्य मंदिर मानवनिर्मित असते, परंतु देहरूपी मंदिर मात्र परमेश्वराने निर्मिलेले दिव्य मंदिर असते. ईश्वर आपल्यापासून खूप दूर आहे, असे वीरशैवधर्म दर्शवीत नाही तर तो आपल्या अत्यंत समीप आहे असे प्रतिपादन करतो. 'तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्' –अर्थात् स्वत: देह निर्माण करून त्यात स्वत:च आत्मरूपाने प्रतिष्ठित झाला– या उपनिषदातील वाक्याप्रमाणे मानवी देह ईश्वरनिर्मित असून त्यात ईश्वर स्वत:च आत्मरूपाने विराजमान झाला. म्हणूनच 'भगवद्गीते'मध्ये शरीराला 'क्षेत्र' असे म्हटले आहे. ज्या ठिकाणी ईश्वराचा नित्य निवास असतो त्याला क्षेत्र म्हटले जाते. लिंगधारक शिवभक्त हे जणू चालतेबोलते शिवालयच होय. बहिर्मुख मनोवृत्तीला अंतर्मुख केले तरच ईश्वराचे दर्शन घडू शकते. म्हणून बहिर्मुख मनोवृत्तीला इष्टलिंगाच्या ठिकाणी केंद्रित

करून ती अंतर्मुख करण्याचा सोपा व प्रभावी मार्ग वीरशैवसिद्धान्ताने सांगितला आहे.

'विरोधरहितं शैवं वीरशैवं विदुर्बुधा:' या नीलकंठ शिवाचार्यांच्या उक्तीप्रमाणे समाजामध्ये अन्यधर्मीय व्यक्तींबरोबर विरोध न करण्याची व सर्वांसोबत सौहार्दाने जीवन जगण्याची शिकवण हा धर्म देतो. दीक्षा हा या धर्मातील प्रमुख संस्कार असून जाती, वर्ण, धर्म, स्त्री, पुरुष असा कोणताही भेदभाव न करता दीक्षा घेण्याची उत्कट इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला धर्मगुरूंकडून दीक्षा देण्यात येते. इष्टलिंगपूजा हे नित्यकर्म असल्यामुळे ही पूजा अखंडित व्हावी यासाठी या धर्मात पंचसूतकांचा निषेध केलेला आहे. देहावर निरंतर इष्टलिंग असल्यामुळे वीरशैव कोठेही गेला तरीही त्याची इष्टलिंगपूजा चुकत नाही आणि कोणत्याही परिस्थितीत वीरशैवाकडून इष्टलिंगपूजाव्रत खंडित होत नाही. इष्टलिंगपूजेबरोबर प्राणलिंग व भावलिंग यांचे पूजन या धर्मात सांगितले आहे. बहिर्मुख वृत्ती अंतर्मुख करण्याचा हा उपाय होय. अशाप्रकारे सर्वांना समान वागणूक देणारा, सर्वांना सामावून घेणारा व बहिरंगापेक्षा अंतरंगोपासनेवर भर देणारा हा जागतिक स्वरूपाचा धर्म आहे. संस्कृत, कन्नड, मराठी इत्यादी भाषांत विपुल वीरशैव साहित्यनिर्मिती झाली आहे.

### वीरशैवदर्शन : शक्तिविशिष्टाद्वैत

भारतीय दर्शनांमध्ये वीरशैवदर्शन हे समन्वयवादी दर्शन मानले जाते. सर्व दर्शने वेदागमांवर आधारित असल्यामुळे कोणत्याही दर्शनाचे युक्तिप्रयुक्तींनी खंडन करू नये, असा उदात्त समन्वयात्मक विचार वीरशैवदर्शनशास्त्राने दार्शनिक जगाला दिला आहे. या दर्शनामध्ये ईश्वरस्वरूप, जीवस्वरूप, सृष्टिनिर्मिती, बंध व मोक्ष या प्रमुख पाच दार्शनिक विचारांची मांडणी करीत असताना द्वैत आणि अद्वैत श्रुतींचा अतिशय सुंदर समन्वय केलेला आहे. उपनिषदांतील द्वैतपर व अद्वैतपर श्रुती परस्परविरोधी नसून त्या द्वैत–द्वैताद्वैत–अद्वैत या मार्गाद्वारे जीवाचा आध्यात्मिक क्रमविकास स्पष्ट करतात, असे वीरशैवसिद्धान्त मानतो. अनादी अविद्येने आवृत झालेला जीव आपल्या कर्मांनुसार अनेक योनींमधून जन्म घेत भ्रमत असतो. गुरुदीक्षेमुळे तो आणव, माया व कर्म या त्रिमलांपासून मुक्त होऊन षट्स्थल–सोपाने लंघीत लिंगांगसामरस्य प्राप्त करून मुक्त होतो.

वीरशैवसिद्धान्तानुसार हे दृश्य जग जड किंवा मिथ्या नसून ते परशिवस्वरूप आहे. सोने विकृत न होता अलंकाररूपात परिणत होते, त्याप्रमाणे शिव छत्तीस तत्त्वरूपांनी विकसित होतो, असे वीरशैवदर्शन मानते. त्यामुळे वीरशैव जगाला सत्य व शिवरूप मानतात. शिव आणि शक्ती यांच्यात चंद्र आणि प्रभा यांच्याप्रमाणे अविनाभावसंबंध आहे. जगाच्या निर्मितीला शक्तिविशिष्ट शिव हे अभिन्ननिमित्तोपादानकारण होय. शिवाशी अविनाभावसंबंधाने युक्त असणाऱ्या विमर्शशक्तीचा विकास म्हणजे विश्वनिर्मिती आणि त्या शक्तीचा संकोच म्हणजे लयावस्था, अशी वीरशैवदर्शनाची भूमिका आहे.

**अष्टावरण**

वीरशैवधर्मामध्ये शिवयोगसाधना करणाऱ्या साधकाला विघ्नबाधा होऊन त्याच्या साधनेत व्यत्यय येऊ नये यासाठी आठ रक्षाकवचांची व्यवस्था केलेली आहे. त्यांना ‘अष्टावरण’ म्हणतात. गुरू, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, विभूती, रुद्राक्ष व मंत्र हे अष्टावरण होय.

गुरू दीक्षासंस्कार देऊन साधकाचे रक्षण करतो. लिंग, रुद्राक्ष व भस्म ही धर्मचिन्हे असून त्यांचे देहावर नित्य धारण केले जाते. त्यामुळे साधकाचे निषिद्ध प्रवृत्तींपासून रक्षण होते. जंगम वारंवार ज्ञानोपदेश करून साधकाची बुद्धी निर्मल ठेवून तिचे रक्षण करतो. ‘जपतो नास्ति पातकम्’ या उक्तीप्रमाणे गुरूने दिलेल्या पंचाक्षरी मंत्राचा निरंतर जप केल्यामुळे साधकाला कोणत्याही पातकाचा स्पर्श होत नाही. दुरितापासून रक्षण करण्याची शक्ती मंत्रामध्ये असते. पादोदक व प्रसाद हे पूजेचे फलस्वरूप असून त्यांच्या नित्यसेवनाने साधकाच्या मनात प्रसन्नता व परिशुद्धी भरून राहते. अशाप्रकारे अष्टावरणे साधकाचे विविध प्रकारे रक्षण करतात.

अष्टावरणे साधनामार्गातील सर्व विघ्नांचे निवारण करून साधकाचे रक्षण करतात, म्हणून त्यांना ‘रक्षाकवच’ असे म्हटले जाते. प्रत्येक साधक हा अष्टावरणयुक्तच असावा लागतो. वीरशैवधर्मामध्ये अष्टावरणाला ‘अंग’ अशी संज्ञा आहे. करचरणादी अवयवांमुळे व्यक्तीचा जीवनव्यवहार सुरळीतपणे चालतो त्याप्रमाणे साधकाचा परमार्थ व्यवहार अष्टावरणामुळे सुरळीत चालतो व त्याला जीवनाचे लक्ष्य लाभते.

## पंचाचार

साधकाच्या जीवनामध्ये ज्ञानाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व आचरणाला आहे. शास्त्रविहित शुद्ध आचरणाला 'आचार' असे म्हणतात. आचार म्हणजे उत्तम वर्तन. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे उत्तम वर्णन करणे म्हणजे आचार होय. आत्मज्ञानसंपन्न शिवयोगी सदाचारी असला तरच त्याच्या ज्ञानाचा लोकांना उपयोग होतो. गाईचे दूध अमृतासमान असले तरी ते ज्या पात्रातून दिले जाते ते पात्र पवित्र असावे लागते. धातूच्या किंवा मातीच्या भांड्यात दूध दिले तरी ते लोक सहजपणे स्वीकारतात, परंतु जर तेच दूध मानवी कवटीत घालून दिले तर कोणीही त्याचा स्वीकार करणार नाही. म्हणून 'श्रीसिद्धान्तशिखामणी'मध्ये

**ज्ञानेनाचारयुक्तेन प्रसीदति महेश्वरः ।**
**तस्मादाचारवान् ज्ञानी भवदादेहपातनम् ।।** १६.१४

असे म्हटले आहे. तात्पर्य असे की, आचारसंपन्न ज्ञानी पुरुषावरच शिवकृपा होते. म्हणून ज्ञानी पुरुषाने शरीर असेपर्यंत आचारशीलच असले पाहिजे. सुवर्णालंकारामुळे शरीरसौंदर्य वृद्धिंगत होते त्याप्रमाणे आचाररूपी अलंकारामुळे ज्ञानी पुरुषाचे व्यक्तिमत्त्व अधिक शोभायमान होते. म्हणून प्रत्येकाने जीवन सार्थक करून घेण्यासाठी आणि लोकांकडून सन्मानित होण्यासाठी सदाचारसंपन्न असले पाहिजे. वीरशैवसिद्धान्तामध्ये लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार व भृत्याचार हे पंचाचार प्रतिपादन केले आहेत.

अंगरूपी जीवाला लिंगरूपप्राप्तीसाठी केला जाणारा जो आचार तोच लिंगाचार होय. शरीराने लिंगाची पूजा, वाणीने लिंगाची स्तुती व मन-बुद्धीने लिंगाचे ध्यान अशी त्रिकरणांनी लिंगाराधना करणे, हाच लिंगाचार होय.

धर्ममार्गाने अर्जित केलेल्या संपत्तीचे गुरू, लिंग, जंगमांना संतर्पण करणे हा सदाचार होय. संतर्पण म्हणजे अन्न, वस्त्र, धन इत्यादी अर्पण करून तृप्त करणे. सदाचाराची अंकुरशील, उत्पन्नशील, द्विदलशील, प्रवृद्धशील, सप्रकांडशील, सशाखशील, सपुष्पशील व सफलशील अशी आठ शीले सांगितली आहेत.

शिव हा या जगताचा सृष्टिकर्ता, पालनकर्ता व संहारकर्ता असून त्याच्यावर निग्रह व अनुग्रह करणारा आहे. उत्पत्ती, स्थिती, संहार, निग्रह व अनुग्रह ही पंचकृत्ये शिवच करतो. म्हणून शिवाशिवाय शरणागतीसाठी अन्य कोणतेही

स्थान नाही, अशा अनन्यभावनेने शरण जाणे म्हणजे शिवाचार होय. शिवाचारामध्ये द्रव्य, क्षेत्र, गृह, भांड, तृण, काष्ठ, वीटिका, पाक, रस, भव, भूत, भाव, मार्ग, काल, वाक् व जन अशा सोळा प्रकारच्या पदार्थांच्या शुद्धी सांगितल्या असून हे पदार्थ शास्त्रोक्तरित्या शुद्ध करून त्यांचा उपभोग घेणे हाच शिवाचार होय.

भक्तगणांकडून आचरिला जाणारा श्रेष्ठ आचार म्हणजे गणाचार. इष्टदेवता, गुरू आणि धर्म यांची निंदा श्रवण न करणे हे गणाचाराचे वैशिष्ट्य आहे. कोणी शिवनिंदा केली तर त्याचा प्रतिकार करणे, त्याला शिक्षा करणे आणि प्रतिकाराचे सामर्थ्य नसेल तर त्या स्थलाचा त्याग करणे याला गणाचार म्हणतात. गणाचारामध्ये वाणी, पाद, त्वचा, चक्षू, जिव्हा, कर्ण, शरीर आणि मन यांच्या शुद्धीकरणासाठी एकूण ६४ प्रकारच्या शीलांचे प्रतिपादन केले आहे.

शिव आणि शिवभक्त हे पृथ्वीतलावरील श्रेष्ठ असून मी त्यांचा सेवक आहे, या भावनेने शिवाची आणि शिवभक्तांची सेवा करणे हा भृत्याचार होय. भृत्याचारी भक्त गुरूला तन, लिंगाला मन आणि जंगमाला धन समर्पित करून स्वत:ला त्यांचा भृत्य मानून त्याप्रमाणे आचरण करतो.

अशा रीतीने विविध शीलांनी युक्त असलेल्या पाच प्रकारच्या आचारांचे निष्ठापूर्वक पालन केल्यामुळे साधक शिवकृपेला पात्र होतो आणि समाजामध्ये सर्व लोकांकडून सन्मानित होतो. म्हणून शिवकृपा आणि लोकगौरव प्राप्त करून घेण्यासाठी पंचाचाराचे निष्ठेने पालन केले पाहिजे.

### षट्स्थल

वीरशैवदर्शनामध्ये परशिव तत्त्वाला 'स्थल' अशी संज्ञा आहे. ज्यामध्ये जग स्थित असते आणि ते ज्यामध्ये प्रलयकाली लय पावते त्या तत्त्वाला 'स्थल' असे म्हणतात. त्यालाच 'लिंग' असेही नाव आहे. लिंग शब्दाचा अर्थदेखील स्थल शब्दाच्या अर्थासारखाच आहे. प्रलयकाली ज्या तत्त्वामध्ये जग विलय पावते आणि सृष्टिकाली ज्यातून जग प्रकट होते असे तत्त्व म्हणजे 'लिंग' होय. अशा रीतीने जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाला कारण असलेले स्थलतत्त्वच सृष्टीची लीला करण्यासाठी लिंगस्थल आणि अंगस्थल असे द्विविध होते. त्याचवेळी स्थलतत्त्वात समवायसंबंधाने युक्त असलेली चिच्छक्तीदेखील कला आणि भक्ती अशी दोन रूपे धारण करते. कला लिंगाचा आश्रय घेते तर भक्ती

अंगाचा आश्रय घेते. असे कलाशक्तियुक्त लिंग आणि भक्तिशक्तियुक्त अंग हे प्रत्येकी सहा भागांमध्ये विभक्त होते. त्यावेळी आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग अशी लिंगस्थलाची सहा रूपे होतात. लिंगस्थल उपास्य होते. त्याच्या उपासनेसाठी अंगस्थलसुद्धा भक्त, माहेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य अशी सहा रूपे धारण करते.

अंगस्थलातील जीव क्रमश: श्रद्धा, निष्ठा, अवधान, अनुभव, आनंद व समरस अशा सहा भक्तींच्या साहाय्याने आपल्या 'अंगत्वा'चा त्याग करून लिंगस्वरूपात समरस होतो. यालाच 'लिंगांगसामरस्य' म्हटले जाते. हे वीरशैवदर्शनाचे चरम लक्ष्य, अंतिम ध्येय होय. 'श्रीसिद्धान्तशिखामणी'मध्ये षट्स्थलसिद्धान्ताची १०१ उपस्थलांमध्ये सूक्ष्मातिसूक्ष्म अशी विभागणी करून ती स्थले विशद केली आहेत. अंगषट्स्थलामध्ये ४४ आणि लिंगषट्स्थलामध्ये ५७ अशा एकूण १०१ स्थलांचे विवेचन केले आहे. पहिली ४४ स्थले जीवाच्या मुक्तीचे साधन असून पुढील लिंगषट्स्थलातील ५७ स्थले जीवन्मुक्तीची अवस्था प्रतिपादन करतात. ह्या १०१ स्थलांचे विवेचन पाहिल्यावर ग्रंथकर्ते श्रीशिवयोगी शिवाचार्य हे श्रेष्ठ मनोवैज्ञानिक होते, असे लक्षात येते. त्यांनी सांगितल्याप्रमाणे शुद्ध मनोबुद्धीच्या साहाय्याने साधक शिवयोगी जीवन्मुक्तीचा विलक्षण आनंदानुभव घेऊ शकतो. लौकिक जीवनामध्ये जे शब्दस्पर्शादी विषयजन्य सुख असते ते क्षणिक असते. सर्वविषयविरहित सामरस्याचा आनंद केवळ अप्रतिम व अखंड असतो. म्हणून साधक शिवभक्त अष्टावरणयुक्त होऊन त्रिकरणशुद्धी करणाऱ्या पंचाचाराचे पालन करीत या मनोविकास मार्गावर प्रवास करीत लिंगांगसामरस्यरूपी मुक्ती प्राप्त करून घेतो.

**समारोप**

हे सर्व विषय प्रस्तुत ग्रंथामधील प्रकरणांमध्ये विस्तारपूर्वक सांगितले आहेत. त्याचेच विहंगमावलोकन उपसंहारामध्ये केले आहे. या संपूर्ण ग्रंथाचे अध्ययन करून वीरशैव साधकाने वीरशैवधर्मदर्शनाचे ज्ञान प्राप्त करून घ्यावे व षट्स्थलमार्गक्रमण करून लिंगांगसामरस्य प्राप्त करून घ्यावे. इति शिवम्।

■■

# पारिभाषिक संज्ञा

**अष्टावरण** : गुरू, लिंग, जंगम, भस्म, रुद्राक्ष, प्रसाद, पादोदक, मंत्र

**कला** : निवृत्तिकला, प्रतिष्ठाकला, विद्याकला, शांतिकला, शांत्यतीतकला, शांत्यतीतोत्तराकला

**कारण** : उपादानकारण, निमित्तकारण

**गुरू** : दीक्षागुरू, शिक्षागुरू, ज्ञानगुरू

**जंगम** : स्वयजंगम, चरजंगम, परजंगम

**तत्त्वे** (छत्तीस ) : (१) शिव, (२) शक्ती, (३) सदाशिव, (४) ईश्वर, (५) शुद्धविद्या (ही पाच शुद्ध तत्त्वे);

(६) माया, (७) कला, (८) विद्या, (९) राग, (१०) काल, (११) नियती, (१२) पुरुष (ही सात शुद्धाशुद्ध तत्त्वे);

(१३) प्रकृती, (१४) महत्, (१५) अहंकार, (१६) मन, (१७) श्रोत्र, (१८) त्वक्, (१९) चक्षू, (२०) जिव्हा, (२१) घ्राण, (२२) वाक्, (२३) पाणि, (२४) पाद, (२५) पायु, (२६) उपस्थ, (२७) शब्द, (२८) स्पर्श, (२९) रूप, (३०) रस, (३१) गंध, (३२) आकाश, (३३) वायू, (३४) अग्नी, (३५) जल, (३६) पृथ्वी (ही चोवीस अशुद्ध तत्त्वे).

(दृश्य व अदृश्य विश्व म्हणजे ३६ तत्त्वांचा समूह.)

**दीक्षा** : वेधदीक्षा, क्रियादीक्षा, मंत्रदीक्षा

**पंचकृत्ये** (शिवाची) : सृष्टी, स्थिती, संहार, निग्रह, अनुग्रह

**पंचक्लेश** : अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश

**पंचमुखे** (शिवाची) : सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान

**पंचपीठे** : रंभापुरी, उज्जयिनी, केदार, श्रीशैल, काशी

**पंचसूतके** : जननसूतक, मरणसूतक, रज:सूतक, उच्छिष्टसूतक, जातिसूतक

**पंचाचार** : लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार, भृत्याचार

**पंचाचार्य** : रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य, विश्वाराध्य

**पातके** : अतिपातक, महापातक, अनुपातक, उपपातक, संकरीकरण, अपात्रिकरण, जातिभ्रंशकरण, मलावह, प्रकीर्तक

**पादोदक** (त्रिविध) : दीक्षापादोदक, शिक्षापादोदक, ज्ञानपादोदक

**प्रसाद** (त्रिविध) : शुद्धप्रसाद, सिद्धप्रसाद, प्रसिद्धप्रसाद

**भक्ती** (षड्विध) : श्रद्धाभक्ती, निष्ठाभक्ती, अवधानभक्ती, अनुभवभक्ती, आनंदभक्ती, समरसभक्ती

**भस्म** (द्विविध) : सोपाधिक भस्म, निरुपाधिक भस्म

**भस्मधारण** : भस्मस्नान, भस्मोद्धूलन, त्रिपुंड्र

**भस्मनिर्मितीप्रक्रिया** : कल्प, अनुकल्प, उपकल्प, अकल्प

**भस्मप्रकार** : विभूती, भसित, भस्म, क्षार, रक्षा

**मल** (मलत्रय) : आणवमल, मायामल (मायीयमल), कार्मिकमल (कार्ममल)

**मंत्रदोष** : मूक, सुप्त, मृत, नग्न, वीर्यहीन, वृथाफल, भुजंग, कीलित, शून्य

**मंत्रोच्चार दोष** : अभक्त, अक्षरभ्रांती, लुप्त, कथन, स्वप्नदोष

**लिंग** : इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग

**वीरशैव प्रभेद** : सामान्य वीरशैव, विशेष वीरशैव, निराभारी वीरशैव

**शक्ती** : इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती

**शिवागम** (अठ्ठावीस) : (१) कामिकागम, (२) योगजागम, (३) चिन्त्यागम, (४) कारणागम, (५) अजितागम, (६) दीप्तागम, (७) सूक्ष्मागम, (८) सहस्रागम, (९) अंशुमानागम, (१०) सुप्रभेदागम, (११) विजयागम, (१२) निःश्वासागम, (१३) स्वायंभुवागम, (१४) अनलागम, (१५) वीरागम, (१६) रौरवागम, (१७) मकुटागम, (१८) विमलागम, (१९) चंद्रज्ञानागम, (२०) बिम्बागम, (२१) प्रोद्गीतागम, (२२) ललितागम, (२३) सिद्धागम, (२४) संतानागम, (२५) शर्वोक्तागम, (२६)पारमेश्वरागम, (२७) किरणागम, (२८) वातुलागम

(यांपैकी पहिले १० आगम शिवाने व पुढील १८ आगम रुद्राने उपदेशिलेले आहेत.)

**षट्स्थल** : भक्तस्थल, माहेश्वरस्थल, प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल

**षड्दर्शने** : न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा, अद्वैतवेदान्त

**षड्लिंग** : आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग, महालिंग

**सप्त स्नाने** : मांत्रस्नान, भौमस्नान, आग्नेयस्नान, वायव्यस्नान, दिव्यस्नान, वारुणस्नान, मानसस्नान

□

# संदर्भग्रंथ


**संस्कृत**

०१. अर्थसंग्रहः, चौखम्बा संस्कृत सीरीज, वाराणसी, १९७६
०२. अद्वैतसिद्धिः, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९३७
०३. अनुभवसूत्रम् (तन्त्रसंग्रहः, भाग १), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९७०
०४. अभिज्ञानशाकुंतलम्, चौखंबा, ओरियण्टालिया, वाराणसी, १९८७
०५. अमरकोशः, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान, दिल्ली, १९८४
०६. अष्टप्रकरणम्, सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
०७. आगममीमांसा, ला. बा. के. संस्कृत विद्यापीठम्, नई दिल्ली, १९८२
०८. ईशाद्यष्टोत्तरपनिषदः, नि. सा. प्रेस, मुंबई, १९२५
०९. ईशावास्योपनिषत् शांकरीव्याख्या, शंकरविलास संस्कृत पाठशाला, मैसूर, १९७६
१०. ईश्वरप्रत्यभिज्ञाविमर्शिनी, काश्मीर संस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९१८–२१
११. ईश्वरप्रत्यभिज्ञाविवृतिविमर्शिनी, काश्मीर संस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९३८–४१
१२. उपनिषद्वाक्यमहाकोशः, गुजरात प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९४०
१३. ऋग्वेदसंहिता, वैदिक संशोधन मंडळ, पुणे, १९४१
१४. एकाक्षरनामकोषसंग्रहः, राजस्थान प्राच्यविद्या प्रतिष्ठान, जोधपूर, १९६४
१५. कारणागमः, पंचाचार्य ई प्रेस, मैसूर, १९५६
१६. क्रियासारः, भाग १–३, प्राच्यविद्या संशोधनालय, मैसूर, १९५४–५७–५८ इ०
१७. चंद्रज्ञानागमः, पंचाचार्य ई. प्रेस, मैसूर, १९५६
१८. तत्त्वप्रकाशः (अष्टप्रकरणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
१९. तत्त्वसंग्रहः
२०. तन्त्रयात्रा, रत्ना प्रकाशन, वाराणसी, १९८२
२१. तंत्रवार्तिकम् (शाबरभाष्यव्याख्या), भाग २–४, आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलिः, पुणे, १९८१–८४
२२. तंत्रसारः, काश्मीरसंस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९१८
२३. तन्त्रालोकः, भाग १–१२, काश्मीर संस्कृत ग्रन्थावलिः, श्रीनगर, १९१८–२२
२४. नारदभक्तिसूत्रम्, गीताप्रेस, गोरखपूर, २०३९ वि.सं.
२५. नित्याषोडशिकार्णवः (द्वितीय संस्करणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८४

२६. नेत्रतंत्रम्, परिमल पब्लिकेशन्स, दिल्ली, १९८५
२७. न्यायकोशः, भांडारकर प्राच्यविद्या संशोधनालय, पुणे, १९२८
२८. न्यायसारः, निर्णयसागरप्रेस, बंबई, १९१०
२९. न्यायसूत्रभाष्यम् (न्यायदर्शनम्), चौखम्बा संस्कृत संस्थान, वाराणसी, १९७०
३०. पंचदशी, भार्गव पुस्तकालय, वाराणसी, १९५६
३१. पद्मपुराणम्, मनसुखराय मोर, कलकत्ता, १९५७
३२. परमार्थसारः, काश्मीरसंस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९१६
३३. परमोक्षनिरासकारिका (अष्टप्रकरणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
३४. पारमेश्वरतन्त्रम्, वीरशैवलिंगिब्राह्मणग्रन्थमाला, सोलापूर, १९०४
३५. पाराशरस्मृतिः श्रीवेंकटेश्वर स्टीम प्रेस, मुंबई, १९८१ वि.सं.
३६. प्रत्यभिज्ञाहृदयम्, काश्मीर संस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९११
३७. प्रबोधसुधाकरः, ओरिएण्टल बुक एजंसी, पुणे, १९५२
३८. प्रशस्तपादभाष्यम्, न्यायकन्दलीसंवलितम्, सं.सं.वि.वि., वाराणसी, १९७७
३९. बृहन्नारदीयपुराणम्, नाग पब्लिकेशन्स, दिल्ली, १९८४
४०. ब्रह्मसूत्रशांकरभाष्यम् (भामतीसहितम्), निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९०९
४१. ब्रह्मसूत्रश्रीकरभाष्यम्, १-२ भाग, प्राच्यविद्या संशोधनालय, मैसूर, १९७७
४२. ब्रह्मसूत्रश्रीकंठभाष्यम्, शिवार्कमणिदीपिकासहितम्, जंगमवाडीमठ, वाराणसी, १९८६
४३. भक्तिरसविमर्शः, डॉ. कपिलदेव ब्रह्मचारी, आचार्य गद्दी, फतुहा, पटणा, १९८०
४४. भगवद्गीता, अच्युतग्रंथमाला, वाराणसी, २०२३ वि.सं.
४५. भास्करी, सरस्वतीभवन टेक्स्ट नं० ८३, इलाहाबाद, १९५०
४६. भोगकारिका (अष्टप्रकरणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
४७. मतंगपारमेश्वरागमः, फ्रेंच इन्स्टिट्यूट, पांडिचेरी, १९७७
४८. मनुस्मृतिः, मन्वर्थमुक्तावलीसमेता, खेमराज श्रीकृष्णदास, मुंबई, १९४५ वि.सं.
४९. महार्थमंजरी, सं.सं.वि.वि., वाराणसी, १९७२
५०. महानारायणोपनिषत्, शैवभाष्योपेता, जंगमवाडीमठ, वाराणसी, १९२९
५१. महाभारतम् (षष्ठ खंड), गीता प्रेस, गोरखपूर, २०४४ वि.सं.
५२. महिम्नःस्तोत्रम्, चौखम्बा संस्कृत संस्थान, १९४४
५३. मालिनिविजयोत्तरतंत्रम्, काश्मीर संस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९२२
५४. मीमांसान्याप्रकाशः, भांडारकर प्राच्यविद्या संशोधनालय, पुणे, १९७२

५५. मृगेंद्रागमः, काश्मीरसंस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९३०
५६. मोक्षकारिका (अष्टप्रकरणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
५७. योगिनीहृदयम्, मोतीलाल बनारसीदास, वाराणसी, १९८८
५८. योगसूत्रभाष्यम् (तत्त्ववैशारदीसहितम्), जीवानन्द विद्यासागर, कलकत्ता, १९४०
५९. रघुवंशमहाकाव्यम्, छन्नूलाल ज्ञानचन्द पाठक, वाराणसी
६०. रत्नत्रयम् (अष्टप्रकरणम्), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८८
६१. रौरवागमः, फ्रेंच इन्स्टिट्यूट, पाँडेचेरी, १९६१
६२. लिंगधारणचन्द्रिका, शैवभारती भवनम्, जंगमवाडी मठ, वाराणसी, १९८८
६३. लिंगपुराणम्, पुव्वाड व्यंकटराय, कांची, १८७९
६४. लुप्तागमसंग्रहः (भाग २), सं.सं.वि.वि., वाराणसी, १९८३
६५. वाचस्पत्यम् (प्रथम खंडम्), तारानाथ भट्टाचार्य, कलकत्ता, १८७३
६६. वातुलशुद्धाख्यतन्त्रम् (तन्त्रसंग्रहः, भाग १) सं०सं०वि०वि०, वाराणसी, १९७०
६७. वायुपुराण, खेमराज श्रीकृष्णदास, मुंबई, १९३३
६८. विज्ञानभैरवः, मोतीलाल बनारसीदास, वाराणसी, १९८४
६९. विवेकचूडामणिः, ओरिएण्टल बुक एजंसी, पुणे, १९५२
७०. वीरशैवसदाचारसंग्रहः, वीरशैवलिंगब्राह्मणग्रन्थमाला, सोलापूर, १९०५
७१. वीरशैवानन्दचन्द्रिका, मुरुसाविर मठ, हुबळी, १९३६
७२. वीरशैवाष्टावरणप्रमाणष्टकाभरणम्, हस्तप्रतिः
७३. वेदान्तसारः, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९३४
७४. वेदान्तसारवीरशैवचिन्तामणिः, वी.लिं.ब्रा. ग्रन्थमाला, सोलापूर, १९०५
७५. वैदिकशिवपूजाविधिः, पंचाचार्य इ.प्रे., मैसूर, १९८२
७६. वैराग्यशतकम्, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी, १९६७
७७. वैशेषिकसूत्रम् (उपस्कारसहितम्), चौ.स.सं., वाराणसी, १९६९
७८. शक्तिविशिष्टाद्वैतदर्शनम्, रंभापुरी संस्थान मठ, बालेहोन्नूर, १९६१
७९. शतरत्नसंग्रहः, संस्कृत पुस्तक भंडार, कलकत्ता, १९४४
८०. शब्दकल्पद्रुमः, राजा राधाकांत देव बहादूर, कलकत्ता, १८८६
८१. शांडिल्यभक्तिसूत्रम्, गीताप्रेस, गोरखपूर, २००९ वि.सं.
८२. शारदातिलकम्, आगमानुसंधान समिति, कलकत्ता, १९३३
८३. शिवगीता, पीतांबरा पीठ, दतिया, १९६०

८४. शिवतत्त्वरत्नाकर: (भाग १-२), प्राच्यविद्या संशोधनालय, मैसूर, १९६४, १९६९
८५. शिवदृष्टिः, काश्मीरसंस्कृत ग्रंथावलिः, श्रीनगर, १९३४
८६. शिवमहापुराणम्, पण्डित पुस्तकालय, काशी, २०२० वि.सं.
८७. शिवसूत्रम् (विमर्शिनीसहितम्), काश्मीर संस्कृत ग्रन्थावलि, श्रीनगर, १९६८
८८. शिवार्चनचंद्रिका, शिवागमसंघ, देवसालनगर, १९२२
८९. शिवाद्वैतदर्पणः, पूवल्ली बृहन्मठ ग्रन्थमाला, हुली १९२८
९०. शिवाद्वैतपरिभाषा, जंगमवाडी मठ, वाराणसी, १९८३
९१. शैवदर्शनबिंदुः, सं.सं.वि.वि., वाराणसी, १९६८
९२. श्रीमद्भागवतम्, भागवत विद्यापीठ, अहमदाबाद, २०२९ वि.सं.
९३. सर्वदर्शनसंग्रहः, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी, १९६४
९४. सर्वदर्शनसंग्रहः, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे १९२४
९५. सारस्वती सुषमा (त्रैमासिक अनुसंधानपत्रिका), सं.सं.वि.वि., वाराणसी
९६. सिद्धान्तशिखामणि: (तत्त्वप्रदीपिका व्याख्या व मराठी भावानुवादासह), वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९०
९७. सिद्धान्तशिखामणिः, तात्पर्यदीपिकाकन्नडव्याख्यासहितः, एन. आर. करिबसवशास्त्री, मैसूर, १९२१
९८. शिवयोगिशिवाचार्यविरचित श्रीसिद्धान्तशिखामणी, शैवभारती शोधप्रतिष्ठानम्, जंगमवाडी मठ, वाराणसी, २००७
९९. सिद्धान्तशिखोपनिषद्वीरशैवभाष्यम्, शंकरविलास संस्कृत पाठशाला, मैसूर, १९८५
१००. सूक्ष्मागमः, काशीनाथ ग्रन्थमाला, मैसूर, १९५६
१०१. स्कन्दपुराणम्, खेमराज श्रीकृष्णदास, मुंबई, १९६५ वि.सं.

**हिंदी**

१०२. आगम और तंत्रशास्त्र, पं. व्रजवल्लभ द्विवेदी, परिमल पब्लिकेशन, दिल्ली, १९८४
१०३. गो-अंक (कल्याण विशेषांक) गीता प्रेस, गोरखपूर, १९४५
१०४. भारतीयदर्शन, पं. बलदेव उपाध्याय, शारदा मंदिर, वाराणसी, १९६०
१०५. भारतीय संस्कृति और साधना, म. म. गोपीनाथ कविराज, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटना, १९६३
१०६. शक्तिविशिष्टाद्वैतसिद्धान्त, पं. काशीनाथ शास्त्री, काशी वीरशैव विद्वत् संघ, जंगमवाडी मठ, १९३७

१०७. शंकरदिग्विजय, पं. बलदेव उपाध्याय, श्रीश्रवणनाथ ज्ञानमंदिर, हरद्वार, २०४२ वि.सं.
१०८. शिवांक (कल्याण विशेषांक), गीता प्रेस, गोरखपूर, १९३३
१०९. हिंदी विश्वकोश, नागेंद्रनाथ वसु एण्ड विश्वनाथ वसु, कलकत्ता, १९३०
११०. हिंदुत्व, रामदास गौड, शिवप्रसाद गुप्त सेवा उपवन, वाराणसी, १९९५ वि.सं.
१११. वीरशैव संस्कृति एवं दर्शन, शैवभारती शोधप्रतिष्ठानम्, जं. म., वाराणसी, २०१७

**कन्नड**

११२. अष्टावरणविवेक, श्री ष०ब्र० शंभुलिंग शिवाचार्य, विजापूर, १९२३
११३. इष्टलिंगविज्ञान, श्रीअक्कुलय्य दीक्षित, प्रबोधपुस्तकमाला, बेंगलोर, १९४६
११४. वीरशैवचिंतामणि, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, १९७१
११५. शिवतत्त्वदर्शन, श्रीगुरुदेव शिवाचार्य, शंकर आर्टस् कॉलेज, नवलगुंद, १९७२

**मराठी**

११६. श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य, शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ वाराणसी, २००१
११७. वीरशैवरत्न, काशीनाथशास्त्री, जंगमवाडी मठ, वाराणसी, १९५२
११८. मन्मथगाथा, काडादी वीरशैव धर्मादाय निधी, सोलापूर, १९६५
११९. म्हणे मन्मथशिवलिंग, शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी, २०१८
१२०. विभूतिवैभव, अंक ६१, जुलै ते सप्टेंबर २००७

**इंग्रजी**

१२१. अभिनव गुप्त : ॲन हिस्टॉरिकल स्टडी, डॉ. कांतिचंद्र पांडेय, चौ. सं. सिरीज, वाराणसी, १९६३
१२२. अ हॅण्डबुक ऑफ वीरशैविजम, एस.सी. नन्दीमठ, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, १९७९
१२३. अ हिस्ट्री ऑफ साउथ इण्डिया, के. ए. नीलकंठशास्त्री, ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस, १९६६
१२४. क्रम तांत्रिसिज्म ऑफ काश्मीर, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, १९७९
१२५. दी इण्डियन रिव्ह्यू, (जर्नल), वॉल्यूम १६, मे १९१५, मद्रास

□

# शैवभारती शोधप्रतिष्ठान

जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तरप्रदेश)२२१ ००१

## प्रकाशित ग्रंथ

| ग्रंथनाम | लेखक / संपादक | मूल्य रु. |
|---|---|---|
| १. **लिंगधारणचंद्रिका** (संस्कृत-मराठी) | नंदिकेश्वर शिवाचार्य | १२५ |
| २. **ब्रह्मसूत्रश्रीकंठभाष्यम्** (संस्कृत-हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १५० |
| ३. **वीरशैव अष्टावरण विज्ञान** (हिंदी व मराठी) | डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य | ५० |
| ४. **सिद्धान्तशिखामणिसमीक्षा** (संस्कृत) | डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य | २०० |
| ५. **निगमागम संस्कृति** (हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १५० |
| ६. **सूक्ष्मागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १२५ |
| ७. **चंद्रज्ञानागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १७५ |
| ८. **मकुटागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १०० |
| ९. **कारणागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. रामचंद्र पाण्डेय | १५० |
| १०. **निगमागमीयसंस्कृतिदर्शनम्** (संस्कृत-हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | २०० |
| ११. **पारमेश्वरागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | २०० |
| १२. **Chandrajnanagama** (Sanskrit-English) | Tr. by Dr. Rama Ghose | 300 |
| १३. **ईशावास्योपनिषद्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. जगन्नाथशास्त्री तैलंग | १०० |
| १४. **केनोपनिषद्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. जगन्नाथशास्त्री तैलंग | १५० |
| १५. **सिद्धान्तप्रकाशिका** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ७५ |
| १६. **Makutagama** (Sanskrit-English) | Tr. by Dr. Rama Ghose | 150 |
| १७. **शक्तिविशिष्टाद्वैततत्त्वत्रयविमर्शः** (संस्कृत) | डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य | २०० |
| १८. **अनुभवसूत्रम्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. जगन्नाथशास्त्री मुसलगांवकर | १२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | **सिद्धान्तशिखोपनिषद्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. जगन्नाथशास्त्री तैलंग | २५० |
| २०. | **ब्रह्मसूत्रशांकरीवृत्तिः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. केदारनाथ त्रिपाठी | १५० |
| २१. | **सिद्धान्तसारावलिः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ४०० |
| २२. | **श्रीगुरुगीता** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १२५ |
| २३. | **शिवाद्वैतदर्पणः** (संस्कृत-हिंदी) | शिवानुभव शिवाचार्य | १०० |
| २४. | **सिद्धान्तशिखामणी मीमांसा** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं व्रजवल्लभ द्विवेदी | २५० |
| २५. | **देवीकालोत्तरागमः** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १०० |
| २६. | **Paramesvaragama** (English) | Tr. by Dr. Rama Ghose | 550 |
| २७. | **संस्कृत वाङ्मय में वीरशैव साहित्य** (हिंदी) | एस.अक्कुरमठ, संपा.प्रभुनाथ द्विवेदी | १५० |
| २८. | **ऋग्वेदस्यप्रथममंडलस्य सयणवेंकटमाधव-भाष्ययोस्तुलनात्मकमध्ययनम्** (संस्कृत-हिंदी) | डॉ. प्रमोदिनी पण्डा | ४०० |
| २९. | **तंत्रागमीय धर्मदर्शन** (भाग १ व २) (संस्कृत-हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ९०० |
| ३०. | **साम्ययोगमीमांसा** (संस्कृत-हिंदी) | मुकुट बिहारीलाल | ३०० |
| ३१. | **भारतीय संस्कृति का समग्र स्वरूप** (हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ३०० |
| ३२. | **संस्कृत वाङ्मय वल्लरी** (संस्कृत-हिंदी) | डॉ. गंगाधर पण्डा, डॉ. प्रमोदिनी पण्डा | ३०० |
| ३३. | **मुण्डकोपनिषद्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. जगन्नाथशास्त्री तैलंग | ४५० |
| ३४. | **वातुलशुद्धाख्यतंत्रम्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | २०० |
| ३५. | **Transmigration** (जन्मांतरवादः) (English) | पं. केदारनाथ त्रिपाठी | १५० |
| ३६. | **सांस्कृतिक राष्ट्रवाद** (हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ३०० |
| ३७. | **पारमेश्वरागम** (तेलुगू) | डॉ. के. प्रताप | ६०० |
| ३८. | **पंचविंशतिलीलाशतकम्** (संस्कृत-हिंदी) | संपा. पं. व्रजवल्लभ द्विवेदी | ३०० |
| ३९. | **Siddhanta Prakasika** (English) | Tr. by T. Ganeshan | 150 |
| ४०. | **पंचवर्णसूत्रमहाभाष्यम्** (संस्कृत-हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१. | **तंत्रागम सार–सर्वस्व** (हिंदी) | पं. व्रजवल्लभ द्विवेदी | १५० |
| ४२. | **श्वेताश्वतरोपनिषद्** (संस्कृत–हिंदी) | पं. जगन्नाथशास्त्री तैलंग | ३०० |
| ४३. | **सिद्धान्तशिखामणि** (हिंदी व्याख्या) | पं. राधेश्याम चतुर्वेदी | ४५० |
| ४४. | **सिद्धान्तशिखामणि प्रवचनप्रभे** (कन्नड) | डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य | ५०० |
| ४५. | **Siddhanta Shikhamani** (English) | Dr. M. Shivkumar Swami | 1400 |
| ४६. | **जन्म हा अखेरचा** | डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य (अनु. शे.दे.पसारकर) | ३५० |
| ४७. | **वीरशैव संतकवी बसवलिंग : चरित्र व वाङ्मय** | डॉ. चंद्रशेखर कपाळे | ८० |
| ४८. | **लक्ष्मण महाराज : व्यक्ती आणि वाङ्मय** | डॉ. भी. शि. स्वामी | ८० |
| ४९. | **श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य** | डॉ. शे. दे. पसारकर | २०० |
| ५०. | **वीरशैवांचे मराठी हिंदी वाङ्मय : एक अभ्यास** | डॉ. श्यामा घोणसे | १०० |
| ५१. | **मन्मथस्वामी : व्यक्ती आणि वाङ्मय** | डॉ. चंद्रकात देऊळगावकर | ८० |
| ५२. | **वीरशैव मराठी अभंगकविता : एक चिकित्सक अभ्यास** | डॉ. शोभा कराळे | १०० |
| ५३. | **मराठी काव्यातील शिवदैवत–दर्शन** | डॉ. शिवशंकर उपासे | १२५ |
| ५४. | **विदर्भातील वीरशैव संप्रदाय : ग्रंथकार व वाङ्मय** | डॉ. अशोक मेनकुदळे | १०० |
| ५५. | **वीरशैव संतकवी शिवदास : एक अभ्यास** | डॉ. वैजनाथ फास्के | १०० |
| ५६. | **वीरनाथ महाराजांची अभंगवाणी** | डॉ. विनय अपसिंगकर | ८० |
| ५७. | **श्रीरमतेरामकथामृत** (ओवीबद्ध) | डॉ. शे. दे. पसारकर | २० |
| ५८. | **श्रीमन्मथचरितामृत** (ओवीबद्ध) | डॉ. शे. दे. पसारकर | २० |
| ५९. | **वीरशैव पंचपीठे** | डॉ. चंद्रशेखर कपाळे | ३० |
| ६०. | **वीरशैव संतवाणी** | संपा. रे. रा. मगाई, ल. सि. हनगंडी, शे. दे. पसारकर | ३० |
| ६१. | **अष्टावरण** | डॉ. शे. दे. पसारकर | ३० |
| ६२. | **वीरशैव धर्माचा स्थूल इतिहास** | डॉ. चंद्रशेखर कपाळे | ३० |
| ६३. | **पंचाचार** | पं. शिवाप्पा खके | ३० |

६४. **वीरशैवांची स्फुट कविता** शांतितीर्थ स्वामी ३०

६५. **वीरशैवरत्न** पं. काशीनाथशास्त्री ५०

६६. **परमरहस्य** संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामी १००

६७. **श्रीसिद्धान्तशिखामणी** (अन्वयार्थ, मराठी भावार्थासह) डॉ. चंद्रशेखर कपाळे १००

६८. **श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत** (ओवीबद्ध पारायणग्रंथ) डॉ. शे. दे. पसारकर २००

६९. **श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा** (अभंगबद्ध) डॉ. शे. दे. पसारकर १००

७०. **श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय** (ओवीबद्ध पारायणग्रंथ) डॉ. शे. दे. पसारकर १५०

७१. **रेणुकगीताई** (अनुष्टुभ् छंदोबद्ध) डॉ. शे. दे. पसारकर १००

७२. **अभंगामृत** रेवणसिद्ध परंडकर महाराज १५०

७३. **वीरशैव संस्कृति एवं दर्शन** (हिंदी) सम्पा. डॉ. रमा घोष ३००

७४. **म्हणे मन्मथशिवलिंग** स्वाती साखरकर कराळे १५०

७५. **श्रीसिद्धान्तशिखामणी समीक्षा** डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य (अनु. शिवाप्पा खके) १२५

७६. **वीरशैव तत्त्वदर्शन** डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य (अनु. शे. दे. पसारकर) १२५

७७. **Principles Of Virasaivism** (English) Dr. Chandrashekhar Shivacharya Mahaswamiji, Tr. by Dr. M. Shivakumara Swamy 501

□

---

**ग्रंथासाठी संपर्क**

## शैवभारती शोधप्रतिष्ठान

जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तरप्रदेश) स्थिरभाष : 070843 21008

### श्रीधर श्रीराम पैलवान

१७०४, सोमवार पेठ, भवानी गल्ली, तासगाव, जि. सांगली चरभाष : 9527806750

### श्रीमद् जगद्गुरू पंचाचार्य बुकस्टॉल

शाहीर वस्ती, प्लॉट नं. ५५/४०, भवानी पेठ, सोलापूर. चरभाष : 9960222151




**शिवकवी डॉ. शेषनारायण देवाप्पा पसारकर**
एम्.ए., पीएच्.डी.


नागपूर विद्यापीठातून बी.ए., पुणे विद्यापीठातून एम्.ए. आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून पीएच्.डी. वीरशैव मराठी साहित्याचे संशोधक, अभ्यासक आणि लोकप्रिय वीरशैव लेखक-कवी. 'जन्म हा अखेरचा', 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत', 'श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय' आदी अनेक ग्रंथांची रचना. काशीपीठाकडून 'डॉ. चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्कार' व 'श्रीजगद्गुरू विश्वाराध्य विश्वभारती पुरस्कार' या पुरस्कारांनी आणि 'शिवकवी' या पदवीने सन्मानित.

श्रीकाशीमहास्वामीजींच्या 'शक्तिविशिष्टाद्वैततत्त्वत्रयविमर्श:' या डी.लिट्. पदवीप्राप्त संस्कृत शोधप्रबंधाचा साररूपाने मराठीत केलेला हा अनुवाद. वीरशैवधर्म व साहित्य, शक्तिविशिष्टाद्वैत, अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल व उपसंहार अशा सहा प्रकरणांत या ग्रंथाची मांडणी केलेली असून वीरशैव म्हणजे कोण, त्यांचे तत्त्वज्ञान कोणते? अशी जिज्ञासा असलेल्या वाचकांचे पूर्ण समाधान हा ग्रंथ निश्चित करू शकेल.


**शैवभारती शोधप्रतिष्ठान**
जंगमवाडी मठ, वाराणसी